निकोलाय अस्त्रोवस्की

अग्निदिव्य



निकोलाय अस्त्रोवस्की

अग्निदिव्य

(दोन भागांमधील कादंबरी)

भाग दुसरा

प्रगती प्रकाशन

मॉस्को

अनुवाद – अनिल हवालदार

सजावट – आ. रेझनिचेन्को

Николай Островский

КАК ЗАКАЛЯЛАСЬ СТАЛЬ

Книга II

на языке маратхи

सोविएत संघात मुद्रित

$О\frac{70302-308}{014(01)-80}764-80$

4702010200

प्रकरण पहिले

मध्यरात्र. शेवटच्या ट्रामगाडीचे खिळखिळे झालेले धूड खडखडत केव्हाच डेपोत परत गेले होते. चंद्राचा शीतल प्रकाश खिडकीच्या तावदानांवर पडला आहे आणि त्याची काचेतून पाझरलेली किरणे नेमकी बिछान्यावर पसरली असून बाकीची खोली मात्र अर्धवट अंधारात गुरफटलेली आहे. कोपऱ्यातील टेबलावर दिव्याच्या अर्धवर्तुळाकार प्रकाशात मान खाली घालून एका जाडजूड वहीत रीता लिहिते आहे. ती तिची दैनंदिनी आहे. तिची टोकदार पेन्सिल कुरूकुरू चाललीय :

"२४ मे,

"माझे विचार लिहून ठेवण्याचा मी पुन्हा एकदा प्रयत्न करते आहे. पुन्हा एकदा फार मोठे अंतर पडलेय. शेवटचे टिपण लिहिल्याला सहा आठवड्यांचा काळ उलटून गेला. पण त्याला माझा इलाज नव्हता.

"रोजनिशी लिहायला मला वेळ कुठून सापडणार? आता मध्यरात्र उलटून गेलीय आणि मी अजून लिहितेय. झोप मला चकवतेय. कॉम्रेड सेगाल आम्हाला सोडून चाललेत. ते मध्यवर्ती समितीमध्ये यापुढे काम करतील. ह्या बातमीने आम्ही सारेच बेचैन झालो होतो. आमचे लाझार अलेक्सान्द्रोविच मोठे छान गृहस्थ आहेत. त्यांची मैत्री आम्हा सर्वांच्या

दृष्टीने किती मोलाची आहे याची अगदी आत्तापर्यंत मला जाणीव नव्हती. ते निघून जातील तेव्हा विरोधविकासवादी भौतिकवादाच्या वर्गाचा पार बोऱ्या वाजणार. काल रात्री अगदी उशीरापर्यंत आम्ही त्यांच्या घरी बसलो होतो आणि आमच्या 'विद्यार्थ्यांच्या' प्रगतीची चाचणी घेत होतो. कम्सामोल गुबेर्निया समितीचा चिटणीस अकीम आणि तो भयंकर तुफ्तासुद्धा आले होते. त्या श्रीमान सर्वज्ञानीचे नुसते दर्शन माझ्या डोक्यात तिडिक उठवते! पक्षाच्या इतिहासा-वरील वादविवादात सेगाल यांचा शिष्य कोर्चागिन याने तुफ्ताचा मोठ्या हुशारीने पराभव केला, तेव्हा सेगाल यांना खूप आनंद झाला होता. म्हणजे हे दोन महिने काही वाया गेले नव्हते. अशी सुरेख फळे मिळतात तेव्हा केलेल्या श्रमांचे दु:ख वाटत नाही. झुखराय यांची लष्करी विभागाच्या खास खात्यामध्ये बदली होत आहे अशी अफवा आहे. याचे कारण मला तरी उलगडत नाही.

"लाझार अलेक्सान्द्रोविच यांनी आपला शिष्य माझ्या हवाली केलाय. 'जे मी सुरू केलंय ते तुम्ही पुरं करा' ते म्हणाले. 'अर्ध्यावरच थांबू नका. रीता, तुम्ही आणि तो असे एकमेकांपासून खूप काही शिकू शकाल. तो पोरगा अजून तेवढा सावरलेला नाही. त्याचा अस्वस्थ स्वभाव आहे आणि भावनेच्या आहारी तो जाण्याची शक्यता आहे. रीता, तुम्ही त्याच्या सर्वांत योग्य मार्गदर्शिका बनाल असा मला विश्वास वाटतो. मॉस्कोला मला पत्र पाठवायला विसरू नका. तुम्हाला सुयश इच्छितो.'

"सोलोमेन्स्क विभागीय समितीसाठी एक नवा चिटणीस आज मध्यवर्ती समितीकडून पाठविण्यात आला. त्याचे नांव

झार्कोय. तो सैन्यात होता तेव्हापासून मला माहीत आहे.

"उद्या द्मीत्री दुबावा कोर्चागिनला घेऊन येईल. थोडे दुबावाबद्दल लिहिते. मध्यम उंचीचा, बळकट, पिळदार बांध्याचा. १९१८ मध्ये कम्सामोलमध्ये दाखल झाला आणि १९२० पासून पक्षाचा सभासद आहे. "कामगारांच्या विरोधी बाजूचे" असल्याबद्दल ज्या तिघांना कम्सामोल गुबेर्निया समितीमधून हाकलून देण्यात आले होते, त्यांच्यापैकी हा एक होता. त्याला शिकविणे ही काही सोपी बाब नाही. दररोज असंख्य प्रश्न विचारून तो सबंध कार्यक्रम विस्कटून टाकतो आणि आम्हाला विषयांतराला भाग पाडतो. तो आणि माझी विद्यार्थिनी ओल्गा युरेनेवा ह्या दोघांचे अजिबात पटत नाही. त्यांच्या पहिल्याच भेटीत त्याने तिला आपादमस्तक निरखून म्हटले होते: 'म्हातारे, तुझा पोषाख अगदी ठार चुकीचा आहे. कातडी ठिगळं ढुंगणावर लावलेली पँट तू घातली पाहिजे होती, टोकदार टाचेचे बूट चढवायला पाहिजे होते, बुद्योन्नी टोपी आणि तलवार असा जामानिमा केला पाहिजे होता. हा आत्ताचा तुझा अवतार अगदीच धेडगुजरी आहे. ना मासा ना पक्षी!"

"ओल्गाला अर्थातच ते सहन झाले नाही आणि मला मध्यस्थी करावी लागली. दुबावा कोर्चागिनचा मित्र असावा असे मला वाटते. मला वाटते आज एवढे पुरे! झोपायची वेळ झाली."

भाजत्या सूर्याखाली जमीन सुकून गेली होती. रेल्वे फलाटा-वरील पादचारी पुलाच्या लोखंडी कठड्यांना नुसता स्पर्श

करताच चटका बसत होता. मनस्वी उन्हाळ्यामुळे थकले भागलेले आणि गलितगात्र बनलेले लोक मोठ्या कष्टाने पूल चढून जात होते. पुलावरून जाणाऱ्यांमध्ये प्रवासी फारसे नव्हते, तर रेलविभागातील रहिवासी होते. शहरात जाण्या-साठी ते ह्या पुलाचा वापर करीत.

पावेल पुलाच्या पायऱ्या उतरून खाली आला आणि रीता त्याच्या दृष्टीस पडली. त्याच्या आधीच ती स्टेशनावर पोचली होती आणि पुलावरून येणाऱ्या लोकांना बघत होती.

तिच्यापासून सुमारे तीन पावलांवर पावेल थांबला. तिचे त्याच्याकडे अजिबात लक्ष नव्हते. एका नव्याच कुतुहलाने तो तिला न्याहाळू लागला. तिने पट्ट्या पट्ट्यांचा पोलका घातला होता व साध्याशा कपड्याचा तोकडा गडद निळा स्कर्ट चढविला होता. एक मुलायम कातडी जाकीट तिच्या खांद्यावर टाकलेले होते. उन्हात रापलेल्या तिच्या चेहऱ्यावर केसांची विस्कटलेली एक बट विखुरली होती. मान किंचित मागे झुकवून आणि सूर्याची तिरीप लागल्यामुळे डोळे किंचित किलकिले करून ती ज्या झोकात उभी होती, त्यावरून कोर्चागिनला प्रथमच जाणीव झाली की, त्याची ही मैत्रिण आणि शिक्षिका केवळ कम्सामोल गुबेर्निया समितीची सदस्याच नाही, तर... असे "पापी" विचार आपल्या मनात यावेत याबद्दल त्याला स्वत:चाच राग आला आणि त्याने तिला मोठ्याने हाक मारली.

"एक तासभर मी तुला निरखून पाहतोय, पण तुझं काही माझ्याकडं लक्ष नाही," तो हसून म्हणाला. "चल, आपली आगगाडी एव्हाना स्टेशनात आली आहे."

फलाटाच्या दिशेने ते निघाले.

कम्सामोलच्या विभागीय परिषदेसाठी आपली प्रतिनिधी म्हणून गुबेर्नियां समितीने आदल्याच दिवशी रीताची निवड केली होती व तिचा साहाय्यक म्हणून तिच्याबरोबर कोर्चागिन जाणार होता. आगगाडीत कसे चढायचे ही त्यांच्या-पुढील या क्षणीची समस्या होती आणि ते काम खरोखरीच कठीण होते. जेव्हा आगगाड्या धावत अशा क्वचित प्रसंगी स्टेशनाचा ताबा पाच लोकांच्या एका अधिकारी समितीकडे असे. त्यांच्या परवानगीविना कुणालाही फलाटावर जाण्यास आणि आगगाडीत चढण्यास मनाई होती. फलाटाकडे जाणाऱ्या सर्व दरवाजांवर आणि रस्त्यांवर ह्या समितीची माणसे उभा पहारा देत होती. गर्दीने ठेचून भरलेल्या आगगाडीत प्रवासाला जाण्यास अधीर झालेल्या लोकांपैकी अगदी थोड्यांनाच प्रवेश मिळत होता. पण मागे राहून पुन्हा अनिश्चित काळपर्यंत पुढील आगगाडीची वाट पाहण्याची कुणाचीच इच्छा नव्हती. म्हणून अप्राप्य डब्यांमध्ये घुसण्यासाठी हजारो लोक फलाटांच्या दरवाजांकडे धावत होते. त्या काळात स्टेशनाला अक्षरश: वेढा पडत असे व काही वेळा घनघोर लढाया होत.

फलाटाच्या प्रवेशदारापाशी जमलेल्या गर्दीमधून घुसून वाट काढण्याचे प्रयत्न फसल्यानंतर, पावेलने रीताला सामानाच्या खोलीकडे नेले. त्याला स्टेशनच्या साऱ्या वाटा चांगल्या ठाऊक होत्या. मोठ्या कष्टाने ते चौथ्या डब्यापाशी पोचले. डब्याच्या दाराशी चेकाचा माणूस गर्दीला थोपवून धरीत होता. उन्हामुळे त्याच्या अंगातून घामाच्या धारा वहात होत्या. तो पुन:पुन्हा सांगत होता:

"डबा संपूर्ण भरला आहे आणि बफर्सवर किंवा टपावर बसून प्रवास करणं नियमांच्या विरुद्ध आहे."

चिडलेले लोक त्याच्यावर खेकसत होते, समितीने त्यांना दिलेली तिकीटे त्याच्या नाकासमोर नाचवीत होते. प्रत्येक डब्यापाशी संतापयुक्त शिव्यांची, आरोळ्यांची दंगल उसळली होती, धक्काबुक्की चालू होती. रीतसर डब्यात चढणे अशक्य होते याची पावेलला जाणीव झाली. तरीही आगगाडीत चढणे त्यांना अत्यावश्यक होते, नाही तर परिषदेला जाणे रद्द करावे लागले असते.

रीताला एका बाजूला नेऊन त्याने आपली पुढील योजना तिला समजावून सांगितली: तो आत घुसेल, खिडकी उघडील आणि तिला आत चढायला मदत करील. याशिवाय दुसरा मार्ग नव्हता.

"तुझं ते जाकीट मला दे. इतर कुठल्याही अधिकारपत्रा-पेक्षा ते जास्त चांगलं आहे," तो म्हणाला.

त्याने जाकीट अंगात चढवले आणि आपले पिस्तूल खिशात अशा काही खुबीने खोवले की, त्याची मूठ व दोरी बाहेर लोकांना दिसावी. पिशवी रीताच्या हाती देऊन डब्याच्या दारापाशी तो गेला, तेथे जमलेल्या उत्तेजित प्रवाशांना कोपरांनी रेटे देत त्याने दरवाजापर्यंत वाट काढली व दाराची मूठ हाती पकडली.

"ए कॉम्रेड, कुणीकडं?"

पावेलने नुसती मान तिरपी करून त्या ठेंगू व मजबूत बांध्याच्या चेकाच्या माणसाकडे शांतपणे पाहिले.

"मी खास खात्याचा माणूस आहे. ह्या डब्यातल्या सर्व प्रवाशांकडं समितीनं दिलेली तिकीटंच आहेत किंवा नाहीत याची मला तपासणी करायचीय," तो अशा काही सुरात बोलला, की त्याच्या अधिकाराबद्दल कुणालाही संशय वाटला नाही.

चेकाच्या माणसाने पावेलच्या पिस्तुलाच्या खिशावर एकदा नजर टाकली, आपले घामाने डवरलेले कपाळ शर्टाच्या बाहीने पुसले व थकलेल्या आवाजात तो म्हणाला:

"जा बाबा. तुला आत जाणं शक्य असेल तर खुशाल तपासणी कर."

आपल्या हातांचा, खांद्यांचा, अधूनमधून मुठींचा वापर करून पावेल आत घुसला. डब्यातल्या मधल्या जागेमध्ये आपल्या सामानावरच फतकल मारून बसलेल्या प्रवाशांच्या मधून तो रेटारेटी करून पुढे जाऊ लागला. वरच्या बर्थच्या कडांना त्याने दोन्ही हातांनी गच्च धरले होते. त्याच्यावर चारी बाजूंनी शिव्यांचा भडिमार चालला होता, पण त्याकडे त्याने संपूर्ण दुर्लक्ष केले.

"अरे सैताना, कुठं मरायला निघालायस?" खाली पाय टेकण्याच्या गडबडीत पावेलने चुकून एका गुबगुबीत बाईच्या गुडघ्याला बुटाचा निसटता स्पर्श केला तेव्हा ती ओरडली. आपले तब्बल २५२ पौंडांचे शरीर खालच्या बाकड्याच्या एका टोकावर टेकवून दोन पायांच्या गुडघ्यांच्या दरम्यान वनस्पती तेलाचा बुधला धरून ठेवण्याची करामत तिने केली होती. बाकीच्या सर्व फळ्यांवर तशाच प्रकारचे बुधले, पेटारे, पोती आणि टोपल्या ठेचून भरलेल्या होत्या. डब्यातले वातावरण कमालीचे कोंदले होते.

तिच्या शिव्यांकडे लक्ष न देता पावेलने मागणी केली:
"तुमचं तिकीट दाखवा!"

"माझं काय?" ह्या अप्रिय तिकीट तपासनीसाला उडवून लावण्याचा बाईने प्रयत्न केला.

अगदी वरच्या फळीवरून एक गलिच्छ आवाज गडगडला:

"वास्का, ह्या खोपडीच्याला काय पायजेल? त्याची पाठवणी कर बघू!"

वास्का नामक घिप्पाड शरीराचा आणि केसाळ छातीचा एक प्राणी पावेलच्या अगदी डोक्यावरच उगवला व त्याने आपले तांबारलेले डोळे पावेलवर सुस्तपणे रोखले.

"त्या बाईला उगा कटकट करू नको, समजलं? तुला तिकीट कशाला पायजे?"

शेजारच्या फळीवरून चार पायांच्या जोडचा एकदम लोंबकळू लागल्या. त्यांचे मालक एकमेकांच्या गळ्यात गळा घालून कडाकड आवाज करीत सूर्यफुलाच्या बिया फोडून खात होते. त्यांच्या चेहऱ्यांवर एक दृष्टिक्षेप टाकताच ते कोण होते याची पावेलला कल्पना आली. खाद्यपदार्थांचा काळाबाजार करणाऱ्यांची ती टोळी होती. ते अट्टल बदमाष देशभर प्रवास करीत होते व प्रचंड नफा उकळून खाद्यपदार्थ विकत होते. त्यांच्याबरोबर वेळ वाया घालवायला पावेलपाशी सवड नव्हती. कसेही करून लौकरात लौकर रीताला आत डब्यात घेणे आवश्यक होते.

खिडकीखाली उभ्या ठेवलेल्या एका लाकडी पेटीकडे बोट करून त्याने रेल्वेच्या गणवेषातल्या एका वयस्क माणसाला विचारले: "ती पेटी कुणाची?"

तपकिरी रंगाचे लांब पायमोजे घातलेल्या दोन लठ्ठ पायांच्या जोडीकडे निर्देश करीत तो माणूस उत्तरला: "तिची!"

खिडकी तर उघडणे आवश्यक होते आणि ती पेटी अडथळा करीत होती. ती ठेवायला कुठेच जागा नाही असे आढळले तेव्हा पावेलने ती सरळ उचलली आणि वरच्या फळीवर बसलेल्या त्या पेटीच्या मालकिणीच्या हाती ती दिली.

“जरा एक मिनिटभर धरा, मला खिडकी उघडायची आहे,” तो म्हणाला.

“माझ्या वस्तूला हात लावाल तर खबरदार!” पावेलने ती पेटी तिच्या गुडघ्यांवर ठेवली तेव्हा बसक्या नाकाची ती हडळ किंचाळली.

“मोत्का, हा माणूस स्वतःला कोण समजतोय?” तिच्या शेजारी बसलेल्या माणसाला उद्देशून ती म्हणाली. त्या माणसाने आपल्या पायातल्या सँडलसकट पावेलच्या पाठीत लाथ हाणली.

“ऐकलं का रे! तुझं नाकाड फोडायच्या आत चालता हो इथून!”

पावेलने मुकाट राहून ती लाथ सहन केली. खिडकी उघडण्याच्या खटपटीत तो गुंतला होता.

“जरा बाजूला व्हा कृपा करून,” त्या रेल्वेतल्या माणसाला तो म्हणाला.

वाटेतला आणखी एक बुधला बाजूला सारून पावेलने खिडकीपुढील जागा मोकळी केली. रीता खाली फलाटावर उभी होती. तिने चटकन पिशवी त्याच्या हाती दिली. वनस्पती तेलाचा बुधला पायांमध्ये धरलेल्या धिप्पाड बाईच्या मांड्यांवर पावेलने ती पिशवी फेकली, तो खाली वाकला आणि रीताचे हात पकडून त्याने तिला वर खेचले. हा नियमभंग गार्डाच्या लक्षात यायच्या आत रीता डब्याच्या आत आली होती व थोडा उशीरा आलेला गार्ड बाहेर फलाटावर शिरा ताणीत होता. रीताच्या प्रवेशाचे ठगांच्या टोळीने एवढ्या मोठ्या आरड्याओरड्याने स्वागत केले, की ती क्षणभर घाबरली. खाली पाय ठेवायला जागा नसल्यामुळे तिने खालच्या

बर्थच्या कडेवर पाय टेकवले व आधारासाठी वरच्या बर्थला हातांनी पकडले. साऱ्या बाजूंनी कमालीच्या अपशब्दांचा मारा झाला. वरून तो गलिच्छ खर्जातला आवाज ओरडला:

"बघा डुक्कर साला, प्रथम स्वतः आत घुसला आणि आता स्वतःच्या पोरीला खेचून घेतलंन!"

वरचा आवाज पिचकला: "मोत्का, त्याच्या दोन डोळयांच्या मधोमध एक ठेवून दे!"

आपली लाकडी पेटी पावेलच्या डोक्यावर उभी करण्याचा ती बाई आटोकाट प्रयत्न करीत होती. दुष्ट, पाशवी चेहऱ्यांच्या माणसांनी त्या दोन नवागतांना वेढले होते. अशा परिस्थितीला रीताला तोंड द्यावे लागत होते याबद्दल पावेलला वाईट वाटत होते, पण आहे ते गोड मानण्यापलिकडे दुसरे काहीही करणे शक्य नव्हते.

ज्याला मोत्का म्हणत होते त्याला उद्देशून पावेल म्हणाला: "तुझी पोती बाजूला सारून कॉम्रेडला बसायला जागा दे." पण यावर त्याला घाणेरड्या शिव्या ऐकायला मिळाल्या. पावेलला आता संताप आवरेना. त्याच्या उजव्या भुवईवरची नाडी थाडथाड उडू लागली व विलक्षण ठणकू लागली. "जरा थांब हलकटा, याचं उत्तर तुला द्यावं लागेल," त्या गुंडाला पावेल म्हणाला. तेवढ्याच वरून त्याच्या डोक्यावर लाथ बसली.

"शाब्बास वास्का, हाण आणखी एक!" सर्व बाजूंनी खुशीच्या आरोळया उमटल्या.

पावेलचे आत्मसंयमन आता सुटले आणि नेहमीप्रमाणे अशा वेळी त्याची हालचाल अत्यंत वेगाने आणि ठामपणे घडली.

"अरे हरामखोर सट्टेबाजांनो, तुम्ही असे सहजासहजी सुटून जाल असं वाटलं काय?" तो ओरडला आणि वरच्या फळीपर्यंत स्वतःला चपळपणे उचलून त्याने मोत्काच्या लबाड चेहऱ्यावर दाणदिशी ठोसा हाणला. तो सट्टेबाज उलटापालटा गडगडत इतर प्रवाशांच्या अंगांवर कोसळला.

"डुकरा, इथून चालता हो, नाहीतर तुम्हा सगळयांना मी गोळया घालीन!" आपले पिस्तूल त्या चौघांच्या तोंडां-समोर नाचवीत तो जोरात ओरडला.

आता परिस्थिती पालटली. रीता सावधपणे पहात होती. कोर्चागिनवर कुणी हल्ला चढविला तर गोळी झाडायची तिने तयारी ठेवली होती. वरची फळी ताबडतोब मोकळी झाली. ती टोळी घाईघाईने पुढच्या डब्यात पसार झाली.

रिकाम्या फळीवर रीताला चढायला पावेलने मदत केली व हळूच तो तिला म्हणाला: "तू इथं बैस. त्या हलकटांचा मी समाचार घेतो."

रीताने त्याला थोपविण्याचा प्रयत्न केला. "त्यांच्याशी पुन्हा मारामारी तर करणार नाहीस ना?"

"नाही, नाही," त्याने तिची समजूत घातली. "मी लौकरच परत येतो."

त्याने पुन्हा खिडकी उघडली आणि फलाटावर तो उतरला. त्यानंतर काही मिनिटांच्या अवधीत तो चेकाच्या वाहतुक विभागाच्या बुर्मेईस्तेर यांच्याकडे पोचला. त्याचे ते पूर्वीचे प्रमुख होते. त्या लात्वियाच्या माणसाने पावेलचे म्हणणे ऐकून घेतले आणि हुकूम दिले की, सबंध डबा रिकामा करावा व सर्व उतारुंचे कागदपत्र तपासावेत.

"अगदी मी म्हणतोय तस्संच घडतंय," बुर्मेईस्तेर गरजले.

"इथं पोचण्यापूर्वीच आगगाड्या काळ्याबाजारवाल्यांनी गच्च भरून येतात."

चेकाच्या दहा माणसांनी डबा मोकळा केला. पावेलने तात्पुरते आपले पूर्वीचे काम अंगावर घेतले व प्रवाशांचे कागदपत्र तपासण्यास मदत केली. आपल्या पूर्वीच्या चेका सहकाऱ्यांशी त्याने संपर्क ठेवलेला होता व कम्सामोलचा चिटणीस या नात्याने काही सर्वोत्तम कम्सामोल सभासदांना चेकामध्ये काम करायला पाठवले होते. तपासणी संपल्यानंतर पावेल रीतापाशी परत आला. आता डब्यामध्ये अगदी वेगळ्या तऱ्हेचे प्रवासी होते: लाल सैनिक आणि कामाच्या निमित्ताने प्रवासाला निघालेले कारखान्यांमधले व कचेऱ्यांमधले कामगार.

डब्याच्या एका कोपऱ्यातील सर्वांत वरची फळी रीताने आणि पावेलने पकडली होती. पण वर्तमानपत्रांच्या गठ्ठ्यांनी एवढी जागा व्यापली, की फक्त रीताला झोपण्यापुरती जागा शिल्लक उरली.

"काही हरकत नाही, आपण जमवून घेऊ कसं तरी," ती म्हणाली.

अखेरीस आगगाडी एकदाची हलली. स्टेशनातून ती मंदगतीने बाहेर पडत असताना, फलाटावर आपल्या पोत्यांच्या ढिगावर बसलेल्या त्या लठ्ठ बाईचे त्यांना ओझरते दर्शन झाले. ती ओरडत होती:

"मान्का ऽऽ, माझा तेलाचा बुधला कुठाय?"

अपुऱ्या जागेत पावेल आणि रीता अवघडून बसले होते. वर्तमानपत्रांच्या गठ्ठ्यांमुळे त्यांना शेजाऱ्यांपासून आडोसा लाभला होता. पाव आणि सफरचंदांचा समाचार घेता घेता

ती दोघे आपल्या प्रवासाच्या आरंभीच्या अप्रिय प्रसंगाची आठवण करीत होती.

आगाडी सरपटत पुढे जात होती. रुळांच्या प्रत्येक सांध्यावर आगगाडीचे जुने, खिळखिळे झालेले आणि लोकांनी गच्च भरलेले डबे करकर आवाज करीत होते, जबरदस्त हादरत होते. खिडक्यांमधून गडद निळा संधिप्रकाश डोकावला. मग रात्रीने डब्याला काळोखात गुरफटून टाकले.

रीता दमली होती. पिशवीला डोके टेकून ती झोपी गेली. फळीच्या टोकाशी बसून पावेल सिगारेट ओढत राहिला. तोसुद्धा दमला होता, पण अंग पसरायला जागा नव्हती. उघडचा खिडकीतून रात्रीची ताजी झुळूक येत होती. धक्क्याने अचानक जाग्या झालेल्या रीताला अंधारात पावेलच्या सिगारेटचे फक्त जळके थोटुक दिसले. तिची गैरसोय करण्यापेक्षा सबंध रात्रभर तसे ताटकळत बसून राहणे, हे त्याच्या स्वभावाला अगदी अनुसरून होते.

"कॉम्रेड कोर्चागिन! ते भांडवलदारी रीतीरिवाज विसर आणि झोप पाहू," विनोदाने ती म्हणाली.

आज्ञाधारकपणे पावेल तिच्याशेजारी झोपला आणि अवघडलेले पाय त्याने आरामात सोडून दिले.

"उद्या आपल्याला कामाचे डोंगर उपसायचे आहेत. तेव्हा पुंडा, थोडी शांत झोप घ्यायचा प्रयत्न कर." तिने मोठ्या विश्वासाने त्याच्या मानेभोवती आपल्या हातांची मिठी घातली. तिचे केस आपल्या गालांना स्पर्शत आहेत असे त्याला जाणवले.

पावेलच्या दृष्टीने रीता पवित्र होती. ती त्याची सखी होती, साथी होती, त्याची राजकीय मार्गदर्शिका होती. पण त्याचप्रमाणे ती एक स्त्रीही होती: त्या पादचारी पुलाच्या

पायथ्याशी त्याला या गोष्टीची प्रथम जाणीव झाली होती. त्यामुळे आताच्या तिच्या मिठीमुळे तो जास्तच उत्तेजित झाला. तिचा शांत मंद श्वास त्याला जाणवत होता. त्याच्या अगदी जवळ कुठेतरी तिचे ओठ होते. तिच्या जवळिकीने ते ओठ शोधण्याची मनस्वी इच्छा त्याच्यात जागी झाली आणि मोठ्या प्रयत्नपूर्वक त्याने आपल्या भावना दडपल्या.

जणू काही त्याच्या भावना समजाव्यात अशा रीतीने रीताच्या चेहऱ्यावर अंधारात स्मित पसरले. वासनांचा आनंद आणि वियोगाचे दुःख अशा दोन्ही भावना एव्हाना तिच्या परिचयाच्या झाल्या होत्या. आपले प्रेम तिने दोन बोल्शेविकांना अर्पण केले होते. श्वेतरक्षकांच्या गोळ्यांनी त्या दोघांनाही तिच्यापासून हिरावून नेले होते. त्यांच्यातला एकजण फार मोठा माणूस होता: ब्रिगेडचा कमांडर होता; दुसरा, स्वच्छ निळ्या डोळ्यांचा मुलगा होता!

लौकरच चाकांच्या नियमित तालावर पावेलला झोप आली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी इंजिनाने कर्कश्य शिट्टी फुंकली तेव्हाच तो प्रथम जागा झाला.

रोज रात्री उशीरापर्यंत रीता कामात गुंतून रहात होती आणि आपली रोजनिशी लिहायला तिला सवडच सापडत नव्हती. काही दिवसांचा अवधी लोटल्यानंतर आणखी काही त्रोटक टिपणे तिच्या रोजनिशीत नमूद झाली:

"**११ ऑगस्ट**

"गुबेर्निया परिषद संपली. खार्कोवमध्ये भरणाऱ्या अखिल-युक्रेन परिषदेला हजर राहण्यासाठी अकीम, मिखाईलो व

इतर अनेकजण निघून गेलेत आणि कागदपत्रांच्या सर्व कामाची जबाबदारी माझ्या एकटीवर टाकून गेलेत. दुबावा आणि पावेल यांना गुबेर्नियां समितीमध्ये कामाला पाठवण्यात आले आहे. द्मीत्रीला ज्या क्षणापासून पेचेस्र्क विभागीय समितीचा चिटणीस नेमण्यात आले आहे त्या क्षणापासून वर्गाला येण्याचे त्याने बंद केले आहे. तो अगदी आकंठ कामात बुडालाय. पावेल थोडा अभ्यास करण्याचा प्रयत्न करतो, पण आमच्या-कडून फारसे काही होत नाही, कारण एकतर मी खूप कामात असते, किंवा त्याला कुठल्यातरी कामगिरीवर पाठवण्यात येते. रेल्वेवरच्या सध्याच्या ताणाच्या परिस्थितीमुळे कम्सा-मोलांना कामासाठी सतत एकवटले जात आहे. काल झार्कीय मला भेटायला आला होता. त्याच्यापासून मुलांना दूर नेण्यात येत आहे याबद्दल तो तक्रार करीत होता. त्याला स्वत:लाच मुलांची फार गरज आहे असे म्हणत होता."

"२३ ऑगस्ट

"आता मी कॉरिडॉरमधून चालले होते तेव्हा पानक्रातोव आणि आणखी एका माणसाबरोबर कोर्चागिनला व्यवस्थापकाच्या कचेरीच्या बाहेर उभा असलेला मी पाहिला. मी जेव्हा त्यांच्या थोडी जवळ गेले तेव्हा कोर्चागिनचे बोलणे मी ऐकले:

"'तिथं बसलेल्या लोकांना गोळ्या घाल्या पाहिजेत. आमचे हुकूम परत घेण्याचा तुम्हाला हक्क नाही,' तो म्हणतो. "रेल्वेची इंधन समिती इथं प्रमुख आहे आणि तुम्ही कम्सामोलवाल्यांनी तिच्यात लुडबुड करायचं काही कारण नाही. तुम्ही त्याचं थोबाड बघायला पाहिजे होतं... त्याच्या-

सारख्या परपुष्ट लोकांनी ती जागा नुसती बुजबुजलीय!' त्या पाठोपाठ त्याने काही भयानक अभद्र भाषा वापरली. पानक्रातोवने मला पाहताच त्याला ढोसून गप्प करण्याचा प्रयत्न केला. पावेल गर्रकन वळला आणि जेव्हा त्याने मला पाहिले तेव्हा त्याचा चेहरा एकदम फिका पडला. माझ्या डोळ्यांना डोळा न देता तो तिथून निघून गेला. आता तो बराच काळ आसपास फिरकायलचा नाही. अभद्र भाषा मला सहन होत नाही हे त्याला माहीत आहे."

"२७ ऑगस्ट

"आमच्या ब्यूरोची एक गुप्त बैठक झाली. परिस्थिती गंभीर बनत आहे. अजून तिच्याबद्दल तपशीलवार लिहिणे मला शक्य नाही. अकीम प्रादेशिक परिषदेहून आल्यापासून चिंताक्रांत दिसतोय. काल तेतेरेवजवळ आणखी एक रसद नेणारी आगगाडी रुळांवरून उलथविण्यात आली. हे रोजनिशी लिहिणे यापुढे मला जमेलसे वाटत नाही. ती खूपच विस्कळीत झालीय. मी कोर्चागिनची वाट पाहतेय. त्या दिवशी तो मला भेटला तेव्हा म्हणाला की, तो आणि झार्कीय मिळून पाचांचे एक कम्यून बनवणार आहेत."

एके दिवशी रेल्वेच्या यंत्रशाळेत पावेल कामावर असताना त्याला टेलिफोनपाशी बोलावण्यात आले. तो रीताचा फोन होता. त्या संध्याकाळी तिला रिकामा वेळ होता आणि ज्या प्रकरणाचा ती दोघे अभ्यास करीत होती– पॅरिस कम्यूनच्या पाडावाची कारणे–ते प्रकरण त्यादिवशी संपवावे असे तिने सुचविले.

विद्यापीठ मार्गावरील रीताच्या घरापाशी त्या संध्याकाळी — पावेल जेव्हा नजीक येऊन ठेपला तेव्हा त्याने घरावर एक दृष्टिक्षेप टाकला. तिच्या खोलीत प्रकाश दिसत होता. तो पळतच वरच्या मजल्यावर गेला, त्याने नेहमीप्रमाणे दरवाजावर हळूच ठोकले आणि उत्तराची वाट न पाहता तो आत गेला.

तिच्या बिछान्यावर एक लष्करी वेषातला माणूस आरामात पहुडला होता. वस्तुतः कुणाही तरुण कॉम्रेडला तिच्या कॉटवर एक क्षणभरही टेकण्याची कधी परवानगी नव्हती. एक रिवॉल्वर, सैनिकी पिशवी आणि लाल तारा लावलेली टोपी टेबलावर पडली होती. रीता त्या अपरिचित माणसाच्या शेजारीच बसली होती व तिने आपल्या हातांनी त्याला गच्च विळखा घातला होता. ती दोघे संभाषणात अगदी बुडून गेली होती. पावेल जेव्हा खोलीत प्रवेशला तेव्हा रीताने उजळल्या मुद्रेने वर पाहिले.

त्या माणसाने तिच्या मिठीमधून स्वतःला सोडवून घेतले आणि तो उठला.

रीताने पावेलशी हस्तांदोलन करीत म्हटले, "पावेल, हा..."

"दावीद उस्तिनोविच," कोर्चागिनचा हात प्रेमाने दाबीत त्या माणसाने स्वतःचे नांव सांगितले.

"अगदी अचानक उगवला," आनंदाने हसत रीताने खुलासा केला. पावेलने थंडपणे त्या नवागताशी हस्तांदोलन केले. एक तिरस्काराची छटा त्याच्या डोळयात उमटून गेली. त्या माणसाच्या गणवेषावर कंपनी कमांडरच्या हुद्द्याचे चार चौकोनांचे चिन्ह त्याने पाहिले.

रीता काहीतरी बोलणार होती, तेवढ्यात पावेलने तिला अडवून म्हटले, "मी एवढंच सांगायला आलो होतो की, आज संध्याकाळी गोदीतून लाकडं काढण्याच्या कामात मी अडकलेला असेन. शिवाय तुझ्याकडं पाहुणे आले आहेत. तर मी चलतो! पोरं माझी खाली वाट पाहताहेत!"

आणि जसा तो आला होता तसाच अचानकपणे दारामधून नाहीसा झाला. जिन्यावरची त्याची घाईघाईने जाणारी पावले त्यांनी ऐकली. मग अगदी बाहेरचे दार धाडकन आपटले आणि नंतर सारे शांत झाले.

"त्याचं काहीतरी बिनसलंय," दावीदच्या प्रश्नार्थक नजरेला उत्तर देताना रीता अडखळत म्हणाली.

...पुलाखाली इंजिनाने एक भलामोठा सुस्कारा सोडला. आपल्या भल्या मोठ्या फुप्फुसांमधून सोनेरी ठिणग्याचा फवारा उडवला. त्या ठिणग्या अद्भुत नाच करीत वर उंच उडाल्या आणि धुरात अदृश्य झाल्या.

पावेल कठड्याला रेलून उभा राहिला आणि डोळे मिचकावणारे सिग्नलचे रंगीत दिवे टक लावून पहात राहिला. त्याने डोळे किलकिले केले.

स्वतःलाच कडवट उपहासाने त्याने प्रश्न टाकले: "कॉम्रेड कोर्चागिन, रीताला नवरा आहे हे समजल्यावर तुम्हाला एवढ्या मिरच्या का झोंबल्या? तिला नवरा नाही असं तिनं कधी तुम्हाला सांगितलं होतं? आणि समजा, जरी तिला नवरा असला, तरी तुम्हाला त्याचे काय होय? तुम्हाला एवढे वैषम्य का वाटावे? कॉम्रेड, तुम्हाला वाटलं, तुमच्या मनात तिच्याबद्दल फक्त मित्रत्वाची भावना होती, दुसरं काही नव्हतं... मग तुमचं हे असं कसं झालं?.. पण

तो तिचा नवरा नसला तर? दावीद उस्तिनोविच हा तिचा भाऊ किंवा काका असू शकेल... अशा परिस्थितीत मूर्ख माणसा, त्या गृहस्थावर तू अन्याय केलास! इतर डुकरां-मध्ये आणि तुझ्यात काहीही फरक नाही. तो तिचा भाऊ आहे किंवा नाही हे शोधून काढणं अगदी सोपं आहे. आणि समज, तो तिचा भाऊ किंवा काका निघाला, तर आजच्या तुझ्या वागण्यानंतर तू तिला तोंड कसं दाखवशील? छे: छे:, तिला भेटणं तू अजिबात बंद केलं पाहिजे!"

इंजिनाच्या कर्कश्य शिट्टीने त्याची विचारमालिका खंडित झाली.

"बराच उशीर झालाय. घरी गेलं पाहिजे. हा मूर्खपणा पुरे झाला!"

रेलकामगार ज्या विभागात रहात त्याला सोलोमेन्का म्हणत. त्या ठिकाणी पाच तरुणांनी एक छोटया प्रमाणावरील कम्यून स्थापन केले. झार्कीय, पावेल, पांढुरक्या केसांचा गंमत्या स्वभावाचा चेक क्लाविचेक, रेलयार्डातील कम्सामोलचा चिटणीस निकोलाय ओकुनेव व बॉयलर दुरुस्तीचे काम करणारा आणि सध्या रेल्वे चेकामध्ये काम करणारा स्तेपान आर्त्यू-खिन, अशा पाचजणांचा त्या कम्यूनमध्ये समावेश होता.

त्यांनी एक खोली शोधली व तीन दिवसपर्यंत फावल्या वेळात तिची साफसफाई, रंगसफेती केली. हातात बादल्या घेऊन ते एवढ्यावेळा मागेपुढे हेलपाटे घालीत होते, की घराला आग लागली असावी असा शेजाऱ्यांचा समज झाला. त्यांनी स्वत:ला झोपण्यासाठी लाकडी पेटया तयार केल्या, बागेत पडलेली मेपलची पाने गोळा करून त्यांच्या गाद्या बनविल्या

आणि चौथ्या दिवशी त्यांची खोली अक्षरशः झळाळत होती. खोलीत पेत्रोव्स्कींचे एक चित्र व एक भलामोठा नकाशा भिंतीवर टांगला होता.

दोन खिडक्यांच्या दरम्यानच्या फडताळावर हारीने पुस्तके रचली होती. कार्डबोर्डने झाकलेल्या दोन खोक्यांच्या खुर्च्या बनल्या होत्या, तर आणखी एका मोठ्या खोक्याचे कपाट बनले होते. खोलीच्या मध्यभागी एक भलेमोठे बिलियर्ड टेबल उभे होते. पण त्यावर मखमाली कपडा नव्हता. खोलीतल्या रहिवाशांनी गुदामामधून ते टेबल चक्क आपल्या खांद्यांवरून वाहून आणले होते. दिवसा त्याचा टेबलासारखा उपयोग करण्यात येई आणि रात्री क्लाविचेक त्यावर पथारी पसरीत असे. त्या पाच तरुणांनी आपल्या स्वतःच्या सर्व चीजवस्तू तेथे आणल्या व व्यवहारी स्वभावाच्या क्लाविचेकने कम्यूनच्या मालकीच्या सर्व वस्तूंची एक यादी तयार केली. ती यादी भिंतीवर टांगण्याचा त्याचा विचार होता, पण इतरांनी त्याला आक्षेप घेतला. त्या खोलीतील सर्व वस्तू सामायिक मालकीच्या म्हणून जाहीर करण्यात आल्या. कमाई, शिधा आणि अधूनमधून घरून येणाऱ्या पार्सलांची समान वाटणी करण्यात येई. फक्त त्यांची शस्त्रे तेवढी वैयक्तिक मालकीची होती. कम्यूनच्या कुणाही सदस्याने कम्यूनच्या मालकीविषयक कायद्याचा भंग केल्यास अथवा आपल्या साथींचा विश्वासघात केल्यास त्याला कम्यूनमधून हाकलून लावण्यात येईल, असे एकमताने मान्य करण्यात आले. ओकुनेव आणि क्लाविचेक यांनी आग्रह धरला की, हकालपट्टी झाल्यानंतर त्या सदस्याला खोलीमधूनही काढून टाकावे. त्यांचा हा ठराव मान्य करण्यात आला.

कम्यूनच्या वास्तुशांती समारंभाला विभागीय कम्सामोलचे सर्व क्रियाशील सभासद आले होते. एका शेजाऱ्याकडून भला-मोठा समोवार मागून आणण्यात आला होता. त्या चहापान समारंभात कम्यूनजवळचा सॅक्रीनचा सारा साठा संपला. चहानंतर ते सारे मिळून गाऊ लागले आणि त्यांच्या दमदार आवाजांनी घराचे वासे हादरले:

सारं सारं जग आसवांनी भिजलंय,
हाल हाल सोसत आमचं आयुष्य सरलंय,
पण थांब, तेजस्वी पहाट उजाडतेय...

ताल्या लागूतिना नांवाची तंबाखूच्या कारखान्यातील मुलगी गाण्याचा मुख्य सूर धरीत होती. तिचा किरमिजी रुमाल तिच्या डोक्यावरून एका बाजूला तिरका कलला होता. तिच्या डोळयांमध्ये मिस्कील छटा चमकत होती. त्या डोळयांचा थांग घेणे अद्याप तरी कुणालाच जमले नव्हते. ताल्याच्या हसण्यात मोठी जादू भरली होती. ऐन अठराव्या वर्षातल्या तारुण्याने ती मुसमुसली होती आणि उमेदभरल्या नजरेने जगाकडे पहात होती. दोन्ही हात उंचावून टीपेच्या सुरात आता ती गाऊ लागली:

महापुरासारखं आमचं गाणं जगावर पसरलंय,
दिमाखानं आमची पताका फडकतेय,
आमच्या काळजातल्या रक्ताच्या आगीनं
साऱ्या जगभर ती भडकून उजळतेय.

ती मैफल रात्री खूप उशीरा संपली आणि तरुण मंडळींच्या दुमदुमणाऱ्या आवाजांच्या प्रतिध्वनींनी मुकाट रस्त्यांना जाग आली.

टेलिफोन खणखणला आणि झार्कीयने रिसीव्हर उचलला.

चिटणीसाच्या कचेरीत जमलेल्या कम्सामोल सभासदांचा एकच गलका चालला होता. "चूप रहा बघू! मला काहीही ऐकू येत नाहीय्!" झार्कीय त्यांच्यावर खेकसला.

तेथील गडबड थोडीशी कमी झाली.

"हॅलो! अरेच्चा, तू होय? ठीक आहे, आत्ता! कार्यक्रम-पत्रिकेवर काय आहे? तीच जुनी गोष्ट, गोदीमधून सर्पण वाहून न्यायचं. काय? नाही, त्याला कुठंही पाठवलेलं नाही. तो इथंच आहे. त्याच्याशी बोलायचंय? एक मिनिट थांब."

झार्कीयने पावेलला जवळ येण्याची खूण केली.

"कॉम्रेड उस्तिनोविचला तुझ्याशी बोलायचंय," तो म्हणाला आणि रिसीव्हर त्याने पावेलच्या हाती दिला.

"मला वाटलं तू गांवात नाहीस," पावेलने रीताचा आवाज ऐकला. "आज संध्याकाळी मी मोकळी आहे. आज येतोस का? माझा भाऊ गेला. योगायोगानं तो या शहरावरून चालला होता आणि मला भेटायचं त्यानं अचानक ठरवलं. आमची जवळ जवळ दोन वर्षं भेट नव्हती."

तिचा भाऊ!

पावेलला पुढचे काहीही ऐकू येईना. ती अप्रिय संध्याकाळ त्याला आत्ता आठवत होती आणि त्या पुलावर त्या रात्री त्याने केलेला निर्धार त्याला आठवत होता. आज सायंकाळी तिच्याकडे जाऊन या सर्व गोष्टींचा सोक्षमोक्ष लावण्याचे त्याने ठरविले. प्रेमाबरोबर खूप वेदना सोसाव्या लागतात, अस्वस्थता अनुभवावी लागते. अशा गोष्टींना यावेळी सवड होती का?

त्याच्या कानातला आवाज म्हणत होता: "माझं बोलणं तुला ऐकू येत नाही का?"

"मी ऐकतोय. चांगलं ऐकू येतंय. ब्यूरोच्या बैठकीनंतर मी येईन." आणि त्याने रिसीव्हर खाली ठेवला.

त्याने सरळ तिच्या डोळयांमध्ये रोखून पाहिले आणि ओकच्या लाकडाच्या टेबलाची कडा गच्च पकडून तो म्हणाला: "मी पुन्हा तुला भेटायला येईन असं वाटत नाही." तिच्या जाड पापण्या एकदम वर उचलल्या गेलेल्या त्याने पाहिल्या. तिची कागदावर झरझर चालणारी पेन्सिल अचानक थबकली आणि उघडचा पॅडवर नंतर स्तब्ध झाली.

"का बरं?"

"सवड काढणं मला फार कठीण जातं. आत्तासुद्धा आपल्याला फारसं सोपं जात नाही हे तुला माहीत आहे. माफ कर, पण मला वाटतं आपल्याला ही योजना रद्द करावी लागणार..."

शेवटचे शब्द फारसे ठामपणे उमटले नाहीत याची त्याला जाणीव झाली.

"उगीच कशाला लपवालपवी चालवलीयस?" तो स्वतः-शीच चिडून मनातल्या मनात म्हणाला. "दोन्ही मुठींनी प्रहार करण्याची हिंमत नाही!"

पण प्रत्यक्षात तो पुढे तिला म्हणाला: "शिवाय, गेल्या काही दिवसांपासून मी तुला काही सांगीन म्हणत होतो– तुझे खुलासे समजून घ्यायला मला फार त्रास पडतो. जेव्हा सेगाल यांच्याबरोबर आपण अभ्यास केला, तेव्हा जे काही मी शिकलो ते डोक्यात राहिलं. पण तुझ्याबरोबर तसं होत नाही. आपले धडे संपले म्हणजे मला नेहमी तोकरेव यांच्याकडं जाऊन सगळया गोष्टी पुन्हा नीट समजून घ्याव्या लागतात.

अर्थात हा माझा दोष आहे. मला बावळटाला लौकर समजत नाही. माझ्यापेक्षा जास्त हुषार विद्यार्थ्यांना तू शोध."

तिच्या चौकस नजरेला नजर देण्याने त्याने टाळले. स्वतःचे परतीचे सर्व मार्ग त्याने मुद्दामच तोडून टाकले व चिकाटीने तो पुढे म्हणाला: "आपण पुढं अभ्यास चालू ठेवणं म्हणजे निव्वळ वेळ वाया घालवणं आहे हे तुला आता पटलं की नाही?"

नंतर तो उठला, आपल्या पायाने त्याने काळजीपूर्वक रीतीने खुर्ची बाजूला सारली. रीताने डोके खाली घातलेले त्याने पाहिले. दिव्याच्या प्रकाशात तिचा एकदम निस्तेज बनलेला चेहरा त्याला दिसला. त्याने आपली टोपी चढवली.

"बरं आहे कॉम्रेड रीता. तुझा खूप वेळ वाया घालवल्याबद्दल मला माफ कर. यापूर्वी केव्हाच मी तुला हे सांगायला पाहिजे होतं. त्या बाबतीत मला दोष दिला पाहिजे."

रीताने यांत्रिकपणे त्याच्या हाती आपला हात दिला. त्याच्या अचानक थंड वागण्यापुढे तीसुद्धा थिजून गेली होती. काही मोजक्या शब्दांपलिकडे ती जास्त बोलू शकली नाही.

"पावेल, मी तुला दोष देत नाही. अवघड गोष्टींचा खुलासा करण्याचा दुसरा एखादा मार्ग मी काढू शकले नाही, तेव्हा मला तुझं म्हणणं मानलंच पाहिजे."

पावेल जडपणे दारापाशी चालत गेला. आपल्यामागे हळूच त्याने दार लावून घेतले. खालच्या मजल्यावर तो क्षणभर थांबला—परत जाऊन खुलासा करायला अजून काही फार उशीर झाला नव्हता... पण काय उपयोग होता? कशासाठी? तिने केलेली निर्भर्त्सना ऐकून घ्यायची आणि घराबाहेर स्वतःला हाकलून घ्यायचे? नाही.

बाजूच्या रुळांवर खिळखिळ्या झालेल्या वाघिणींच्या व टाकून दिलेल्या इंजिनांच्या थडग्यांचे ढीग वाढत होते. वारा भिरभिरत होता आणि ओस पडलेल्या लाकडाच्या यार्डातला भुस्सा इतस्ततः उधळीत होता.

शहराभोवतालच्या जंगलाच्या झाडोऱ्यात आणि खोल घळींमधून ओर्लीकची टोळी लपून बसली होती. दिवसाउजेडी ते गुंड आजूबाजूच्या वाड्यांमधून किंवा जंगलपट्ट्यांमधून लपूनछपून रहात, पण रात्रीच्या वेळी ते रुळांवर चोरपावलांनी येत, निर्दयपणे रूळ उखडून टाकत आणि आपले दुष्कृत्य संपवून पुन्हा गुप्त जागी पसार होत.

अनेक लोखंडी घोडे रुळांवरून घसरत होते. उतारूवाहू डब्यांचा चकाचूर होई, त्या लोखंडी धूडांखाली झोपाळलेल्या माणसांचा सपाट भुगा होई आणि बहुमोल धान्य रक्तात व मातीत नासून जाई.

ती टोळी अचानकपणे एखाद्या छोट्या गांवावर धाड घाली. घाबरलेल्या कोंबड्या कलकलाट करीत चारी दिशांना सैरावैरा धावत. चार आडवेतिडवे बार होत. वोलस्त सोविएतच्या इमारतीसमोर रायफलीचा छोटा कडकडाट होई आणि वाटेत आडव्या येणाऱ्या प्रत्येकाला कापून काढीत दरोडेखोरांची टोळी आपल्या पुष्ट घोड्यांवरून जोराने दौडत जाई. जणू काही लाकडाचे ओंडके फोडावे तेवढ्या शांतपणे ते आपल्या बळींना कापून काढीत. फार क्वचित ते गोळ्या झाडीत, कारण काडतुसे दुर्मीळ झाली होती.

टोळी जेवढ्या वेगाने येई, तेवढ्याच वेगाने पसार होई. तिला सर्वत्र डोळे आणि कान होते. वोलस्त सोविएतच्या छोट्या पांढऱ्या इमारतीच्या भिंतींमधून आरपार त्या डोळ्यांना

सर्व काही दिसत असे. कारण पाद्र्याच्या घरातून आणि कुलकांच्या झोपड्यांमधून काही अदृश्य धागेदोरे जंगलातल्या झाडोऱ्यात पोचलेले होते. दारूगोळयाची खोकी, डुकराच्या मांसाचे ताजे तुकडे, निळसर रंगाच्या दारूच्या बाटल्या त्याच मार्गांनी जंगलात पुरविल्या जात. तसेच कनिष्ठ आतामानांच्या कानात सांगितलेल्या बातम्या वेगवेगळया मार्गांनी खुद्द ओर्लीक-पर्यंत पोचत.

त्याच्या टोळीत दोन-तीनशे दरोडेखोरांपेक्षा जास्त लोक नव्हते, पण आजपर्यंत ह्या टोळीने हुलकावणी दिली होती. अनेक छोटया छोटया गटांमध्ये ही टोळी विभागली जाई व एकाच वेळी दोन-तीन मुलुखांमधून धाडी घाली. त्या सर्वांना पकडणे अशक्य ठरले होते. काल रात्री जो दरोडेखोर असायचा तो दिवसा शेतकरी बनून आपल्या बागेत शांतपणे मशागत करीत असलेला, आपल्या घोड्याला तोबरा देत किंवा दारा-पाशी चिलीम ओढीत आपल्या धूर्त नजरेने घोडदळाचे पहारेकरी हेरीत बसलेला दिसायचा.

अलेक्सान्द्र पुझिरेवस्की अत्यंत चिकाटीने तीन मुलुखांमधून आपल्या रेजिमेंटच्या साह्याने दरोडेखोरांचा खाली-वर पाठलाग करीत होते. कधी कधी त्यांना माग काढण्यात यश यायचे. एक महिन्यानंतर, दोन मुलुखांमधून आपल्या दरोडेखोरांना मागे घेणे ओर्लीकला भाग पडले. आता एका अरुंद चिंचोळया प्रदेशात तो कोंडला गेला होता.

शहरातील जीवन नेहमीप्रमाणे रखडत चालले होते. शहरातील पाच बाजारांमधून गोंगाट करणाऱ्या लोकांची गर्दी उसळली होती. त्या गजबजणाऱ्या जमावांमध्ये दोनच

प्रवृत्ती प्रामुख्याने वास करीत होत्या – जास्तीत जास्त ओरबाडून घेणे आणि कमीत कमी देणे. सर्व प्रकारच्या राक्षसी आणि फसव्या लोकांना त्या वातावरणात अमाप वाव होता. प्रामाणिकपणा सोडून इतर सर्व भावना व्यक्त करणाऱ्या कावेबाज माणसांच्या नजरा त्या गर्दीमधून भिरभिरत होत्या. शेणावर घोंघावणाऱ्या माशांप्रमाणे शहरातला सारा गाळ त्या ठिकाणी केवळ एकाच हेतूने एकवटला होता: सहज फसणाऱ्यांना टोपी घालायला! या शहराच्या दिशेने आलेल्या काही थोड्या आगगाड्यांनी पोत्यांनी लगडलेल्या लोकांचे बडके ओकले होते. त्या लोकांनी बाजारची वाट धरली होती.

रात्रीच्या वेळी बाजारपेठा ओस पडायच्या. गाळ्यांच्या काळ्या रंगाच्या ओळी मोठ्या अमंगळ आणि भेसूर दिसायच्या.

अंधार पडल्यानंतर प्रत्येक गाळ्याभोवती एक प्रकारचे धोक्याचे वातावरण तरंगत असायचे आणि केवळ धाडसी माणूसच अशा वेळी तेथे जाण्याचे साहस करीत असे. अनेक-वेळा लोखंडावर हातोड्याचा टणत्कार व्हावा तसा रात्रीच्या वेळी बार वाजायचा आणि कुणाच्या तरी घशातून रक्ताची उलटी व्हायची. नजीकच्या गस्तीवरून मूठभर पोलिस त्या जागी पोहोचेपर्यंत (एकट्याने जाण्याचे धाडस ते करीत नसत) त्यांना तेथे छिन्नभिन्न प्रेताविना दुसरे काहीही आढळत नसे. खुनी पसार झालेले असायचे आणि निर्माण झालेल्या गोंधळाने बाजारच्या चौकातले थोडे निशाचर वाऱ्याच्या वेगाने अदृश्य व्हायचे.

बाजारच्या समोरच 'अरीओन' सिनेमा होता. रस्त्यावर आणि फूटपाथवर दिव्याचा झगझगीत उजेड पडला होता. प्रवेशद्वारापाशी लोकांची गर्दी दाटली होती. चित्रपटगृहात

प्रोजेक्टर सुरू झाला व पडद्यावर अतिभडक प्रेमप्रसंग दिसू लागले. अधूनमधून फिल्म तुटायची आणि प्रेक्षक नापसंतीच्या आरोळ्या ठोकायचे. शहराच्या मध्यभागी आणि शहराच्या सीमेपाशी जीवन सुरळीत झाल्यासारखे भासत होते. क्रांतिकारक सत्तेचे केंद्र असलेल्या पक्षाच्या गुबेर्नियां समितीमध्येही सारे काही शांत होते. पण ही सारी वरवरची शांतता होती.

शहरात तुफान खळबळत होते.

वेगवेगळ्या दिशांनी येऊन तेथे जमलेल्या अनेकांना त्या तुफानाची आधी चाहूल लागली होती. त्यांच्या लांबलचक किसान-डगल्यांच्या आत दडवलेल्या सैनिकी रायफली सरळ उठून दिसत. त्याचप्रमाणे आगगाड्यांच्या टपांवर बसून धान्याचा काळाबाजार करणाऱ्यांच्या वेषात आलेल्या लोकांनाही त्या आगामी वादळाची कल्पना होती. आपली पोती बाजारकडे नेण्याऐवजी व्यवस्थित आठवणीत ठेवलेल्या पत्त्यांवर त्यांनी ती नेली होती.

या लोकांना सारे माहीत होते, पण कामगारांच्या वस्तीं-मध्ये, तसेच बोल्शेविकांनाही त्या आगामी वादळाची काहीच कल्पना नव्हती.

कोणता कट रचला जात होता याची फक्त पाच बोल्शे-विकांना माहिती होती.

लाल सेनेने ज्या पेत्ल्युरा टोळयांच्या उरलेल्या लोकांना श्वेतरक्षकांच्या पोलंडमध्ये पिटाळून लावले होते, त्यांनी वॉर्सामधील काही परकी वकिलातींच्या निकट सहकार्याने उठाव करण्याचा घाट घातला होता. पेत्ल्युरा रेजिमेंटांच्या उरलेल्या लोकांमधून धाड घालणारी टोळी बनविण्यात आली होती.

बंडखोरांच्या मध्यवर्ती समितीची शेपेतोवकामध्ये एक संघटना होती. तिच्यात सत्तेचाळीस लोक होते. त्यांपैकी बहुतेकजण पूर्वी क्रियाशील प्रतिक्रांतिकारक होते, पण स्थानिक चेकाने त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना मोकळे सोडलेले होते.

वासिली पाद्री, कनिष्ठ पायदळ अधिकारी वीन्नीक आणि पेत्ल्युराचा लष्करी अधिकारी कुझ्मेन्को हे त्या संघटनेचे पुढारी होते. पाद्र्याच्या मुली, वीन्नीकचे वडील आणि भाऊ, तसेच कार्यकारी समितीच्या कचेरीत शिरकाव करून घेतलेला सामो-तिया नांवाचा एक माणूस– असे लोक हेरगिरीचे काम करीत.

युद्धआघाडीवरील खास विभागावर हातबाँबचा हल्ला रात्रीच्या वेळी करायचा, कैद्यांना सोडवायचे आणि शक्य झाल्यास रेल्वे स्टेशनचा ताबा घ्यायचा, अशी त्यांची योजना होती.

दरम्यान लष्करी अधिकारी गुप्तपणे शहरात एकवटले होते. उठावाचे ते प्रमुख केंद्र होते. दरोडेखोरांच्या टोळया नजीकच्या जंगलापाशी येऊन थांबल्या होत्या. या ठिकाणाहून रूमानियाशी आणि खुद्द पेत्ल्युराशी विश्वासू हस्तकांमार्फत संपर्क राखण्यात आला होता.

फ्योदर झुखराय आपल्या खास विभागाच्या कचेरीत सहा रात्री अजिबात झोपले नव्हते. काय शिजत होते याची ज्या पाच बोल्शेविकांना माहिती होती, त्यांपैकी ते एक होते. पट्टीच्या शिकाऱ्याला आपल्या सावजाचा माग लागल्यानंतर जो आनंद होतो आणि आता सावज केव्हा झेप घेते याची तो वाट पहात असतो, त्यावेळची भावना हा माजी खलाशी अनुभवीत होता.

मोठ्याने ओरडणे किंवा धोक्याचा इशारा देणे त्यांना शक्य नव्हते. रक्तपिपासू राक्षसाचा वध करायला पाहिजे होता. केवळ त्यानंतरच शांततेने काम करणे शक्य झाले असते, दर झुडुपामागे भेदरलेला कटाक्ष टाकावा लागला नसता. सावजाला बिथरवून चालणार नव्हते. यासारख्या जीवन-मरणाच्या संघर्षात सहनशीलतेचा आणि खंबीरपणाचाच शेवटी विजय होतो.

कसोटीचा क्षण अगदी जवळ येऊन ठेपला होता. शहरात कटवाल्यांच्या गुप्त ठिकाणांच्या जाळ्यात कुठेतरी वेळ निश्चित झाली होती: उद्या रात्री!

पण ज्या पाच बोल्शेविकांना ह्या कटाची माहिती होती, त्यांनी आधी प्रहार करण्याचे ठरविले. वेळ ठरली होती: **आजच्या** रात्री!

त्याच संध्याकाळी रेल्वे यार्डातून एक चिलखती आगगाडी हळूच बाहेर निसटली आणि यार्डाचे प्रचंड दरवाजे तिच्या पाठोपाठ बंद झाले.

सांकेतिक तारा पाठविण्यात आल्या व त्यांनी दिलेल्या तातडीच्या इशाऱ्यांनुसार सावध आणि दक्ष माणसे सज्ज झाली. प्रजासत्ताकाच्या सुरक्षिततेची जबाबदारी त्यांच्यावर सोपवलेली होती. गांधीलमाशांचे मोहोळ नष्ट करण्यासाठी त्यांनी ताबडतोब उपाययोजना केल्या.

अकीमने झार्कीयला टेलिफोन केला.

"छोट्या संघटनांच्या बैठकी ठाकठीक? छान. ताबडतोब परिषदेसाठी इकडं ये आणि पक्षाच्या विभागीय समितीच्या चिटणीसाला बरोबर आण. आपल्या कल्पनेपेक्षा इंधनाचा प्रश्न वाईट आहे. इथं येशील तेव्हा तपशीलानं बोलू." खंबीर आवाजात, घाईघाईने अकीम बोलला.

“ ह्या सर्पणाच्या भानगडीनं आपल्या सगळ्यांना वेडं केलंय,” झार्कीय रिसीव्हरमधून उलट गुरगुरला.

लीत्केने तुफान वेगाने मोटरीमधून दोन्ही चिटणीसांना मुख्य कचेरीत आणले. पहिल्या मजल्याच्या पायऱ्या चढत असतानाच त्यांच्या ताबडतोब लक्षात आले की, सर्पणाच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी त्यांना बोलावलेले नव्हते.

कचेरी व्यवस्थापकाच्या टेबलावर एक मशिनगन उभी होती आणि खास मोहीमेच्या तुकडीमधील माणसांची तिच्याभोवती लगबग चालू होती. शहरातील पक्षाच्या व कम्सामोलच्या संघटनांचे रक्षक व्हरांड्यांमधून गप्प उभे होते. चिटणीसांच्या कचेरीच्या मोठ्या दरवाजांमागे पक्षाच्या गुबेर्निया समितीच्या ब्यूरोची तातडीची बैठक संपत आली होती.

खिडकीच्या चौकटीमधून रस्त्याच्या बाजूने रणक्षेत्रावरील दोन टेलिफोनच्या तारा आत आणल्या होत्या. खोलीत खालच्या आवाजातील संभाषणाचा ध्वनी घुमत होता. अकीम, रीता आणि मिखाईल तेथे होते. रीताने लाल सेनेचे शिरस्त्राण चढवले होते, खाकी सदरा घातला होता, त्यावर कातडी जाकीट घातले होते व त्याला जाडजूड मॉसर पिस्तूल पट्ट्याने बांधले होते. कंपनीची राजकीय शिक्षक म्हणून ती युद्ध आघाडीवर काम करीत होती, त्यावेळचा तिचा हा गणवेष होता.

“हा सगळा काय प्रकार आहे?” झार्कीयने चकित सुरात तिला विचारले.

“वान्या, सज्जतेची कवायत करायचीय. आत्ता सरळ तुझ्या विभागात जायचं. पाचव्या पायदळ विद्यालयाजवळ आपली भेट ठरलीय. कम्सामोलचे सभासद आपल्या छोट्या

संघटनांच्या बैठकांनंतर सरळ तिथं जाणार आहेत. कोणाचंही लक्ष वेधून न घेता तिथं पोचायचं ही सर्वांत महत्त्वाची बाब आहे."

त्या जुन्या लष्करी विद्यालयाच्या आवारात ओकची जुनाट महाप्रचंड झाडे उभी होती, तेथील तळ्याच्या तुंबलेल्या पाण्यात काटेरी पान-फुलांच्या झुडुपांचे आणि खाजकोयलींचे रान माजले होते आणि तेथील अस्वच्छ रुंद पाऊलवाटा निःस्तब्धतेत गुरफटलेल्या होत्या. त्या मैदानाच्या मध्यभागी, एका उंच पांढऱ्या भिंतीपलिकडे विद्यालयाची इमारत उभी होती. आता ते लाल सेनेच्या कमांडरांच्या पाचव्या पायदळ विद्यालयाचे स्थळ बनले होते. रात्रीची खूप उशिराची वेळ झाली होती. इमारतीच्या वरच्या मजल्यावर काळोख होता. बाहेरून सारे काही निवांत होते. तेथून सहज जाणाऱ्या एखाद्या माणसाला वाटले असते की, विद्यालयाचे छात्र गाढ झोपले होते. मग लोखंडी दरवाजे का उघडे होते आणि प्रवेशद्वारा-पाशी राक्षसी बेडकासारख्या त्या दोन काळ्या आकृती कसल्या होत्या? रेल्वे विभागामधील सर्व ठिकाणची माणसे तेथे जमली होती. रात्रीच्या सावधगिरीचा इशारा दिल्यानंतर विद्यालयातील छात्र झोपणे शक्य नव्हते, याची त्या लोकांना कल्पना होती. आपल्या कम्सामोलच्या आणि पक्षाच्या बैठकांहून सरळ ते इथे आले होते. अत्यंत त्रोटक शब्दात याठिकाणी येण्याबद्दलचा निरोप त्यांना देण्यात आला होता. अगदी मुकाटपणे, एकेकट्याने, क्वचित दोघे दोघे असे ते आले. तीन लोकांपेक्षा जास्त एकत्र कुणीही आले नाही. प्रत्येकाने सोबत आपले कम्युनिस्ट पक्षाच्या किंवा कम्सामोलच्या सभा-सदत्वाचे कार्ड आणले होते. त्या कार्डाविना कुणालाही लोखंडी दारांच्या आत प्रवेश मिळत नव्हता.

सभागृहात दिव्याचा प्रकाश उजळला होता आणि एव्हाना बरीच माणसे तेथे जमली होती. खिडक्यांवर तंबूच्या कापडाचे जाड पडदे सोडले होते. ज्या बोल्शेविकांना तेथे बोलावण्यात आले होते ते आपल्या हातांनी वळलेल्या सिगारेटी शांतपणे ओढत होते व कवायतीसाठी एवढी प्रचंड सावधगिरी बाळगल्याबद्दल थट्टा-विनोद करीत होते. हा खराखुरा सावध-गिरीचा इशारा होता याची कुणालाही जाणीव झाली नाही. खास मोहीमेच्या तुकड्यांमध्ये शिस्त राखण्यासाठी तसे केले जात होते. पण सराईत सैनिकाला मात्र विद्यालयाच्या आवारात येताच इशाऱ्याच्या अस्सलपणाची चटकन कल्पना येत होती. फारच सावधगिरी बाळगली जात होती. अस्फुट आवाजात हुकूम देऊन बाहेरील बाजूस विद्यार्थ्यांच्या पलटणी उभ्या करण्यात येत होत्या. अत्यंत गुपचुपपणे मशिनगन आवारात आणल्या जात होत्या. इमारतीच्या खिडक्यांमधून प्रकाशाचा बारिकसा कवडसाही बाहेर दिसत नव्हता.

"मित्याय, मामला गंभीर दिसतोय?" पावेल कोर्चागिनने दुबावाला विचारले. दुबावा खिडकीच्या चौकटीत एका मुली-शेजारी बसला होता. दोनच दिवसांपूर्वी ही मुलगी झार्कीयच्या ठिकाणी दिसल्याचे पावेलला आठवले.

दुबावाने पावेलच्या खांद्यावर गंमतीने थाप मारली.

"घाबरलास वाटतं? काही हरकत नाही, कसं लढायचं ते आम्ही तुम्हाला शिकवू. तुमची एकमेकांशी ओळख आहे की नाही?" त्याने त्या मुलीकडे मानेने इशारा करीत म्हटले: "ही आन्ना. आडनांव माहीत नाही. आंदोलन आणि प्रचार केंद्राची मुख्य आहे."

आत्ता ओळख करून दिलेल्या त्या मुलीला कोर्चागिनबद्दल

कुतूहल वाटले. तिच्या जांभळया रुमालामधून बाहेर आलेली केसांची बट तिने मागे सारली. कोर्चागिनची नजर तिच्या नजरेला भिडली व क्षण-दोन क्षण नजरांची मूक जुगलबंदी झडली. तिच्या भरघोस पापण्यांखालील चमकदार काळयाभोर डोळयांनी पावेलच्या डोळयांना आव्हान दिले. पावेलने आपली नजर दुबावाकडे वळवली. आपण लाजतोय याची जाणीव झाल्यामुळे त्याने डोळे वटारले.

"तुमच्यापैकी आंदोलनाचं काम कोण करतं?" बळेच हसत त्याने विचारले.

त्याच क्षणाला सभागृहात एकदम खळबळ माजली. एक कंपनी कमांडर खुर्चीवर उभा राहून ओरडला: "पहिल्या कंपनीची माणसं, रांगेत उभे रहा. लौकर, घाई करा!"

गुबेर्निया कार्यकारी समितीचे अध्यक्ष आणि अकीम यांच्यासह झुखराय आले. त्यांचे नुकतेच आगमन झाले होते. रांगेने उभे राहिलेल्या लोकांनी सभागृह या टोकापासून त्या टोका-पर्यंत गच्च भरले होते.

मशिनगन चालवायला शिकविण्याच्या उंचवटयावर गुबेर्निया कार्यकारी समितीचे अध्यक्ष चढून उभे राहिले आणि त्यांनी आपला हात वर केला.

ते बोलू लागले: "कॉम्रेडहो, अत्यंत गंभीर आणि तातडीच्या कामासाठी तुम्हाला इथं बोलावण्यात आलं आहे. आत्ता जे काही मी तुम्हाला सांगणार आहे ते सुरक्षिततेच्या कारणांसाठी अगदी कालसुद्धा सांगणं शक्य नव्हतं. उद्या रात्री ह्या शहरात आणि युक्रेनमधल्या इतर शहरांमध्ये प्रतिक्रांति-कारक बंडाळी व्हायची आहे. शहरात श्वेतरक्षक लष्करी अधिकारी खच्चून भरले आहेत. शहराभोवती दरोडेखोरांच्या

तुकड्या दबा धरून बसल्या आहेत. कटवाल्यांपैकी काहींनी चिलखती गाड्यांच्या तुकड्यांमध्ये शिरकाव करून घेतलाय आणि ड्रायव्हर म्हणून ते काम करताहेत. पण चेकानं योग्य वेळीच कट उघडकीला आणलाय आणि सबंध पक्ष संघटनांना व कम्सामोल संघटनांना आम्ही शस्त्रसज्ज करतोय. पहिली आणि दुसरी कम्युनिस्ट बटालियन लष्करी विद्यालयांच्या तुकड्यांबरोबर व चेका तुकड्यांबरोबर काम करील. लष्करी विद्यालयाच्या तुकड्यांनी एव्हाना कारवाई सुरू केलीय. कॉम्रेडहो, आता तुमची पाळी आहे. शस्त्र घेऊन रांगेत उभं रहायला मी तुम्हाला पंधरा मिनिटांचा अवधी देतो. मोहीमेचं नेतृत्व कॉम्रेड झुखराय यांच्याकडं राहील. तुकड्यांचे कमांडर त्यांच्याकडून आपले हुकूम घेतील. परिस्थितीचं गांभीर्य मी आणखी पटवून देण्याची गरज नाही. उद्याची बंडाळी आजच मोडून काढली पाहिजे."

पंधरा मिनिटांनंतर शस्त्रसज्ज बटालियन विद्यालयाच्या आवारात रांगेने उभी होती.

निःस्तब्ध सैनिकांवरून झुखरायनी आपली नजर फिरविली. त्यांच्यापासून तीन पावले अंतरावर कातडी पट्टे बांधलेले दोन लोक उभे होते: बटालियनचे कमांडर मेन्यायलो—धातू ओतण्याच्या कारखान्यात ते कामगार होते, उरालमधला हा माणूस प्रचंड व्यक्तिमत्वाचा होता—आणि त्यांच्याशेजारी कमिस्सार अकीम. डाव्या अंगाला पहिल्या कंपनीच्या पलटणी उभ्या होत्या व त्यांच्या पुढे दोन पावलांवर कंपनी कमांडर श्कोलेन्को आणि राजकीय शिक्षिका उस्तिनोविच उभे होते. त्यांच्या मागे कम्युनिस्ट बटालियनचे तीनशे सैनिक उभे होते.

फ्योदरनी इशारा दिला. "सुरू करायची वेळ झाली."

निर्जन रस्त्यांवरून तीनशे लोक संचलन करीत चालले होते.

सारे शहर झोपले होते.

ल्वोवस्काया रस्त्यावर, दीकायाच्या समोर, बटालियन-मधले सैनिक पांगले. इथे तिची हालचाल सुरू झाली.

अजिबात आवाज न करता त्यांनी इमारतींना वेढा घातला. एका दुकानाच्या पायऱ्यांवर मुख्य ठाणे स्थापन करण्यात आले.

शहराच्या केंद्राकडून ल्वोवस्काया रस्त्यावर एक मोटार वेगाने आली. तिच्या पुढच्या दिव्यांचा प्रखर प्रकाशझोत पडला होता. बटालियन कमांड पोस्टच्या समोर ती कचकन थांबली.

ह्यूगो लीत्केने यावेळी आपल्या वडिलांना आणले होते. कमांडंट वेगाने मोटारीतून बाहेर पडले. बाहेर पडता पडताच आपल्या मुलाला उद्देशून लात्वियन भाषेत त्यांनी भराभरा काही वाक्ये उच्चारली. मोटार पुढे झेपावली आणि रस्त्याच्या पुढील वळणापलिकडे दिसेनाशी झाली. मोटारीचे सारथीचक्र लीत्केने असे काही धरले होते की, त्याचे हात म्हणजे त्या चक्राचाच एक भाग भासत होते. त्याची नजर रस्त्यावर खिळली होती आणि सैतान संचारल्याप्रमाणे तो मोटार पिटाळीत होता.

आजच्या रात्री लीत्केच्या बेफाम गाडी हाकण्याची खरो-खरीच गरज होती. आत्ता वेगाने गाडी चालविल्याबद्दल त्याला दोन रात्री चौकीत बसविण्याचा विचार कुणालाही सुचला नसता.

आणि ह्यूगो उल्केच्या वेगाने रस्त्यांवरून सुसाटत चालला होता.

डोळ्याची पापणी] लवते न लवते एवढ्या अवधीत झुखरायना शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत मोटरीतून भरवेगाने नेण्याची करामत तरुण लीत्के करीत होता. झुखराय प्रशस्तीच्या सुरात म्हणाले: "आज जर रस्त्यावर कुणावर आदळला नाहीस, तर उद्या सोन्याचं घड्याळ बक्षिस देईन."

ह्यूगो खूष झाला. "मला वाटलं, त्या वळणाबद्दल मला दहा दिवस तुरुंगाची हवा खावी लागणार..."

कटवाल्यांच्या मुख्य ठाण्यावर पहिले आघात करण्यात आले. लौकरच कैद्यांच्या गटांची आणि कागदपत्रांच्या फायलींची खास विभागाकडे पाठवणी झाली.

दीकाया रस्त्यावरच्या ११ क्रमांकाच्या घरात त्युर्बेर्तं नांवाचा एक माणूस रहात होता. चेकाला समजलेल्या माहिती-नुसार, श्वेतरक्षकांच्या कटात त्याचा फार महत्त्वाचा हात होता. पदोल भागात कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या तुकड्यांच्या याद्या त्याच्यापाशी होत्या.

अटक करण्यासाठी खुद्द वरिष्ठ लीत्के दीकाया रस्त्यावर आले. त्युर्बेर्तंच्या घराच्या खिडक्या बागेच्या दिशेला होत्या व पूर्वी जोगिणींचा मठ असलेल्या इमारतीपासून एका उंच भिंतीने ती बाग अलग केलेली होती. त्युर्बेर्तं घरात नव्हता. सबंध दिवसभर तो घरात दिसला नसल्याचे शेजाऱ्यांनी सांगितले. घराची झडती घेण्यात आली. हातबाँबच्या एका खोक्याबरोबरच नांवांच्या आणि पत्त्यांच्या याद्या सापडल्या. एकदम छापा घालण्याचे हुकूम लीत्के यांनी दिले व कागदपत्र तपासण्यासाठी खोलीत क्षणभर रेंगाळले.

बागेच्या कोपऱ्यात एका तरुण लष्करी छात्राला पहाऱ्यावर उभे करण्यात आले होते. प्रकाशित खिडकी तो आपल्या

जागेवरून पाहू शकत होता. त्या अंधारात तेथे एकटयाने उभे राहणे छातीत थोडी धडकी भरविणारे होते. भिंतीवर लक्ष ठेवायचा त्याला हुकूम दिला होता. तो दिलासा देणारा उजेड त्याच्यापासून थोडा दूरच भासत होता. त्यात भरीला भर म्हणून चंद्र सारखा ढगांआड लपत होता. रात्रीच्या त्या प्रहरी झुडुपांमधल्या वातावरणाला एक अमंगळ कळा लाभली होती. त्या तरुण सैनिकाने आपले बागनेट अंधारात चारी दिशांना खुपसले. पण सभोवती काहीच नव्हते. निव्वळ पोकळी !

"त्यांनी कशाला मला इथं ठेवलं? ही भिंत चढून येणं काही कुणाला शक्य नाही. ती फारच उंच आहे. थोडं खिडकीपाशी जाऊन डोकवून पहावं." एकवार त्याने भिंतीवर दृष्टिक्षेप टाकला आणि त्या दमट बुरसलेल्या कोपऱ्यामधून तो बाहेर आला. तो खिडकीपाशी आला त्याचवेळी लीत्केनी टेबलावरचे कागद उचलले. नेमक्या त्याच क्षणाला भिंतीवर एक छाया अवतरली. खिडकीजवळचा पहारेकरी आणि खोलीतला माणूस त्या छायेला आपल्या जागेवरून अगदी स्पष्ट दिसत होते. मांजराच्या चपळतेने त्या छायेने झाडावर झेप घेतली आणि जमिनीवर खाली उडी मारली. चोरपावलांनी ती आपल्या बळीच्या दिशेने पुढे सरकली. नाविक सुऱ्याचा मुठीपर्यंत एकच घाव त्या पहारेकऱ्याच्या पाठीत घुसला आणि तो तात्काळ आडवा झाला.

बागेत एक बार होताच ब्लॉकभोवती वेढा घालणाऱ्या माणसांमधून विजेचा प्रवाह सळसळत गेला. त्यांच्यापैकी सहाजण घराकडे धावले. रात्रीच्या वातावरणात त्यांच्या पावलांचा आवाज मोठ्याने ऐकू येत होता. लीत्के टेबलावर

ओणवे कोसळले होते. त्यांच्या डोक्यावरच्या जखमेतून रक्ताचा लोंढा वहात होता. ते ठार झाले होते. खिडकीच्या तावदानाचा चुरा झाला होता. पण खुनी माणसाला कागदपत्रे पळवायला सवड मिळाली नव्हती.

जोगिणींच्या मठाच्या भिंतीपलिकडे अनेक बार ऐकू आले. खुनी माणूस आता भिंतीवर रस्त्याच्या बाजूने चढला होता आणि गोळ्या झाडून रस्ता मोकळा करीत लुक्यानोवच्या मोकळ्या जागेकडे पळत होता. पण एका गोळीने त्याची धाव थांबवली.

सबंध रात्रभर झडत्या चालू होत्या. घर समित्यांच्या दप्तरी नोंद न झालेल्या, पदरी संशयास्पद कागदपत्रे आढळलेल्या आणि शस्त्रे बाळगणाऱ्या शेकडो लोकांना चेकाकडे पाठविण्यात आले. संशयितांची उलटतपासणी घेण्यासाठी तेथे एक आयोग काम करीत होता.

काही तुरळक ठिकाणी कटवाल्यांनी चार हात केले. झिल्यान्स्काया रस्त्यावरील एका घराची झडती घेत असताना अगदी जवळून झाडलेल्या एका गोळीमुळे आन्तोशा लेबेदेव ठार झाला.

सोलोमेन्का बटालियनची पाच माणसे त्या रात्री गमावली. कट्टर बोल्शेविक आणि प्रजासत्ताकाचे एकनिष्ठ पालक यान लीत्के चेकाने गमावले.

पण श्वेतरक्षकांचे बंड अंकुरावस्थेतच खुडण्यात आले. त्याच रात्री शेपेतोवकामध्ये वासीली पाद्री व त्यांच्या दोन मुलींना, तसेच इतर टोळीला अटक करण्यात आली.

ताण कमी झाला. पण लौकरच नव्या शत्रूचा शहराला धोका निर्माण झाला: रेलवाहतुक थंडावली. याचा अर्थ

उपासमार आणि आगामी हिवाळ्याची कडाक्याची थंडी!

धान्य आणि सर्पण यांच्या पुरवठ्यावर आता सर्व काही अवलंबून होते.

प्रकरण दुसरे

पयोदरनी आपल्या तोंडामधून आखूड दांड्याचा पाईप बाहेर काढला आणि सावधपणे त्याच्यातील राखेत बोट दाबून पाहिले. पाईप विझला होता.

त्या खोलीतील छताखाली आणि गुबेर्निया कार्यकारी समितीच्या अध्यक्षांच्या खुर्चीवर सुमारे डझनभर सिगारेटींच्या करड्या धुराचा ढग ओठंगला होता. त्या धुरकट वातावरणात खोलीतील लोकांचे चेहरे अस्पष्ट दिसत होते.

अध्यक्षांच्या शेजारी बसलेले तोकरेव किंचित पुढे झुकून अस्वस्थपणे आपल्या तुरळक दाढीमधील केस उपटत होते व बुटक्या, टक्कल पडलेल्या त्या माणसाकडे आपल्या डोळ्याच्या कोपऱ्यातून वारंवार पहात होते. तो माणूस तारस्वरात अखंडपणे बोलत होता, पण एखाद्या शोषून घेतलेल्या अंड्याप्रमाणे त्याची सर्व वाक्ये पोकळ आणि अर्थहीन होती.

त्या म्हाताऱ्या कामगाराच्या डोळ्यातील भाव अकिमने जाणला. लहानपणी खेड्यात असताना झुंजीच्या कोंबड्याच्या डोळ्यात हाच भाव पाहिल्याची त्याला आठवण झाली. आपल्या प्रतिस्पर्ध्यावर तुटून पडण्यापूर्वी त्या कोंबड्याच्या डोळ्यात नेमकी हीच धूर्त चमक दिसायची.

गुबेर्निया पक्ष समितीची परिषद एक तासाहून अधिक काळ

चालली होती. तो टक्कलवाला माणूस रेल्वे सर्पण समितीचा अध्यक्ष होता.

आपल्या चपळ बोटांनी पुढ्यातील कागदांचा ढिगारा चाळीत तो टकल्या बडबडत होता: "...अशा परिस्थितीत गुबेर्निया समितीचा आणि रेल्वे व्यवस्थापन विभागाचा निर्णय अंमलात आणणं अगदी अशक्य आहे. मी पुन्हा एकवार सांगतो, आजपासून एक महिन्यानंतरसुद्धा, चारशे घनमीटरपेक्षा जास्त सर्पण आम्ही देऊ शकणार नाही. आणि एक लाख ऐंशी हजार घनमीटर सर्पणाच्या गरजेबद्दल बोलायचं तर ते अगदी शुद्ध..." योग्य शब्दासाठी तो वक्ता थोडा अडखळला, "अं... शुद्ध स्वप्नरंजन आहे!" त्याने आपले भाषण आटोपले. त्याच्या चिमुकल्या तोंडाचे ओठ घट्ट मिटले गेले तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर दुखरा भाव दिसत होता.

एक प्रदीर्घ शांतता पसरली.

फ्योदरनी आपल्या पाईपवर नखांनी टिचक्या मारल्या आणि राख झाडून टाकली. शेवटी तोकरेवनी शांततेचा प्रथम भंग केला.

"आपल्या तोंडाची वाफ वाया दवडण्यात काही अर्थ नाही," त्यांनी दणदणीत खर्जसुरात बोलायला सुरुवात केली. "रेल्वे सर्पण समितीपाशी अजिबात सर्पण नाही, तिच्याकडं पूर्वीही कधी नव्हतं आणि भविष्यातही असेल अशी तिची अपेक्षा नाही... बरोबर?"

त्या टक्कलवाल्या माणसाने खांदे उडविले.

"कॉम्रेड, मला माफ करा, पण सर्पणाचा साठा आम्ही केला होता. आता रस्त्यावरच्या वाहतुकीत तूट पडली तर..." त्याने आवंढा गिळला आणि आपले चकचकीत टक्कल चौक-

ड्याच्या रुमालाने पुसले. तो रुमाल परत आपल्या खिशात कोंबण्याचे त्याने अनेक निष्फळ प्रयत्न केले आणि सरतेशेवटी विमनस्कपणे आपल्या पोर्टफोलिओखाली त्याने तो रुमाल सारला.

"लाकूड पाठवण्याबाबत तुम्ही काय व्यवस्था केलीत? कटात गुंतलेल्या प्रमुख तज्ज्ञांना अटक केली त्या घटनेला खूप दिवस उलटलेत," कोपऱ्यातून देनेक्को म्हणाले.

टक्कलवाला त्यांच्याकडे वळून म्हणाला, "रेल्वेच्या शासकीय खात्याला मी तीनदा लिहिलं की, आम्हाला जोपर्यंत योग्य वाहतुकीच्या सवलती मिळत नाहीत तोपर्यंत ते अशक्य आहे..."

तोकरेवनी मध्येच त्याला अडवले. "ते आम्ही आधीच ऐकलंय," त्या टक्कलवाल्याकडे रागाने पहात ते थंड सुरात म्हणाले. "आम्ही मूर्ख आहोत असं तुम्हाला वाटतंय का?"

हे शब्द ऐकताच त्या टक्कलवाल्याच्या पाठीतून एक थंड शहारा गेला.

"प्रतिक्रांतिकारकांच्या कारवायांना मी जबाबदार नाही," खालच्या सुरात तो उत्तरला.

"पण रेल्वेमार्गापासून खूप दूर अंतरावर झाडं तोडत होते याची तुम्हाला माहिती होती, होय की नाही?"

"मी त्याबद्दल ऐकलं होतं. पण माझ्या प्रांताच्या बाहेरच्या क्षेत्रातल्या अनियमितपणाकडं मी माझ्या वरिष्ठांचं लक्ष वेधू शकलो नाही."

"किती माणसं कामावर आहेत तुमच्यापाशी?" ट्रेड युनियन मंडळाच्या अध्यक्षांनी विचारले.

"जवळ जवळ दोनशे," टक्कलवाला उत्तरला.

"म्हणजे ते प्रत्येक बांडगूळ वर्षाला एक घनमीटर लाकूड तोडतं!" तोकरेव फणफणले.

"रेल्वे सर्पण समितीनं खास शिध्याची तरतूद केलीय. कामगारांच्या तोंडचा घास कमी करून इथं अन्न पाठवलंय आणि तुम्ही काय करता आहात? कामगारांसाठी दोन वाघिणी भरून पीठ पाठवलं होतं त्याचं काय झालं?" ट्रेड युनियनच्या अध्यक्षांनी चिकाटीने पुढे प्रश्न टाकले.

अशाच प्रकारच्या खोचक प्रश्नांचा सगळीकडून त्या टक्कल-वाल्यावर वर्षाव झाला आणि सतावणाऱ्या सावकारांना टाळू पाहणारा संत्रस्त माणूस जशी उत्तरे देतो तशी त्याने उत्तरे दिली. थेट उत्तरे देणे टाळण्यासाठी तो माशाप्रमाणे वळवळत होता, पण त्याचे डोळे मात्र भेदरलेले दिसत होते. आपल्याला धोका आहे याची त्याला जाणीव झाली. त्याचे भित्रे मन फक्त एकाच गोष्टीचा धावा करीत होते: इथून लौकरात लौकर निसटायचे आणि आपल्या उबदार घरट्यात गुडुप व्हायचे; तिथे चवदार भोजन त्याची वाट पहात असेल आणि त्याची तरणीबांड बायको गुलगुलीत कादंबऱ्या वाचत वेळ काढीत असेल!

टक्कलवाल्याच्या उत्तरांना लक्षपूर्वक ऐकून फ्योदरनी आपल्या टिपणवहीत खरडले: "या माणसाची योग्य तपासणी केली पाहिजे असे मला वाटते. अकार्यक्षमतेपेक्षा आणखी काहीतरी इथे पाणी मुरतेय. त्याच्याबद्दलच्या एक-दोन गोष्टी मला माहीत आहेत... चर्चा थांबवा आणि त्याला जाऊ द्या. म्हणजे आपण कामाला लागू शकू."

अध्यक्षांनी ती चिठ्ठी वाचली व फ्योदर यांच्याकडे पाहून संमतीदर्शक मान डोलावली.

टेलिफोन करण्यासाठी झुखराय उठून बाहेरच्या व्हरांड्यात गेले. ते परत आले तेव्हा अध्यक्ष ठराव वाचत होते:

"...धडधडीत घातपात केल्याबद्दल रेल्वे सर्पण समितीच्या व्यवस्थापन विभागाला बडतर्फ करणे; लाकूड कापणीची बाब चौकशी अधिकाऱ्यांकडे सोपविणे."

यापेक्षा अधिक वाईटाची टक्कलवाल्याने अपेक्षा केली होती. धडधडीत घातपात केल्याच्या आरोपावरून त्याला बडतर्फ करण्यात आल्यानंतर त्याच्या एकूण खात्रीशीरपणाबद्दल प्रश्न निर्माण झाला असता हे खरे, पण ती अगदी किरकोळ बाब होती. बोयारकाच्या कामाबाबत त्याला चिंता नव्हती, तो त्याचा मुळी प्रांतच नव्हता. त्याने स्वतःशी विचार केला: "पण अगदी गुळगुळीत हजामत झाली. च्यायला, मला वाटलं त्यांना काहीतरी सुगावा लागला..."

आता तो एकदम निवांत झाला. आपले कागदपत्र पोर्ट-फोलिओमध्ये परत ठेवीत तो म्हणाला: "अर्थात मी बिगरपक्षीय तज्ज्ञ आहे आणि माझ्यावर विश्वास न ठेवण्याचं तुम्हाला स्वातंत्र्य आहे. पण माझी सदसद्विवेकबुद्धी स्वच्छ आहे. माझ्याकडून अपेक्षित असलेलं काम करण्यात मला जर अपयश आलं असेल, तर केवळ ते काम अशक्य होतं म्हणूनच!"

कुणीही काहीही भाष्य केले नाही. तो टक्कलवाला खोलीतून बाहेर पडला, घाईघाईने जिन्यावरून खाली उतरला आणि सुटकेचा जोरदार निश्वास टाकीत त्याने रस्त्यावर जाण्यासाठी दार उघडले.

"आपलं नांव काय?" लष्करी कोटातल्या एका माणसाने त्याला अडवून विचारले.

विलक्षण निराश सुरात टक्कलवाला चाचरला: "चेर... वीन्स्की..."

तिकडे वरच्या मजल्यावर, तो तिऱ्हाईत जाताच बैठकीच्या टेबलाशी तेरा डोकी खाली झुकली.

उलगडून पसरलेल्या नकाशावर बोट खुपशीत झुखराय म्हणाले: "हे पहा, बोयारका स्टेशन. लाकडं तोडण्याची जागा तिथून सहा वेर्स्ता लांब आहे. ह्या जागी दोन लाख दहा हजार घनमीटर लाकूड रचून ठेवलंय. ते सारं लाकूड साठवून ठेवायला माणसांची अख्खी फौज आठ महिने राब राब राबली. आणि फळ काय? तर विश्वासघात. रेल्वेपाशी आणि शहरापाशी सर्पणाचा ठणठणाट. ते लाकूड सहा वेर्स्ता अंतर काटून स्टेशनापर्यंत आणायला पाच हजार गाड्यांना किमान एक महिना लागेल आणि तेसुद्धा त्यांनी दररोज दोन खेपा टाकल्या तर! सर्वांत जवळचं खेडं पंधरा वेर्स्ता लांब आहे. शिवाय ओर्लीक आणि त्याची टोळी त्या भागात धुमाकूळ घालतेय. या सर्वांचा अर्थ तुम्हाला समजतो? खरं म्हणजे मूळ योजनेप्रमाणं लाकूडतोड या ठिकाणी सुरू व्हायला पाहिजे होती आणि स्टेशनाच्या दिशेनं यायला पाहिजे होती. त्या हरामखोरांनी ऐन जंगलात ते काम केलं. तोडलेलं लाकूड रेल्वे स्टेशनापर्यंत आपल्याला आणता येऊ नये, असा त्यांचा डाव होता. आणि त्यांचा अंदाज फारसा चुकला नाही, कारण या कामासाठी आपल्याला शंभरसुद्धा गाड्या मिळणार नाहीत. अगदी वाईट रीतीनं त्यांनी आपल्यावर घाव घातलाय. बंडाइतकीच ही बाब गंभीर आहे."

नकाशाच्या मेणचट कागदावर झुखराय यांची गच्च मिटलेली मूठ दण्णदिशी आदळली. त्या परिस्थितीच्या अधिक

गंभीर बाबींचा झुखरायनी जरी उच्चार केला नव्हता, तरी त्या तेराही लोकांच्या नजरेसमोर स्पष्ट दृश्य उभे होते. हिवाळा तोंडावर आला होता. इस्पितळे, शाळा, कचेऱ्या, लक्षावधी माणसे गोठवणाऱ्या थंडीच्या पकडीत सापडलेली त्यांना दिसत होती. रेल्वे स्टेशनांवर लोकांची अफाट गर्दी उसळल्याची व आठवड्याला फक्त एक आगगाडी वाहतुक करीत असल्याची दृश्ये त्यांच्या डोळ्यांसमोर आत्ताच स्पष्ट दिसत होती.

प्रत्येक माणूस या परिस्थितीचा गंभीरपणे विचार करीत होता. विलक्षण स्तब्धता पसरली होती.

शेवटी फ्योदरनी आपली मूठ सैल केली.

"कॉम्रेडहो, एक मार्ग सुचतोय", ते म्हणाले.

"रेल्वे स्टेशनापासून लाकूडतोडीच्या पट्ट्यापर्यंत सात वेर्स्ता लांबीचा नॅरोगेज रेलरस्ता आपण तीन महिन्यात बांधला. पाहिजे. पट्ट्याच्या आरंभाकडं नेणारा पहिला रेलरस्त्याचा भाग सहा आठवड्यात तयार झाला पाहिजे. गेला आठवडाभर ही योजना मी तयार करतोय. आपल्याला", झुखराय यांच्या कोरड्या पडलेल्या घशात आवाज चिरकला, "तीनशे पन्नास कामगार आणि दोन इंजिनिअर यांची गरज लागेल. पुश्चा-वादीत्सामध्ये भरपूर रूळ आणि सात इंजिनं आहेत. कम्सामोलच्या सभासदांनी गुदामांमधून ती शोधून काढली. पुश्चा-वादीत्सापासून शहरापर्यंत एक नॅरोगेज रेलरस्ता बांधण्याची योजना युद्धापूर्वी आखण्यात आली होती. अडचण एकच आहे, ती म्हणजे बोयारकामध्ये कामगारांची राहण्याची सोय नाही. तिथं सारं काही पडझडीच्या अवस्थेत आहे. एका वेळी एका पंधरवड्यापुरते लोकांचे लहान लहान गट आपण पाठवले पाहिजेत. त्यापेक्षा जास्त काळ ते टिकाव

धरू शकणार नाहीत. अकीम, आपण कम्सामोलांना पाठवू या का?" उत्तराची वाट न पाहता ते पुढे म्हणाले: "या स्थळावर जास्तीत जास्त सभासद पाठवण्याचा कम्सामोलनं प्रयत्न करावा. सलोमेन्का संघटनेच्या लोकांनी आणि शहरातल्या काहीजणांनी आरंभ करावा. हे काम फार फार कठीण आहे. पण काय पणाला लागलंय याची माहिती तरुणांना दिली, तर ते ही कामगिरी नक्की पार पाडतील अशी मला खात्री आहे."

रेल्वे-प्रमुखांनी अनिश्चितपणाच्या भावनेने मान हलविली.

"मला वाटतं ही योजना काही उपयोगाची नाही. शरदातला पाऊस सुरू होतोय आणि गोठवणारी थंडी येतेय, अशा परिस्थितीत जंगलात सात वेर्स्ता रूळ टाकायचं काम म्हणजे..." निराश सुरात ते बोलू लागले. पण झुखरायनी त्यांचे बोलणे तात्काळ तोडले.

"आन्द्रेई वासील्येविच, सर्पणाच्या प्रश्नाकडं तुम्ही जास्त लक्ष पुरवायला पाहिजे होतं. हा रेलरस्ता बांधलाच पाहिजे आणि आपण तो बांधणार आहोत. हाताची घडी घालून स्वस्थ बसायची आणि थंडीत गोठून मरण्याची आपली तयारी आहे का? मुळीच नाही!"

हत्यारांचे शेवटचे खोके आगगाडीत चढविण्यात आले. आगगाडीच्या कर्मचाऱ्यांनी आपापल्या जागा घेतल्या. पावसाची छान झिमझिम चालू होती. रीताच्या चकाकत्या कातडी जाकीटावरून स्फटिकासारखे स्वच्छ पावसाचे थेंब ओघळत होते.

रीताने अत्यंत प्रेमाने तोकरेव यांच्याशी हस्तांदोलन करीत हळूच म्हटले: "तुमच्या कामात यश येवो हीच इच्छा!"

त्या म्हाताऱ्या माणसाने आपल्या झुपकेदार पांढऱ्या भुवयांखालच्या डोळ्यांनी रीताला ममतेने न्याहाळले.

"त्यांनी आम्हाला वैताग दिलाय खरा," स्वतःशीच ते मोठ्याने म्हणाले. "तुम्ही इथं सगळ्या गोष्टींवर नीट लक्ष ठेवा. तिथं काही अडचण निर्माण झाली तर आवश्यक त्या ठिकाणी दबाव आणा. इथली कुचकामी माणसं लांबवण लावल्याशिवाय काहीही काम धड करत नाहीत. बराय मुली, मी आता आगगाडीत चढतो."

म्हाताऱ्याने आपल्या जाकीटाची बटणे लावली. शेवटच्या क्षणी रीताने सहज चौकशी केली: "कोर्चागिन चाललाय तिकडं? मुलांमध्ये तो कुठं दिसला नाही मला!"

"तो आणि कामावरचे व्यवस्थापक आमची तिथली व्यवस्था करायला कालच तिकडं गेलेत."

त्याच वेळी झार्कीय, दुबावा आणि आन्ना बोरहार्ट फलाटा-वरून घाईघाईने त्यांच्या दिशेने आले. आन्नाने आपल्या खांद्यावर निष्काळजीपणाने जाकीट फेकले होते व तिच्या सडपातळ बोटांमध्ये सिगरेटचे विझलेले थोटुक होते.

इतर माणसे तेथे येऊन पोचण्यापूर्वी तोकरेवना आणखी एक प्रश्न विचारायला रीताला सवड सापडली.

"कोर्चागिनबरोबर तुमचा अभ्यास कसा काय चाललाय?"

म्हाताऱ्याने तिच्याकडे आश्चर्याने पाहिले.

"कसला अभ्यास? तो पोरगा तुमच्या हाताखाली शिकतोय ना? तुमच्याबद्दल त्यानं मला खूप काही सांगितलं! फार मानतो तो तुम्हाला!"

रीता बुचकळ्यात पडली. "कॉम्रेड तोकरेव, तुम्ही खरं

सांगताय? माझ्याबरोबरचे धडे संपल्यानंतर खुलासे विचारण्यासाठी नेहमी तो तुमच्यापाशी येत नाही?"

म्हातारा खो खो हसत सुतला. "माझ्याकडं? कशाला? कित्येक दिवसात त्याचा मुखडासुद्धा पाहिला नाही!"

इंजिनाने जोरात शिट्टी वाजविली. क्लाविचेक एका डब्यातून ओरडला:

"कॉम्रेड उस्तिनोविच, आमच्या डॅडींना आमच्याकडं परत द्या आता! त्यांच्याशिवाय आमचं कसं चालेल?"

तो चेक तरुण आणखी काहीतरी बोलायच्या बेतात होता, पण उशीरा येणाऱ्या तिघांना पाहून त्याने आपले बोलणे आवरले. आन्नाच्या डोळ्यातील चिंतेची छटा त्याने हेरली, दुबावाला तिने दिलेले निरोपाचे स्मित त्याने दुखऱ्या मनाने टिपले व चटकन तो खिडकीपासून आत वळला.

शरदातला पाऊस तोंड झोडपीत होता. जस्ती रंगाचे बाष्पाने भरलेले जडावलेले ढग पृथ्वीवर अगदी खाली ओठंगून सरपटत चालले होते. शरदाच्या त्या अखेरच्या दिवसात झाडे उघडीबोडकी पडली होती. कुंपणाच्या उपयोगाला येणारी झाडे अगदी रोडावली होती आणि मरगळली होती. त्यांचे सुरकुतलेले बुंधे तपकिरी शेवाळयात लपले होते. कठोर शरदाने त्यांची तलम वस्त्रे हिरावून घेतली होती आणि ती तेथे नग्नावस्थेत केविलवाणी उभी होती.

जंगलाच्या मध्यभागी स्टेशनाची ती छोटी इमारत अगदी एकाकी उदास उभी होती. दगडांची रास रचलेल्या फलाटापासून जंगलाच्या दिशेने ताज्या खणलेल्या मातीचा एक पट्टा दिसत होता. त्या पट्ट्याभोवती मुंग्यांसारखी माणसांची धावपळ चालली होती.

रेंदाळलेला चिखल पायांखाली रपरपताना कसेसेच वाटत होते. कडेच्या दगडावर पहारींचे आणि फावडयांचे दणादण घाव बसत होते. माणसे मोठ्या जोमाने खणत होती.

चाळणीतून पडाव्या तशा पावसाच्या सरी कोसळल्या आणि लोकांच्या कपडयांमधून पावसाचे थंडगार थेंब आत घुसले. त्या पावसामुळे त्यांच्या केल्या श्रमांवर अक्षरशः पाणी पडते की काय अशी धास्ती निर्माण झाली, कारण चिकणमाती विदघळून कडेने तिचा लोंढा वाहू लागला होता.

चिंब भिजलेली आणि गारठलेली माणसे अंधार पडल्या-नंतरसुद्धा काम करीत होती. आणि दर दिवसागणिक तो माती उकरलेला पट्टा जंगलाच्या दिशेने दूर दूर सरकत होता.

स्टेशनापासून जवळच एक भेसूर सांगाडा अस्पष्ट दिसत होता. एकेकाळी ती विटकरी इमारत होती. पण दरोडेखो-रांनी पूर्वीच तेथून जे काही लुटता येण्यासारखे होते ते लुटून, ओरबाडून नेले होते. खिडक्या व दारे यांच्या जागी भली-मोठी भगदाडे होती; पूर्वी जेथे चुलाण्याची दारे होती तेथे मोठे काळे खड्डे होते. छिन्नविच्छिन्न छताच्या भोकांमधून एखाद्या सांगाडयाच्या बरगडयांप्रमाणे वासे लोंबत होते.

फक्त चार मोठ्या खोल्यांमधील काँक्रीटची फरशी तेवढी शाबूत होती. रात्रीच्या वेळी ह्या फरशीवर चारशे माणसे आपल्या अंगातल्या ओलसर चिखलभरल्या कपडयांसकट झोपत होती. दारात ते आपले कपडे पिळत तेव्हा चिखलाचे पाणी त्यांच्या कपडयांमधून वाहू लागे. मग पावसाच्या आणि चिखलाच्या नांवाने माणसे कडाकडा बोटे मोडत. त्या फरशीवर वाळल्या गवताचा पातळ थर पसरला होता व ऊब मिळावी म्हणून ती माणसे एकमेकांना चिकटून एका ओळीने झोपत.

त्यांच्या कपड्यांमधून वाफ बाहेर येई, पण ते वाळत नसत. खिडक्यांच्या रिकाम्या चौकटींवर अडकवलेल्या पोत्यांवर पावसाचे सपकारे बसत आणि पाण्याचे ओघळ फरशीवर वाहू लागत. पत्र्याच्या तुटक्या छपरावर पावसाच्या सरींचा ताडताड आवाज घुमत असे आणि दारांच्या मोठ्या फटींमधून घूं घूं करीत वारा आत घुसे.

पडक्या बराकींमध्ये मुदपाकखाना होता. तिथे सकाळी सारे लोक चहा पीत व आपल्या कामावर जात. दररोज एकच प्रकारचे जेवण मिळे: उकडलेली मसूर आणि कोळशासारखा काळाकुट्ट दीड पौंड पाव. लोकांना त्या एकसुरी बेचव जेवणाची अगदी शिसारी आली होती.

पण शहराकडून फक्त एवढ्याच गोष्टी पुरविणे शक्य होते.

कामावरचे व्यवस्थापक वालेऱ्यान निकोदीमोविच पातोश्कीन हे उंच, काटकुळे, तोंडाशी दोन मोठ्या खोल सुरकुत्या पडलेले वयस्क गृहस्थ आणि जाड्याभरड्या चेहऱ्याचे, गुबगुबीत नाकाचे, गाठीव बांध्याचे तंत्रज्ञ वाकुलेन्को, या दोघांची स्टेशनमास्तरांच्या घरात राहण्याची सोय केली होती.

स्टेशनवरील चेकाचे एजंट खोल्यावा यांच्या छोट्याशा खोलीत तोकरेव यांनी आपला मुक्काम ठेवला होता. खोल्यावा हे छोट्या अंगलटीचे, चटपटीत स्वभावाचे गृहस्थ होते.

विलक्षण धैर्याने माणसे कष्ट सहन करीत होती आणि रेलमार्ग दर दिवसागणिक जंगलामध्ये पुढे पुढे सरकत होता.

पण काही लोक पसार झाले होते हे मात्र खरे! प्रथम नऊ लोक पळून गेले; त्यानंतर काही दिवसांनी आणखी पाच पळाले.

काम सुरू झाल्यानंतर एक आठवड्याने पहिले संकट

कोसळले. रात्रीच्या आगगाडीने पावाचा पुरवठा आला नाही.

दुबावाने तोकरेवना उठविले आणि ती बातमी सांगितली. पक्षाच्या चिटणीसांनी आपले केसाळ पाय बिछान्यावरून खाली सोडले व काखेत कराकरा खाजविले.

"हं! म्हणजे आत्ता खरी गंमत सुरू झाली म्हणायची!" ते गुरगुरले आणि भराभरा कपडे अंगात घालायला त्यांनी सुरुवात केली.

खोल्यावा आपल्या तोकड्या पायांनी इकडेतिकडे दुडुदुडू पळू लागला.

तोकरेवनी त्याला म्हटले: "धावत जाऊन खास विभागाला फोन कर," आणि दुबावाकडे वळून ते पुढे म्हणाले, "आणि पावाबद्दल कुणाला चकार शब्दानं सांगायचं नाही हे लक्षात ठेव."

तब्बल अर्धा तास रेल्वे टेलिफोन ऑपरेटरांशी खटखट करून जिद्दीच्या खोल्यावाने अखेरीस खास विभागाचे उपप्रमुख झुखराय यांच्याशी संपर्क साधला. तेवढा वेळ तोकरेव शेजारी अधीरपणे येरझाऱ्या घालीत होते.

"काय? पाव मिळाला नाही? याला कोण जबाबदार ते मी शोधून काढतो!" टेलिफोनवरून येणाऱ्या झुखराय यांच्या आवाजात अनिष्टाची झाक होती.

"आम्ही माणसांना उद्या खायला काय घालायचं?" तोकरेव रागाने उलट ओरडले.

फोनवर दीर्घकाळ स्तब्धता पसरली. झुखराय यांच्या मनात कृतीचे काही विचार चालले होते हे उघड जाणवत होते. शेवटी ते म्हणाले: "आज रात्री तुम्हाला पाव मिळेल. तरुण लीत्केला मी मोटार देऊन पाठवतो. त्याला रस्ता माहीत आहे. सकाळपर्यंत तुम्हाला पाव मिळेल."

पहाटेच्या वेळी पावाची पोती लादलेली, चिखलाने माखलेली मोटार स्टेशनात आली. रात्रभर न झोपता गाडी चालविण्याचा ताण सहन केलेला लीत्के पांढराफटक पडला होता. मोटारीतून तो खाली उतरला तेव्हा कमालीचा थकला होता.

रेलरस्त्याच्या कामात वाढत्या प्रमाणात अडचणी निर्माण होऊ लागल्या. रेलखात्याने कळविले: रूळांखालचे लाकडी ओंढे नाहीत. रेलरस्त्याच्या कामाच्या ठिकाणी रूळ व इंजिने पाठविण्याची साधने शहरच्या अधिकाऱ्यांना मिळेनात. इंजिनांची बरीच दुरुस्ती करणे आवश्यक होते असे आढळून आले. आपल्या कामाचा वाटा पहिल्या पथकातील लोकांनी पुरा केला होता. पण त्यांची जागा घ्यायला नवे कामगार मिळत नव्हते. पहिल्या पथकातील लोक एवढे प्रचंड थकले होते, की त्यांना आणखी थांबवून धरण्यात काही अर्थ नव्हता.

मोडकळीस आलेल्या आडोशात वातीच्या दिव्याच्या मंद प्रकाशात पक्षाचे प्रमुख सभासद रात्री खूप उशीरापर्यंत एकूण परिस्थितीविषयी चर्चा करीत बसले होते.

त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी तोकरेव, दुबावा आणि क्लाविचेक आपल्या सांगाती सहा माणसांना घेऊन इंजिने दुरुस्त करण्यासाठी व रूळांची पाठवणी लौकर करण्यासाठी शहरात गेले. क्लाविचेक मूळ धंद्याने बेकरीवाला होता. त्याला पुरवठा विभागाकडे तपासनीस म्हणून पाठविण्यात आले. बाकीचे लोक पुश्चा-वादीत्साला गेले.

पाऊस अखंड कोसळत होता.

चिकट गाळामधून पावेल कोर्चागिनने मोठ्या कष्टाने आपला पाय वर उपसून काढला. त्याच्या पायाला झालेल्या थंडगार चावऱ्या स्पर्शाने त्याला समजले की, त्याच्या बुटाचा झिजलेला

तळवा अखेरीस उघडला होता. ह्या कामावर आल्यापासून पावेलला त्याच्या फाटक्या बुटांनी खूप त्रास दिला होता. ते बूट कधीही वाळत नव्हते आणि त्यांच्या आत घुसणारा चिखल तो चालू लागला म्हणजे पचपच वाजायचा. आता एका बुटाचा तळवा संपूर्ण उलगडला होता आणि त्याच्या उघड्या पावलाला थंडगार चिखल खुपत होता. पावेलने चिखलातून तो तळवा उपसून बाहेर काढला व त्याच्याकडे निराशपणे पाहिले. शिव्या न देण्याची शपथ त्याने नकळतपणे मोडली. एका उघड्या पायानिशी कामावर जाणे शक्य नसल्याने तो लंगडत परत बराकींमध्ये आला. मुदपाकखान्याच्या शेजारी बसून त्याने आपल्या पायावरचे चिखलभरले फडके सोडले आणि बधीर झालेले पाऊल आगीच्या धगीवर धरले.

स्वैपाकघरातील टेबलापाशी उभे राहून ओदार्का बीट चिरत होती. लाईनमनची ही बायको स्वैपाकाच्या कामात मदतनीस म्हणून तेथे काम करीत होती. अजून वयाने तरुण असलेली, घसघशीत बांध्याची, रुंद पुरुषी खांद्यांची, पुष्ट स्तन आणि नितंब असलेली ही बाई हातात सुरी धरून जोरजोराने बीट कापत होती. तिच्या चपळ बोटांखाली कापलेल्या भाजीपाल्याचा ढीग वेगाने उंचावत होता.

ओदार्काने एक बेफिकीर कटाक्ष पावेलच्या दिशेने टाकला आणि तुटक आवाजात तिने विचारले:

"तू काय जेवणासाठी आलास? जेवण तयार व्हायला अजून खूप वेळ आहे. कामावरून असं चोरून पळून यायला तुला लाज वाटली पाहिजे! तुझे पाय चुलीपासून लांब घे! हा काही हमामखाना नाही, स्वैपाकघर आहे हे!"

त्याचवेळी वयस्क आचारी आत आला.

"माझा बूट पार फाटला," स्वैपाकघरामधील आपल्या अवेळी उपस्थितीचा खुलासा पावेलने केला.

आचाऱ्याने त्याच्या फाटलेल्या जुनाट बुटाकडे नजर टाकली व ओदार्काकडे मानेने इशारा करीत म्हटले: "हिचा नवरा तुला मदत करील. त्याला थोडं चांभारकाम येतं. लौकर बूट शिवून घे, नाहीतर तुझी अवस्था वाईट होईल. बुटाशिवाय इथं जगणं शक्य नाही."

ओदार्काने हे बोलणे ऐकले तेव्हा तिने पुन्हा एकदा पावेलकडे कटाक्ष टाकला.

"मला वाटलं तू गुंड आहेस," तिने सरळ कबुली दिली.

तिच्याविषयी आपल्या मनात राग नाही हे दाखविण्यासाठी पावेलने स्मित केले. ओदार्काने सराईताच्या नजरेने त्याचा बूट न्याहाळला.

"त्याला ठिगळ लावून काही उपयोग नाही," शेवटी ती म्हणाली. "पण मी काय करीन सांगते. आमच्या घरात जुने पावसाळी रबरी बूट पडलेत. त्यांना तू ह्या बुटांच्या वरती चढव. असा फाटक्या बुटांनी फिरत राहिलास तर मरशील! बर्फाची थंडी कुठल्याही दिवशी सुरू होईल आता!"

अनुकंपेने भरलेली ओदार्का सुरी खाली ठेवून घाईधाईने बाहेर गेली व लौकरच रबरी बूट आणि चिवट लिननचा कपडा घेऊन परत आली.

उबदार आणि कोरडा झालेला आपला पाय जाड लिननच्या कपड्यात गुंडाळून पावेलने जेव्हा रबरी बूट चढविला, तेव्हा ओदार्काकडे त्याने आत्यंतिक कृतज्ञतेचा एक दृष्टिक्षेप टाकला.

तोकरेव शहरातून परतले तेव्हा कमालीचे संतापलेले होते.

महत्त्वाच्या प्रमुख कम्युनिस्टांची त्यांनी खोल्यावाच्या खोलीत बैठक भरविली आणि ती अप्रिय बातमी त्यांना सांगितली.

"सगळीकडे अडचणीच अडचणी आहेत. जिथं जावं तिथं काही काम होतंय असं वाटतं, पण प्रत्यक्षात काहीच घडत नाही. त्या पांढऱ्या उंदरांचा सगळीकडं सुळसुळाट झालाय आणि त्यांना खतम करायला आपली आयुष्यं पुरी पडतील असं वाटत नाही. मित्रांनो, परिस्थिती अत्यंत वाईट आहे. आपल्या जागी काम करायला नवी माणसं अजून मिळालेली नाहीत आणि किती नवी माणसं मिळतील याचा कुणालाच अंदाज नाही. हिवाळा आता कोणत्याही क्षणाला सुरू होईल आणि त्यापूर्वी काय वाट्टेल ते करून आपल्याला दलदलीच्या प्रदेशापलिकडं काम नेलं पाहिजे, कारण एकदा का जमीन गोठली म्हणजे मग सारंच संपलं! तेव्हा सगळा गोंधळ करून ठेवणाऱ्या शहरातल्या त्या लोकांना बकोटीला धरून इथं आणीपर्यंतच्या काळात इथं आपल्याला आपल्या कामाचा वेग दुप्पट केला पाहिजे. हा रेलरस्ता आपल्याला बांधलाच पाहिजे आणि आपण तो बांधणार आहोत. मग तो बांधताना आपल्याला मरण आलं तरी त्याची पर्वा नाही. तसं वागलो नाही तर आपण बोल्शेविक कसले, गांडुळं ठरू!" तोकरेव यांच्या घोगऱ्या खर्ज आवाजात एक कणखरपणा होता आणि त्यांच्या झुपकेदार भुवयांखालील डोळ्यात एक निग्रही चमक होती.

"आज एक गुप्त बैठक भरवून आपल्या पक्षाच्या सभासदांना बातमी कळवू आणि उद्या सारेजण कामाला लागू. बिगरपक्षीय लोकांना उद्या सकाळी आपण परत जायची परवानगी देऊ; बाकीचे आपण इथं राहू. हा गुबेर्निया समितीचा निर्णय

आहे," पानक्रातोव यांच्या हाती घडी केलेला एक कागद देत तोकरेव म्हणाले.

पावेल कोर्चागिनने पानक्रातोव यांच्या खांद्यांवरून डोकावून तो कागद वाचला:

"आणीबाणी लक्षात घेता, कम्सामोलच्या सर्व सभासदांनी कामाच्या ठिकाणीच रहावयाचे आहे आणि सर्पणाचा पहिला हप्ता जोवर येत नाही तोवर त्यांची कामामधून मुक्तता करण्यात येणार नाही.

सही, रीता उस्तिनोविच, गुबेर्निया समितीच्या चिटणीसांच्या वतीने."

भोजनघराच्या बराकी गच्च भरल्या होत्या. त्या अरुंद जागेत एकशेवीस माणसे दाटीवाटीने सामावली होती. काही भिंतींशी टेकून उभे होते, काही टेबलांवर चढले होते आणि काहीजण तर मैदानी मुदपाकखान्याच्या टपावर चढले होते.

पानक्रातोवनी सभा सुरू केली. नंतर तोकरेवनी एक छोटे भाषण केले. त्या भाषणाच्या अखेरी एक घोषणा करून त्यांनी जणू बाँबगोळा टाकला:

"कम्युनिस्ट आणि कम्सामोल उद्या काम सोडून जाणार नाहीत."

म्हातारबाबांनी आपल्या ह्या निवेदनाबरोबर असा काही आविर्भाव केला की, त्या निर्णयाचा ठामपणा सर्वांवर पक्का ठसावा. त्यांच्या त्या कृतीने शहरात जाण्याच्या, घरी परतण्याच्या, त्या कोंडीतून बाहेर पडण्याच्या सर्व आशांवर पाणी पडले होते.

काही क्षणांपर्यंत रागीट आवाजांनी सारे वातावरण भरून

गेले. लोकांच्या हालचालींमुळे तेलाचा मंद दिवा फडफडू लागला. त्या अर्धवट अंधाऱ्या वातावरणात गोंगाट वाढला. त्यांना "घरी" जायचे होते; सहनशक्तीची त्यांनी सीमा गाठली होती. संतापाने ते निषेध व्यक्त करीत होते. काही लोक मात्र मुकाट राहिले. फक्त एक माणूस काम सोडून जाण्याची भाषा बोलला.

अत्यंत घाणेरड्या शब्दांचा भडिमार करीत संतापाने तो एका कोपऱ्यातून ओरडला: "सालं गेलं सगळं खड्ड्यात! मी इथं आणखी एकही दिवस रहायला तयार नाही. एखादा गुन्हा केला असेल तर असलं कठीण श्रमाचं काम करणं ठीक आहे. पण आम्ही काय केलंय? दोन आठवडे हे सारं सोसलं तेवढं खूप झालं! ज्यांनी हा निर्णय घेतलाय त्यांनाच इथं येऊन स्वतः काम करू दे! ह्या घाणीत चिवडत बसायला काही लोकांना आवडत असेल, पण मला अवघं एकच आयुष्य लाभलंय. मी उद्या जाणार!"

तो आवाज ओकुनेव यांच्या मागून आला होता. बोलणारा कोण आहे ते पाहण्यासाठी त्यांनी काडी ओढली. बोलणाऱ्याचा संतापलेला वेडावाकडा चेहरा आणि उघडलेले तोंड त्या काडीच्या ज्योतीमुळे क्षणभर अंधारातून उजळले. पण तो क्षण त्या बोलणाऱ्या व्यक्तीला ओळखण्यास ओकुनेव यांना पुरेसा ठरला. गुबेर्निया अन्नमंत्रालयाच्या मुनीमांचा तो मुलगा होता.

"कोण आहे ते पाहून ठेवताय अं?" तो खेकसला. "मी काही भीत नाही. मी काही चोर नाही."

काडी विझली. पानक्रातोव उठून ताठ उभे राहिले.

"काय ही बोलायची तऱ्हा झाली? पक्षाचं काम आणि

गुन्हेगारांनी भोगण्याची शिक्षा यांची तुलना करायची हिंमत कशी झाली?" पुढील रांगांवर आपले डोळे वटारीत ते खणखणीत आवाजात म्हणाले. "कॉम्रेडहो, आपण शहरात परत जायचं नाही. आपली जागा इथं आहे. आपण जर आत्ता इथून काम सोडून गेलो, तर माणसं थंडीत गोठून मरतील. जेवढ्या लौकर आपण काम पुरं करू, तेवढ्या लौकर आपण घरी परतू. मागच्या बाजूला केकाटणारा माणूस सुचवतो त्याप्रमाणं पळून जाणं आपल्या विचारांना किंवा आपल्या शिस्तीला शोभत नाही."

बोटीत मालाची चढ-उतार करण्याचे काम करणाऱ्या पानक्रातोवना लांबलचक भाषणे देण्याची सवय नव्हती. पण त्यांच्या त्या छोट्या निवेदनातही मघाच्याच चिडक्या आवाजाने अडथळा आणला.

"बिगर-पक्षीय लोक जात आहेत, होय की नाही?"

"होय."

आखूड ओव्हरकोट घातलेला एक मुलगा धक्काबुक्की करीत पुढच्या भागात आला. कम्सामोलचे कार्ड हवेत उडाले, पानक्रातोव यांच्या छातीवर आदळले आणि टेबलाच्या कडेशी पडले.

"हे घ्या तुमचं कार्ड. ह्या पुठ्ठ्याच्या एका तुकड्यासाठी मी माझ्या प्रकृतीचा धोका पत्करणार नाही!"

संतापलेल्या आरोळ्यांमध्ये त्याचे शेवटचे शब्द बुडून गेले:

"तू काय फेकून देतो आहेस याची तुला कल्पना आहे?"

"विश्वासघातकी कमअस्सल अवलाद!"

"चैन करायला मिळेल म्हणून कम्सामोलमध्ये आला वाटतं?"

"हाकलून द्या त्याला!"

"भडव्याला माझ्या ताब्यात द्या!"

तो फुटीर मुलगा खाली मान घालून बाहेर गेला. जणू तो महारोगी असावा तसे सारे त्याच्यापासून दूर सरकले. तो बाहेर जाताच त्याच्यामागे कर्रर्र आवाज करीत दार बंद झाले.

पानक्रातोवनी ते टाकून दिलेले सदस्यत्वाचे कार्ड उचलले आणि तेलाच्या दिव्याच्या ज्योतीवर धरले.

कार्डाने पेट घेतला आणि जळताना त्याला मुरड पडली.

बंदुकीचा बार जंगलात घुमला. त्या पडक्या बराकींपासून एक घोडेस्वार मागे वळला आणि तुफान वेगाने जंगलातील अंधारात नाहीसा झाला. त्यानंतर क्षणार्धात बराकींमधून आणि शाळेच्या इमारतीमधून माणसे धावत बाहेर आली. दाराशी एक फळकुटाचा तुकडा ठोकून बसविल्याचे कुणाच्या तरी ध्यानात आले. एक काडी पेटविली गेली आणि वाऱ्यापासून तिच्या थरथरत्या ज्योतीला आडोसा धरून त्यांनी त्या फळकुटावरचा खरडलेला निरोप वाचला:

> "ही जागा मोकळी करा आणि आला होतात तिथे परत जा. तसे केले नाहीत तर आम्ही तुम्हा प्रत्येकाला गोळी घालून ठार करू. उद्या रात्रीपर्यंत मी तुम्हाला जाण्याची मुदत देतो.
>
> आतामान चेस्नोक"

चेस्नोक हा ओर्लीकच्या टोळीतला होता.

रीताच्या खोलीतील टेबलावर एक उघडी रोजनिशी पडली आहे.

" २ डिसेंबर

"आज सकाळी पहिला हिमवर्षाव झाला. थंडी कडाक्याची होती. जिन्यावरच व्याचेस्लाव ओल्शीन्स्कीची भेट झाली आणि आम्ही बरोबरच रस्त्यावरून चालत निघालो.

"'मला पहिला हिमवर्षाव फार आवडतो. विशेषत: अशी गोठवणारी थंडी असते तेव्हा! किती छान वाटतं नाही?' तो म्हणाला.

"पण माझ्या मनात बोयारकाचे विचार घोळत होते. गोठवणारी थंडी आणि हिम मला मुळीच आनंदी करीत नाहीत असे मी त्याला सांगितले. उलट मला त्यांच्यामुळे जास्तच निराश वाटते. तसे का वाटते तेही मी त्याला सांगितले.

"त्यावर तो म्हणाला, 'ही अगदी शुद्ध वैयक्तिक प्रतिक्रिया झाली. जर ह्या आधारावर तुम्ही युक्तिवाद करू लागलात तर युद्धकाळात सगळ्या मौजेवर आणि आनंदाच्या कुठल्याही प्रदर्शनावर बंदी घालावी लागेल. पण आयुष्य तसं नसतं. युद्धआघाडीवर जिथं लढाई चाललीय त्या तुकड्यापुरती शोकांतिका मर्यादित आहे. मरणाच्या जवळिकीची तिथं आयुष्यावर सावली पडलीय. पण तरीही तिथली माणसंसुद्धा हसतात. आणि युद्धआघाडीपासून दूर अंतरावरचं आयुष्य तर नेहमीप्रमाणं जात असतं: लोक हसतात, रडतात, यातना भोगतात, आनंद लुटतात, प्रेम करतात, मनोरंजन, करमणूक, उत्तेजक वातावरण यांचा अनुभव घेऊ पाहतात.'

"ओल्शीन्स्कीच्या बोलण्यात उपहासाची छटा शोधणे अवघड

होते. परराष्ट्रखात्याच्या जन-मंत्रालयाचा ओल्शीन्स्की हा प्रतिनिधी आहे. १९१७ पासून तो पक्षात आहे. त्याचा पोषाख नेहमी रुबाबदार असतो, नेहमी गुळगुळीत दाढी केलेली असते व सेंटचा मंद सुवास त्याच्याभोवती नेहमी दरवळत असतो. तो आमच्याच घरात सेगालच्या फ्लॅटमध्ये राहतो. काही वेळा संध्याकाळचा तो मला भेटायला येतो. त्याच्याबरोबर बोलायला छान वाटते. युरोपबद्दल त्याला खूप माहिती आहे, अनेक वर्षे तो पॅरिसमध्ये राहिलाय. पण त्याची आणि माझी कधी चांगली मैत्री होईल अथवा नाही याबद्दल मला शंका आहे. याचे कारण त्याच्या दृष्टीने प्रथम मी एक स्त्री आहे. मी त्याची पक्षातील साथी आहे ही वस्तुस्थिती त्याला दुय्यम वाटते. या बाबतीत आपल्या भावना आणि आपली मते लपवून ठेवण्याचा तो अजिबात प्रयत्न नाही, हे मात्र खरे. आपली मते उघडपणे सांगण्याचे त्याच्यापाशी धैर्य आहे आणि त्याच्या वागण्यात कुठेही असभ्यपणा नाही. सुंदर रीतीने आपल्या भावना व्यक्त करण्याची कला त्याला अवगत आहे. तरीही तो मला आवडत नाही.

"ओल्शीन्स्कीच्या त्या सर्व सफाईदार युरोपीय वर्तनापेक्षा झुखराय यांचा रांगडा साधेपणाच मला जास्त आवडतो.

"बोयारकाच्या बातम्या तुटक स्वरूपात येतात. दर दिवशी आणखी दोनशे यार्डाचा रस्ता घातला. गोठलेल्या जमिनीला उथळ खणून तिच्यावर ते रूळांखालचे लाकडी ओंढे घालीत आहेत. तिथे फक्त दोनशे चाळीस माणसे काम करताहेत. नव्याने गेलेल्यांपैकी निम्मे लोक काम सोडून पळाले. तेथील परिस्थिती खरोखरीच भयानक आहे. गोठलेल्या थंडीत ते पुढे काम चालू कसे ठेवतील, याची मला कल्पनाच करवत

नाही. दुबावाला जाऊन आता आठवडा झाला. पुश्चा-वादीत्सामधल्या आठपैकी फक्त पाच इंजिने ते दुरुस्त करू शकले. बाकीच्या इंजिनांसाठी पुरेसे सुटे भाग नव्हते.

"ट्रामगाड्यांच्या अधिकाऱ्यांनी द्मीत्रीच्या विरुद्ध गुन्हे नोंदलेत. पुश्चा-वादीत्सापासून शहराकडे जाणाऱ्या सर्व गाड्या त्याने आणि त्याच्या पथकाने स्वतःच्या ताब्यात घेतल्या, सर्व उतारूंना ट्रामगाड्यांमधून त्यांनी खाली उतरविले व बोयारका रेलरस्त्यासाठी त्या ट्रामगाड्यांमध्ये रूळ भरले. ट्रामरस्त्यांवरून शहरात स्टेशनापर्यंत त्यांनी १९ गाड्या भरून रूळ वाहून आणले. ट्रामच्या कर्मचाऱ्यांनी ह्या कामाला मोठ्या आनंदाने मदत केली.

"अद्याप शहरात असलेल्या सोलोमेन्का कम्सामोल सभासदांनी रात्रभर श्रमून वाघिणींमध्ये रूळ भरले. द्मीत्री आणि त्याचे पथक त्याच वाघिणींमधून बोयारकाला गेले.

"दुबावाच्या ह्या कृतीला कम्सामोल ब्यूरोपुढे चर्चेला मांडण्यास अकीमने नकार दिला. ट्रामगाड्यांच्या कारभारातील संतापजनक नोकरशाहीबद्दल आणि दिरंगाईबद्दल द्मीत्रीने आम्हाला सांगितले होते. दोन ट्रामगाड्यांपेक्षा जास्त गाड्या त्या कामासाठी देण्यास ट्राम वाहतुक अधिकाऱ्यांनी नकार दिला होता.

"पण तुफ्ताने मात्र दुबावाला खाजगीत ताकीद दिली. तो त्याला म्हणाला, 'ह्या गनिमी सैनिकी डावपेचांना आता सोडून दे. नाहीतर एक दिवस काही कळण्यापूर्वीच तुरुंगात जाऊन पडशील. शस्त्रांचा धाक न घालता हे काम तुला नक्की करता आलं असतं, होय की नाही?'

"दुबावाला एवढा संतापलेला मी कधीही पाहिला नव्हता.

"तो उसळून म्हणाला: 'अरे कुचकामी कारकुना, तू स्वतःच त्यांच्याशी का नाही बोललास? इथं बसून खुर्ची उबवायची आणि वटवट करायची, एवढंच तुला येतं! रूळ न घेता मी बोयारकाला परत कसा जाणार होतो? इथं टवाळक्या करत फिरतोस आणि प्रत्येकाच्या पायात पाय घालायचा प्रयत्न करतोस, त्यापेक्षा तुला तिथं काही उपयोगी पडेल असं काम करायला पाठवला पाहिजे होता. तोकरेवनी तुझ्या डोक्यात काही अक्कल भरली असती!' द्मीत्री एवढ्या मोठ्याने बोलत होता, की सबंध इमारतीत त्याचे बोलणे ऐकू येत होते.

"तुफ्ताने दुबावाविरुद्ध तक्रार लिहिली, पण अकीमने मला खोलीतून बाहेर जाण्यास सांगितले व त्याच्या एकट्याशी जवळ जवळ दहा मिनिटेपर्यंत तो बोलला. त्यानंतर लालबुंद चेहरा झालेला तुफ्ता संतापाने फणफणत पाय आपटीत तेथून निघून गेला."

"३ डिसेंबर

"यावेळी चेकाच्या वाहतुक विभागाकडून गुबेर्निया समितीकडे आणखी एक तक्रार आली आहे. त्या तक्रारीवरून असे दिसते की, मोतोवीलोव्का स्टेशनावर पानक्रातोव, ओकुनेव आणि इतर अनेक कॉम्रेड गेले व तेथील रिकाम्या इमारतींच्या सर्व दारांना, खिडक्यांच्या चौकटींना उचकटून घेऊन गेले. मालगाडीमध्ये त्या सर्व गोष्टी ते जेव्हा भरीत होते तेव्हा स्टेशनवरच्या चेकाच्या माणसाने त्यांना अटक करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्याला निःशस्त्र केले, त्याच्या पिस्तुलातील काडतुसे काढून घेतली आणि गाडीने वेग घेतल्यानंतरच त्याचे

पिस्तूल त्याला परत केले. दारे आणि खिडक्यांच्या चौकटी त्यांनी आपल्या बरोबर नेल्या.

"बोयारका रेल गुदामांमधून वीस पूड खिळे घेतल्याबद्दल रेलखात्याच्या पुरवठा विभागाने तोकरेव यांच्याविरुद्ध तक्रार नोंदली आहे. रूळांच्या खाली घालण्याच्या लाकडी ओंढ्यांचे लाकूड वाहून आणल्याबद्दल मोबदला म्हणून तोकरेवनी ते खिळे शेतकऱ्यांना दिले.

"ह्या सर्व तक्रारींबद्दल मी कॉम्रेड झुखराय यांना सांगितले. पण ते फक्त हसले आणि म्हणाले, 'या सर्व गोष्टींची आपण खबर घेऊ!'

"रेलरस्त्याच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती कमालीची तणावाची आहे. आता प्रत्येक दिवस मोलाचा आहे. प्रत्येक क्षुल्लक गोष्टीसाठी आम्हाला तिथे दबाव आणावा लागतो. गुबेर्निया समितीमधील खोडा घालणाऱ्यांना आम्हाला वारंवार ताकीद द्यावी लागते. आणि कामाच्या ठिकाणी मुले वारंवार नियमांना धाब्यावर बसवतात.

"ओल्शीन्स्कीने मला एक छोटा विजेवर चालणारा स्टोव्ह आणून दिलाय. ओल्गा युरेनेवा आणि मी त्याच्यावर आमचे हात शेकतो. पण खोलीत ऊब आणण्यास तो स्टोव्ह पुरेसा पडत नाही. ह्या कडाक्याची थंडीची रात्र पुरुष मंडळी तिकडे रानात कशी सहन करत असतील? ओल्गा मला सांगतेय की, इस्पितळात एवढा गारठा आहे की रोगी गरम पांघरुणांखालीसुद्धा कुडकुडतात. दोन दिवसानंतर फक्त एकदा इस्पितळ उबदार करण्यात येते.

"कॉम्रेड ओल्शीन्स्की, तुमचे बरोबर नाही. युद्धआघाडीवरची शोकांतिका ही पिछाडीवरचीही शोकांतिकाच असते!"

"४ डिसेंबर

"सबंध रात्र हिमवर्षाव होत होता. बोयारकाहून ते लिहितात की, सर्व काही बर्फाखाली झाकून गेले आहे आणि रस्ता साफ करण्यासाठी त्यांना काम बंद ठेवावे लागले आहे. आज गुबेर्निया समितीने ठराव संमत केला की, ज्या ठिकाणी लाकूडतोड केली जात होती तिथपर्यंतचा रेलरस्त्याचा पहिला भाग १ जानेवारी १९२२ पूर्वी पूर्ण झालाच पाहिजे. हा निर्णय जेव्हा बोयारकाला पोचला तेव्हा तोकरेव यांनी म्हणे शेरा मारला: 'तोपर्यंत आम्ही अखेरचा श्वास टाकला नाही तर नक्की पूर्ण करू!'

"कोर्चागिनबद्दल मला काहीच समजले नाही. पानक्रातोव 'उद्योगात' तो कसा काय गुंतला नाही याचे मला आश्चर्य वाटले. तो मला का टाळतो हे अजूनही समजत नाही."

"५ डिसेंबर

"काल रेलरस्त्याच्या कामाच्या ठिकाणी दरोडेखोरांची धाड पडली."

मऊ भुसभुशीत बर्फात घोडे दुडक्या चालीने थकल्या-भागल्या अवस्थेत चालले आहेत. अधूनमधून बर्फाखालची एखादी डहाळी घोड्याच्या खुराला अडकते व घोडा नाक फुरफुरत थोडासा बुजतो. पण त्याच्या कानाच्या पाठीमागे एक तडाखा मारताच तो इतरांच्या मागे दौडत जातो.

डोंगराळ घळीच्या पलिकडे काळ्या मातीचा पट्टा अजून बर्फाच्या चादरीखाली झाकला गेला नव्हता त्या प्रदेशाकडे

सुमारे डझनभर घोडेस्वार आले. इथे त्यांनी आपल्या घोड्यांचे लगाम खेचले. रिकिब रिकिबीवर घासली गेली म्हणजे बारिक किणकिण आवाज होत होता. त्या लोकांच्या पुढाऱ्याचा घोडा खूप दौड केल्यामुळे घामाने निथळत होता आणि एकाच जागी थयथय नाचत होता.

तो सर्वांत पुढचा घोडेस्वार इतरांना उद्देशून युक्रेनी भाषेत म्हणाला, "इथं त्यांची खूप माणसं आहेत. पण आज त्यांना असं पाणी पाजू की, त्यांना माय आठवेल! आतामान म्हणालाय की, ह्या अक्करमाशांना इथून पिटाळून लावायचं. सर्पणाच्या ढिगांच्या फार जवळ यायला लागलेत लेकाचे!"

स्टेशनपर्यंत नॅरोगेज रेलरस्त्याच्या कडेकडेने एकेकाच्या रांगेने ते दौडत गेले. शाळेच्या जुन्या इमारतीजवळचे मोकळे आवार दृष्टीला पडताच त्यांनी लगाम खेचून घोड्यांना हळू चालवले. मात्र पुढे उघड्यावर येण्याचे धाडस न करता झाडांच्या मागेच ते थांबले.

गोळीबाराच्या फैरीने रात्रीची शांतता टराटरा फाटली. चंद्राच्या प्रकाशात चांदीप्रमाणे चमकणाऱ्या भोजाच्या फांदीवरचा बर्फ खारीप्रमाणे धपकन खाली पडला. झाडांमधून बंदुकींचा चकचकाट झाला, ढिसाळ गिलाव्यामध्ये गोळ्या सटासट घुसल्या आणि पानक्रातोवच्या खिडकीच्या काचा खळ्ळदिशी फुटुन त्यांचा चुरा चुरा झाला.

काँक्रीटच्या फरशीवरची माणसे गोळीबार ऐकताच पटदिशी उठली, पण प्राणघातकी गोळ्यांचे खोलीच्या वरच्या भागात थैमान सुरू झालेले पाहताच पुन्हा एकमेकांवर पटापट आडवी पडली.

"कुठं चाललास?" पावेलच्या कोटाच्या मागील टोकाला खेचत दुबावाने विचारले.

"बाहेर."

"मूर्खा, खाली पडून रहा!" द्मीत्री खेकसला. "तू नुसतं डोकं बाहेर काढलंस तरी ते तुझा फडशा पाडतील."

दाराजवळच ते शेजारी शेजारी पालथे पडले होते. दाराकडे पिस्तूल रोखून दुबावा पोटावर आडवा पडला होता. आपल्या पिस्तुलाच्या नळीवर अस्वस्थपणे बोटे फिरवीत पावेल ओणवा बसला. पिस्तुलात पाच काडतुसे होती. एका काडतुसाची जागा मोकळी होती. त्याने पुढचा खटका फिरविला.

बाहेरचा गोळीबार अचानक थांबला. त्यानंतरच्या शांततेमुळे ताण वाढला.

"ज्यांच्याजवळ शस्त्रं आहेत त्यांनी या बाजूनं या," दुबावाने घोगऱ्या अस्फुट आवाजात हुकूम केला.

सावधपणे पावेलने दार उघडले. मोकळे आवार निर्मनुष्य होते. हिमकणांची भुरभुर चालू होती.

जंगलात दहा घोडेस्वार आपल्या घोड्यांना चाबूक हाणीत तुफान वेगाने दौडत गेले.

दुसऱ्या दिवशी शहरातून ट्रॉली आली. झुखराय आणि अकीम तिच्यामधून खाली उतरले. तोकरेव आणि खोल्यावा त्यांना भेटले. एक मशिनगन, काडतुसांच्या पट्ट्यांची अनेक खोकी व दोन डझन रायफली, एवढे सामान फलाटावर उतरविण्यात आले.

रेलरस्त्यावरून ते घाईघाईने निघाले. फ्योदर यांच्या लांब कोटाची मागील टोके बर्फात त्यांच्या पाठीमागून नागमोडी

नक्षी कोरीत फरपटत चालली होती. अजूनही ते खलाशाच्या फेंगडया चालीने चालत होते; जणू काही विनाशिकेच्या डेकवर ते येरझाऱ्या घालीत होते! लांबटांग्या अकीम फ्योदर यांच्या पावलाला पाऊल जमवून चालत होता. पण त्या दोघांच्या जोडीने वेग राखायला तोकरेवना मात्र मधून मधून दुडक्या चालीने पळावे लागत होते.

"दरोडेखोरांची धाड हे काही आपल्यापुढचं मोठं संकट नाही. पण रेलरस्त्याच्या वाटेत एक त्रासदायक उंचवटा आहे. आपलं दुर्दैव म्हणायचं! आता त्यासाठी खूप जादा खोदकाम करावं लागणार."

म्हाताराबाबा थांबले, त्यांनी वाऱ्याकडे पाठ केली आणि काडीवर हाताचा आडोसा धरून सिगारेट पेटवली. थोडे झुरके मारल्यानंतर तोकरेव इतरांना गाठायला धावले. त्यांची वाट पहात अकीम थांबला होता, पण झुखराय मात्र पुढे चालतच राहिले होते.

"वेळेवर रस्ता पुरा होईल असं तुम्हाला वाटतं?" अकीमने तोकरेवना विचारले.

उत्तर देण्यापूर्वी तोकरेव थोडा वेळ थांबले. सरतेशेवटी ते म्हणाले: "हे बघ मुला, तसं एकूण सांगायचं तर काम पुरं करणं शक्य नाही. पण ते पुरं झालंच पाहिजे आणि म्हणून तुम्ही इथं आहात."

त्यांनी फ्योदरना गाठले व पुढचा मार्ग वेगाने कापू लागले.

तोकरेव गंभीरपणे बोलू लागले: "परिस्थिती अशी आहे की, आमच्यातल्या फक्त दोघांनाच — म्हणजे पातोश्कीनना आणि मला — माहीत आहे की, या परिस्थितीत आमच्यापाशी

असलेल्या अपुऱ्या साधनांनिशी आणि माणसांनिशी रस्ता बांधणं अशक्य आहे. पण बाकी सर्वांना, अगदी झाडून प्रत्येकाला माहीत आहे की, वाट्टेल त्या परिस्थितीत रेलरस्ता बांधून झालाच पाहिजे! 'आम्ही गोठून मेलो नाही तर काम पुरं होईल' असं मी का म्हणालो, ते तुम्हाला आता समजलं? तुम्हीच पहा: एक महिन्यापेक्षा जास्त काळ आम्ही खणतोय. नवी कुमक न आल्यामुळं पुन्हा चौथ्यांदा आम्ही काम करतोय. केवळ त्यांच्या तरुण वयामुळं त्यांचा निभाव लागलाय. पण त्यांच्यापैकी निम्म्यांना थंडीची वाईट बाधा झालीय. त्यांच्याकडं पाहताना काळजाला चरे पडतात. ही पोरं सोन्याच्या मोलाची आहेत. पण त्यांच्यापैकी खूपजण ह्या नतद्रष्ट बेळक्यात मरणार!"

तयार झालेला नॅरोगेज रेलरस्ता स्टेशनापासून एक किलो-मीटर अंतरापर्यंत येऊन पोहोचला. त्यापलिकडे दीड किलो-मीटर अंतरावर, वाऱ्याने उडवून लावलेल्या लाकडी मेढेकोटा-सारखा दिसणारा एक ढीग सपाट केलेल्या रस्त्यावर रचलेला होता. ते रूळांखालचे लाकडी ओंढे गच्च बसवून ठेवलेले होते. आणि त्यापलिकडे उंचवटयापर्यंत फक्त सपाट रस्ता होता.

पानक्रातोव यांचे एक क्रमांकाचे बांधकाम पथक या विभा-गात काम करीत होते. चाळीस लोक लाकडी ओंढे घालीत होते, तर गाजरासारख्या रंगाच्या दाढीचा, सालीचे नवे बूट घातलेला एक शेतकरी सावकाशपणे उकरलेल्या रस्त्यावर ओंडक्यांचा ढिगारा ओतत होता. त्यापासून थोडया दूर अंतरावर अशा अनेक घसरगाडयांमधून ओंडके खाली उतर-

विण्यात येत होते. दोन लांब लोखंडी दांड्या जमिनीवर पडल्या होत्या. ओंढे समांतर घालायला त्यांचा उपयोग केला जात होता. कुऱ्हाडी, पहारी, फावडी या सर्वांचा वापर करून खडी दाबण्यात येत होती.

रूळांखाली ओंढे घालायचे काम फार हळू चालते आणि मोठे कष्टाचे असते. ओंढे जमिनीमध्ये अगदी गच्च बसावे लागतात, म्हणजे रूळ त्यांच्यावर समांतर बसतात.

ओंढे घालण्याचे तंत्र त्या गटातील फक्त एका माणसाला अवगत होते. तो माणूस म्हणजे ताल्याचे वडील – रेल फोरमन लागूतिन. चोपन्न वर्षांच्या ह्या माणसाच्या डोक्यावर एकही पांढरा केस नव्हता आणि त्याची काळीभोर दाढी ऐटबाजपणे मधोमध दुभंगलेली होती. बोयारकाचे काम सुरू झाल्याच्या दिवसापासून लागूतिन स्वेच्छेने तेथे श्रमत होते, तरुणांच्या जोडीने हालअपेष्टा सोसत होते. सबंध तुकडीमध्ये त्यांना प्रतिष्ठा लाभली होती. लागूतिन जरी पक्षाचे सभासद नव्हते तरी पक्षाच्या सर्व परिषदांमध्ये त्यांना मानाचे स्थान देण्यात येई. या गोष्टीचा त्यांना फार अभिमान वाटत होता आणि काम संपेपर्यंत तेथून न जाण्याचे त्यांनी वचन दिले होते.

त्यांच्या जागी नवीन माणसांना आणण्याचा प्रश्न जेव्हा जेव्हा उपस्थित होई तेव्हा तेव्हा ते गंमतीने म्हणत: "सगळी जबाबदारी तुमच्यावर सोपवून मी कसा जाणार? देखरेख करायला अनुभवी माणूस नसला तर हमखास काही-तरी गोंधळ होईल! आणि अनुभवाच्या बाबतीत म्हणाल तर ह्या देशात ठिकठिकाणी मी एवढे ओंढे ठोकलेत की त्यांचा

आकडासुद्धा माझ्या लक्षात नाही!" अशा रीतीने ते तेथेच राहिले होते.

लागूतिन यांना आपले काम चांगले माहीत आहे याची पातोश्कीनना जाणीव झाली होती. म्हणून त्यांच्या विभागाची ते क्वचितच पाहणी करीत. ते जेथे काम करीत होते त्या ठिकाणी अकीम आणि झुखराय यांच्याबरोबर तोकरेव आले तेव्हा श्रमांनी घामेजलेले आणि लालबुंद झालेले पानक्रातोव ओंढ्यासाठी खड्डा खणत होते. त्या गोदीकामगाराला अकीमने प्रथम ओळखलेच नाही. पानक्रातोव यांचे वजन खूप कमी झाले होते, त्यांच्या खप्पड आणि खोल गेलेल्या चेहऱ्यावरची रुंद हाडे उठून दिसत होती.

अकीमला पाहताच त्यांनी आपला गरम, ओलसर हात त्याच्या हाती देत म्हटले: "अरे वा! मोठी मंडळी आली वाटतं!"

फावड्यांचे आवाज थांबले. भोवतालच्या लोकांचे फिकट, थकलेले चेहरे अकीमने न्याहाळले. त्यांचे कोट आणि त्यांची जाकीटें बर्फावर अस्ताव्यस्त ढिगामध्ये पडली होती.

लागूतिन यांच्याबरोबर थोडे बोलून तोकरेव यांनी आपल्या बरोबरच्या लोकांना खोदकामाच्या ठिकाणी नेले. जाताना त्यांनी पानक्रातोवना आपल्या सांगाती घेतले. पानक्रातोव झुखराय यांच्या जोडीने चालत होते.

"मोतोवीलोव्का इथं काय घडलं ते मला सांग पानक्रातोव? त्या चेकाच्या माणसाला निःशस्त्र करणं हा तुझा थोडा जादापणा झाला की नाही?" फ्योदरनी त्या अबोल गोदी-कामगाराला कडक सुरात विचारले.

पानक्रातोव' कसनुसे हसले.

"ते सगळं आम्ही एकमेकांच्या संगनमतानं केलं," त्यांनी खुलासा केला. "त्याला आम्ही निःशस्त्र करावं असं त्यानं स्वतःच सुचवलं. चांगला पोरगा आहे तो. एकूण परिस्थिती जेव्हा आम्ही त्याला समजावून सांगितली तेव्हा तो म्हणतो कसा: 'दोस्तांनो, तुमची अडचण मला समजते. पण त्या खिडक्या-दारं घेऊन जायला मी तुम्हाला परवानगी देऊ शकत नाही. रेल्वेच्या मालमत्तेच्या लुटालुटीला आळा घालण्याचा हुकूम कॉम्रेड झ्देर्झीन्स्कींनी आम्हाला दिलाय. इथला स्टेशन-मास्तर मोठा चोर आहे. त्याच्या उद्योगांमध्ये मी आडवा येतोय. आता हा माल मी तुम्हाला नेऊ दिला तर तो नक्की माझ्याविरुद्ध तक्रार नोंदवील आणि क्रांतिकारक न्यायालयासमोर माझ्यावर खटला चालेल. पण मला निःशस्त्र करा आणि पसार व्हा. जर स्टेशनमास्तरनं ही घटना कळवली नाही, तर मामला इथंच संपला.' म्हणून आम्ही तसं केलं. ती दारं-खिडक्या आम्ही काही स्वतःसाठी नेत नव्हतो. होय की नाही?"

झुखराय यांच्या डोळ्यांमधील चमक पाहून पानक्रातोव पुढे म्हणाले: "कॉम्रेड झुखराय, तुम्हाला हवं तर आम्हाला शासन करा. पण त्या पोराला सोडून द्या."

"तो सगळा मामला मिटलाय. पण पुन्हा असं करू नका. शिस्तीच्या दृष्टीनं वाईट आहे. योग्य रीतीनं नोकरशाही नष्ट करण्याचं बळ आता आपल्यापाशी आहे. आता काही जास्त महत्त्वाच्या गोष्टींची चर्चा करू या." आणि दरोडेखोरांच्या धाडीचा तपशील फयोदर विचारू लागले.

बोयारका स्टेशनपासून सुमारे साडेचार किलोमीटर अंतरावर

रेलरस्त्याच्या मार्गात आलेल्या मोठ्या उंचवटयाच्या ठिकाणी माणसांचा एक गट जोरजोराने खणत होता. तुकडीपाशी असलेली सर्व शस्त्रे घेऊन – खोल्यावाची रायफल, कोर्चागिन, पानक्रातोव, दुबावा व खोमुतोव यांची पिस्तुले – सात लोक पहारा देत होते.

उंचवटयाच्या माथ्यावर बसून आपल्या टिपणवहीत आकडे लिहित पातोश्कीन बसले होते. कामावरचे ते एकमेव इंजिनिअर होते. तंत्रज्ञ वाकूलेन्को त्याच सकाळी कामावरून पळून गेले होते. दरोडेखोरांच्या हाती मरण्यापेक्षा पळून जाण्या-बद्दल शिक्षा भोगणे चांगले, असा त्यांनी विचार केला होता.

"ही टेकडी फोडून जागा सपाट करायला दोन आठवडे लागतील. जमीन गोठून घट्ट बनलीय," शेजारी खिन्नपणे उभ्या राहिलेल्या खोमुतोवना उद्देशून पातोश्कीन हळू आवृजात म्हणाले.

"सबंध रस्ता पुरा करायला आम्हाला पंचवीस दिवस दिले आहेत आणि तुम्ही फक्त ह्या टेकडीसाठी पंधरा दिवस घाल-वायचे म्हणताय," आपल्या मिशीचे टोक चघळीत खोमुतोव रागावून म्हणाले.

"दिलेली मुदत ही खरी नाही. अर्थात अशा परिस्थितीत आणि अशा प्रकारच्या कामगारांबरोबर यापूर्वी मी कधी काही बांधकाम केलेलं नाही. माझा अंदाज कदाचित चुकेलही. खरं म्हणजे यापूर्वी दोनदा माझा अंदाज चुकलाय."

त्याचवेळी झुखराय, अकीम आणि पानक्रातोव उताराच्या पायथ्याशी येताना त्यांना दिसले.

"ते बघा खाली कोण आहे?" पेत्का त्रोफीमोव नांवाचा

एक तरुण यंत्रज्ञ ओरडला. रेल्वे वर्कशॉपमध्ये काम करणाऱ्या ह्या मुलाने अंगात एक जुना स्वेटर घातला होता व हाताच्या दोन्ही कोपरांना तो फाटला होता. त्याने कोर्चागिनला ढोसले आणि नवागतांकडे त्याचे लक्ष वेधले. हाती फावडे घेतलेला कोर्चागिन दुसऱ्याच क्षणी टेकडीवरून खाली धावत सुटला. शिरस्त्राणाखाली झाकलेल्या त्याच्या डोळ्यांमध्ये प्रेमळ स्वागताचे स्मित उमटले होते. फ्योदरनी खूप वेळपर्यंत त्याचा हात आपल्या हाती दाबून धरला.

"काय पावेल, कसा काय आहेस? तुला या अवतारात एकदम ओळखलंच नाही!"

पानक्रातोव कोरडे हसून म्हणाले. "हवा खेळती रहायला भरपूर भोकं आहेत त्याच्या ह्या अवतारात! पळून गेलेल्यांपैकी कुणीतरी त्याचा ओव्हरकोट पळवला. ओकुनेवनं त्याला हे जाकीट दिलंय. त्यांचं कम्युन आहे हे तुम्हाला माहीत आहे की नाही? पण तसा पावेल छान आहे. गरम रक्त खेळतंय त्याच्या धमन्यांमधून! काँक्रीटच्या फरशीवर आणखी एक-दोन आठवडे तो ऊब घेईल. गवताचा फारसा काही उपयोग होत नाही. आणि मग छान देवदाराच्या शवपेटीत निजायची त्याची तयारी होईल!"

काळ्या भुवयांच्या, बसक्या नाकाच्या ओकुनेवनी मिस्कीलपणे डोळे किलकिले करीत म्हटले: "काही चिंता करू नका, आम्ही पावेलची काळजी घेऊ. ओदार्काला स्वैपाकघरात मदत करण्याच्या कामावर आम्ही त्याला ठेवू. मूर्खासारखा वागला नाही तर त्याला दोन घास जास्त खायला मिळतील आणि चुलाण्याजवळ किंवा ओदार्काच्या कुशीतच झोपेल!"

या बोलण्यावर जोरदार हशा पिकला. त्या दिवशी प्रथमच ते सारे हसले होते.

फ्योदरनी टेकडीची पाहणी केली व नंतर तोकरेव आणि पातोश्कीन यांच्याबरोबर घसरगाडीत बसून लाकूडतोडीच्या स्थळी ते गेले. जेव्हा ते तिथून परत आले तेव्हा माणसे अजूनही चिकाटीने टेकाड खणत होती. फावड्यांची जलद हालचाल आणि ताणाखाली वाकलेल्या कामगारांच्या पाठी फ्योदर यांच्या नजरेने टिपल्या. अकीमकडे वळून ते खालच्या आवाजात म्हणाले:

"सभांची गरज नाही. इथं आंदोलन चालविण्याची गरज नाही. तोकरेव, तू म्हणाला ते बरोबर होतं—ही पोरं सोन्याच्या मोलाची आहेत. इथं खरं पोलादाला पाणी चढतंय!"

खोदकाम करणाऱ्यांकडे झुखराय कौतुकाने पहात होते. त्यांच्या नजरेत कणखर, पण मृदु अभिमान भरला होता. त्या मुलांपैकी काही मुले अगदी थोड्या काळापूर्वी आपली चकचकीत पोलादी बागनेटे हाती धरून त्यांच्यापुढे उभी राहिली होती. बंडाच्या आधीच्या रात्रीची ती घटना होती. आणि आता ऊबेच्या व जीवनाच्या बहुमोल उगमापर्यंत रेल्वेच्या पोलादी धमन्या पोहोचाव्यात ह्या एकाच हेतूने प्रेरित होऊन ही मुले दिवस-रात्र खपत होती.

टेकाडामधून खोदणे दोन आठवड्यांपेक्षा कमी काळात शक्य नाही ही वस्तुस्थिती अत्यंत नम्रपणे, पण खंबीरपणे पातोश्कीननी फ्योदरना समजावून सांगितली. फ्योदर त्यांचे बोलणे ऐकत होते तेव्हा खरे म्हणजे स्वतःच्याच दुसऱ्या

कुठल्यातरी समस्येचा विचार त्यांच्या डोक्यात चालला होता.

"टेकाडापाशी काम थांबवा आणि पुढच्या रस्त्याचं काम हाती घ्या. टेकडीचा प्रश्न आपण दुसऱ्या मार्गानं सोडवू," शेवटी ते म्हणाले.

स्टेशनावर टेलिफोनपाशी त्यांनी बराच वेळ खर्च केला. बाहेर दाराशी पहाऱ्यावर उभ्या असलेल्या खोल्यावाने फ्योदर यांचा खोलीतून येणारा घोगरा खर्जातला आवाज ऐकला.

"लष्करी विभागातल्या सरसेनानींना फोन करा आणि रेलरस्त्याच्या कामाच्या ठिकाणी पुझीरेवस्कींची रेजिमेंट ताबड-तोब पाठवण्याचा हुकूम द्या, असा माझा निरोप त्यांना सांगा. अजिबात दिरंगाई न करता दरोडेखोरांना ह्या भागातून हुसकून लावलं पाहिजे. चिलखती आगगाडीमधून धडक सैनिक पाठवा. बाकीची व्यवस्था मी पाहतो. मला परत यायला उशीर होईल. मध्यरात्रीला स्टेशनापाशी मोटार घेऊन यायचा निरोप लीत्केला द्या."

बराकींमध्ये अकीमने छोटेसे भाषण केल्यानंतर झुखरायनी सभेची सूत्रे हाती घेतली. मैत्रीच्या वातावरणात चर्चा करताना एक तासाचा अवधी सहज उलटून गेला. काम पूर्ण करण्या-साठी १ जानेवारीची घालून दिलेली मर्यादा वाढवून देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे फ्योदरनी तेथे जमलेल्या लोकांना सांगितले.

ते म्हणाले: "आता यापुढं आम्ही लष्करी धर्तीवर काम चालवणार आहोत. कॉम्रेड दुबावाच्या पुढारीपणाखाली पक्षाचे सभासद एक खास कामगार पथक तयार करतील. सर्व सहाही पथकांवर निश्चित कामगिऱ्या सोपवण्यात येतील. कामाच्या उरलेल्या भागाचे सहा समान भाग करून प्रत्येक

पथकाकडे एकेक भाग पुरा करण्याचे सोपविण्यात येईल. १ जानेवारीपर्यंत सर्व काम पुरं झालंच पाहिजे. जे पथक सर्वांत आधी काम पुरं करील त्याला शहरात परतण्याची परवानगी मिळेल. तसंच, पहिल्या येणाऱ्या पथकातल्या सर्वोत्तम कामगाराला लाल पताकेचा किताब द्यावा, अशी मागणी गुबेर्निया कार्यकारी समितीचं अध्यक्षमंडळ सरकारकडं करीत आहे."

वेगवेगळ्या पथकांचे प्रमुख पुढीलप्रमाणे नेमण्यात आले: क्र. १, कॉम्रेड पानक्रातोव; क्र. २, कॉ. दुबावा; क्र. ३, कॉ. खोमुतोव; क्र. ४, कॉ. लागूतिन; क्र. ५, कॉ. कोर्चागिन; क्र. ६, कॉ. ओकुनेव.

आपल्या प्रभावी वक्तृत्वाच्या अखेरीस झुखराय म्हणाले: "ह्या कामाचं प्रमुखपद, त्याचं राजकीय आणि शासकीय पुढारीपण, पूर्वीप्रमाणंच अन्तोन निकीफोरोविच तोकरेव यांच्याकडं राहील."

भर्ररदिशी अचानक उडणाऱ्या पक्ष्यांच्या कळपाप्रमाणे टाळ्यांचा कडकडाट झाला आणि ताणलेल्या चेहऱ्यांवर स्मितरेषा उमटल्या. झुखराय यांच्या भाषणाच्या अखेरीच्या जिव्हाळ्याच्या, नर्मविनोदी शब्दांनी सभेमधील गांभिर्याचा ताण सुटला व हास्याचा खळखळाट उमटला.

अकीम आणि फ्योदर यांना निरोप देण्यासाठी स्टेशनवर सुमारे वीस लोक गेले.

कोर्चागिनशी हस्तांदोलन करताना फ्योदरनी पावेलच्या बर्फाने माखलेल्या रबरी बुटांकडे नजर टाकली.

"मी तुला बुटांची एक जोडी पाठवीन", ते खालच्या आवाजात म्हणाले. "तुझे पाय अजून गोठले नसतील अशी आशा करतो!"

"त्यांना थोडी सूज यायला लागलीय," पावेल उत्तरला. खूप दिवसांपूर्वी त्याने काहीतरी मागितले होते याची आठवण होऊन त्याने फ्योदर यांचा दंड धरीत म्हटले: "माझ्या पिस्तुलासाठी मला थोडी काडतुसं देता का? माझ्यापाशी फक्त तीन चांगली काडतुसं राहिलीत!"

झुखरायनी खेदाने मान हलविली. पण पावेलची निराश मुद्रा पाहताच त्यांनी चटकन आपले 'मॉसर' पिस्तुल पट्ट्यातून बाहेर काढले:

"तुला माझ्याकडून भेट!"

खूप काळापासून आपल्याला हवी असलेली वस्तू आत्ता मिळते आहे यावर क्षणभर पावेलचा विश्वासच बसेना. झुखरायनी कातडी पट्टा त्याच्या खांद्यावर टाकीत म्हटले:

"अरे घे घे! खूप दिवसांपासून त्याच्यावर तुझा डोळा होता ते मला माहीत आहे. पण आपलीच माणसं त्यानं मारू नकोस एवढी काळजी घे. ह्या त्याच्याबरोबर काडतुसांच्या तीन संपूर्ण लडी घे!"

इतर लोक आपल्याकडे असूयेने पहात आहेत याची पावेलला जाणीव झाली.

कुणीतरी ओरडला, "ए पाव्का, तुला याच्या बदल्यात बुटांची जोडी आणि मेंढकातडी कोट देतो."

पानक्रातोवनी पावेलला पाठीत मुद्दाम ढोसले. "चल, चल, मी तुला नमदी बुटांची जोडी देतो ह्या पिस्तुलाच्या बदल्यात! नाहीतरी हे रबरी बूट घालून तू नाताळच्या पूर्वीच मरणार!"

आधारासाठी ट्रॉलीवर एक पाय ठेवून झुखरायनी 'मॉसर'चा परवाना लिहून दिला.

दुसऱ्या दिवशी अगदी सकाळच्याच प्रहरी एक चिलखती आगगाडी खडखडत स्टेशनात येऊन थांबली. स्फटिकासारख्या नितळ गोठलेल्या वातावरणात इंजिनाने सोडलेले वाफेचे लोट हंस पक्ष्यांच्या पिसांप्रमाणे पांढरेशुभ्र दिसत होते. पोलादी डब्यांमधून कातडी पोषाखातील आकृती उतरल्या. त्यानंतर काही तासांनी त्या आगगाडीतील तीन सैनिकांनी टेकडीच्या मातीत दोन भोपळ्याच्या आकाराच्या मोठ्या वस्तू पुरल्या. त्यांना लांब वाती जोडलेल्या होत्या. त्या लोकांनी इशाऱ्याचे काही बार उडविताच टेकडीपासून सर्व माणसे दूर अंतरावर पांगली. वातीचे टोक काड्यापेटीने पेटविताच एक छोटी निळसर ज्योत सरसर पेटत गेली.

काही काळ लोकांनी आपले श्वास रोखून धरले. एक-दोन क्षण अनिश्चित गेले आणि धरती हादरली. जबरदस्त जोराने टेकडीच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या व मातीची भलीमोठी ढेकळे आकाशात उंच उडाली. दुसरा स्फोट पहिल्यापेक्षा जास्त प्रभावी होता. त्याचा आवाज सभोवतालच्या जंगलात जोराने घुमला व वातावरण गोंधळाने कोंदले.

जेव्हा धूर आणि धूळ स्थिरावली तेव्हा टेकडीच्या जागी एक भलामोठा खड्डा पडलेला सर्वांना दिसला. त्या खड्ड्या-भोवती मातीमिश्रित हिमाचा थर विखुरला होता.

स्फोटाने तयार झालेल्या खड्ड्याकडे माणसे फावडी आणि टिकाव घेऊन धावली.

झुखराय यांच्या प्रयाणानंतर, पहिल्याने काम पुरे करण्याचा मान पटकाविण्यासाठी सर्व पथकांमध्ये जोरदार चुरस सुरू झाली.

पहाट होण्यापूर्वी खूप आधी कोर्चागिन चूपचाप उठला. इतर जागे होणार नाहीत अशी खबरदारी घेत आपल्या बधीर पावलांनी थंडगार फरशीवरून तो स्वैपाकघराकडे गेला. तेथे त्याने चहाचे आधण ठेवले आणि आपल्या पथकाला उठविण्यासाठी तो परत गेला.

बाकीचे लोक उठेपर्यंत चांगलेच उजाडले होते.

दाटी झालेल्या बराकींमध्ये दुबावा आपल्या गटातील माणसांबरोबर त्या सकाळी न्याहरी करीत होता. आपल्या कोपरांनी ढोसून वाट काढीत पानक्रातोव त्याच्यापर्यंत पोचला.

"पाहिलंस मित्याय?" तो तापल्या आवाजात म्हणाला. "पाव्कानं पहाटेपूर्वीच आपल्या पोरांना जागं केलं. आत्तापर्यंत त्यांनी वीस यार्ड रस्ता नक्की तयार केला असणार. पंचवीस तारखेपर्यंत सर्व काम पुरं करायचं, अशी त्यानं त्या रेल्वे वर्कशॉपमधल्या पोरांच्या मनाची तयारी केलीय म्हणे! आपल्या सगळ्यांवर त्याला मात करायचीय. पण आपण हे होऊ देणार नाही!"

दुबावा खवट हसला. रेल्वे दुरुस्ती खात्यामधील माणसांनी जे केले होते त्याचे नदीवरील बंदराच्या कम्सामोल चिटणीसाला एवढे दुःख का झाले होते, हे तो समजू शकत होता. वस्तुतः खुद्द दुबावावर त्याच्या जिवलग मित्राने—पावेलने—कुरघोडी केली होती. कुणालाही चकार शब्दाने न बोलता पावेलने सबंध कंपनीला आव्हान दिले होते.

"आता मैत्री-बित्री काही नाही. जो जिंकील तो खरा!" पानक्रातोव म्हणाला.

माध्यान्हीच्या सुमाराला कोर्चागिनचे पथक कामाच्या घाईगर्दीत असताना अचानक अडथळा उद्भवला. रायफलींच्या

ढिगाशी पहारा देणाऱ्या टेहळ्याला झाडीमधून काही घोडेस्वार येताना दिसले आणि त्याने ताबडतोब इशाऱ्याचा बार वाजविला.

"पोरांनो, आपली शस्त्रं घ्या! दरोडेखोर आले!" पावेल ओरडला. त्याने आपले फावडे फेकले आणि त्याचे 'मॉसर' टांगले होते त्या झाडाकडे धाव घेतली.

आपापल्या रायफली घेऊन बाकीचे लोक रेलरस्त्याच्या कडेनेच सरळ बर्फावर पालथे पडले. आघाडीच्या घोडेस्वारांनी आपल्या टोप्या हलविल्या.

"कॉम्रेडहो, गोळ्या झाडू नका!" त्यांच्यातील एकजण ओरडला.

चकचकीत लाल तारे बसविलेल्या बुद्योन्नी टोप्यांमधील सुमारे पन्नास घोडदळ सैनिक तेथे दौडत आले.

पुझीरेवस्कींच्या रेजिमेंटची एक छोटी तुकडी रेलरस्त्याच्या कामाच्या जागी भेट द्यायला आली होती. त्या तुकडीच्या कमांडरची करड्या रंगाची देखणी घोडी होती, तिच्या कपाळावर एक पांढरा ठिपका होता आणि तिच्या कानाचे एक टोक तुटलेले होते, हे पावेलच्या लक्षात आले. आपल्या स्वाराच्या मांडीखाली ती घोडी अस्वस्थपणे नाचत होती. पावेल जेव्हा पुढे धावला आणि त्याने तिचा लगाम हाती धरला तेव्हा ती घाबरून मागे सरली.

"लीस्का, पोरी आपण पुन्हा कधी भेटू असं वाटलं नव्हतं! माझ्या एका कानाच्या सुंदरी, गोळ्यांनी तुझा बळी घेतला नाही म्हणायचा!" पावेल घोडीला चुचकारीत म्हणाला. त्याने तिच्या सडपातळ मानेला मिठी घातली आणि तिच्या थरथरणाऱ्या नाकपुड्यांना गोंजारले.

कमांडरने क्षणभर पावेलकडे टक लावून पाहिले आणि

नंतर चकित होऊन तो ओरडला: "कोर्चागिन तर नव्हे! तू घोडीला ओळखलंस, पण जुन्या मित्राला, सेरेदाला पाहिलं नाहीस? मित्रा, तुला कडकडून भेटू दे मला!"

दरम्यानच्या काळात, रेलरस्त्याचे बांधकाम वेगाने पुरे व्हावे म्हणून तिकडे शहरात चारी बाजूंनी दबाव आणला जात होता. ह्या बदललेल्या परिस्थितीची कामाच्या स्थळी जाणीव होत होती. झार्कीयने कम्सामोल विभागीय समितीच्या जवळ जवळ सर्व पुरुष-सदस्यांना बोयारकाला पाठवून दिले होते. सोलोमेन्कामध्ये फक्त मुली उरल्या होत्या. झार्कीयने रेल-विद्यालयातील विद्यार्थ्यांची आणखी एक तुकडीसुद्धा बोयारकाला पाठवली.

अकीमला आपल्या कामाच्या निष्पत्तींचा अहवाल देताना झार्कीय गंमतीने म्हणाला, "मी इथं महिला कामगारवर्गीयांबरोबर एकटा राहिलोय. मला वाटतं मी ताल्या लागूतिनाला माझ्या जागी नेमतो, दारावर 'महिला-विभाग' अशी पाटी लटकावतो आणि स्वतः सरळ बोयारकाला जातो. या सगळ्या बायकांमध्ये मला एकटचा पुरुषाला फार चमत्कारिक वाटतंय. त्या ज्या खवचट नजरांनी माझ्याकडं पाहतात ते तू बघायला हवंस. त्या नक्की म्हणत असणार: 'ह्या लबाड चोरानं सगळ्यांची पाठवणी केली, पण स्वतः मात्र मागं लपून राहिलाय!' किंवा याहूनही वाईट बोलत असतील. तू मला जायला परवानगी दे."

पण त्यावर अकीम नुसता हसला.

बोयारकाला नवनवे कामगार सतत येत होते. त्यात रेल विद्यालयातील साठ विद्यार्थीसुद्धा होते.

नवागतांची राहण्याची सोय व्हावी म्हणून बोयारकाला चार उतारूवाहू डबे पाठविण्याची झुखरायनी रेल खात्याच्या मार्फत व्यवस्था केली.

दुबावाच्या पथकाला रेलरस्त्याच्या कामातून मोकळे करून इंजिने व पासष्ट नॅरोगेजवरचे उघडे सपाट डबे आणण्यासाठी पुश्चा-वादीत्साला धाडण्यात आले. ही कामगिरी म्हणजे त्यांच्या हिश्शाच्या कामाचा एक भाग समजण्यात येणार होती.

कामगिरीवर निघण्यापूर्वी दुबावाने तोकरेवना सुचविले की, शहरातून क्लाविचेकला परत बोलावून घेण्यात यावे आणि बोयारकामधील नव्याने संघटित केलेल्या पथकांपैकी एका पथकाचा प्रमुख म्हणून नेमावे. तोकरेवनी त्याप्रमाणे केले. दुबावाच्या सूचनेपाठीमागील खरे कारण त्यांना माहीत नव्हते. सोलोमेन्काहून आलेल्या नवागतांनी आन्नाकडून दुबावासाठी एक चिठ्ठी आणली होती.

आन्नाने लिहिले होते :

> "द्मीत्री ! मी आणि क्लाविचेकने मिळून तुझ्यासाठी पुस्तकांचा एक गठ्ठा तयार केलाय. तुला आणि बोयार-कामधल्या इतर धडक-कामगारांना आम्ही मनःपूर्वक शुभेच्छा पाठवतो. तुम्ही सारे खूप छान आहात! काम पुढं रेटायला तुम्हाला ताकद आणि सामर्थ्य लाभो हीच इच्छा. काल सर्पणाचा शेवटचा साठा वाटण्यात आला. क्लाविचेकनं तुला शुभेच्छा धाडल्यात. त्या कळवायला त्यानं मला सांगितलंय. तो फार छान आहे. बोयारकासाठी सर्व पाव तो भाजतो, पीठ चाळतो; स्वतः कणीक तिंबतो. बेकरीतील कुणावरही

हे काम तो सोपवीत नाही. उत्तम दर्जाचं पीठ तो मिळवतो आणि त्याचा पाव चांगला असतो. मला मिळतो त्या पावाहून कितीतरी चांगला. संध्याकाळी आपली मित्रमंडळी माझ्या घरी जमतात: लागूतिना, आर्त्यूखिन, क्लाविचेक आणि काहीवेळा झार्कीय. आम्ही थोडं वाचन करतो, पण बहुतेकवेळा आम्ही गप्पा मारतो.

विशेषत: बोयारकामधल्या तुम्हा लोकांबद्दल बोलतो. रेलरस्त्यावर काम करायला परवानगी न दिल्याबद्दल मुली तोकरेव यांच्यावर चिडल्या आहेत. त्या इतर कुणाहीप्रमाणं हालअपेष्टा सहन करू शकल्या असत्या, असं त्यांचं म्हणणं आहे. ताल्यानं जाहीर केलंय की, आपल्या वडलांचे कपडे घालून ती स्वत: बोयारकाला काम करायला जाणार आहे. 'त्यांनी मला तिथून हाकलूनच दाखवावं' असं ती म्हणते.

"तिनं आपला शब्द खरा करून दाखवला तर मला आश्चर्य वाटणार नाही. तुझ्या काळ्याभोर डोळ्यां या मित्राला माझा नमस्कार सांग.

आन्ना."

बर्फाच्या वादळाचा त्यांना अगदी अचानक तडाखा बसला. आकाशात करड्या रंगाचे ढग खूप खालपर्यंत ओठंगले होते आणि प्रचंड हिमवृष्टी होत होती. रात्र झाली तसा वारा चिमण्यांमधून घू घू घुमू लागला, झाडांमधून कण्हू लागला, गरगर फिरणाऱ्या हिमकणांना उधळू लागला आणि अभद्र सुरांनी त्याने सारे जंगल घुमवून टाकले.

सबंध रात्रभर हिमवादळाचे तांडव चालू होते. चुलाणे पेटते ठेवूनही माणसे काकडली होती. त्या स्टेशनच्या पडक्या इमारतीत ऊब तग धरीत नव्हती.

सकाळच्या वेळी आपल्या कामाच्या ठिकाणांपर्यंत जायला त्यांना अक्षरश: ढोपरभर बर्फामधून जावे लागले. झाडांच्या उंच शेंड्यांवर निळ्या आकाशात सूर्य पूर्ण तेजाने चमकत होता आणि आकाशाच्या नितळ विस्ताराला एकाही ढगाचे गालबोट लागलेले नव्हते.

आपल्या कामाच्या भागातील बर्फ साफ करण्यासाठी कोर्चागिन आणि त्याची माणसे गेली. थंडीमुळे माणसाला किती यातना सहन कराव्या लागतात याची पावेलला आत्ता खरी जाणीव झाली. ओकुनेवचे जीर्ण जाकीट त्याचे फारसे रक्षण करीत नव्हते आणि त्याचा रबरी बूट सतत बर्फाने भरलेला होता. तो रबरी बूट मधून मधून बर्फात अडकून त्याच्या पायामधून सुटून पडायचा. त्याच्या दुसऱ्या पायातल्या बुटाचा जबडाही उघडण्याच्या बेतात होता. थंड फरशीवर झोपल्यामुळे त्याच्या मानेवर दोन मोठी गळवे उमटली होती. तोकरेवनी आपला टॉवेल त्याला मफलरच्या जागी वापरायला दिला होता.

रोडावलेला आणि तांबड्याभडक डोळ्यांचा पावेल आपले लाकडी फावडे जोरजोराने चालवून बर्फ उपसत होता. तेवढ्यात एक उतारूवाहू आगगाडी वाफेचे सुस्कारे टाकीत हळू हळू स्टेशनात आली. त्या आगगाडीच्या मरणोन्मुख इंजिनाने डब्यांना कसेबसे इथपर्यंत खेचून आणले होते. इंधनाच्या जागेत लाकडाचा एकही ओंडका नव्हता आणि शेवटचे निखारे भट्टीमध्ये मंद पेटत होते.

"आम्हाला इंधन द्या, तर आम्ही पुढं जातो. नाहीतर हलायची ताकद आहे तेवढ्यात बाजूच्या रूळावर आम्हाला घ्या!" इंजिन ड्रायव्हने स्टेशन मास्तरना ओरडून सांगितले.

आगगाडी बाजूच्या रूळावर घेण्यात आली. असंतुष्ट उतारूंना आगगाडी थांबविण्याचे कारण समजावून सांगण्यात आले. गर्दीने ठेचलेल्या डब्यांमधून तक्रारींचे आणि शिव्याशापांचे वादळ उठले.

"त्या म्हाताऱ्या माणसाशी जाऊन बोला," स्टेशन मास्तरनी फलाटावरून चालणाऱ्या तोकरेव यांच्याकडे बोट दाखवीत आगगाडीच्या गार्डांना सल्ला दिला. "इथल्या कामावरचे ते प्रमुख आहेत. कदाचित घसरगाडीतून सर्पण आणून ते इंजिनासाठी पुरवतील. रूळांखाली घालायला ते ओंढे वापरताहेत."

आगगाडीचे कंडक्टर जेव्हा तोकरेवना विनंती करायला गेले तेव्हा तोकरेव त्यांना म्हणाले: "मी तुम्हाला लाकूड पुरवीन, पण त्यासाठी तुम्ही काम केलं पाहिजे. तसं पाहिलं तर हे आमच्या बांधकामाचं सामान आहे. बर्फामुळे आमचं काम या क्षणाला अडकून पडलंय. तुमच्या आगगाडीत कमीत कमी सहा-सातशे उतारू तरी असतील. बायका-मुलांना डब्यांमध्येच बसून राहू दे, पण पुरुषांनी बाहेर येऊन बर्फ साफ करायला संध्याकाळपर्यंत जर मदत केली, तर मी तुम्हाला इंधनाला लाकडं देतो. जर त्यांनी नाही म्हटलं तर नव्या वर्षाच्या सुरुवातीपर्यंत आहेत तिथंच त्यांना थांबून रहावं लागेल."

"अरे इकडं येणारी गर्दी बघ! त्यात बायकासुद्धा आहेत!" कोर्चागिनने पाठीशी कुणाचा तरी चकित उद्‌गार ऐकला.

त्याने मागे वळून पाहिले. तोकरेव त्याच्यापाशी आले. ते त्याला म्हणाले: "हे तुझ्यासाठी शंभर मदतनीस. त्यांना काम सांग आणि कुणी कामचुकारपणा करणार नाही यावर लक्ष ठेव."

नव्याने आलेल्या लोकांना कोर्चागिनने कामाला लावले. रेल्वेतला रुबाबदार गणवेष केलेल्या, केसाळ कातडी कॉलर लावलेल्या आणि गरम काराकुल टोपी घातलेल्या एका उंच माणसाने संतापाने आपल्या हातातील फावडे गरंकन फिरविले व शेंड्याशी झुपकेदार गोंडा बसवलेली सील माशाच्या कातड्याची टोपी घातलेल्या आपल्या बरोबरीच्या तरुणीकडे वळून तो म्हणाला:

"मी बर्फ उपसणार नाही आणि मला हे काम बळजबरीनं करायला लावायचा कुणालाही हक्क नाही. रेल्वे इंजिनियर ह्या नात्यानं मी ह्या कामाची जबाबदारी उचलीन, पण त्यांनी मला तसं सांगावं. मात्र मी किंवा तू फावड्यानं बर्फ उपसत बसायची काही एक गरज नाही. हे नियमांच्या विरुद्ध आहे. तो म्हातारा कायदा मोडतोय. मी त्याच्यावर खटला भरीन." त्याने शेजारच्या एका कामगाराला विचारले: "तुमचा फोरमन कुठं आहे?"

कोर्चागिन तेथे आला. त्याने त्या झकपक पोषाखातील तरुणाला विचारले:

"तुम्ही काम का करत नाही?"

त्या तरुणाने तिरस्काराच्या नजरेने पावेलला आपादमस्तक न्याहाळले.

"आपण कोण?"

"मी एक कामगार आहे."

“मग मला तुमच्याशी बोलायची इच्छा नाही. तुमच्या फोरमनला अथवा त्याला ज्या काही नांवानं ओळखत असाल त्याला बोलवा...”

कोर्चागिनने डोळे वटारले.

“तुम्हाला काम करायची इच्छा नसेल तर खुशाल स्वस्थ बसा. पण तुमच्या तिकीटावर आम्ही सही केल्याशिवाय त्या आगगाडीत तुम्हाला परत बसायला मिळणार नाही. इथल्या बांधकाम प्रमुखांचा तसा हुकूम आहे.”

“आणि तुम्हाला काय म्हणायचंय?” पावेल त्या तरुणीकडे वळून म्हणाला आणि एकदम चकित झाल्यामुळे त्याचे बोलणेच खुंटले. तोन्या तुमानोवा त्याच्या समोर उभी होती!

आपल्यासमोर फाटक्या कपड्यात, तुटक्या पादत्राणात, मळकट टॉवेल गळयाभोवती गुंडाळलेल्या अवतारात आणि दिवसचे दिवस चेहऱ्याला पाण्याचा स्पर्श न झालेल्या अवस्थेत उभा असलेला भटक्या माणूस म्हणजे एकेकाळी ओळखीचा असलेला कोर्चागिन आहे, यावर तोन्याचा विश्वासच बसेना. त्याच्या डोळयांमध्ये मात्र पूर्वीचाच अंगार पेटत होता. पावेलचे डोळे तिला आठवत होते. ह्या फाटक्या प्राण्याला अगदी थोड्या काळापूर्वी तिने आपले प्रेम देऊ केले यावर तिचा स्वतःचाच विश्वास बसेना. सर्व गोष्टी किती पालटून गेल्या होत्या!

अगदी अलिकडेच तिने विवाह केला होता. ती आणि तिचा नवरा शहरच्या वाटेवर होते. तिथे रेल खात्यात त्याला मोठे महत्त्वाचे पद मिळाले होते. तिच्या यौवनातल्या पहिल्या प्रेमविषयाची अशा रीतीने गाठ पडेल याची कुणाला काय कल्पना? आपला हात पावेलच्या हाती द्यायलाही ती बिचकली.

वासीलीला काय वाटेल असा विचार तिच्या मनात आला. कोर्चागिन एवढा कसा अधोगतीला गेला? कोळसे मारण्याचे काम करणाऱ्या ह्या मुलाची रस्त्यावरचा मजूर होण्यापलिकडे मजल गेली नव्हती तर!

तोन्या घुटमळत उभी राहिली. शरमेने तिची कानशिले तापली होती. दरम्यान, त्या रेल्वे इंजिनियरला वाटले की, आपल्या पत्नीकडे टक लावून रोखून पहात हा भटक्या उद्दाम-पणा दाखवितो आहे. हातातले फावडे फेकून देऊन तो तिच्या शेजारी जाऊन उभा राहिला.

"चल तोन्या, ह्या लाझ्झारोनकडं* बघणंसुद्धा मला सहन होत नाही."

कोर्चागिनने 'झुझेप्पे गॅरिबाल्दी वाचला' होता आणि त्या शब्दाचा अर्थ त्याला माहीत होता.

"मी कदाचित लाझ्झारोन असेन, पण तू सडका भांडवल-दार आहेस," घोगऱ्या आवाजात पावेल म्हणाला व तोन्याकडे वळून तुटकपणे पुढे बोलला: "कॉम्रेड तुमानोवा, फावडं हाती घ्या आणि रांगेत उभ्या रहा. ह्या माजलेल्या बैलाचं उदा-हरण इथं गिरवू नका... तुमचा तो कुणी नात्यातला असेल तर माफ करा."

पावेलने तोन्याच्या नमदी बुटांकडे नजर टाकली व गंभीर स्मित करीत सहजसुरात तो पुढे म्हणाला:

"तुम्ही इथं मुक्काम करावा असा सल्ला मी तुम्हाला देणार नाही. परवा रात्रीच दरोडेखोरांनी आमच्यावर हल्ला चढवला होता."

---

* लाझ्झारोन – महारोगी. – **अनु.**

एवढे बोलून तो टाचांवर वळला आणि तेथून निघून गेला. चालताना त्याचे रबरी बूट फरपटत होते.

त्याच्या शेवटच्या शब्दांचा रेल्वे इंजिनियरवर परिणाम झाला होता. शिवाय तोन्याने त्याचे मन वळवून त्याला कामाला लावले.

संध्याकाळी, त्या दिवसाचे काम संपल्यानंतर, स्टेशनाकडे उतारूंचा जमाव परतला. आगगाडीत आपल्या जागेची खात्री करून घेण्यासाठी तोन्याचा नवरा घाईघाईने पुढे गेला. कामगारांचा एक जथा जाईपर्यंत तोन्या थांबून राहिली असताना रखडत येणारा थकला-भागला पावेल तिच्या नजरेस पडला. आपल्या फावड्यावर जोरात भार देऊन तो वाकून चालत होता.

"पावलूशा, तू अशा अवस्थेत भेटशील अशी मी कधीही अपेक्षा केली नव्हती," त्याच्या जोडीने चालत तोन्या म्हणाली. "रस्त्यावरची मजुरी करण्याचं काम देण्यापेक्षा जास्त चांगलं काम तुला अधिकाऱ्यांनी द्यायला पाहिजे होतं! एव्हाना तू कमिस्सार वगैरे बनला असशील असं मला वाटलं. आयुष्यानं तुझ्याशी एवढं निष्ठुर व्हावं हे खरंच अगदी वाईट झालं..."

पावेल थांबला आणि चकित नजरेने त्याने तोन्याला न्याहाळले.

"आणि मीसुद्धा अपेक्षा केली नव्हती अशी भेटशील म्हणून... पेंढा भरल्यासारखी..." आपल्या भावना जास्तीत जास्त सभ्य शब्दात व्यक्त करण्याचा पावेलने प्रयत्न केला.

तोन्याच्या कानाच्या पाळया लालबुंद झाल्या.

"तू नेहमीसारखाच उद्धट आहेस!"

कोर्चागिनने फावडे खांद्यावर टाकले व तो ताडताड निघाला. काही पावलांनंतर तो थांबला.

तो म्हणाला : "कॉम्रेड तुमानोवा, तुमच्या बेगडी सभ्यपणाच्या निम्म्यानंसुद्धा माझा उद्धटपणा अपमानकारक नाही. आणि माझ्या आयुष्याची चिंता तुम्ही करू नका. माझ्या आयुष्याचं काहीही वाईट झालेले नाही. तुमच्याच आयुष्याचा घोटाळा झालाय. माझ्या अपेक्षेपेक्षा जास्त! दोन वर्षांपूर्वी तू बरीच ठीक होतीस! एका कामगाराशी हस्तांदोलन करायची लाज वाटत नव्हती त्यावेळी! पण आता तुला कसर लागल्याची घाण मारतेय. खरं सांगायचं म्हणजे आपल्या दोघांमध्ये बोलण्यासारखं आणखी काही राहिलेलं नाही."

पावेलला आर्त्योमचे पत्र आले होते. आर्त्योम लग्न करणार असल्याची बातमी त्यात होती व न चुकता पावेलने लग्नाला हजर राहिले पाहिजे, अशी त्यात ताकीद दिलेली होती.

वाऱ्याने पावेलच्या हातातील कागद सुटला आणि दूर उडाला. विवाहाच्या मेजवान्या त्याच्यासाठी नव्हत्या. आत्ता यावेळी तो कसा जाणार? कालच त्या अस्वल पानक्रातोवने पावेलच्या पथकावर मात केली होती आणि एवढी जोरदार आघाडी मारली होती की प्रत्येकजण थक्क झाला. स्पर्धेत पहिला क्रमांक मिळविण्यासाठी तो गोदीकामगार अटीतटीने प्रयत्न करीत होता. त्याची नेहमीची शांत वृत्ती नाहीशी झाली होती आणि आपल्या सहकारी "गोदीकामगारांना" अतिवेगाने काम करण्यासाठी तो दामटत होता.

माणसे मूक राहून ज्या तीव्रतेने काम करीत होती ते पाहून पातोश्कीन गोंधळून गेले होते. "ही माणसं आहेत का

राक्षस?" असा कौतुकाचा विचार त्यांच्या मनात आला. "एवढी अभूतपूर्व ताकद त्यांना मिळते कुठून? आणखी आठ दिवस हवामान ठीक राहिलं तर आम्ही लाकूडसाठ्यांपर्यंत पोहोचू! खरंच, माणूस जगण्यातून शिकतो! ही माणसं सारे विक्रम आणि सारे अंदाज मोडत आहेत!"

आपण भाजलेल्या पावाची अखेरची पोती घेऊन क्लाविचेक शहरातून आला. तोकरेव यांच्याशी त्याचे बोलणे झाले आणि नंतर कोर्चागिनच्या शोधात तो बाहेर पडला. त्या दोघांनी प्रेमाने एकमेकांचे हात दाबले. क्लाविचेकने हसऱ्या चेहऱ्याने आपल्या थैलीत हात घातला व केसाळ कातडीची किनार लावलेले स्वीडिश बनावटीचे एक सुंदर कातडी जाकीट बाहेर काढले.

"हे तुझ्यासाठी!" मऊ कातड्यावरून हात फिरवीत त्याने ते पावेलला दिले. "कुणी दिलं असेल ओळख पाहू? काय? तुला माहीत नाही? अगदीच कसा मूर्ख रे तू? अरे कॉम्रेड उस्तिनोविचनं पाठवलंय तुझ्यासाठी! तुला थंडीची बाधा होऊ नये म्हणून. ओल्शीन्स्कीनं तिला दिलं होतं. तिनं ते त्याच्याकडून घेतलं अणि तसंच सरळ माझ्या हाती देऊन हुकूम केला की, तुला नेऊन द्यायचं. अकीमनं तिला सांगितलं की, नुसत्या एका पातळ जाकीटावर इथं थंडीत तू काम करतोयस. ओल्शीन्स्की थोडं नाक मुरडीत म्हणाला, 'मी त्या कॉम्रेडला हवा तर लष्करी कोट पाठवतो.' पण रीता हसून म्हणाली, काही गरज नाही. ह्या जाकीटात तो जास्त चांगलं काम करील."

चकित झालेल्या पावेलने ते ऐटबाज जाकीट हातात घेतले आणि थोडा वेळ घुटमळल्यानंतर आपल्या अंगात घातले. त्या मऊ केसाळ कातड्यामुळे त्याला तात्काळ ऊब आली.

रीताने आपल्या रोजनिशीत लिहिले होते :

" २० **डिसेंबर**

"हिमवादळाचा तडाखा चालू आहे. बर्फ आणि वारा यांचे थैमान. तिथे बोयारकाला त्यांचे काम अगदी संपत आले होते तेवढ्यात कडाक्याच्या थंडीने आणि वादळांनी त्यांना अडविले. त्यांच्या गळ्यांपर्यंत बर्फाचे ढिग पसरले आहेत आणि गोठलेली जमीन खणणे काही सोपे नाही. त्यांना अवघा पाऊण किलो-मीटर गाठायचा आहे, पण हा सर्वांत अवघड पट्टा आहे.

"तोकारेव कळवतात की, तिथे विषमज्वराची साथ सुरू झालीय. तीन माणसांना विषमाची बाधा झालीय."

" २२ **डिसेंबर**

"कम्सामोल गुबेर्निया समितीचे सर्वसदस्य अधिवेशन होते, पण बोयारकाहून कुणीही आले नाही. बोयारकापासून सतरा किलोमीटरवर धान्य घेऊन येणारी एक आगगाडी दरोडेखो-रांनी रूळांवरून उलटवली. त्या जागी सर्व बांधकाम कामगारांना पाठवण्याचा हुकूम अन्न-मंत्रालयाच्या प्रतिनिधीने दिला."

" २३ **डिसेंबर**

"बोयारकाहून आणखी सात विषमज्वराचे रोगी शहरात आणण्यात आले. त्यांच्यात ओकुनेव आहे. मी स्टेशनवर गेले होते. खार्कोवहून आलेल्या आगगाडीच्या बफर्सवरून प्रवास करीत आलेले गोठलेले सैनिक पाहिले. इस्पितळांच्या इमारती थंडगार आहेत. हे अभद्र हिमवादळ केव्हा संपणार?"



“ २४ डिसेंबर

“नुकतीच झुखरायना भेटले. ओर्लीकने आपल्या टोळीसकट काल रात्रीं बोयारकावर हल्ला चढविला ही बातमी खरी असल्याचे त्यांनी सांगितले. दोन तास लढाई चालली होती. दळणवळण तुटले होते आणि आज सकाळपर्यंत झुखरायना काहीच नक्की वार्ता मिळाली नव्हती. टोळीला परतवून लावण्यात आले पण तोकरेवना छातीत गोळी घुसून जखम झालीय. त्यांना आज शहरात आणतील. त्या रात्री पहाऱ्या-वरचा प्रमुख असलेला फ्रान्झ क्लाविचेक ठार झाला. त्यानेच प्रथम दरोडेखोरांना पाहिले व धोक्याचा इशारा दिला. टोळीवाल्यांवर त्याने गोळ्या झाडीत शाळेच्या इमारतीकडे पळायला सुरुवात केली, पण तिथे पोचण्यापूर्वीच दरोडेखोरांनी त्याला गाठले व तलवारींनी कापून काढले. अकरा बांधकाम कामगार जखमी झाले. एव्हाना तिथे दोन घोडदळ स्क्वाड्रन आणि एक चिलखती आगगाडी पोचली आहे.

“पानक्रातोवने कामाच्या प्रमुखपदाची जबाबदारी घेतली आहे. आज ग्लूबोकी खेड्यात दरोडेखोरांच्या टोळीच्या एका भागाला पुझिरेव्स्कींनी गाठले आणि तिला नष्ट केले. काही बिगरपक्षीय कामगारांनी आगगाडीची वाट न पाहता पायीच शहरचा रस्ता धरला आहे. ते रूळांवरून चालत येत आहेत.”

“ २५ डिसेंबर

“तोकरेव आणि इतर जखमींना इस्पितळात दाखल करण्यात आले. म्हातारबाबांचा जीव वाचवू, असे डॉक्टरांनी आश्वासन दिले आहे. तोकरेव अजून बेशुद्धीत आहेत. बाकीच्यांच्या आयुष्याला धोका नाही.

"आम्हाला आणि गुबेर्निया पक्ष समितीला उद्देशून बोयार्कांहून एक तार आली.

'दरोडेखोरांच्या हल्ल्याला उत्तर म्हणून आम्ही नॅरोगेज रस्त्याचे बांधकाम कामगार ह्या सभेला जमलो आहोत. आमच्याबरोबर 'सोविएत सत्तेसाठी' नांवाच्या चिलखती आगगाडीचे सैनिक, घोडदळ रेजिमेंटमधील लाल सैनिक आहेत. आम्ही तुमच्यापाशी प्रतिज्ञा करतो की, कितीही अडथळे आले तरी १ जानेवारीला शहराला इंधनासाठी लाकूड मिळेल. आमची सारी ताकद एकवटून आम्ही कामाला लागत आहोत. आम्हाला इथे पाठवणारा कम्युनिस्ट पक्ष चिरायू होवो!

कोर्चागिन, सभेचे अध्यक्ष, बेर्झिन, चिटणीस.'

"क्लाविचेकचे लष्करी इतमामानुसार सोलोमेन्का येथे दफन करण्यात आले."

इच्छित उद्दिष्ट डोळ्यांसमोर होते, पण त्या दिशेने होणारी प्रगती कमालीची मंद होती, पीडादायी होती. कारण ज्यांची अत्यंत जरूरी होती अशा बांधकाम कामगारांमधील डझनभर लोक विषमज्वराने रोज कमी होते होते.

एके दिवशी कामावरून स्टेशनकडे परतणारा कोर्चागिन दारुड्याप्रमाणे झोकांड्या खात येत होता. त्याचे पाय लटपटत होते. त्याला गेले काही दिवस बारीक ताप येत होता, पण आज नेहमीपेक्षा तापाचा जोर जास्त होता.

बांधकाम तुकडीमधील कामगारांची संख्या विषमज्वराने आधीच रोडावली होती. आज आणखी एका आजाऱ्याची भर

पडली. पण पावेलच्या दणकट प्रकृतीने रोगाला थोपवून धरले होते आणि कॉंक्रीटच्या फरशीवरील आपल्या गवती बिछान्यामधून उठून इतरांबरोबर कामाला जाण्याची हिंमत गेले पाच दिवस ओळीने तो करू शकला होता. आता मात्र तापाने त्याचा पुरता ताबा घेतला होता. ते उबदार जाकीट किंवा आधीच हिमबाधा झालेल्या आपल्या पायांवर त्याने चढवलेले झुखराय यांच्याकडून भेट आलेले नमदी बूट, त्याला काहीही मदत करू शकत नव्हते.

दर पावलागणिक त्याच्या छातीमधून जोरदार कळ उमटत होती, त्याचे दात कडकडा वाजत होते आणि त्याच्या डोळयां-समोर अंधेरी येत होती. भोवतालची झाडे गरागरा फिरताहेत असा त्याला भास होत होता.

मोठ्या कष्टाने रखडत तो स्टेशनपर्यंत पोहोचला. तेथे नेहमीपेक्षा वेगळाच गोंगाट चाललेला ऐकून तो थबकला आणि आपल्या तापातल्या नजरेने डोळे ताणून त्याने पाहिले तेव्हा सबंध फलाटभर लांबीची आडव्या डब्यांची एक आगगाडी तेथे उभी असलेली त्याला दिसली. त्या आगगाडीबरोबर आलेली माणसे नॅरोगेज इंजिने, रूळ व ओंढे खाली उतर-विण्याच्या गडबडीत होती. पावेल पुढे धडपडला आणि त्याचा तोल गेला. जमिनीवर त्याचे डोके आपटले तेव्हा एक अस्पष्ट वेदना त्याला जाणवली व त्या पाठोपाठ त्याच्या तापाने फणफणलेल्या गालांना बर्फाचा शीतल स्पर्श झाला.

अनेक तासांनंतर लोकांना त्याचा शोध लागला व त्यांनी त्याला बराकीमध्ये नेले. त्याचा श्वास जड चालला होता, भोवतालच्या परिस्थितीची त्याला फारशी शुद्ध राहिली नव्हती. चिलखती आगगाडीमधून बोलावलेल्या डॉक्टरांच्या एका

साहाय्यकाने त्याला तपासले व न्यूमोनिया आणि विषमज्वराची बाधा झाल्याचे निदान केले. १०६ अंशांपेक्षा त्याचा ताप जास्त होता. डॉक्टरांच्या मदतनीसाने पावेलच्या सुजलेल्या सांध्यांची व मानेवरील व्रणांची दखल घेतली. पण त्या गोष्टी न्यूमोनिया व विषमापुढे किरकोळ होत्या असे तो म्हणाला. न्यूमोनिया आणि विषमज्वर ह्या दोन गोष्टी पावेलच्या मरणाला पुरेशा होत्या.

पानक्रातोव आणि दुबावा शहरामधून आले होते. पावेलला वाचविण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची शर्थ केली.

आल्योशा कोखान्स्की हा पावेलच्याच गावचा होता. पावेलला त्याच्या घरच्या माणसांकडे पोचविण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकण्यात आली.

कोर्चागिनच्या पथकातील सर्व लोकांच्या मदतीने आणि विशेषत: मुसंडी मारून काम करणाऱ्या खोल्यावाच्या साहाय्याने पानक्रातोव आणि दुबावाने बेशुद्ध अवस्थेतील पावेलसकट आल्योशाला गच्च गर्दीने भरलेल्या आगगाडीच्या डब्यात घुसविण्यात यश मिळविले. डब्यातील उतारूंना विषमज्वराच्या रोग्याचा संशय येताच त्यांनी पावेलला आत घेण्यास विरोध केला व आगगाडीच्या वाटेवर रोग्याला फेकून देण्याची धमकी घातली.

खोल्यावाने त्यांच्यावर आपली बंदूक रोखली व तो गरजला: "त्याचा आजार संसर्गाचा नाही! आणि तो याच आगगाडीनं जाईल, मग तुम्हा सर्वांना डब्यातून बाहेर फेकून द्यावं लागलं तरी बेहत्तर! आणि डुकरांनो, लक्षात ठेवा, जर त्याच्या नखाला कुणी धक्का लावला तर मी वाटेवर ताबडतोब निरोप पाठवीन, आणि तुम्हा सगळ्यांची तुरुंगात पाठवणी

करीन. आल्योशा, हे पावेलचं मॉसर घे आणि जो कुणी पावेलच्या अंगाला हात लावील त्या पहिल्या माणसाला गोळी घाल!" शेवटच्या वाक्यावर खोल्यावाने जास्त जोर दिला.

धुराचे लोट सोडीत आगगाडी स्टेशनमधून बाहेर पडली. ओसाड फलाटावर उभ्या असलेल्या दुबावाकडे पानक्रातोव गेला.

"तो यातून निभेल असं वाटतं?"

त्याचा प्रश्न अनुत्तरित राहिला.

"चल मित्याय, काही इलाज नाही. आता सारी जबाबदारी आपल्यावरच! रात्री ती इंजिनं आपण खाली उतरवून घेतली पाहिजेत. सकाळी त्यांना सुरू करण्याचा प्रयत्न करू."

आजारी कोर्चागिनला वाटेत आगगाडीतून कुणी उतरविणार नाही याची खात्री करून घेण्यासाठी खोल्यावाने रेलमार्गावरील आपल्या सर्व चेका मित्रांना टेलिफोन करून कोर्चागिनची काळजी घेण्याबद्दल कळविले. कोर्चागिनची योग्य ती काळजी घेतली जाईल असा खात्रीचा शब्द मिळाल्यानंतरच तो बिछान्यावर आडवा झाला.

एका रेल जंक्शनावर एका उतारूवाहू आगगाडीच्या डब्यामधून एका सफेद केसाच्या अज्ञात तरुणाचा मृत देह फलाटावर उतरविण्यात आला. तो कोण होता आणि कशामुळे मेला याची कुणालाच माहिती नव्हती. स्टेशनवरील चेकाच्या लोकांना खोल्यावाच्या निरोपाची आठवण झाली व ते डब्यापाशी धावले. पण तो तरुण मेलेला आहे असे आढळताच त्यांनी त्याचे शरीर शवागारात हलविण्याची आज्ञा दिली आणि तावडतोब बोयारकाला टेलिफोन करून खोल्यावाला

कळविले की, ज्या मित्राचे प्राण वाचविण्यासाठी तो एवढा चिंताक्रांत होता तो त्याचा मित्र मरण पावला होता!

बोयारकाहून एक त्रोटक तार कम्सामोलच्या गुबेर्नीया समितीला पाठवून कोर्चागिनच्या मृत्यूची बातमी कळविण्यात आली.

दरम्यान आल्योशा कोखान्स्कीने आजारी कोर्चागिनला त्याच्या घरच्या लोकांच्या हवाली केले होते व तो स्वत: परत आला तेव्हा त्याला ताप चढला होता.

"९ जानेवारी

"माझ्या काळजात एवढी वेदना का होतेय? लिहायला बसण्यापूर्वी मी खूप रडले. रीता एवढ्या हमसाहमशी रडू शकते यावर कोण विश्वास ठेवील? पण अश्रू हे नेहमीच दुबळेपणाचे निदर्शक असतात का? आजचे माझे अश्रू विलक्षण वेदना देणाऱ्या दु:खाचे आहेत. जेव्हा थंडीच्या संकटांवर मात करण्यात आली आहे, रेल्वे स्टेशनांवर इंधनाचे ढीगच्या ढीग रचलेले आहेत, रेलरस्त्याचे काम पार पाडणाऱ्या वीरांचा नगर सोविएतच्या प्रचंड सभेत जेव्हा बहुमान करण्यात आला आहे, अशा विजयोत्सवाच्या दिवशी या दु:खाने का यावे? विजय मिळालाय, पण दोन लोकांनी त्यासाठी आपले प्राण वेचले – क्लाविचेक आणि कोर्चागिन.

"पावेलच्या मृत्यूने एक सत्य मला जाणवलेय. माझ्या कल्पनेपेक्षा तो मला फार प्रिय होता.

"आता ही दैनंदिनी मी संपवते. मी पुन्हा कधी ती लिहायला घेईन असे वाटत नाही. युक्रेनी कम्सामोलच्या मध्यवर्ती समितीने मला काम देऊ केले आहे. ते स्वीकारत असल्याचे पत्र 'उद्या मी खार्कोवला पाठवीन."

प्रकरण तिसरे

पण तारुण्याचा विजय झाला. विषमाच्या तापाला पावेल हार गेला नाही. चौथ्यांदा तो मरणाच्या दारापासून परत आला. मात्र अंथरुणातून उठायला त्याला तब्बल एक महिना लागला. तो कमालीचा रोडावला होता आणि फिकुटला होता. आपल्या थरथरत्या पायांनी तो खोलीमध्ये हळू हळू चालू लागला. आधारासाठी तो भिंतीला धरत असे. आपल्या आईच्या मदतीने तो खिडकीपाशी पोचला व बाहेरच्या दृश्याकडे खूप वेळपर्यंत पहात राहिला. वसंताच्या मोसमाचा पहिला काळ होता. रस्त्यावरून वितळलेल्या बर्फाच्या पाण्याचे ओहोळ वहात होते. सूर्यप्रकाशात बर्फ चमकत होते. बर्फ वितळायला नुकताच आरंभ झाला होता.

खिडकीच्या अगदी समोरच असलेल्या चेरी झाडाच्या फांदीवर करड्या रंगाचा एक चिमणा पिसे फुलवून अंगावरचे पाणी झटकत होता आणि पावेलकडे चोरटे कटाक्ष टाकीत होता.

"म्हणजे तू आणि मी हिवाळ्यातून बचावलो तर?" खिडकीच्या तावदानावर हलकेच टिचकी मारीत पावेल त्या चिमण्याला उद्देशून म्हणाला.

त्याच्या आईने दचकून त्याच्याकडे पाहिले.

"बाहेर कुणाशी बोलतो आहेस?"

"चिमणा आहे एक... अरेच्चा, उडाला बघ, डांबीस कुठला!" पावेलच्या चेहऱ्यावर हलकेसे स्मित उमटले.

वसंताचे ऐन बहराचे दिवस सुरू झाले तेव्हा शहराकडे परतण्याचे विचार पावेलच्या मनात एव्हाना घोळू लागले

होते. आता चालण्याइतकी ताकद त्याच्या अंगी आली होती, पण कुठलातरी अज्ञात रोग त्याचे शरीर पोखरत होता. एके दिवशी तो बागेत फिरत होता तेव्हा अचानक त्याच्या पाठी-मध्ये असह्य वेदनेची कळ उमटली आणि तो खाली पडला. मोठ्या मुष्कीलीने तो पुन्हा उठून उभा राहिला आणि खुरडत खुरडत खोलीत परत आला. दुसऱ्याच दिवशी त्याने आपली संपूर्ण वैद्यकीय तपासणी करवून घेतली. डॉक्टरांनी पावेलची पाठ तपासली तेव्हा त्याच्या पाठीत एक खोल खड्डा पडल्याचे त्यांना आढळले.

"हे असं कसं काय घडलं?" डॉक्टरांनी विचारले.

"रोवनोजवळच्या लढाईत. एका तीन इंची तोफेनं आमच्या-मागचा हमरस्ता उखडून काढला आणि स्फोटात उडालेल्या एका दगडानं माझ्या पाठीत दणका दिला."

"पण त्यानंतर तुम्ही चालू कसे शकलात? त्या माराचा तुम्हाला पुढं कधी त्रास झाला नाही?"

"त्या दगडाचा दणका बसल्यानंतर एक-दोन तासपर्यंत मला उठता येईना. पण नंतर वेदना थांबली आणि मी पुन्हा घोड्यावर स्वार झालो. त्यानंतर आत्तापर्यंत त्याचा मला कधीही त्रास झाला नाही."

पावेलच्या पाठीतील तो खळगा काळजीपूर्वक तपासताना डॉक्टरांचा चेहरा खूप गंभीर झाला.

"मित्रा, हा मामला फार वाईट आहे. पाठीच्या मणक्याला असा धक्का बसणं चांगलं नाही. हे दुखणं लौकर संपून जावो अशी आशा करू या."

आपल्या ह्या पेशंटकडे पाहताना डॉक्टरांनी स्वतःच्या चेहऱ्यावरची उमटलेली चिंता लपविण्याचा मुळीच प्रयत्न केला नाही.

एके दिवशी पावेल आपल्या भावाला भेटायला गेला होता. आर्त्योम आपल्या बायकोच्या घरी रहात होता. आर्त्योमची बायको स्तेशा ही अगदी गरीब शेतकरी कुटुंबातली सामान्य रूप असलेली मुलगी होती. तिरळ्या डोळ्यांचे एक पोरटे घरासमोरच्या घाणेरड्या छोट्या अंगणात खेळत होते. पावेलकडे एकटक पहात नाक पुशीत त्या मुलाने विचारले:

"काय पाहिजे तुला? तू चोर तर नाहीस? ताबडतोब इथून चालता हो, नाहीतर माझी आई तुला चांगला पिटून काढील!"

मोडकळीला आलेल्या खोपटाची खिडकी एकदम खाडकन उघडली आणि आर्त्योमचा चेहरा बाहेर डोकावला.

"कोण पावेल, ये रे आत ये!" आर्त्योम म्हणाला.

पिवळसर कांतीची सुरकुतल्या चेहऱ्याची एक म्हातारी चुलाण्याशी काम करीत होती. तिच्याजवळून पावेल गेला तेव्हा तिने त्याच्याकडे एक तिरसट कटाक्ष टाकला व पुन्हा भांड्यांशी खुडबुड सुरू केली.

केसांच्या बारिक आखूड वेण्या घातलेल्या दोन मुली चुलाण्यावरच्या कट्ट्यावर चढून बसल्या व घरात आलेल्या ह्या नव्या माणसाकडे कुतूहलाने पाहू लागल्या.

टेबलापाशी बसलेला आर्त्योम काहीसा अवघडलेला दिसला. आपल्या आईला किंवा भावालाही आपले लग्न मान्य नव्हते, याची त्याला जाणीव होती. पिढ्यानपिढ्या कामगारवर्गीय असलेल्या कुटुंबातील आर्त्योमने गाल्यासारखी पाथरवट घरातली सुंदर मुलगी ठोकरून स्तेशासारखी मद्ड, अडाणी बाई का स्वीकारली आणि पाच लोकांच्या भरण-पोषणाची जबाबदारी का घेतली, हे त्यांना उमजले नव्हते. गाल्या शिवणकाम

करीत होती आणि आर्त्योमने तिचे तीन वर्षे प्रणयाराधन केले होते. पण आता रेलयार्डातले दिवसभराचे कष्टाचे काम केल्यानंतर, ओसाड पडलेल्या शेताला फुलविण्यासाठी आर्त्योमला पुन्हा नांगर ओढावा लागत होता.

"मध्यमवर्गीय प्रवृत्तीं"कडे वळल्याबद्दल पावेलला आपला राग आहे हे आर्त्योमला ठाऊक होते. म्हणून पावेलची नजर घरभर फिरत होती तेव्हा आर्त्योम त्याचा चेहरा निरखत राहिला.

थोडा वेळ बसून त्यांनी शिळोप्याच्या गप्पा मारल्या. शेवटी पावेल जायला निघाला तेव्हा आर्त्योमने त्याला अडवले.

"थोडा थांब आणि आमच्याबरोबर जेवून नंतर जा. लौकरच स्तेशा दूध आणील. उद्या तू परत जाणार तर? पाव्का, तुझ्या अंगात तेवढी ताकद आलीय अशी खात्री आहे ना तुझी?"

स्तेशा तेवढ्यात आत आली. तिने पावेलला अभिवादन केले आणि पडवीमधून काहीतरी उचलून आणायला मदत करण्यासाठी ती आर्त्योमला बाहेर घेऊन गेली. पावेल त्या घुम्या म्हातारीबरोबर तेथे एकटा राहिला. खिडकीमधून दूरवरच्या चर्चच्या घंटांचा आवाज येत होता. म्हातारीने हातातला चिमटा खाली ठेवला व आंबट सुरात ती पुटपुटू लागली:

"आकाशातल्या देवा, ह्या मेल्या घरकामाच्या जंजाळात ह्या देहाला प्रार्थना करायलासुद्धा सवड सापडत नाही!" तिने आपल्या पाठीवरची शाल काढून घेतली आणि काळा-बरोबर काळवंडून गेलेल्या देवाच्या तसबिरींपाशी एका कोपऱ्यात

नी गेली. जाताना तिने पावेलकडे एकदा संशयित नजरेने पाहिले. आपल्या तीन हडकुळ्या बोटांनी तिने क्रूस केला.

"स्वर्गातल्या आमच्या बापा, तुझ्या नामाचा महिमा अगाध राहो!" जराजर्जर ओठांमधून ती पुटपुटली.

अंगणात खेळणारा तो मुलगा आता एका काळ्या, कान-तुटक्या डुकराच्या पाठीवर स्वार झाला होता. आपल्या अनवाणी टाचा तो मोठ्या ऐटीत डुकराच्या कुशीमध्ये ढोसत होता आणि धावणाऱ्या, फुरफुरणाऱ्या त्या जनावरावर ओरडत होता: "है है! च्यॅक च्यॅक!"

पाठीवरच्या मुलाला फेकून देण्याचा प्रयत्न करीत ते डुक्कर नबंध अंगणभर पिसाटासारखे धावत होते. पण ते तिरळ्या डोळ्यांचे कारटे घट्ट मांड घालून बसले होते.

म्हातारीने प्रार्थना थांबवली व खिडकीमधून डोके बाहेर काढून पाहिले.

"हरामखोरा, आत्ताच्या आत्ता त्या डुकरावरून खाली उतर, नाहीतर तुझी मुंडी मुरगाळीन!"

सरतेशेवटी त्या स्वाराच्या तावडीतून सुटका करून घेण्यात डुकराला यश आले. म्हातारी पुन्हा एकदा पुतळ्यांपाशी आली व भाविक मुद्रा करून पुढे बोलू लागली:

"तुझे राज्य येवो..."

त्याच क्षणाला तो मुलगा दारात अवतरला. त्याचा चेहरा अश्रूंनी माखला होता. आपले वाहणारे नाक हाताच्या बाहीने पुसत आणि हुंदके देत तो किंचाळला:

"आई ऽ ग, मला ब्लिन्नी* दे!"

---

* ब्लिन्नी – धिरड्यासारखा खाण्याचा एक पदार्थ. – **अनु.**

म्हातारी संतापून त्याच्यावर खेकसली :

"चकण्या सैताना, मी देवाची प्रार्थना करतेय ते दिसत नाही तुला? थांब तुला चांगली ब्लिन्नी देते! .." असे म्हणत तिने बाकड्यावरचा चाबूक उचलला. तो पोरगा निमिषार्धात बाहेर पसार झाला. चुलाण्यावरच्या त्या दोन छोट्या मुलीही खुदखुदल्या.

म्हातारी पुन्हा तिसऱ्यांदा प्रार्थनेकडे वळली.

पावेल उठला आणि भावाची वाट न पाहता सरळ बाहेर गेला. अंगणातले फाटक त्याने बंद केले तेव्हा घराच्या शेवटच्या खिडकीआडून म्हातारी आपल्याकडे संशयाने डोकावून पहात असल्याचे त्याला जाणवले.

"कुठल्या दुष्ट पिशाच्चानं आर्त्योमला भुरळ घालून इथं आणलं?" त्याच्या मनात कडवट विचार आला. "आता आर्त्योम सारं आयुष्य इथं बांधला गेला. स्तेशा दरवर्षाला एका पोराला जन्म देणार आणि आर्त्योम शेणातल्या किड्या-सारखा सबंध आयुष्य वळवळत राहणार. कदाचित तो रेलयार्डातलं कामही सोडून देईल." छोट्या गावातल्या निर्मनुष्य रस्त्यांवरून चालत असताना पावेलच्या मनात असे विचार येत होते. "आणि त्याला राजकीय कार्यात रस वाटेल, अशी आशा मी बाळगून बसलो होतो."

उद्या ही जागा सोडून आपण मोठ्या शहरी जाणार आणि आपल्या प्रिय मित्रांना व सहकाऱ्यांना भेटणार, ह्या विचाराने पावेलच्या चित्तवृत्ती उल्हसित झाल्या. शहरातले घाईगर्दीचे जीवन, तिथला माणसांचा अखंड लोंढा, तिथल्या खडखड-णाऱ्या ट्रामगाड्या व कर्णे वाजवणाऱ्या मोटारगाड्या, एखाद्या चुंबकाप्रमाणे त्याला आकर्षित करीत होत्या. पण त्या सर्वांहूनही

त्याला आकर्षण होते कारखान्यांच्या मोठ्या विटकरी इमारतींचे, काजळलेल्या यंत्रशाळांचे, यंत्रांचे, यंत्रांच्या पट्ट्यांच्या मंद घरघरीचे. प्रचंड चाकांना गरगर फिरताना पाहण्यासाठी, यंत्रांच्या तेलाचा वास घेण्यासाठी, त्याचाच एक भाग बनलेल्या त्या सर्व गोष्टींसाठी, तो कमालीचा आसुसला होता. आत्ता तो ज्या तालुक्याच्या गावातल्या रस्त्यांवरून फिरत होता, त्या गावात त्याला काहीशी निराशेची अस्पष्ट भावना जाणवत होती. या ठिकाणी त्याला परक्यासारखे वाटत होते याचे त्याला आश्चर्य वाटले नाही. दिवसाढवळ्या रस्त्यावरून जाणेही एक दिव्य होऊन बसले होते. ओणव्या बसून गावगप्पा करणाऱ्या गृहिणींची कुजबूज रस्त्यावरून जाताना त्याच्या कानांवर येई :

"हे बुजगावणं कोण ग?"

"क्षयाचा रोगी असावा असं वाटतंय."

"अंगात जाकीट छान आहे. चोरलेलं असावं."

अशाच तऱ्हेचे अनेक संवाद पावेलला ऐकावे लागत. त्या सर्वांचा पावेलला वीट आला होता.

ह्या सर्वांपासून त्याने फार पूर्वीच स्वत:ची फारकत करून घेतली होती. त्यापेक्षा त्याचे मोठ्या शहराशी अधिक जवळचे लागेबांधे जुळले होते. तेथे मैत्रीचे आणि श्रमाचे अधिक भक्कम, जोमदार संबंध निर्माण झाले होते.

एव्हाना तो सूचिपर्णी झाडांच्या जंगलात पोचला होता आणि रस्त्याच्या फाट्यापाशी एक क्षणभर तो थांबला. त्याच्या उजव्या हाताला जुना तुरुंग होता. उंच काटेरी कुंपणाने तो जंगलापासून अलग केलेला होता. त्यापलिकडे इस्पितळाच्या पांढऱ्या इमारती होत्या.

ह्या विस्तीर्ण आवारात वाल्याच्या आणि तिच्या साथीदारांच्या गळ्यांभोवती फाशीचे दोर आवळले गेले होते. ज्या ठिकाणी फाशीचे तक्ते उभे केलेले होते तेथे पावेल काही क्षण स्तब्ध उभा राहिला. नंतर टेकाड चढून खालच्या बाजूस असलेल्या छोटचा स्मशानभूमीत गेला. श्वेतरक्षकांच्या दहशतीला बळी पडलेल्यांची सामायिक थडगी तेथे होती. प्रेमळ अंतःकरणाच्या लोकांनी थडग्यांवर फरच्या झाडाच्या डहाळ्या पसरल्या होत्या आणि स्मशानाभोवती नीटस हिरवे कुंपण बांधले होते. टेकाडावर सूचिपर्णीची झाडे ताठ सरळ वाढली होती आणि उतारांवर कोवळ्या गवताचा मखमली हिरवा गालिचा पसरला होता.

गावाच्या ह्या बाहेरच्या परिसरात एक करुण शांतता पसरली होती. झाडांची हलकी कुजबुज चालू होती आणि पुनरुज्जीवित जमिनीमधून वसंताचा ताजा गंध दरवळत होता... गरिबीत जन्मलेल्यांना आणि गुलामगिरीतच जन्मलेल्यांना सुंदर जीवनाचा लाभ व्हावा यासाठी पावेलचे साथीदार ह्या ठिकाणी धीराने मृत्यूला सामोरे गेले होते.

हलकेच पावेलचा हात वर गेला आणि त्याने डोक्यावरची टोपी काढली. त्याच्या अंतःकरणात विषण्णता दाटून आली होती.

जीवन हा माणसाचा सर्वांत प्रिय असा ठेवा. हा ठेवा त्याला एकदाच लाभतो. म्हणून त्याने असे जीवन जगले पाहिजे की, वर्षे वाया गेल्याची त्याला कधी बोचरी खंत वाटू नये, क्षुद्र आणि क्षुल्लक भूतकाळाबद्दलची जळती शरम त्याला कधी स्पर्शू नये. त्याने असे जगावे की मरतेसमयी त्याने म्हटले पाहिजे: माझे सारे जीवन, माझी सारी शक्ती,

जगातल्या सर्वोत्तम कार्यासाठी— मानवजातीच्या मुक्तीलढ्यासाठी—वेचली. प्रत्येकाने आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षणाचा वापर केला पाहिजे, नाहीतर एखादे अचानक आजारपण अथवा दुर्दैवी अपघात त्या जीवनाची अकाली अखेर करतो.

हे विचार मनात घोळवीतच कोर्चागिन स्मशानभूमीपासून परत वळला.

घरी पावेलची आई त्याच्या प्रयाणाची तयारी जड अंत:करणाने करीत होती. पावेलने तिच्याकडे पाहिले तेव्हा त्याला दिसले की, ती आपले अश्रू त्याच्यापासून लपवू पहात होती.

सरतेशेवटी धीर करून तिने विचारले: "पावेल, मुला इथंच का रहात नाहीस? माझ्या म्हातारपणात मला एकटीला राहणं खूप जड जातंय. माणसाला कितीही मुलं असली तरी त्याचा काही उपयोग नाही. ती मोठी झाली म्हणजे जन्मदात्यांना सोडून जातात. तुला शहरात पळायची गरज काय? तुला इथं राहणंही शक्य आहे. कदाचित एखाद्या केस कापलेल्या मैनेनं तिथं तुला भुरळ घातली असेल? तुम्ही पोरं आपल्या म्हाताऱ्या आईला कधी काही सांगत नाही. एकही शब्दानं मला न सांगता आर्त्योमनं जाऊन लग्न केलं. आणि तू तर या बाबतीत त्याच्यापेक्षा वाईट आहेस. तू जेव्हा पांगळा होतोस तेव्हाच तुझं मला दर्शन घडतं," पावेलच्या किरकोळ सामानाला स्वच्छ पिशवीत भरता भरता स्फुंदत आई म्हणाली.

पावेलने तिचे दोन्ही खांदे धरले आणि तिला आपल्यापाशी जवळ ओढली.

"आई, तुला खरं सांगू, कुठल्याही मैना नाहीत! पाखरं स्वत:च्या जातीचाच जोडीदार निवडतात हे माहीत नाही का

तुला ? आणि मी मैनेच्या जातीतला होतो असं तू म्हणशील काय ?"

त्याच्या आईला त्याही मन:स्थितीत हसू आले.

"जोपर्यंत जगातले सगळे भांडवलदार नष्ट होत नाहीत तोपर्यंत मुलींपासून लांब राहण्याचं मी वचन दिलंय आई! तू म्हणशील, याला फार काळ लागेल. नाही आई, भांडवलदार आता फार काळ तग धरू शकणार नाहीत. आता लौकरच सर्व लोकांसाठी एक मोठं प्रजासत्ताक स्थापन होईल आणि सबंध आयुष्यभर श्रमलेली तुझ्यासारखी म्हातारी माणसं समुद्रमार्गानं इटलीसारख्या सुंदर, उबदार देशात जातील. आई, तिथं हिवाळा नाही. श्रीमंतांच्या राजवाड्यांमध्ये आम्ही तुम्हाला रहायला जागा देऊ. आणि आपल्या म्हाताऱ्या हाडांना सूर्यप्रकाशात तुम्ही शेकत बसाल तोवर आम्ही अमेरिकेतल्या भांडवलदारांचा फडशा पाडू."

"मुला, तुझी ही परीकथा फार छान आहे, पण ती खरी घडलेली पहायला मी जिवंत असणार नाही... तुझ्या खलाशी आजोबासारखाच तू हुबेहूब झालास. त्यांच्या डोक्यातही खच्चून कल्पना भरलेल्या असायच्या. अगदी जातिवंत पुंड! परमेश्वर त्यांना क्षमा करो! सेवास्तोपोलची लढाई संपवून घरी आले तेव्हा एक हात आणि एक पाय गमावलेला होता. छातीवर मात्र दोन क्रूस आणि दोन चांदीची झारची पदकं लटकत होती. पण त्यांना मरण मात्र गरिबीत आलं. अति तापट स्वभाव. हातातल्या कुबडीनं एका अधिकाऱ्याच्या डोक्यावर एकदा तडाखा मारला आणि त्याबद्दल वर्षभर त्यांना तुरुंगात टाकलं होतं. त्यावेळी ते लष्करी क्रूससुद्धा उपयोगी पडले नाही. खरंच, तू अगदी आपल्या आजोबांच्या वळणावर गेला आहेस."



"ए आई, आपण असा दु:खी निरोप घ्यायचा नाही. होय की नाही? माझं अॅकॉर्डियन दे पाहू. किती किती वर्षांत मी त्याला हात लावलेला नाही."

त्याने मोतीदार पट्ट्यांवर मान झुकवली आणि त्याची बोटे झरझर फिरू लागली. त्याच्या संगीतामध्ये काहीतरी नवीनच गुण आल्याचे त्याच्या आईला जाणवले. पूर्वी तो असा कधीच वाजवत नसे. धडाकेबाज, धुंद-फुंद सुरावटींबद्दल पूर्वी त्याची ख्याती होती. पण आता ते सूर गेले होते. त्याच्या बोटांमधले कौशल्य आणि ताकद अजून कायम होती. पण त्याच्या बोटांमधून स्त्रवणारी संगीतधारा अधिक संपन्न आणि सखोल होती.

पावेल स्टेशनावर एकटाच गेला.

आईला त्याने घरीच राहण्याचा आग्रह केला होता, कारण स्टेशनवरचा अंतिम निरोप तिला फार जड जाईल याची त्याला कल्पना होती.

स्टेशनावर गाडीची वाट पहात थांबलेली लोकांची गर्दी गाडी येताच तिच्यावर तुटून पडली. डब्यातल्या सर्वांत वरच्या फळीवर पावेल चढून बसला आणि ओरडणाऱ्या, उत्तेजित झालेल्या, वाद घालणाऱ्या, हातवारे करणाऱ्या खालच्या उतारूंकडे पाहू लागला.

प्रत्येक प्रवासी नेहमीप्रमाणेच बोचकी आणि गाठोडी बरोबर घेऊन आला होता व बैठकांखाली सरकवीत होता.

गाडीने वेग घेताच गोंधळ काहीसा शमला आणि प्रवाशांनी उदरभरणाला सुरुवात केली.

पावेलला लौकरच झोप लागली.

कीव्हमध्ये येताच पावेलने स्-ळ क्रेश्चातीक रस्त्याची वाट

धरली. हा रस्ता शहराच्या अगदी केंद्रभागी होता. हळूहळू तो पूल चढला. सारे काही पूर्वीप्रमाणेच होते. काहीही बदल घडला नव्हता. गुळगुळीत लोखंडी कठड्यांवरून हात सरकवीत त्याने पूल पार केला. पुलावर चिटपाखरू नव्हते. पूल उतरण्यापूर्वी समोरच्या दृश्याची भव्यता सामावून घेण्यासाठी तो थबकला. क्षितिज अंधाराच्या मखमली लडयांमध्ये गुरफटलेले होते. तारे चमचम करीत प्रकाशत होते. आणि खालच्या अंगाला एक अदृश्य टोकाशी धरती आकाशामध्ये जेथे मिसळून गेली होती तेथे शहरच्या लाख दिव्यांनी अंधार उधळून लावला होता...

चढ्या सुरातल्या वादविवादाच्या आवाजांनी रात्रीची स्तब्धता भंगली आणि पावेल एकदम तंद्रीमधून भानावर आला. त्याच्या दिशेने कुणीतरी येत होते. पावेलने शहरच्या दिव्यांवरची आपली खिळलेली नजर काढली व पायऱ्या उतरून तो खाली आला.

प्रादेशिक खास विभागात कामावरच्या माणसाने पावेलला सांगितले की, बऱ्याच दिवसांपूर्वी झुखराय शहर सोडून गेले.

त्या माणसाने पावेलला नाना तऱ्हेचे प्रश्न विचारले आणि पावेल हा खरोखरीच झुखराय यांच्या खास ओळखीचा होता याची खात्री पटल्यानंतर शेवटी सांगितले की, तुर्कस्तान आघाडीवर काम करण्यासाठी फ्योदरना ताश्कंदला पाठवले होते. ह्या बातमीने पावेल एवढा बेचैन झाला की पुढील तपशील अजिबात न विचारता तो सरळ मागे फिरला. पण एकाएकी थकवा आल्याने दाराच्या पायरीवर त्याला विश्रांतीसाठी मटकन बसावे लागले.

आपल्या खडखड आवाजाने सारा रस्ता भरीत एक ट्राम-

गाडी गेली. पावेलच्या शेजारून लोकांचा अखंड प्रवाह वहात होता. पावेलच्या कानांवर बायकांच्या उल्हसित हसण्याचा खळखळाट येत होता. कुणाचा खर्जातला आवाज येत होता, एका तरुणाचा तारस्वर येत होता, एका म्हाताऱ्याचे धपापते बोलणे ऐकू येत होते. घाईगर्दीने जाणाऱ्या लोकांची भरती-ओहटी कधीच थांबली नाही. झगझगीत प्रकाशमान झालेल्या ट्रामगाड्या, मोटारींचे डोळे दिपवणारे दिवे, जवळच्याच चित्रपटगृहाच्या प्रवेशद्वाराशी झगमणारे विजेचे दिवे... आणि सगळीकडे माणसेच माणसे! त्यांच्या संभाषणांच्या आवाजांनी रस्ता सतत गजबजला होता.

फ्योदर यांच्या जाण्यामुळे पावेलच्या मनाला जी वेदना झाली होती तिची तीव्रता रस्त्यावरच्या आवाजांनी आणि गजबजाटाने कमी झाली. आता तो कुठे जाणार होता? त्याचे मित्र जेथे रहात होते ते सोलोमेन्का खूप दूर होते. एकाएकी त्याला विद्यापीठ रस्त्यावरचे घर आठवले. येथून ते लांब नव्हते. त्याने तेथे जायचे नक्की केले. सरतेशेवटी फ्योदर यांच्यानंतर भेटावे अशी वाटणारी पहिली व्यक्ती म्हणजे रीताच! शिवाय अकीमच्या किंवा मिखाईलोच्या घरी रात्र काढणे त्याला कदाचित शक्य झाले असते.

खूप दूरवरूनच त्याला शेवटच्या खिडकीमध्ये प्रकाश दिसला. आपल्या भावनांना कसेबसे आवरून धरून त्याने बाहेरचे भले-मोठे अवजड ओकच्या लाकडाचे दार उघडले. काही सेकंद तो पायऱ्यांच्या खाली थांबून राहिला. रीताच्या खोलीतून आवाज ऐकू येत होते व कुणीतरी गिटारच्या तारा छेडीत होते.

“अच्छा, म्हणजे आजकाल तिला गिटारचं संगीत चालू

लागलंय. शिस्त थोडी सैल झालेली दिसते", तो स्वत:शीच म्हणाला. आपली अंतर्यामीची खळबळ थोपवून धरण्यासाठी त्याने स्वत:चे ओठ गच्च आवळून घेतले आणि दारावर हलकेच टिचक्या वाजवल्या.

संपूर्ण कुरळ्या बटा असलेल्या एका तरुणीने दार उघडले. तिने प्रश्नार्थक नजरेने कोर्चागिनकडे पाहिले.

"कोण पाहिजे तुम्हाला?"

तिने दार अर्धवट बंद धरले होते व खोलीच्या आत ओझरता दृष्टिक्षेप टाकताच पावेलच्या लक्षात आले होते की, त्याची फेरी वाया गेली होती.

"रीता उस्तिनोविच आहेत का?"

"ती इथं नाही. गेल्या जानेवारीत ती खार्कोवला गेली आणि आता ती मॉस्कोत आहे असं ऐकलं."

"कॉम्रेड अकीम इथं अजून राहतो, का तोसुद्धा जागा सोडून गेला?"

"नाही, तोसुद्धा इथं नाही. आता तो अदेस्सामध्ये गुबेर्निया कम्सामोलचा चिटणीस आहे."

आता मागे परतण्यावाचून दुसरा काही मार्गच नव्हता. शहरात परतल्याचा पावेलचा आनंद पार पुसला गेला होता.

रात्रीच्या मुक्कामापुरती जागा शोधणे भाग होते.

"इथं नसलेले जुने मित्र शोधण्यासाठी करा तंगडतोड", स्वत:ची निराशा गिळून टाकीत तो स्वत:शीच चिडून म्हणाला. तरीही आणखी एक प्रयत्न करून पानक्रातोव अजून शहरात आहे किंवा नाही ते पाहण्याचे त्याने ठरविले. तो गोदीकामगार गोदीच्या आसपास रहात होता आणि सोलोमेन्कापेक्षा ते ठिकाण जवळ होते.

पानक्रातोवच्या घरी पोहोचेपर्यंत पावेल पुरता थकून गेला

होता. एकेकाळी पिवळा रंग दिलेल्या दारावर थाप मारताना पावेलच्या मनात विचार आला की, "जर पानक्रातोवसुद्धा इथं नसेल, तर मी शोध घ्यायचं चक्क सोडून देईन आणि एखाद्या बोटीच्या खाली सरपटत जाऊन रात्रभर तिथंच झोपीन."

गळ्याखाली रुमालाची गाठ बांधलेल्या एका म्हातारीने दार उघडले. ती पानक्रातोवची आई होती.

"आई, ईग्नात घरात आहे?"

"अगदी आत्ताच आलाय."

तिने पावेलला ओळखले नाही. आपल्या मुलाला हाक मारण्यासाठी ती मागे वळली: "ईग्नात, तुला कुणीतरी भेटायला आलंय!"

पावेल तिच्या पाठोपाठ खोलीत गेला आणि आपली पडशी त्याने जमिनीवर ठेवली. टेबलाशी बसून रात्रीचे जेवण करणाऱ्या पानक्रातोवने मान वळवून नवागताकडे ओझरते पाहिले.

"तुला जर मलाच भेटायचं असेल तर बसून बिडी ओढता ओढता बोल. तोपर्यंत मी बोर्श (एक प्रकारचे सूप – **अनु.**) पोटात रिचवतो", तो म्हणाला. "सकाळपासून काही खाल्लेलं नाही." आणि त्याने भलामोठा लाकडी चमचा उचलला.

एका बाजूच्या डुगडुगत्या खुर्चीवर पावेल बसला. त्याने डोक्यावरची टोपी काढली व पूर्वीच्या सवयीने तिनेच आपले कपाळ पुसले.

"मी एवढा बदललोय का, की ईग्नातनंसुद्धा मला ओळखलं नाही?" त्याने स्वतःला प्रश्न केला.

पानक्रातोवने बोर्शचे एक-दोन चमचे भुरकले. पण आपला

पाहुणा काहीच बोलला नाही हे पाहून त्याने त्याला पाहण्यासाठी मान वळवली.

"अरेच्चा! काय विचार काय तुझा?"

पावाचा तुकडा धरलेला त्याचा हात तसाच हवेत अधांतरी राहिला. आपल्या पाहुण्याकडे तो चकित नजरेने डोळे फाडफाडून बघत राहिला.

"अरे ऽ... म्हणजे आहे काय?... कमाल आहे, तू कसा...? ..."

पानक्रातोवच्या लालबुंद चेहऱ्यावर उडालेला गोंधळ आणि उमटलेले आश्चर्य पाहून पावेलला हसू आवरेना व तो खो खो हसत सुटला.

"पाव्का!" पानक्रातोव ओरडला. "अरे आम्हा सगळ्यांना वाटलं की, तू खपला! जरा थांब हं! पुन्हा तुझं नांव सांग पाहू?"

पानक्रातोवचा ओरडा ऐकून त्याची मोठी बहीण आणि त्याची आई शेजारच्या खोलीतून धावत आल्या. त्या तिघांनीही पावेलवर प्रश्नांचा भडिमार केला आणि तो दुसरातिसरा कुणी नसून पावेल कोर्चागिनच आहे अशी खात्री पटली, तेव्हा कुठे ते गप्प झाले.

घरातली माणसे झोपून गेल्याला बराच वेळ उलटून गेला होता तरी पानक्रातोव पावेलला गेल्या चार महिन्यातील घडामोडींची इत्थंभूत माहिती सांगत बसला होता.

"गेल्या हिवाळ्यात झार्कीय, मिखाईलो आणि मित्याय खार्कोवला गेले. आणि ते भिकारी कुठं गेले असतील असं वाटतं तुला? कम्युनिस्ट विद्यापीठात! वान्का आणि मित्याय प्राथमिक अभ्यासक्रमात दाखल झाले. मिखाईलो पहिल्या

वर्षाला दाखल झाला. सुरवातीला आम्ही पंधरा होतो. मला-सुद्धा तेव्हा चेव आला होता आणि मी अर्ज ठोकला. जरा डोक्यातला कचरा साफ करावा असा विचार होता. आणि तुला काय सांगू, परीक्षक मंडळानं माझे तीन-तेरा वाजवले!"

या आठवणीसरशी पानक्रातोवने एक दीर्घ श्वास घेतला आणि तो पुढे सांगू लागला:

"सुरवातील सारं काही छान होतं: सगळ्या बाबतीत मी अगदी फिट्ट बसत होतो. माझ्यापाशी पक्षाचं कार्ड होतं, कम्सामोलमध्ये मी बराच काळ काढला होता, माझी पूर्वीची कारकीर्द एकदम ठीक होती. पण राजकारणाच्या ज्ञानाची वात्र आली आणि आमचा बोऱ्या वाजला.

"परीक्षक मंडळातल्या एका परीक्षकाशी माझा वाद जुंपला. त्यानं मला एक बारिकसा खोडसाळ प्रश्न टाकला: 'कॉम्रेड पानक्रातोव, तत्त्वज्ञानाबद्दल तुम्हाला काय माहिती आहे ती सांगा!' आता खरं सांगायचं तर तत्त्वज्ञानाबद्दल मला ओ की ठो माहीत नव्हतं! पण आमच्या धक्क्यावर एक पोरगा काम करायचा. पूर्वी तो विद्यार्थी होता, पण शिक्षण सोडून गंमतीखातर गोदी कामगार बनला होता. मला त्यानं सांगितलेल्या एका गोष्टीची आठवण झाली की, प्रत्येक बाबतीतली सगळी उत्तरं माहीत असलेले काही हुशार लोक पूर्वी ग्रीसमध्ये होते आणि त्यांना तत्त्वज्ञानी म्हणून ओळखत असत. तसंच आणखी एकजण होता... त्याचं नांव आता मला नीटसं आठवत नाही, पण दिओगिनीझ किंवा असंच काहीसं होतं, तो सबंध आयुष्यभर पिंपात राहिला... जो कुणी चाळीसपेक्षा जास्त वेळा काळे म्हणजे पांढरे आणि पांढरे म्हणजे काळे असं सिद्ध करू शके, तो सर्वांत हुशार! अशी चलाख माणसं!

तर मला त्या विद्यार्थ्यानं जे सांगितलं होतं त्याची आठवण झाली आणि स्वतःशीच म्हणालो: 'अरेच्चा, हा लबाड माझी फिरकी घेतोय.' तो परीक्षक माझ्याकडं खट्याळ नजरेनं पाहतोय हे माझ्या लक्षात आलं. मी त्याला तो आसुरी आनंद उपभोगू दिला. मी म्हणालो: 'तत्त्वज्ञान ही एक फालतू बाब आहे आणि त्याच्याशी डोकेफोड करण्याची माझी इच्छा नाही. हां, पण पक्षाचा इतिहास ही वेगळी बाब आहे. त्याबद्दल खुशाल विचारा.' मग मात्र त्यांनी माझी उलटसुलट हजेरी घेतली. असले चमत्कारिक विचार माझ्या डोक्यात कुठून शिरले याबद्दल त्यांना कुतूहल होतं. मी त्यांना त्या विद्यार्थ्या-बद्दल आणि त्यानं सांगितलेल्या गोष्टींबद्दल माहिती दिली. सारे परीक्षक पोट दुखेपर्यंत हसले. मी त्यांच्या चेष्टेचा विषय बनलो. मला मात्र त्यांचा राग आला आणि तडक बाहेर निघून गेलो.

"पुढं त्या परीक्षकानं गुबेर्निया समितीत मला धरला आणि तब्बल तीन तास व्याख्यान झोडलं. त्या गोदीवरल्या विद्यार्थ्यानं विषयांची गल्लत केली होती असं माझ्या लक्षात आलं. तत्त्वज्ञान हे खूप महत्त्वाचं आहे हे मला समजलं.

"दुबावा आणि झार्कीय परीक्षा पास झाले. मित्याय अभ्यासात नेहमीच चांगला होता, पण झार्कीय माझ्याच जातीतला! पण त्याचा किताब त्याला उपयोगी पडला असावा. तर मी इथं मागं राहिलो. ते निघून गेल्यानंतर मालधक्क्यावर उप-प्रमुख म्हणून माझी नेमणूक झाली. हे काम व्यवस्थापकीय स्वरूपाचं होतं. पूर्वी माझे मॅनेजरांशी नेहमी खटके उडायचे व कामगारांची मी बाजू घ्यायचा. आता मी स्वतःच मॅनेजर आहे. अलिकडं कुणी कामचुकार सापडला म्हणजे मॅनेजर

आणि कम्सामोल चिटणीस अशा दोन्ही नात्यानं मी त्याला चांगला फैलावर घेतो. माझ्या डोळयात तो धूळ फेकू शकत नाही! बरं, आता माझ्याबद्दलचं पुराण पुरे. आणखी तुला सांगण्यासारखं काय आहे बरं? अकीमबद्दल तुला माहीत झालंच आहे. गुबेर्निया समितीत पूर्वीच्या लोकांपैकी फक्त तुफ्ता राहिलाय. पूर्वीचंच काम करतो. तोकरेव सोलोमेन्काच्या विभागीय पक्ष समितीत चिटणीस आहे. तुझा कम्युनमधला साथीदार ओकुनेव हा कम्सामोलच्या विभागीय समितीत आहे. ताल्या राजकीय शिक्षण विभागात काम करते. त्स्वेतायेव दुरुस्ती खात्यांमध्ये तुझं काम करतो. मला त्याच्याबद्दल फारशी माहिती नाही. आमची कधीतरी गुबेर्निया समितीत भेट होते. तो हुशार दिसतो, पण जरा चढेल आहे. आन्ना बोरहार्त आठवते? तीसुद्धा सोलोमेन्काला आहे. विभागीय पक्ष समितीच्या महिला खात्याची प्रमुख आहे. इतर सगळयांबद्दल मी तुला सांगितलंच आहे. पावेल, पक्षानं खूप लोकांना अभ्यास करायला पाठवलं. पूर्वीचे सर्व कार्यकर्ते गुबेर्निया सोविएतमध्ये आणि पक्षाच्या विद्यालयात जातात. मलासुद्धा पुढल्या वर्षी तिथं पाठवणार आहेत."

ते दोघे अंथरुणावर पडले तेव्हा मध्यरात्रीनंतर बराच वेळ उलटून गेला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी पावेलला जाग आली तोवेळपावेतो पानक्रातोव धक्क्यावर कामाला निघून गेला होता. त्याच्या बहिणीने, दूस्याने, पावेलला चहा करून दिला. ती दिसायला खूपशी आपल्या भावासारखीच होती. सारा वेळ अखंड बडबड करीत तिने पावेलची करमणूक केली. जहाजावर इंजिनिअर असलेले पानक्रातोवचे वडील सध्या घरापासून दूर होते.

पावेल जेव्हा बाहेर जाण्याची तयारी करू लागला तेव्हा दूस्याने त्याला बजावले :

"आम्ही जेवणाच्या वेळी तुझी वाट पाहतोय हे विसरू नको."

पक्षाच्या गुबेर्निया समितीमध्ये नेहमीची धांदल चालू होती. पुढील दाराची सतत उघड-झाप चालली होती. व्हरांड्यांमधून आणि कचेऱ्यांमधून लोकांची दाटी झाली होती. शासकीय विभागातून टंकयंत्रांचा दबता आवाज येत होता.

ओळखीचा चेहरा शोधत पावेल काही काळ व्हरांड्यात घुटमळत राहिला. पण परिचित असे कुणी दिसेना तेव्हा तो तडक चिटणीसांना भेटायला गेला. निळा रशियन सदरा घातलेले चिटणीस एका भल्या मोठ्या मेजामागे बसले होते. पावेल खोलीत आला तेव्हा त्यांनी एक ओझरता कटाक्ष टाकला व पुन्हा ते लेखनात मग्न झाले.

त्यांच्यासमोर पावेल बसला व अकीमच्या जागी आलेल्या ह्या नव्या माणसाचा चेहरा त्याने न्याहाळला.

आपले लिहिण्याचे काम संपवीत रशियन सदऱ्यातल्या त्या माणसाने पावेलला विचारले :

"आपल्यासाठी मी काय करू शकतो?"

पावेलने त्यांना आपली कथा सांगितली.

"माझं सभासदत्व मला पुन्हा नोंदवायचं आहे आणि रेल्वे वर्कशॉपमध्ये मला पाठवा," अखेरीस तो म्हणाला. "त्यासाठी आवश्यक त्या सूचना द्या."

चिटणीस खुर्चीत मागे रेलले.

"अर्थात आम्ही तुमचं नांव पुन्हा नोंदवून घेऊ, यात काही

शंका नाही," थोडेसे बिचकत ते म्हणाले. "पण वर्कशॉप-मध्ये तुम्हाला पाठवणं थोडं चमत्कारिक ठरेल. त्स्वेतायेव आधीच तिथं काम करताहेत. ते गुबेर्निया समितीचे सभासद आहेत. तुमच्यासाठी आम्हाला दुसरं काहीतरी काम शोधलं पाहिजे."

कोर्चागिनचे डोळे आकुंचन पावले.

"त्स्वेतायेवच्या कामात ढवळाढवळ करण्याचा माझा मुळीच इरादा नाही," तो म्हणाला. "मी तिथं कामगार म्हणून काम करणार आहे, चिटणीस म्हणून नव्हे. आणि माझी प्रकृती तितकीशी चांगली नाही, तेव्हा दुसऱ्या कुठल्या कामावर माझी नेमणूक करू नका, अशी माझी विनंती आहे."

चिटणीसांना हे मान्य झाले. एका कागदाच्या चिटोऱ्यावर त्यांनी काही शब्द खरडले.

"कॉम्रेड तुफ्तांना हे द्या. ते सगळी व्यवस्था करतील."

नोंदणी विभागात पावेल गेला तेव्हा तुफ्ता आपल्या साहाय्यकाची खडसून हजेरी घेत असलेले पावेलला आढळले. एक-दोन मिनिटे पावेलने त्यांची खडाजंगी ऐकली, पण तो वाद लौकर संपण्याचे चिन्ह दिसेना तेव्हा त्याने मध्ये खंड पाडला.

"तुफ्ता, तुमचा वाद तुम्ही नंतर केव्हातरी मिटवा. माझा कागद तयार करण्याबाबत ही चिठ्ठी आणलीय."

तुफ्ताने रोखून पाहिले. कागदावर आणि कोर्चागिनच्या चेहऱ्याकडे आळीपाळीने नजर टाकली. अखेरीस त्याच्या डोक्यात प्रकाश पडला.

"च्यायला! म्हणजे तू मेला नव्हतास तर? अरे, अरे, आता कसं करायचं रे? याद्यांमधून तुझं नांव खोडून टाकलंय.

मध्यवर्ती समितीकडं मी स्वतःच तुझं कार्ड दिलं. एवढंच नाही तर शिरगणतीच्या वेळी तू नव्हतास आणि कम्सामोलच्या मध्यवर्ती समितीच्या आदेशानुसार, शिरगणतीच्या वेळी ज्यांची नोंद झाली नाही ते बाद ठरलेत. आता रीतसर अर्ज करणं एवढंच तू करू शकतोस." तुफ्ताच्या स्वरात रोखठोकपणा होता.

पावेलने कपाळाला आठ्या घातल्या.

"तुफ्ता, तू अजूनही बदललेला दिसत नाहीस. पूर्वीसारखाच नोकरशहा राहिलास. तसा वयानं तू तरुण आहेस, पण वागण्यात अगदी जुन्या खोडापेक्षा वाईट आहेस. माणुसकीनं वागायला तू केव्हा शिकणार?"

गांधीलमाशी डसावी त्याप्रमाणे तुफ्ता ताडकन उभा राहिला.

"तू व्याख्यान झोडलं नाहीस तर उपकार होतील माझ्यावर. इथला प्रमुख मी आहे. आदेश पाळण्यासाठी देतात, त्यांचा भंग व्हावा म्हणून नव्हे. आणि आरोप करताना जरा सांभाळून बोललास तर बरं होईल!"

एवढे बोलून तुफ्ता खाली बसला आणि न उघडलेल्या पत्रांचा ढिगारा त्याने दिखाऊपणे स्वतःपाशी खेचला.

पावेल हळूहळू चालत दारापर्यंत गेला. मग काहीतरी आठवण झाल्यामुळे परत टेबलापाशी आला व तुफ्तासमोर पडलेली चिटणीसांची चिठ्ठी त्याने उचलून घेतली. तुफ्ता त्याला बारीक नजरेने न्याहाळीत होता. तो अत्यंत क्षुद्र मनाचा माणूस होता. यौवनाचा एकही गुण त्याच्यात नव्हता. त्याच्या मोठ्या कानांमुळे तो काहीसा चमत्कारिक दिसे. ते कान सतत टवकारल्यासारखे दिसत.

"ठीक आहे" उपहासाच्या सुरात पावेल शांतपणे म्हणाला.

"'आकड्यांमध्ये गोंधळ' केल्याबद्दल तू माझ्यावर ठपका ठेवू शकतोस, पण आधी औपचारिक नोटिस न देता जी माणसं जाऊन मरतात, त्यांना तू ताकीद कशी काय देतोस? सरते-शेवटी कुणीही आजारी पडू शकतो, किंवा मरू शकतो. मी पैज लावून सांगतो, त्याबद्दल आदेशांमध्ये एका शब्दानं उल्लेख नाही."

"हाः! हाः! हाः!" तुफ्ताचा साहाय्यक इतःपर तटस्थता पाळगू शकला नाही आणि खो खो हसत सुटला.

तुफ्ताच्या पेन्सिलीचे टोक तुटले. त्याने ती फरशीवर नाडकन भिरकावली. पण प्रतिटोमणा मारायला त्याला अवसर मिळाला नाही, कारण तेवढ्यात अनेक लोक हसत-बोलत त्याच्या खोलीत शिरले. ओकुनेव त्या लोकांमध्ये होता. पावेलची ओळख पटली तेव्हा तेथे बरीच धांदल उडाली आणि त्याच्यावर अगणित प्रश्नांचा भडिमार झाला. काही मिनिटां-नंतर लोकांचा आणखी एक घोळका तिथे आला. ओल्गा युरेनेवा त्यांच्यात होती. पावेलला पुन्हा पाहताच तिला आश्चर्याचा धक्का बसला आणि कमालीचा आनंद झाला. पावेलचा हात तिने खूप वेळपर्यंत स्वतःच्या हातात धरून ठेवला.

पावेलला आपली कथा पुन्हा एकवार सांगावी लागली. आपल्या सहकाऱ्यांना मनापासून झालेला आनंद, त्यांची प्रकट मैत्री आणि सहानुभूती, त्यांची प्रेमळ हस्तांदोलने आणि स्नेहाने पाठीवर मारलेल्या थापट्या — ह्या सर्व गोष्टींमुळे तुफ्ताचा पावेलला क्षणकाल विसर पडला.

पण आपली हकिकत सांगून झाल्यानंतर, तुफ्ताबरोबर घडलेले संभाषण जेव्हा त्याने आपल्या साथीदारांना सांगितले,

तेव्हा निषेधात्मक आवाज एकसुरात उमटले. तुफ्ताकडे तीव्र तिरस्काराचा कटाक्ष टाकून ओल्गा तडक चिटणीसाच्या कचेरी-कडे गेली.

"चला रे, सगळेच न्येझ्दानोवकडं जाऊ या," ओकुनेव ओरडला. "तो त्याची व्यवस्था करील." एवढे बोलून त्याने पावेलच्या खांद्यांना धरले आणि तरुण मित्रांचे ते सबंध टोळके ओल्गापाठोपाठ चिटणीसाच्या कचेरीकडे निघाले.

"त्या तुफ्ताला कामावरून काढून टाकला पाहिजे आणि निदान वर्षभर पानक्रातोवच्या हाताखाली गोदीकामगार म्हणून धक्क्यावर पाठवला पाहिजे. अगदी टणक कातडीचा नोकरशहा आहे!" ओल्गा उसळून म्हणाली.

ओकुनेव, ओल्गा आणि इतरांनी जेव्हा तुफ्ताची सुरक्षा विभागामधून हकालपट्टी करण्याची मागणी केली तेव्हा गुबेर्नियां समितीच्या चिटणीसांनी काहीशा स्मितपूर्वक चेहऱ्याने ऐकून घेतले.

ओल्गाला आश्वासन देत ते म्हणाले: "कोर्चागिनची पुन्हा नोंदणी निःसंशयपणं होईल. त्याला नवं कार्ड ताबडतोब देण्यात येईल. तुफ्ता फार उपचारानं चालणारा आहे याबाबत मी सहमत आहे. त्याचा तो मोठा दोष आहे. पण आपलं काम त्यानं चोख केलंय हे कबूल केलं पाहिजे. जिथं जिथं मी काम केलंय तिथं तिथं कम्सामोल नोंदणी खात्यात कमालीचा गोंधळ होता. एकाही आकड्यावर विसंबता येत नव्हतं. पण आपलं नोंदणी खातं चोख आहे. तुफ्ता अनेकदा रात्रीपर्यंत काम करत बसतो हे तुम्हाला स्वतःलाच माहीत आहे. मला असं वाटतं पहा: तुफ्ताला केव्हाही कामावरून काढून टाकता येईल. पण त्याच्या जागी दुसरा कुणी नोंदणी

करण्याची माहिती नसलेला अधिक मोकळा आणि ढिल्या शिस्तीचा माणूस आला तर कदाचित आपल्याकडं नोकरशाही असणार नाही, पण आपल्यात व्यवस्थितपणाही असणार नाही. त्याला आपल्या कामावर राहू दे. मी त्याची चांगली कानउघाडणी करतो. त्यामुळं तात्पुरता फायदा होईल. पुढचं आपण पाहून घेऊ."

"ठीक आहे, राहू दे त्याला आपल्या जागी," ओकुनेव कबूल झाला. "चल पावेल, सोलोमेन्काला जाऊ या. आज रात्री क्लबाची तिथं सभा आहे. तू परत आल्याचं अजून कुणाला ठाऊक नाही. 'कोर्चागिन आता बोलेल' असं आम्ही जाहीर करू तेव्हा त्यांना किती आश्चर्य वाटेल याची जरा कल्पना कर. न मरून तू मोठी बहादुरी गाजवली आहेस पावेल! तू मेलास तर कामगारवर्गाला तुझा काय उपयोग?" एवढे बोलून ओकुनेवने पावेलच्या गळ्यात गळा घातला आणि त्याला व्हरांड्याकडे घेऊन गेला.

"ओल्गा, तू येशील?"

"अर्थात."

पानक्रातोवच्या घरी जेवणासाठी कोर्चागिन परतला नाही. वस्तुतः सबंध दिवस तो तिकडे फिरकलाच नाही. सोविएत सदनातील आपल्या खोलीवर ओकुनेव त्याला घेऊन गेला. शक्य तेवढे चांगले जेवण त्याने पावेलला खाऊ घातले. नंतर वर्तमानपत्रांचा ढिगारा आणि विभागीय कम्सामोल ब्यूरो सभांच्या दप्तराच्या दोन जाडजूड फायली त्याच्यासमोर ठेवीत तो म्हणाला:

"याच्यावरून जरा नजर फिरव. विषमाबरोबर तिकडं

तू खेळत बसला होतास तेव्हा इथं बऱ्याच गोष्टी घडून गेल्यात. वाच, काय घडलं आणि काय घडतं आहे त्याची ओळख करून घे. संध्याकाळच्या सुमाराला मी परत येईन. मग आपण क्लबावर एकत्र जाऊ. तू दमलास तर एक डुलकी काढ."

सर्व प्रकारचे कागदपत्र आणि दस्तऐवज ओकुनेवने आपल्या खिशांमध्ये कोंबले (चामडी पिशवी वापरण्याचा ओकुनेवला तत्त्वतः तिटकारा होता आणि ती त्याच्या बिछान्याखाली धूळ खात पडली होती) व विभागीय समितीचा तो चिटणीस पावेलचा निरोप घेऊन बाहेर गेला.

संध्याकाळी तो परत आला तेव्हा त्याच्या खोलीभर वर्तमानपत्रे विखुरली होती व बिछान्याखालून पुस्तकांचा ढिगारा बाहेर काढलेला होता. त्यांपैकी काही पुस्तके टेबलावर रचून ठेवलेली होती. आपल्या मित्राच्या उशीखाली सापडलेली मध्यवर्ती समितीची शेवटची पत्रे वाचीत पावेल बिछान्यावर बसला होता.

"ए गुंड माणसा, माझ्या खोलीची अगदी दशा करून टाकली आहेस!" लटक्या रागाने ओकुनेव ओरडला. "अरे ए मित्रा! ते गुप्त कागदपत्र तू वाचतोस की काय! तुझ्यासारख्या नाक खुपसणाऱ्या माणसाला माझ्या गुहेत प्रवेश दिल्याबद्दल चांगलं बक्षिस मिळालं मला!"

हसत पावेलने पत्र बाजूला ठेवले.

"हे पत्र काही गुप्त नाही," तो म्हणाला. "पण दिव्याची शेड म्हणून जे पत्र तू वापरतो आहेस त्यावर मात्र 'गुप्त' असं लिहिलंय. त्याच्या चारी कडा जळल्यात बघ!"

ओकुनेवने तो जळका कागदाचा कपटा घेतला, त्याच्या

शीर्षकाकडे नजर टाकली आणि निराशेने कपाळावर हात मारला.

"गेले तीन दिवस मी हा कागद शोधतोय! कुठं गेला तेच समजेना. आत्ता मला आठवलं. वोलीन्त्सेवनं त्या दिवशी त्याची दिव्याची शेड बनवली आणि नंतर स्वतःच सगळीकडं उलथापालथ करत शोधत बसला." ओकुनेवने तो दस्तऐवज काळजीपूर्वक घडी केला आणि गादीखाली सारला. "नंतर आपण सारं व्यवस्थित ठेवू", तो आश्वासनाच्या सुरात म्हणाला. "आता काहीतरी खाऊ या आणि तडक क्लबावर जाऊ. पावेल, टेबल ओढून घे!"

एका खिशातून त्याने वर्तमानपत्रात गुंडाळलेला लांब वाळवलेला मासा काढला आणि दुसऱ्या खिशामधून पावाचे दोन तुकडे काढले. टेबलावर त्याने वर्तमानपत्र पसरले, मासा डोक्याशी धरला व त्याला नरम करण्यासाठी सफाईदारपणे टेबलाच्या कडेशी आपटला.

टेबलावर बसून मचामचा खात विनोदी स्वभावाच्या ओकुनेवने पावेलला साऱ्या बातम्या तिखटमीठ लावून सांगितल्या.

क्लबात ओकुनेवने कोर्चागिनला मागल्या दाराने रंगमंचाच्या मागील बाजूस नेले. त्या प्रशस्त हॉलच्या एका कोपऱ्यात, रंगमंचाच्या उजव्या बाजूस पियानोपाशी ताल्या लागूतिना आणि आन्ना बोरहार्त ह्या दोघी रेल्वे विभागातील कम्सामोल सदस्यांच्या गटाबरोबर बसल्या होत्या. रेल्वे यंत्रशाळांचा कम्सामोल चिटणीस वोलीन्त्सेव आन्नाच्या विरुद्ध दिशेला बसला होता. त्याचा चेहरा सफरचंदासारखा लाल टवटवीत होता, त्याच्या केसांचा आणि भुवयांचा रंग मक्याच्या पिकल्या

कणसासारखा होता. त्याचे कातडी जाकीट कमालीचे जीर्ण होते. एकेकाळी त्याचा रंग काळा असावा असे पाहणाऱ्याला वाटे.

त्याच्या शेजारी पियानोच्या झाकणावर निष्काळजीपणे हाताचे कोपर टेकवून त्स्वेतायेव बसला होता. तो दिसायला देखणा तरुण होता, त्याचे केस तपकिरी रंगाचे होते आणि अत्यंत कोरीव ओठ होते. त्याच्या सदऱ्याची गळ्याजवळची बटणे मोकळी होती.

ओकुनेव जेव्हा त्या गटापाशी आला तेव्हा त्याला आन्नाचे बोलणे ऐकू आले:

"नव्या सदस्यांच्या प्रवेशाला अडचण व्हावी यासाठी काही माणसं काय वाट्टेल ते करतात. त्स्वेतायेव अशांपैकी एक आहे."

"कम्सामोल म्हणजे काही सहलीचं मैदान नव्हे," त्स्वेतायेवने कडवटपणे प्रतिटोला हाणला.

"अय्या, निकोलायकडं जरा नजर टाका!" ओकुनेवला पाहताच ताल्या ओरडली. "आज तो अगदी चकचकीत समोवारसारखा चमकतोय!"

ओकुनेवला त्या वर्तुळात खेचण्यात आले आणि त्याच्यावर प्रश्नांचा भडिमार झाला.

"तू कुठं होतास?"

"चला, सुरू करू या."

सर्वांनी शांत व्हावे म्हणून ओकुनेवने आपला हात वर केला.

"मंडळी, जरा धीर धरा. तोकरेव येताच आपण सुरवात करू."

"ते आलेच बघा," आन्ना उद्गारली.

आणि विभागीय पक्ष समितीचे चिटणीस खरोखरीच तेथे हजर झाले. ओकुनेव त्यांना भेटायला पुढे धावला.

"डॅडी, चला माझ्याबरोबर. रंगमंचाच्या मागं माझ्या मित्राची तुमच्याशी गाठ घालून द्यायचीय. आश्चर्याचा धक्का सोसायला तयार रहा!"

"आता काय नवीन काढलंस?" सिगारेटचा झुरका मारीत म्हातारबाबा गुरकावले. पण ओकुनेवने त्यांच्या बाहीला धरून त्यांना खेचत न्यायला एव्हाना सुरुवात केली होती.

... ओकुनेवने अध्यक्षांची घंटी एवढ्या जोरजोराने वाजवली, की श्रोत्यांमधली सर्वांत जास्त गोंगाट करणारी माणसेही एकदम गप्प झाली.

तोकरेव यांच्या पाठीमागे 'कम्युनिस्ट जाहीरनामा' लिहिणाऱ्या प्रतिभावान पुरुषाचा सिंहासारखा भव्य चेहरा चौकटी-मध्ये विलसत होता. ओकुनेव सभेच्या प्रास्ताविकाचे भाषण करीत होता तेव्हा तोकरेव विंगेत उभ्या राहिलेल्या कोर्चागिनकडे एकटक पहात होते. पावेल इशाऱ्याची वाट पहात उभा होता.

ओकुनेव बोलत होता: "कॉम्रेडहो! कार्यक्रमपत्रिकेवरच्या चालू संघटनविषयक प्रश्नांना आपण हात घालण्यापूर्वी, एका कॉम्रेडनं आधी बोलायची परवानगी मागितली आहे. तोकरेव आणि मी असा ठराव मांडतो की, त्याला बोलायला परवानगी देण्यात यावी."

हॉलमध्ये संमतीदर्शक कुजबुज उमटली. तेवढ्यात ओकुनेव ताडकन म्हणाला:

"सभेपुढं बोलण्यासाठी मी पावेल कोर्चागिनला बोलावतो!"

हॉलमधील शंभरपैकी निदान ऐंशी लोकांना कोर्चागिन

माहीत होता आणि जेव्हा परिचित आकृती रंगमंचावरील दिव्यांच्या उजेडात उभी राहिली व उंच, फिकट चेहऱ्याचा तो तरुण बोलू लागला तेव्हा प्रेक्षकांमधून आनंदप्रदर्शक आरोळ्या उठल्या व टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

"प्रिय कॉम्रेडहो!"

कोर्चागिनचा आवाज स्थिर होता, पण आपल्या भावना तो लपवू शकला नाही.

"मित्रहो, तुमच्याबरोबर काम करण्यासाठी मी परतलो आहे. मी परतलो याचा मला खूप आनंद झालाय. माझे अनेक कॉम्रेड इथं मला दिसताहेत. मला असं समजलंय की, सोलोमेन्का कम्सामोलमध्ये पूर्वीपेक्षा तीस टक्के सभासद जास्त आहेत, वर्कशॉपमध्ये आणि यार्डात सिगारेट लायटर बनविण्याचा उद्योग त्यांनी बंद केलाय आणि रेल्वेच्या स्मशानभूमीतले जुने सांगाडे मोठ्या दुरुस्तीसाठी त्यांनी दुसरीकडं हलवले आहेत. त्याचा अर्थ आपला देश नव्या जीवनाला आरंभ करतोय आणि ताकद एकवटतोय. त्यामुळं आयुष्याला अर्थ आलाय! अशा वेळी मी कसा मरणार?" कोर्चागिनच्या डोळ्यांमधून आनंदप्रदर्शक स्मित उमटले होते.

टाळ्यांच्या कडकडाटात तो व्यासपीठावरून खाली उतरला व आन्ना आणि ताल्या बसल्या होत्या, त्यांच्यापाशी गेला. लोकांनी पुढे केलेल्या हातांना त्याने प्रेमभराने दाबले. मित्रांनी बाजूला सरकून त्याला वाट मोकळी करून दिली. ताल्याने पावेलच्या हातावर आपला हात ठेवून गच्च दाबला. आन्नाचे डोळे अजून आश्चर्याने विस्फारलेले होते. पावेलचे प्रेमळ नजरेने स्वागत करताना तिच्या पापण्या किंचित थरथरल्या.

दिवस भराभर उलटत होते. तरीही त्यांच्यात एकसुरीपणा अजिबात नव्हता. कारण प्रत्येक दिवस आपल्याबरोबर काहीतरी नवे आणीत होता आणि सकाळच्या वेळी पावेल आपल्या कामाची योजना करायचा तेव्हा त्याच्या लक्षात यायचे की, दिवसाचा वेळ त्याला अपुरा पडायचा व ठरविल्यापैकी बरेच काम राहून जायचे.

पावेल आता ओकुनेवबरोबर रहायला आला होता. रेल्वे वर्कशॉपमध्ये साहाय्यक इलेक्ट्रिक फिटर म्हणून तो काम करत होता.

कम्सामोलच्या नेतृत्वामधून पावेलने तात्पुरते अंग काढून घ्यायला ओकुनेवने मान्यता दिली. पण त्यापूर्वी त्याने पावेलशी खूप जोरात वाद घातला.

"वर्कशॉपमध्ये तुला स्वतःचा तळीराम शांत करण्याची हौस आलीय, पण इथं आम्हाला आधीच चांगल्या कार्यकर्त्यांची चणचण भासतेय," ओकुनेव पावेलवर उखडून म्हणाला होता. "तू आजारी आहेस अशा थापा मला मारू नको. विषमाच्या तापानंतर मीसुद्धा हातात काठी धरून महिनाभर विभागीय पक्षाच्या समितीत लटपटत चालत होतो. पावेल, तू मला फसवू शकत नाहीस. या सगळयामागं काहीतरी कारण आहे हे मला पक्कं ठाऊक आहे. चल, बोलून टाक पटदिशी," ओकुनेवने आग्रह धरला होता.

"कोल्या, तुझा अंदाज बरोबर आहे. मला अभ्यास करायचाय."

"आता कसं?" ओकुनेव उत्तेजित सुरात ओरडला. "तरी मला वाटलंच! मला अभ्यास करावासा वाटत नाही असं तुला वाटतं? याबाबतीत तू भलताच अहंपणा दाखवतोयस.

आम्ही इथं स्वतःला कामाच्या घाण्याला जुंपून घ्यायचं आणि तुम्ही महाराज निघालात शिक्षण घ्यायला! ते काही नाही. उद्यापासून संघटक म्हणून काम करायला लागा चिरंजीव!"

पण एवढे होऊनसुद्धा, बऱ्याच चर्चेनंतर ओकुनेवने पावेलपुढे हार खाल्ली.

"ठीक आहे. दोन महिन्यांपुरता मी तुला सोडतो. माझ्या ह्या उदारपणाची तू दखल घेशील अशी आशा आहे. पण त्स्वेतायेवशी तुझं पटेल असं मला वाटत नाही. तो जरा अहंकारी आहे."

पावेल वर्कशॉपमध्ये परत आल्यापासून त्स्वेतायेव एकदम सावध बनला होता. कोर्चागिनच्या आगमनामुळे नेतृत्वाच्या संघर्षाला सुरुवात होणार होती याची त्याला खात्री होती. त्याच्या आत्मप्रतिष्ठेला धक्का बसला होता आणि जोरदार प्रतिकाराची त्याने तयारी केली. पण आपली चूक झाल्याचे लौकरच त्याच्या ध्यानात आले. कम्सामोल ब्यूरोचा पावेलला सदस्य बनविण्याची योजना घाटतेय असे समजताच कोर्चागिन स्वतःच तडक कम्सामोल चिटणीसांच्या कचेरीत गेला होता आणि ओकुनेवबरोबरच्या त्याच्या समझोत्याची सबब सांगून त्याने कार्यक्रमपत्रिकेवरचा त्याच्या नेमणुकीविषयीचा प्रश्न खोडून टाकायला लावला होता. कम्सामोलच्या वर्कशॉपमधील संघटनेत पावेल राजकीय अभ्यासाचा वर्ग घेत होता, पण ब्यूरोत काम करण्याबाबत मात्र त्याने विचारणा केली नाही. पुढारीपणात अधिकृतरीत्या तो महभाग घेत नव्हता, तरी सामुदायिकाच्या कामात सर्व ठिकाणी त्याचा प्रभाव जाणवत असे. आपल्या निरलस, स्नेहपूर्ण वर्तनाने त्याने त्स्वेतायेवला अनेकवेळा अडचणी पार करण्यास मदत केली.

एके दिवशी त्स्वेतायेव वर्कशॉपमध्ये आला तेव्हा तेथील दृश्य पाहून थक्क झाला. कम्सामोल संघटनेचे तेथील सर्व सभासद आणि सुमारे तीन डझन बिगरपक्षीय मुले खिडक्या धुवून काढत होती, यंत्रांवर साचलेली अनेक वर्षांची घाण साफ करीत होती व कचऱ्याचे ढीग बाहेर यार्डात वाहून नेत होती. यंत्राच्या तेलाने आणि वंगणाने माखलेली सिमेंटची फरशी साफ करण्यात पावेल स्वत: गुंतला होता.

"वसंतामधली साफसफाई चाललीय काय? निमित्त तरी काय घडलं?" त्स्वेतायेवने पावेलला विचारले.

"ह्या सगळ्या घाणीचा आम्हाला वीट आलाय. तब्बल वीस वर्षं ही जागा साफ केलेली नाही. एका आठवड्याच्या आत आम्ही तिला नव्यासारखी चकचकीत बनवू," कोर्चागिनने थोडक्यात उत्तर दिले.

त्स्वेतायेवने खांदे उडवले आणि तो निघून गेला.

इलेक्ट्रिशियनांचे केवळ स्वत:चे वर्कशॉप साफ करून समाधान झाले नाही. त्यांनी कारखान्याच्या आवाराच्या सफाईला हात घातला. सर्व प्रकारच्या कुचकामी सामग्रीला फेकून देण्यासाठी त्या प्रचंड आवाराचा गेली कित्येक वर्षे वापर करण्यात येत होता. तेथे आगगाडीच्या डब्यांची शेकडो चाके पडली होती, दांडे पडले होते; गंजलेल्या लोखंडाचे, रूळांचे, बफर्सचे, दांड्यांच्या पेट्यांचे, डोंगर पडले होते. हजारो टन धातू उघड्यावर गंजत पडला होता. पण कारखान्याच्या व्यवस्थापकीय विभागाने तरुणांच्या सफाई कामाला मनाई घातली.

"आपल्याला यापेक्षा जास्त महत्त्वाची कामे करायची आहेत. आवार सफाई नंतर करता येईल," असे त्यांना सांगण्यात आले.

तेव्हा इलेक्ट्रिशियननांनी आपल्या वर्कशॉपच्या प्रवेशद्वाराबाहेरचा अंगणाचा पट्टा तेवढा साफ केला आणि जाळीदार पायपोस दाराशी ठेवला. बाहेरची सफाई त्यांनी एवढ्यावरच थांबवली, पण आतील सफाई ते कामाची वेळ संपल्यानंतर करू लागले. प्रमुख इंजिनियर स्त्रीझ एक आठवड्यानंतर जेव्हा वर्कशॉपमध्ये आले तेव्हा तेथे सारे काही चकचकीत होते. लोखंडी सळ्या लावलेल्या भल्यामोठ्या खिडक्यांवरील धुळीचे आणि तेलाचे जाडजूड थर साफ केल्यानंतर आता सूर्यप्रकाश सरळ आतपर्यंत पोहचत होता आणि डिझेल इंजिनांवरच्या चकचकीत पॉलिश केलेल्या तांब्याच्या पट्ट्यांवरून परावर्तित होत होता. यंत्रांच्या अवजड भागांवर हिरव्या रंगाचे ताजे पट्टे चमकत होते. कुणीतरी चाकांच्या काड्यांवर पिवळे बाणही रंगविले होते.

"अरे वा..." स्त्रीझ चकित होऊन उद्‌गारले.

यंत्रशाळेच्या दूरच्या एका कोपऱ्यात काही माणसे आपले काम संपविण्याच्या बेतात होती. स्त्रीझ त्यांच्या दिशेने निघाले. वाटेत त्यांना कोर्चागिन भेटला. त्याच्या हातात रंगाचा डबा होता.

"अरे मित्रा, जरा थांब," इंजिनियरसाहेबांनी त्याला थोपवले. "तुम्ही इथं जे काही केलंय ते मला एकदम आवडलंय! पण हा रंग तुम्ही कुठून मिळवलात? माझ्या परवानगीवाचून कुठलाही रंग वापरायचा नाही अशी मी कडक ताकीद दिली होती ना? अशा कामासाठी रंग वापरणं आपल्याला परवडत नाही. आपल्यापाशी असलेला सारा रंग इंजिनांच्या सुट्या भागांसाठी आवश्यक आहे."

"फेकून दिलेल्या रंगांच्या डब्यांचे तळ खरवडून आम्ही

ह्रा रंग मिळवलाय. त्यासाठी आम्ही दोन दिवस खपलो, पण जवळ जवळ पंचवीस पौंड रंग खरवडून काढला. कॉम्रेड इंजिनियर, आम्ही इथला कुठलाही कायदा मोडत नाही."

इंजिनियर पुन्हा एकदा गुरकावले, पण त्यांचा चेहरा एकदम नरमला होता.

"नसं असेल तर माझं काही म्हणणं नाही. ते जाऊ दे. मग मला सांगा... वर्कशॉप आपण होऊन साफ करण्याची बुद्धी तुम्हाला कशी झाली? मला वाटतं, हे सारं तुम्ही कामाची वेळ संपल्यानंतर केलंत ना?"

इंजिनियर खरोखरीच बुचकळ्यात पडले होते असे कोर्चागिनला त्यांच्या बोलण्यातील सुरावरून जाणवले.

"अर्थात, कामाची वेळ संपल्यानंतर आम्ही सफाईचं काम केलं! तुम्हाला काय वाटलं?" कोर्चागिन म्हणाला.

"हो, पण..."

"कॉम्रेड स्त्रीझ, यात आश्चर्य वाटून घेण्यासारखं काही नाही. बोल्शेविक फक्त घाण मागं ठेवून जाणार असं तुम्हाला कुणी सांगितलं? जरा हे सारं सुरळीत होईपर्यंत थांबा. मग तुम्हाला आणखी आश्चर्याचे धक्के बसतील!"

एवढे बोलून, इंजिनियरसाहेबांच्या अंगावर रंगाचा ठिपका उडणार नाही अशा बेताने त्यांना वळसा घालून कोर्चागिन पुढे गेला.

दररोज संध्याकाळी खूप उशिरापर्यंत पावेल सार्वजनिक वाचनालयात घुटमळताना आढळायचा. तेथील तीनही ग्रंथपालांबरोबर त्याने मैत्री जमवली होती आणि आपल्या लाघवी स्वभावाने त्यांना आपलेसे करून तेथील पुस्तकांचा मनमुराद वापर करण्याची सवलत त्याने मिळवली होती. पुस्तकांच्या

उंच उंच कपाटांना शिडी लावून तो तासन् तास ग्रंथांमध्ये डोके खुपसून बसायचा. बहुतेक पुस्तके जुनी होती. एका छोटया कपाटात आधुनिक साहित्य सामावले होते. त्यात काही यादवी युद्धकालीन पुस्तिका, मार्क्स यांचे 'भांडवल', जॅक लंडन यांचे 'लोखंडी टाच' आणि इतर काही पुस्तके होती. जुनी पुस्तके चाळताना त्याला 'स्पार्ताकस' आढळले. दोन रात्रींमध्ये त्याने ते वाचून संपवले आणि नंतर माक्सिम गोर्की यांच्या पुस्तकांशेजारी ते कपाटात ठेवून दिले. आधुनिक क्रांतिकारक संदेश देणाऱ्या अधिक रंजक पुस्तकांची निवड करण्याचा त्याचा हा धीमा उद्योग काही काळपर्यंत चालू होता.

ग्रंथपालांनी त्याच्या ह्या उद्योगाला आक्षेप घेतला नाही.

रेल्वे वर्कशॉपमधील कम्सामोलच्या नेहमीच्या कामात अचानक विघ्न आले होते. आरंभी तो प्रसंग अगदी किरकोळ वाटला होता. ढिल्या अंगाचा, नकटया नाकाचा आणि देवीच्या वणांनी चेहरा भरलेला दुरुस्ती कामगार कोस्त्या फिदिन हा कम्सामोल संघटनेच्या ब्यूरोचा सदस्य होता. एके दिवशी त्याच्या हातून लोखंडाच्या एका तुकडयावर भारी किंमतीचे परदेशी बनावटीचे ड्रिल मोडले. त्याच्या निष्काळजी-पणापायी हा अपघात घडला होता. त्यात वाईट म्हणजे फिदिनने तो अपघात मुद्दाम केला असे वरकरणी भासत होते. सकाळी ही घटना घडली. वरिष्ठ दुरुस्ती फोरमन होदारोव यांनी लोखंडाच्या एका लादीवर अनेक भोके पाडण्याचे काम कोस्त्यावर सोपवले होते. कोस्त्याने प्रथम ते काम करायला नकार दिला होता. पण फोरमनने त्याच्यावर ते काम

जबरदस्तीने लादले. तेव्हा कोस्त्याने ड्रिल मशिन घेऊन भोके पाडायला सुरुवात केली. कडक शिस्तीने काम करवून घेण्याची सवय असलेला हा फोरमन कामगारांमध्ये फारसा प्रिय नव्हता. तो पूर्वीचा मेन्शेविक होता. कारखान्याच्या सामाजिक कार्यात तो मुळीच भाग घेत नसे आणि कम्युनिस्ट युवक संघटनेचे लोक त्याला आवडत नसत. पण आपल्या कामात मात्र तो वाकबगार होता आणि अत्यंत मन लावून तो आपले काम पार पाडत असे. कोणतेही तेल न वापरता "सुक्या" पद्धतीने कोस्त्या भोके पाडण्याचे काम करीत होता असे होदोरोव यांच्या ध्यानात आले. घाईघाईने ते यंत्रापाशी गेले आणि त्यांनी ते थांबवले.

"काय आंधळा आहेस का? ड्रिल कसं वापरायचं याची अक्कल नाही तुला?" अशा पद्धतीने ड्रिल यंत्र फार काळ टिकणार नाही ह्या जाणीवेने ते कोस्त्यावर खेकसले.

कोस्त्या तेवढ्याच जोराने त्यांच्यावर ओरडला आणि त्याने पुन्हा लेथ चालू केला. तेव्हा खात्याच्या प्रमुखांकडे तक्रार नोंदवायला होदोरोव गेले. दरम्यान, खाते-प्रमुख येईपर्यंत सारे काही ठीक दिसावे या उद्देशाने यंत्र तसेच चालू ठेवून कोस्त्या तेलाचा डबा आणायला पळाला. तेल घेऊन तो परत येईपर्यंत ड्रिल यंत्र मोडले होते. फिदिन याला कामावरून काढून टाकण्यात यावे असा शेरा मारून खाते-प्रमुखांनी अहवाल सादर केला. पण कम्सामोलच्या ब्यूरोच्या सदस्यांनी फिदिनची बाजू घेतली आणि सर्व क्रियाशील कम्सामोल सदस्यांविरुद्ध होदोरोव यांना राग असल्यामुळे त्यांनी फिदिनवर हे बालंट आणले असा दावा केला. फिदिनला बडतर्फ करावे असा व्यवस्थापकीय विभागाने आग्रह धरला.

यंत्रशाळांच्या कम्सामोल ब्यूरोपुढे ही केस मांडण्यात आली. संघर्ष पेटला.

कोस्त्याला अधिकृतरीत्या ताकीद द्यावी आणि दुसऱ्या कामावर त्याची बदली करावी, असे ब्यूरोच्या पाचापैकी तीन सदस्यांचे मत होते. त्स्वेतायेव हा त्या तीनापैकी एक होता. फिदिनला अजिबात शासन करू नये असे उरलेल्या दोघांचे मत होते.

ह्या केसची चर्चा करण्यासाठी ब्यूरोची बैठक त्स्वेतायेवच्या कचेरीत भरविण्यात आली. तांबड्या कपड्याचे आच्छादन घातलेल्या एका मोठ्या टेबलाभोवती अनेक बाकडी आणि स्टुले ठेवलेली होती. हे फर्निचर सुतार खात्यामधल्या कम्सामोल सदस्यांनी बनविले होते. भिंतींवर पुढाऱ्यांची चित्रे होती आणि टेबलामागील सबंध भिंतीवर रेल्वे वर्कशॉपची पताका झळकत होती.

त्स्वेतायेव आता कम्सामोलचा "पूर्ण वेळेचा" कार्यकर्ता बनला होता. व्यवसायाने तो लोहार होता, पण चांगला संयोजक असल्यामुळे चार महिन्यात कम्सामोलमध्ये त्याला वरचे पद देण्यात आले होते. आता तो कम्सामोलच्या विभागीय समितीच्या ब्यूरोचा सभासद होता आणि त्याशिवाय गुबेर्निया समितीचा सदस्य होता. रेल्वे वर्कशॉपमध्ये तो नवखा होता. अगदी आरंभापासून व्यवस्थापनाची सूत्रे त्याने खंबीरपणे हाती घेतली होती. त्याला स्वतःबद्दल कमालीची खात्री वाटे आणि निर्णय घेण्याबाबत तो खूप घाई करी. त्यामुळे इतर कम्सामोल सभासदांचा पुढाकार त्याने सुरुवातीपासूनच दडपून टाकला होता. प्रत्येक गोष्ट स्वतःच करण्याबाबत त्याचा आग्रह होता. अगदी स्वतःची कचेरी सजविण्याचे कामही त्याने

वैयक्तिक देखरेखीखाली करवून घेतले होते. आणि जेव्हा सर्व कामे उरकणे त्याला अशक्य ठरे तेव्हा आपल्या मदतनीसांवर तो निष्क्रीयतेचा ठपका ठेवी.

आत्ता या घटकेला त्याने बैठक भरविली होती त्या खोलीत क्लबामधून आणलेल्या एकमेव मऊ आरामखुर्चीत तो पहुडला होता. ती गुप्त बैठक होती. पक्ष-संयोजक खोमुतोवने बोलण्याची परवानगी मागितली तेवढ्यात कुलूप लावलेल्या दारावर टकटक वाजले. ह्या अडथळ्यामुळे त्स्वेतायेवच्या कपाळाला आठ्या पडल्या. टकटक आवाज पुन्हा झाला. कात्या झेलेनोवाने उठून दार उघडले. बाहेर उंबरठ्याशी कोर्चागिन उभा होता. कात्याने त्याला आत येऊ दिले.

एका रिकाम्या आसनावर बसण्यासाठी पावेल त्या दिशेने जाऊ लागला तोच त्स्वेतायेव त्याला उद्देशून म्हणाला:

"कोर्चागिन, ही ब्यूरोची गुप्त बैठक आहे."

पावेलची कानशिले गरम झाली. मंदपणे तो टेबलाच्या दिशेने वळला.

"ते मला माहीत आहे. फिदिनच्या बाबतीत तुझं मत ऐकून घेण्याची माझी इच्छा आहे. त्या संबंधात मला एक मुद्दा मांडायचा आहे. माझ्या उपस्थितीला तुझी हरकत आहे काय?"

"माझी काही हरकत नाही, पण गुप्त बैठकीला फक्त ब्यूरोच्या सभासदांनीच हजर रहायचं असतं हे तुला माहीत असलं पाहिजे. माणसं जेवढी जास्त तेवढा प्रश्नांचा योग्य रीतीनं निकाल लावणं अवघड जातं. आता आलाच आहेस तर थांब."

अशा प्रकारचा अपमान कोर्चागिनने यापूर्वी कधी सहन केला नव्हता. त्याच्या कपाळाला आठी पडली.

"काय हा औपचारिकपणा चाललाय?" नाराजीने खोमुतोव उद्गारला. पण तेवढ्यात कोर्चागिनने त्याला नजरेने दटावले आणि तो खाली बसला. खोमुतोवने आपले बोलणे पुढे चालू केले: "तर मला म्हणायचं आहे की, होदोरोव हे जुन्या पठडीतले आहेत हे खरं असलं तरी शिस्तीबाबत काही तरी केलंच पाहिजे. जर सगळे कम्सामोल सभासद ड्रिल यंत्रं मोडून ठेवू लागले तर काम करायचं कशानं? शिवाय असं वागून बिगरपक्षीय कामगारांसमोर आपण वाईट उदाहरण ठेवतोय. माझ्या मतं फिदिनला गंभीर ताकीद दिली पाहिजे."

त्स्वेतायेवने खोमुतोवला बोलणे पुरे करण्याची संधीच दिली नाही. आपले आक्षेप त्याने मांडायला आरंभ केला. दहा मिनिटे सरली. दरम्यान, वारा कोणत्या दिशेने वाहतोय याचा कोर्चागिनला अंदाज आला. जेव्हा प्रश्न मताला टाकण्यात आला तेव्हा त्याने बोलण्याची परवानगी मागितली. त्स्वेतायेवने नाखुषीने कोर्चागिनला बोलायची परवानगी दिली.

"कॉम्रेडहो, फिदिनच्या प्रकरणाबाबत मला माझं मत मांडायची इच्छा आहे," पावेलने बोलायला आरंभ केला. त्याच्या नकळत त्याचा आवाज कठोर बनला होता.

"फिदिन प्रकरण हा एक इशारा आहे आणि कोस्त्याचं वागणं त्यात तितकंसं महत्त्वाचं नाही. काल मी काही आकडेवारी गोळा केलीय." पावेलने खिशातून छोटी टिपणवही काढली. "टाईमकीपरकडून ही आकडेवारी मला मिळाली. आता लक्षपूर्वक ऐका: आपल्या कम्सामोलांपैकी तेवीस टक्के सभासद दररोज पाच ते पंधरा मिनिटं उशीरा कामावर येतात. ही नेहमीची बाब झालीय. सतरा टक्के सभासद दर महिन्यात एक किंवा दोन दिवस अजिबात कामावर येत नाहीत. बिगर-

पक्षीय तरुण कामगारांच्या अनुपस्थितीचं प्रमाण चौदा टक्के आहे. कॉम्रेडहो, हे आकडे चाबकाच्या फटकाऱ्यापेक्षा जास्त वेदना देणारे आहेत. मी आणखी काही आकडे टिपून घेतलेत: आपल्या पक्षाचे चार टक्के सभासद महिन्यातून एक दिवस गैरहजर राहतात आणि चार टक्के उशीरा कामावर येतात. बिगरपक्षीय कामगारांपैकी अकरा टक्के महिन्यातला कामाचा एक दिवस चुकवतात, तर तेरा टक्के नियमितपणं उशीरा कामावर येतात. यंत्रांची नव्वद टक्के मोडतोड तरुण कामगारांकडून होते, त्यात सात टक्के नवखे कामगार असतात. ह्या आकड्यांवरून असा निष्कर्ष निघतो की, पक्षाच्या सदस्यांपेक्षा आणि प्रौढ कामगारांपेक्षा आम्हा कम्सामोलांची कामगिरी अत्यंत वाईट आहे. पण परिस्थिती सगळीकडंच काही एकसारखी नाही. फौंड्री खातं उत्तम आहे, इलेक्ट्रिशियन काही वाईट नाहीत, मात्र बाकीचे थोड्याफार फरकानं सारख्याच पातळीचे आहेत. माझ्या मतानं कॉम्रेड खोमुतोव शिस्तीबाबत जे काही म्हणाला, त्याच्या कितीतरी पटींनी जास्त त्यानं बोलायला पाहिजे होतं. ही वाकडी वळणं सरळ करणं ही तातडीची समस्या आहे. इथं चळवळ सुरू करण्याचा माझा इरादा नाही, पण निष्काळजीपणाला आणि ढिलेपणाला आपण पायबंद घातलाच पाहिजे. जुने कामगार प्रांजलपणानं कबूल करतात की, त्यांच्या मालकासाठी, भांडवलदारासाठी, ते जास्त चांगलं काम करायचे. पण आता आपणच मालक आहोत आणि वाईट काम करायला कोणतीही सबब नाही. कोस्त्याला किंवा दुसऱ्या एखाद्या कामगारावर सगळा ठपका ठेवण्यात अर्थ नाही. आपल्याच सर्वांचा दोष आहे, कारण वाईटाविरुद्ध संघर्ष करण्याऐवजी काहीवेळा आपणच या ना

त्या सबबीखाली कोस्त्यासारख्या कामगारांचा कैवार घेत बसतो.

"सामोखिन आणि बुतिल्याक आत्ताच म्हणाले की, फिदिन फार चांगला पोरगा आहे, उत्तमांपैकी एक आहे, कम्सामोलचा क्रियाशील सभासद आहे, वगैरे वगैरे. त्यानं एक ड्रिल मोडलं म्हणून काय झालं? कुणाच्याही हातून ही चूक घडू शकली असती! तो आपल्यापैकी एक आहे पण फोरमन नाही... पण होदोरोव यांच्याशी बोलण्याचा कुणी कधी प्रयत्न केलाय? त्यांच्यापाशी तीस वर्षांचा कामाचा अनुभव आहे हे विसरू नका. आपण त्यांच्या राजकारणाची चर्चा इथं करायला नको. पण ह्या प्रकरणात त्यांची बाजू योग्य आहे, कारण त्यांच्यासारखा बाहेरचा माणूस सरकारी मालमत्तेची काळजी वाहतोय आणि आपण बहुमोल हत्यारांची नासधूस करतोय. या परिस्थितीला तुम्ही काय म्हणाल? मला वाटतं की, आपणच आता पहिला प्रहार केला पाहिजे आणि ह्या क्षेत्रात आक्रमक धोरण स्वीकारलं पाहिजे.

"मी असा ठराव मांडतो की, कामात निष्काळजीपणा दाखवल्याबद्दल आणि उत्पादनात व्यत्यय आणल्याबद्दल फिदिनला कम्सामोलमधून काढून टाकावं. भित्तीपत्रकात त्याच्या प्रकरणाची चर्चा व्हावी आणि परिणामांची भीती न बाळगता ही आकडेवारी संपादकीयामधून उघडपणे प्रसिद्ध करण्यात यावी. आपण बळकट आहोत. विसंबण्यासारख्या शक्ती आपल्यापाशी आहेत. बहुसंख्य कम्सामोल सभासद चांगले कामगार आहेत. त्यांच्यापैकी साठजण बोयारकाच्या कामगिरीत होते आणि ती त्यांची कडवी कसोटी होती. त्यांच्या मदतीनं आणि साहाय्यानं आपण अडचणींवर मात करू शकू.

त्यासाठी आपण एकदाच ठामपणं एकूण सर्व बाबतीत आपला दृष्टिकोन बदलला पाहिजे."

नेहमी शांत आणि गप्प असणारा कोर्चागिन एवढा आवेशाने बोललेला पाहून त्स्वेतायेव चकित झाला. खऱ्या पावेलचे दर्शन त्याला प्रथमच घडत होते. पावेलचे म्हणणे बरोबर होते याची त्याला जाणीव झाली होती, पण त्याच्याशी उघडपणे सहमत व्हायची त्याची मनाची तयारी होत नव्हती. कोर्चागिनचे भाषण म्हणजे संघटनाच्या एकूण परिस्थितीवरील कठोर टीका होती, त्याच्या – म्हणजे त्स्वेतायेवच्या – अधिकाराला सुरुंग लावण्याचा प्रयत्न होता, अशी त्याने भूमिका घेतली व आपल्या प्रतिस्पर्ध्यावर मात करण्याचा त्याने निर्धार केला. मेन्शेविक होदोरोव यांचे समर्थन करण्याचा कोर्चागिनने प्रयत्न केला, असा आरोप करून त्स्वेतायेवने आपले भाषण सुरू केले.

तीन तास खडाजंगी वादविवाद झडला. त्या रात्री बऱ्याच उशिरा अंतिम टोक गाठले गेले. वस्तुस्थितीचा कठोर तर्क-शक्तीकडून पराभव झाल्यामुळे आणि कोर्चागिनला बहुमत लाभल्यामुळे, त्स्वेतायेवने चुकीचे पाऊल टाकले. ठराव अंतिम मताला टाकण्यापूर्वी त्याने कोर्चागिनला खोली सोडून जाण्याचा हुकूम केला व लोकशाही नियमाचा भंग केला.

"ठीक आहे त्स्वेतायेव, मी जातो. तुझं हे वागणं तुला हिताचं ठरणार नाही. पण तू तुझं मत लादण्याचा असाच आग्रह धरलास तर उद्याच्या सार्वत्रिक सभेत ही बाब मी मांडीन असा तुला इशारा देतो. आणि तिथं तुला बहुमत मिळणार नाही अशी माझी खात्री आहे. त्स्वेतायेव, तुझं वागणं योग्य नाही. कॉम्रेड खोमुतोव, सार्वत्रिक सभेपूर्वी

ही बाब पक्षाच्या गटापुढं मांडणं हे तुझं कर्तव्य आहे असं मला वाटतं."

"मला घाबरवण्याचा प्रयत्न करू नकोस," त्स्वेतायेव प्रतिकाराच्या भावनेने ओरडला. "मी स्वतःच पक्षाच्या गटाकडं जाईन. एवढंच नाही तर तुझ्याबद्दल मला त्यांना काही सांगायचंय."

पावेलने आपल्यामागे धाडकन दरवाजा लावून घेतला. आपल्या तापलेल्या कपाळावरून त्याने एकदा हात फिरवला व रिकाम्या कचेरीमधून तो बाहेर पडला. बाहेर रस्त्यावर आल्यानंतर त्याने एक दीर्घ श्वास घेतला, सिगारेट पेटवली व बातीयेव टेकडीवरच्या तोकरेव यांच्या छोटया घराच्या दिशेने तो निघाला.

म्हातारे मेकॅनिक तोकरेव रात्रीच्या जेवणाला बसलेले त्याला आढळले.

पावेलला टेबलाशी बसायला लावून तोकरेव म्हणाले: "चला, तुझ्याकडून बातम्या ऐकू या." आपल्या बायकोला उद्देशून ते म्हणाले: "दार्या, या पोराला थाळीत खीर आण बघू!"

दार्या फोमीनीश्ना ही तोकरेव यांची बायको चांगली उंच आणि धिप्पाड होती. याउलट तोकरेव हे बुटके आणि अंगाने किरकोळ होते. तिने पावेलसमोर खिरीची थाळी ठेवली व आपल्या पांढऱ्या झग्याच्या कोपराने ओलसर तोंड पुशीत प्रेमळ-पणे त्याला म्हणाली: "खा रे माझ्या सोन्या!"

तोकरेव जेव्हा वर्कशॉपमध्ये पूर्वी काम करीत होते तेव्हा पावेल त्यांच्याकडे वारंवार पाहुणा असायचा आणि ह्या वयोवृद्ध जोडप्याबरोबर त्याने अनेक चांगल्या संध्याकाळी घालविल्या

होत्या. पण तो शहरात परत आल्यानंतर मात्र त्यांच्या घराला त्याची ही पहिलीच भेट होती.

चमच्याने भराभर खीर खाताना म्हातारे मेकॅनिकबाबा पावेलची कथा अत्यंत लक्षपूर्वक ऐकत होते. अधूनमधून हुंकारण्यापलिकडे दुसरे कसलेही भाष्य करीत नव्हते. खीर संपल्यावर त्यांनी रुमालाने मिशी पुसली व घसा साफ करीत म्हटले :

"अर्थात तुझं बरोबर आहे. हा प्रश्न योग्य रीतीनं मांडायची वेळ आली आहे. विभागात दुसरीकडं कुठंही नाहीत तेवढे वर्कशॉपमध्ये कम्सामोल जास्त आहेत. तिथूनच आपल्याला सुरुवात केली पाहिजे. अच्छा, म्हणजे तुझी आणि त्स्वेतायेवची अखेरीस जुंपली तर? फार वाईट झालं. तो थोडा उद्धट आहे. तू पोरांशी जमवून घ्यायचास, होय की नाही? बरं, सध्या वर्कशॉपमध्ये तू काम काय करतोस?"

"मी एका विभागात काम करतो. आणि सर्वसाधारण जे काही काम चालू असतं त्यात मी असतो. माझ्या गटात मी राजकीय अभ्यास मंडळ चालवतो."

"ब्यूरोचं काय?"

कोर्चागिन घुटमळला.

"अजून माझी प्रकृती तितकी ठीक नाही आणि मला थोडा अभ्यास करायचा होता, म्हणून तोपर्यंत पुढारीपणात अधिकृतपणं भाग घ्यायचा नाही असं मी ठरवलं होतं."

"अशी भानगड आहे काय!" नाराजीच्या सुरात तोकरेव गरजले. "पोरा, तुझी प्रकृती चांगली नाही म्हणून! नाहीतर तुझी चांगली खरडपट्टी काढली असती. बरं, आता कसं वाटतंय? पूर्वीपेक्षा शक्ती आलीय?"

"होय."

"छान. आता कसून कामाला लाग. उगीच थातुरमातुर करणं बंद! असं कुंपणावर बसून काहीही चांगलं निष्पन्न व्हायचं नाही. तू निव्वळ जबाबदारी टाळू पाहतो आहेस आणि याची तुला चांगली कल्पना आहे. उद्या तू सर्व काही वळणावर आणलं पाहिजे. ओकुनेवला याबाबत मी बोलीन." तोकरेव यांच्या आवाजातून त्यांचा संताप स्पष्ट जाणवत होता.

"नाही, त्याला काही बोलू नका," पावेल घाईघाईने म्हणाला. "मला काही काम देऊ नको म्हणून मीच त्याला सांगितलं होतं."

तोकरेवनी चिडून म्हटले: "अस्सं? तू त्याला सांगितलं आणि त्यानं तुला मोकळं सोडलं काय? छे: छे:, तुम्हा कम्सा-मोलांना काय करावं तेच समजत नाही... पोरा, पूर्वी मला वर्तमानपत्र वाचून दाखवायचास तसं आज वाचून दाखवशील? माझे डोळे चांगले राहिले नाही आताशा!"

वर्कशॉपमधील पक्षाच्या ब्यूरोने कम्सामोलच्या ब्यूरोमधील बहुसंख्यांचा निर्णय उचलून धरला. कामाच्या शिस्तीचे उदाहरण घालून देण्याच्या महत्त्वाच्या आणि अवघड कार्याला पक्षाच्या आणि कम्सामोलच्या गटांनी सुरुवात केली. त्स्वेतायेवची ब्यूरोमध्ये चांगलीच कानउघाडणी करण्यात आली. त्याने सुरुवातीला प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, पण क्षयी चेहऱ्याचे वडीलधारे चिटणीस लोपाखिन यांनी त्याला तात्काळ गप्प बसवले. अखेरीस त्स्वेतायेवने हार घेतली व अंशत: आपली चूक क़बूल केली.

दुसऱ्याच दिवशी भित्तीपत्रकामध्ये अनेक लेख प्रसिद्ध झाले आणि त्यांच्यामुळे रेल्वे वर्कशॉपमध्ये काहीशी खळबळ माजली. लेखांचे मोठ्यांदा वाचन झाले व त्यांच्यावर जोरदार चर्चा झडल्या. त्याच संध्याकाळी युवकांची सभा भरली. कधी नव्हती एवढी प्रचंड गर्दी सभेला जमली होती. भित्तीपत्रका-मधील लेखांमधून निर्माण केलेल्या प्रश्नांचाच त्या सभेत परामर्श घेण्यात आला.

फिदिनला कम्सामोलमधून हाकलण्यात आले व राजकीय शिक्षणप्रमुख म्हणून एका नव्या सदस्याची – कोर्चागिनची – ब्युरोवर नेमणूक करण्यात आली.

ह्या नव्या टप्प्यात रेल्वे यंत्रशाळांसमोर कोणती कार्ये आहेत त्यांची रूपरेषा न्येझ्दानोव जेव्हा समजावून सांगत होते तेव्हा सुई पडली तरी आवाज होईल अशी विलक्षण शांतता सभेत नांदत होती.

सभेनंतर कोर्चागिन आपली वाट पहात बाहेर उभा असलेला त्स्वेतायेवला आढळून आले.

"मला तुला काही सांगायचंय," पावेल त्याला म्हणाला.

"कशाबद्दल?" कडवटपणे त्स्वेतायेवने विचारले.

पावेलने त्याच्या दंडाला धरले व काही यार्ड अंतर तेथून दूर गेल्यावर एका बाकड्यापाशी ते थांबले.

"आपण थोडा वेळ बसू या का?" त्याने सुचवले व तो स्वतः बाकावर बसला.

त्स्वेतायेवच्या सिगारेटचे जळते टोक प्रकाशत होते व मंद होत होते.

"त्स्वेतायेव, माझ्याविरुद्ध तुझा कसला राग आहे?"

काही मिनिटे स्तब्धता पसरली.

"अच्छा, म्हणजे याबाबत तुला बोलायचंय? मला वाटलं तू काहीतरी कामासंबंधी सांगणार," खोटे आश्चर्य दाखवीत त्स्वेतायेव म्हणाला. पण त्याचा आवाज कापरा होता.

पावेलने आपला हात भक्कमपणे त्स्वेतायेवच्या गुडघ्यावर ठेवला.

"दीम्का, थोडा जमिनीवरून चालायला शीक. तशी भाषा फक्त मुत्सद्द्यांना शोभते. मला एक सांग, माझ्याविषयी एवढा आकस का धरलास?"

त्स्वेतायेवने बसल्या जागी चुळबूळ केली.

"काय बोलतोस काय तू? तुझ्याविरुद्ध मी कशाला आकस धरीन? मी तुला काम देऊ केलं, होय की नाही? तू नाकारलंस आणि आता तू आरोप करतोस की, मी तुला बाहेर ठेवायचा प्रयत्न करतोय म्हणून!"

पण त्याच्या शब्दांमधून ठामपणा व्यक्त होत नव्हता. पावेलचा हात अजूनही त्स्वेतायेवच्या गुडघ्यावर होता. भाववश होऊन तो म्हणाला :

"तू सांगणार नसलास तर मी सांगतो. तुला वाटलं की, तुझ्या कामाच्या पद्धतीला मला मोडता घालायचा होता, तुला वाटलं मी तुझं काम काढून घेण्याच्या मागं होतो. तसं तुला वाटलं नसतं तर कोस्त्या प्रकरणी आपलं भांडण झालं नसतं. असे संबंध आपल्या कार्याचा नाश करतील. ही बाब फक्त आपल्या दोघांपुरती असती तर काही हरकत नव्हती. तुला माझ्याविषयी काय वाटतं याची मी पर्वा केली नसती. पण उद्यापासून आपण एकत्र काम करणार आहोत. अशा रीतीनं वागून आपण कसं चालेल? आता ऐक. आपल्यात मतभेद असून चालणार नाही. आपण दोघेही कामगार आहोत.

आपलं कार्य हे इतर कशाहूनही तुला जास्त प्रिय असेल तर माझ्याशी हात मिळव आणि उद्यापासून मित्र म्हणून आपण कामाला सुरुवात करू. पण जोपर्यंत तू हा सर्व मूर्खपणा स्वतःच्या डोक्यातून काढून टाकत नाहीस आणि कट-कारवाया करण्याचं थांबवत नाहीस, तोपर्यंत कामात निर्माण होणाऱ्या प्रत्येक अडथळ्यावर तुझी-माझी जबरदस्त खडाजंगी माजेल. अजून मी मैत्रीच्या नात्यानं माझा हात पुढं करतोय तोवर त्याला आपल्या हाती घे."

त्स्वेतायेवची खरबरीत बोटे पावेलच्या पंजाभोवती घट्ट बसली तेव्हा पावेलला कमालीचे समाधान वाटले.

एक आठवडा लोटला. पक्षाच्या विभागीय समितीमधील कामाचा दिवस संपत आला होता. कचेऱ्यांमध्ये शांतता पसरली होती. पण तोकरेव अजून टेबलाशी होते. आपल्या आरामखुर्चीत बसून ताजे अहवाल ते अभ्यासत होते. तेवढ्यात दारावर टकटक आली.

"आत या!"

कोर्चागिन आत आला व त्याने चिटणीसांच्या टेबलावर दोन भरलेल्या प्रश्नपत्रिकांचे कागद ठेवले.

"हे काय?"

"बाबा, हा बेजबाबदारपणाला रामराम. मला वाटतं, वेळ भरलीय. जर तुझंही तसंच मत असेल, तर मला पाठबळ दे."

तोकरेवनी त्या कागदांच्या मथळ्याकडे एकदा नजर टाकली, नंतर कोर्चागिनकडे काही क्षण टक लावून पाहिले व हाती पेन उचलले. "पावेल आंद्रेयेविच कोर्चागिन याला

रशियन कम्युनिस्ट पक्षाचे (बोल्शेविक) सदस्यत्व देण्याच्या कॉम्रेडांच्या शिफारशीला पक्ष अनुमती देत आहे" ह्या मजकुरापुढे तोकरेवनी ठसठशीतपणे "१९०३" लिहिले व आपली सही केली.

"शाब्बास पोरा. माझ्या पिकल्या केसांना तू कधीही काळोखी फासणार नाहीस याची खात्री होती मला," तोकरेव म्हणाले.

खोलीत उष्म्याने घुसमटत होते. प्रत्येकाच्या मनात एकच विचार प्रामुख्याने घोळत होता: शक्य तेवढ्या लौकर सोलोमेन्काच्या चेस्नट झाडांच्या सावलीत गारव्यासाठी धाव घ्यायची!

"पावेल, आटप लौकर, मला आता एक मिनिटही इथं सहन होत नाही," दरदरून घामेजलेल्या त्स्वेतायेवने काकुळतीच्या सुरात म्हटले. कात्युशाने आणि इतरांनी त्याला पाठिंबा दिला.

पावेल कोर्चागिनने पुस्तक मिटले आणि अभ्यास मंडळ पांगले.

ते उठले न उठले तोच भिंतीवरचा जुन्या घाटणीचा एरिकसन टेलिफोन खणखणला. खोलीत आवाजांचा एवढा गोंगाट होता की टेलिफोनवर उत्तर देणाऱ्या त्स्वेतायेवला तारस्वरात ओरडावे लागत होते.

रिसीव्हर जागेवर ठेवीत कोर्चागिनकडे वळून तो म्हणाला: "स्टेशनावर पोलिश वकिलातीचे रेल्वेचे दोन डबे उभे आहेत. त्यांचे दिवे पेटत नाहीत. वायरिंगमध्ये काहीतरी गडबड झालीय. आणखी एक तासानं आगगाडी निघायचीय. पावेल,

तुझी हत्यारं घेऊन ताबडतोब तिथं दुरुस्तीला जा. तातडीचं बोलावणं आलंय."

पहिल्या क्रमांकाच्या फलाटावर ते दोन स्लीपर डबे उभे होते. त्यांचे पितळी आणि काचेचे आवरण चकाकत होते. त्या खिडक्यांचा भोजनाचा डबा प्रकाशाने झगमगत होता. पण त्याच्या शेजारच्या डब्यात मात्र काळोख होता.

त्या शानदार डब्याच्या पायऱ्यांपाशी पावेल गेला आणि वर चढण्याच्या उद्देशाने त्याने दांडा पकडला.

स्टेशनच्या इमारतीच्या भिंतीपासून एक आकृती वेगाने पुढे आली आणि तिने पावेलचा खांदा गच्च धरला.

"कुठं चाललास?"

आवाज ओळखीचा होता. पावेल मागे वळला. कातडी कोटातल्या, रुंद टोकाच्या टोपीतल्या, हडकुळया, बाकदार नाकाच्या व संशयित नजरेने पाहणाऱ्या त्या व्यक्तीला त्याने नीट न्याहाळून पाहिले.

तो आर्त्यूखिन होता. प्रथम त्याने पावेलला ओळखले नव्हते. पण आता ओळख पटताच पावेलच्या खांद्यावरचा आपला हात त्याने मागे घेतला आणि त्याच्या गंभीर चेहऱ्यावरचा ताण थोडा कमी झाला. तरीही पावेलच्या हातातील हत्यारांच्या पेटीवर त्याची प्रश्नार्थक नजर रेंगाळत राहिली.

"कुठं निघाला होतास?" त्याने थोडया कमी औपचारिक सुरात विचारले.

पावेलने थोडक्यात खुलासा केला. डब्याच्या मागील बाजूकडून आणखी एक आकृती अवतरली.

"जरा थांब. मी त्यांच्या गार्डला बोलावतो."

गार्डपाठोपाठ पावेल डब्यात चढला तेव्हा त्या भोजनयानात

भारी कपडे परिधान केलेले अनेक लोक बसलेले होते. गुलाबाच्या फुलांची चित्रे असलेले रेशमी आच्छादन घातलेल्या मेजापाशी दाराकडे पाठ करून एक स्त्री बसली होती. पावेल डब्यात प्रवेशला तेव्हा एका उंच लष्करी अधिकाऱ्याशी ती बोलत होती. इलेक्ट्रिशियन डब्यात येताच ती दोघे बोलायची थांबली.

डब्यामधील शेवटच्या दिव्यापासून कॉरिडॉरमध्ये जाणाऱ्या तारांची कोर्चागिनने झपाटयाने तपासणी केली आणि तेथे सारे काही ठाकठीक आहे असे दिसताच दुसऱ्या डब्याकडे मोर्चा वळविला. धिप्पाड, बैलासारख्या माजलेल्या मानेचा, पोलिश गरुडाची चिन्हे असलेली मोठी पितळी बटणे गणवेषावर लावलेला गार्ड त्याच्या अगदी पाठोपाठ फिरत होता.

"पुढचा डबा बघू या. इथं सारं काही ठीक आहे. तिथंच काहीतरी दोष निर्माण झाला असणार," कोर्चागिन गार्डला उद्देशून म्हणाला.

गार्डने दारात चावी फिरवली आणि अंधाऱ्या कॉरिडॉरमधून ते चालत गेले. पावेलने विजेरीचा झोत टाकून शॉर्ट सर्किट झालेली जागा बरोबर हेरली. काही मिनिटांच्या अवधीतच पहिला दिवा पेटला आणि कॉरिडॉर उजळून निघाले.

"कूपेमधले दिवे बदलले पाहिजेत. ते जळून गेलेत," कोर्चागिन गार्डला म्हणाला.

"तसं असेल तर मला त्या बाईंना बोलवावं लागेल. त्यांच्याकडं किल्ली आहे." इलेक्ट्रिशियनला एकटयाला डब्यात ठेवण्याची गार्डची इच्छा नव्हती. म्हणून त्याने कोर्चागिनला आपल्या पाठोपाठ येण्याची खूण केली.

ती स्त्री प्रथम कूपेमध्ये प्रवेशली, तिच्या पाठोपाठ कोर्चा-

गिन आत गेला. गार्ड दारामध्येच रस्ता अडवून उभा राहिला. दोन देखण्या कातडी प्रवासी बॅगा, आसनावर बेफिकीरपणे फेकलेला एक रेशमी झगा, खिडकीखालच्या टेबलावर एक परफ्यूमची बाटली व आरशी, फणी वगैरे ठेवण्याची छोटी मॅलकाईटची पेटी ह्या वस्तू पावेलच्या नजरेने चटकन टिपल्या. ती बाई कूपेच्या एका कोपऱ्यात बसली, आपल्या सोनेरी केसांवरून तिने एकदा हलकेच हात फिरवला व इलेक्ट्रिशियनची कामगिरी ती न्याहाळू लागली.

"बाईसाहेब, मी एक सेकंदासाठी बाहेर जाऊन येऊ काय?" आपली माजलेली गर्दन मोठ्या कष्टाने खाली झुकवीत गार्डने नम्रपणे विचारले. "मेजरसाहेबांनी थंड बीयर मागितलीय."

"तुम्ही जाऊ शकता," त्या स्त्रीने कृत्रिम सुरात उत्तर दिले.

त्यांचे हे बोलणे पोलिश भाषेत झाले.

कॉरिडॉरमधल्या प्रकाशाचा एक झोत त्या बाईच्या खांद्यावर पडला होता. पॅरिसच्या सर्वोत्तम पोषाख बनविणाऱ्या कारागिरांनी बनवलेल्या तिच्या दिमाखदार सुरेख रेशमी गाऊनमधून तिचे खांदे व दंड उघडे ठेवलेले होते. तिच्या नाजुक कानाच्या प्रत्येक पाळीमधून हिऱ्याचा एकेक खडा चमचमत होता. कोर्चागिनच्या नजरेला फक्त एकच रेखीव खांदा आणि दंड दिसत होता. तिच्या चेहऱ्यावर सावली होती. आपल्या स्क्रूड्रायव्हरने चटपट काम करून पावेलने छतामधील विद्युत्प्रवाह बदलला आणि क्षणार्धात कूपेमध्ये प्रकाश उजळला. आता ती स्त्री बसली होती त्या सोफावरचा दिवा तपासण्याचे काम तेवढे बाकी राहिले होते.

"मला तो बल्ब तपासून पाहिला पाहिजे," तिच्या पुढ्यात थांबून कोर्चागिन म्हणाला.

"अरे खरंच, मी तुमची वाट अडवून बसलेय," ती स्त्री अस्खलित रशियनमध्ये उत्तरली. ती हलकेच उठली व त्याच्या अगदी मागेच उभी राहिली. आता तो तिला संपूर्ण पाहू शकत होता. त्या कमानदार भुवया आणि मुरडलेले तिरस्करणीय ओठ त्याच्या परिचयाचे होते. संशयाला जागाच नव्हती: ती वकीलांची मुलगी नेल्ली लेश्चीन्स्काया होती. पावेलच्या चेहऱ्यावरील आश्चर्य तिच्या लक्षात आले. पण पावेलने जरी तिला ओळखले होते तरी गेल्या चार वर्षांत पावेलमध्ये एवढा प्रचंड फरक पडला होता की, हा इलेक्ट्रिशियन म्हणजे आपला कटकट्या शेजारी होता हे तिने ओळखणे अवघड होते.

पावेलचे टक लावून पाहणे तिला आवडले नाही. कपाळाला नापसंतीची आठी घालून ती कूपेच्या दारापाशी गेली व आपल्या पेटंट लेदरच्या बुटाची टाच टपटप वाजवीत अस्वस्थपणे उभी राहिली. पावेलने आपले लक्ष दुसऱ्या बल्बकडे वळवले. त्याने तो उलटा फिरवून मोकळा केला व दिव्यावर धरून पहात नकळतपणे पोलिश भाषेत त्याने तिला विचारले:

"विक्तरसुद्धा इथं आहे?" वस्तुत: त्याच्या पोलिश बोलण्यामुळे ती स्त्री जेवढी चकित झाली होती तेवढाच तो स्वत:सुद्धा चकित झाला होता.

पावेल जेव्हा बोलला होता तेव्हा त्याने मान वळवली नव्हती. त्याने नेल्लीचा चेहरा पाहिला नव्हता. पण त्याच्या प्रश्नानंतर जी प्रदीर्घ काळपर्यंत शांतता पसरली होती, त्यावरून ती गोंधळल्याचे उघडपणे जाणवले होते.

"का बरं? तुम्ही विक्तरला ओळखता?"

"हो, अगदी चांगला ओळखतो. तुम्हाला ठाऊक आहे, आपण शेजारी होतो." पावेल तिचा चेहरा पाहण्यासाठी वळला.

"तुम्ही... तुम्ही पावेल... कुणाचा बरं मुलगा..." नेल्लीचा गोंधळ उडाला.

"... तुमच्या स्वैपाकिणीचा," पावेलने तिला मदत केली.

"पण एकदम किती मोठे झालात! मला आठवतं तेव्हा अगदी गुंड मुलगा होतात!"

नेल्लीने पावेलला थंड नजरेने आपादमस्तक न्याहाळले.

"विक्तरची चौकशी कशासाठी केलीत? माझ्या आठवणीप्रमाणं तुमचं एकमेकांशी अजिबात पटत नव्हतं," आपल्या किनऱ्या आवाजात ती म्हणाली. या अनपेक्षित भेटीमुळे तिच्या कंटाळवाण्या चाललेल्या वेळात थोडी गंमत येण्याची शक्यता निर्माण झाली होती.

स्क्रू जलदपणे तक्तपोशीत बसला.

"विक्तरनं माझं एक देणं अजून दिलेलं नाही. त्याला तुम्ही भेटाल तेव्हा सांगा की, तो व्यवहार पूर्ण होण्याची आशा मी अजून सोडलेली नाही."

"तो तुमचं किती देणं लागतो ते मला सांगा आणि त्याच्या वतीनं मी तुम्हाला पैसे देते."

कोर्चागिनच्या मनात कोणते "देणे" अभिप्रेत होते त्याची तिला चांगली कल्पना होती. तिच्या भावाने पावेलचा विश्वासघात करून त्याला पेत्ल्युराच्या माणसांच्या स्वाधीन केले होते, हे तिला माहीत होते. पण ह्या "कळकट" माणसाची थट्टा करण्याचा मोह तिला आवरत नव्हता.

कोर्चागिन काहीच बोलला नाही.

"खरंच आमचं घर लुटून नेलं आणि आता अगदी पडित अवस्थेत आहे का हो? मला वाटतं, ग्रीष्मकुटीची आणि

सगळ्या झुडुपांची अगदी दुर्दशा झाली असणार," नेल्लीने उत्कंठेने विचारले.

"ते घर इत:पर तुमचं राहिलेलं नाही, ते आमचं आहे आणि आमची स्वत:ची मालमत्ता आम्ही नष्ट करण्याचा संभव नाही."

नेल्ली उपहासाने किंचित हसली.

"अग बाई, तुम्हालाही चांगलं शिकवून तयार केलेलं दिसतंय! पण एक आठवण ठेवा की, हा डबा पोलिश वकिलातीचा आहे, इथं मी मालकीण आहे आणि तुम्ही पूर्वी नेहमी होतात तसेच आत्ताही नोकर आहात. मला इथं सोफ्यावर आरामात पडून वाचता यावं म्हणून उजेड देण्या-साठी तुम्ही काम करता आहात. तुमची आई आमचे कपडे धुवायची आणि तुम्ही पाणी भरत होता. आपण पुन्हा एकदा अगदी त्याच परिस्थितीत भेटतोय!"

तिच्या आवाजात दुष्ट गर्विष्ठ सूर होता. आपल्या चाकूने तारेच्या टोकावरचे आवरण खरवडून काढीत पावेलने तिच्याकडे उघड तिरस्काराचा एक कटाक्ष टाकला.

"इथं मी एकही गंजलेला खिळा ठोकणार नाही, पण भांडवलदारांनी ही असली मुत्सद्दी मंडळी शोधून काढलीत, तर आम्हीही तोच खेळ खेळू. आम्ही त्यांची डोकी छाटत नाही, उलट त्यांच्याशी आदबीनं वागतो. तुमच्याच बाबतीत बघा ना!"

नेल्लीचे गाल लाल-किरमिजी झाले.

"वॉर्सा जिंकून घेण्यात तुम्हाला यश आलं तर काय कराल? मला वाटतं, माझा खिमा कराल किंवा मला रखेली म्हणून ठेवाल?"

दरवाजात ती आकर्षक रीतीने उभी होती. कोकेनची सवय झालेल्या तिच्या पातळ नाकपुड्या थरथरत होत्या. सोफ्या-वरचा दिवा पेटला आणि पावेल सरळ उभा राहिला.

"कुणाला तुमची गरज? तुमच्यासारखीला ठार मारायची नमर्दी कोण घेणार? कोकेनच तुमचा बळी घेईल! आणि खरं सांगायचं तर तुझ्यापेक्षा मी रांडेकडं जाईन!"

त्याने आपली अवजारांची पेटी उचलली व दाराच्या दिशेने तो निघाला. त्याला वाट करून देण्यासाठी नेल्ली बाजूला सरकली. कॉरिडॉरमध्ये तो अर्ध्या वाटेवर असताना तिच्या तोंडचा तुच्छ उद्‌गार त्याने ऐकला: "हलकट बोल्शेविक मेला!"

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पावेल लायब्ररीत निघाला होता तेव्हा वाटेत त्याला कात्युशा झेलेनोवा भेटली. आपल्या छोट्या हाताने तिने त्याची बाही पकडली व त्याचा रस्ता अडवला.

"म्हातारे राजकारणी आणि प्रबोधनकार, कुठं निघालीय आपली स्वारी?"

"लायब्ररीत निघालोय मावशीबाई, वाट सोड माझी!" पावेल तिच्याच सुरात उत्तरला. त्याने हलकेच तिच्या बकोटीला धरले व उचलून बाजूला ठेवले. कात्युशाने त्याच्या पकडीतून अंग झटकून सुटका करून घेतली व त्याच्या बरोबरीने ती चालू लागली.

"हे बघ पावेल, तू सगळा वेळ अभ्यास करत बसणं शक्य नाही. होय की नाही? मी तुला सांगू काय करायचं ते? आज रात्री आपण पार्टीला जाऊ या. झीना ग्लादीशाच्या घरी मंडळी जमणार आहेत. तुला घेऊन ये म्हणून पोरी

माझ्यापाशी सारखं टुमणं लावतात. पण आजकाल तुला राजकारणाच्या अभ्यासाशिवाय दुसरं काही सुचतच नाही. तुला कधी थोडी गंमत करावीशी वाटत नाही का रे? एखादे वेळी वाचन चुकवलंस तर बरंच वाटेल बघ तुला," कात्युशा लाडीगोडी लावीत म्हणाली.

"कसली पार्टी आहे? आपण तिथं काय करणार आहोत?"

"म्हणे ऑपण तिथं क्याय करणार ऑहोत!" हसत कात्युशाने त्याला वेडावून दाखवले. "आपण काही तिथं प्रार्थना म्हणत बसणार नाही. खूप गंमत करायची! बास्स!! तू ॲकॉर्डियन वाजवतोस ना? मी तुझं वाजवणं कधीही ऐकलेलं नाही! आज संध्याकाळी जरूर ये आणि आम्हाला ॲकॉर्डियन वाजवून दाखव! दाखवशील? मला बरं वाटावं म्हणून एवढं करशील? झीनाच्या काकांकडे ॲकॉर्डियन आहे, पण त्यांना वाजवायलाच जमत नाही. अरे वेड्या, तिकडं पोरी तुझ्यासाठी जीव टाकताहेत आणि तू पुस्तकातला किडा होऊन बसलायस! कम्सामोलांनी गंमत करायची नाही असं कुणी सांगितलं? मी तुझी मनधरणी करायला कंटाळायच्या आत चल बघू, नाही तर आपलं भांडण होईल आणि मग महिनाभर मी तुझ्याशी बोलायची नाही."

कात्युशा घरांना रंग लावायचे काम करायची, ती एक चांगली कॉम्रेड होती व उत्तम दर्जाची कम्सामोल सभासद होती. तिच्या भावना दुखविण्याची पावेलची इच्छा नव्हती. म्हणून अशा पार्टांना त्याला विलक्षण अवघडल्यासारखे व परके वाटत असूनही कात्युशाखातर तो जायला तयार झाला.

इंजिन ड्रायव्हर ग्लादीश यांच्या घरी तरुण मंडळींचा

गोंगाट करणारा घोळका जमला होता. मोठा दिवाणखाना आणि पुढचात छोटी बाग असलेला व्हरांडा सुमारे पंधरा मुला-मुलींच्या ताब्यात देऊन घरची मोठी मंडळी दुसऱ्या एका खोलीत जाऊन बसली होती. कात्युशा जेव्हा पावेलला घेऊन बागेतून व्हरांड्यात आली तेव्हा "कबूतरांना दाणे खाऊ घालणे" नांवाचा एक खेळ रंगात आला होता. व्हरांड्याच्या मध्यभागी दोन खुर्च्या एकमेकींच्या पाठी टेकवून ठेवल्या होत्या. त्या खेळाचे संचालन झीना ग्लादीश स्वत:च करीत होती. तिने इशारा करताच त्या खुर्च्यांवर एकमेकांकडे पाठी करून एक मुलगा आणि एक मुलगी बसे व "आता कबूतरांना दाणे खायला घाला" असे झीना ओरडताच ते जोडपे एकमेकांच्या ओठांना ओठ लागेपर्यंत मागे वाके. त्यांचे हे 'चिमणीच्या दातांनी घेतलेले चुंबन' बघेमंडळी मोठ्या चवीने पहात होती. त्यानंतर त्यांनी "कडे" आणि "पोस्टमन" हे दोन खेळ खेळले. हे दोनही खेळ चुंबन घेण्याचेच होते. पण "पोस्टमन" ह्या खेळात मात्र खेळगडी सर्वांसमोर व्हरांड्यात चुंबनाची जाहिरात न करता शेजारच्या दिवे मालवलेल्या खोलीत चुंबन घेत होते. ज्यांना या दोन्ही खेळांमध्ये स्वारस्य नव्हते त्यांच्यासाठी "फुलांची प्रणयचेष्टा" नांवाचा कार्डांचा खेळ कोपऱ्यातल्या एका छोट्या वाटोळ्या टेबलावर मांडलेला होता. पावेलच्या शेजारी फिकट निळ्या डोळ्यांची सुमारे सोळा वर्षांची एक मुलगी बसली होती. तिने त्याला स्वत:ची मूरा असे नांव सांगून ओळख करून दिली व एक कार्ड त्याच्या हाती देऊन चोरटा कटाक्ष टाकीत अस्फुटपणे म्हणाली :

"जांभळं फूल."

काही वर्षांपूर्वी अशा पार्टर्यांना पावेल हजर राहिलेला होता आणि तेथील छचोरपणात त्याने जरी प्रत्यक्ष भाग घेतला नव्हता तरी त्या पोरकटपणामध्ये त्यावेळी त्याला काही वावगे वाटले नव्हते. पण छोटया शहरातील मध्यमवर्गीय जीवनापासून आता त्याने कायमचा संबंध तोडला असल्यामुळे त्याला ती पार्टी कमालीची तिरस्करणीय व मूर्खपणाची वाटली.

पण तरीही या क्षणी तो "फुलाचे" कार्ड हातात धरून होता.

"जांभळे फूल" समोर त्याने पुढील शब्द वाचले: "मला तुम्ही फार फार आवडता."

पावेलने नजर उचलून मुलीकडे पाहिले. तिने किंचितही न शरमता त्याच्या नजरेला नजर दिली.

"का?"

त्याचा प्रश्न अगदीच फुसका भासला. पण मूराचे उत्तर तयार होते.

"गुलाब," ती पुटपुटली आणि दुसरे कार्ड तिने त्याच्या हाती दिले.

त्या "गुलाब" कार्डावर पुढील वाक्य होते: "तुम्ही माझा आदर्श आहात."

कोर्चागिन त्या मुलीकडे वळला व आपल्या सुरात शक्य तितका मऊपणा आणण्याचा प्रयत्न करीत त्याने विचारले:

"असला मूर्खपणा कशाला करतेस?"

मूरा त्याच्या बोलण्यामुळे एवढी दचकली की काय बोलावे हे तिला क्षणभर सुचेना.

"माझा संदेश आवडला नाही का?" ओठांचा लाडिक चंबू करीत तिने विचारले.

पावेलने तिच्या या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. पण तिच्याविषयी जास्त माहिती जाणून घेण्याची त्याला उत्सुकता लागली. त्याने तिला अनेक प्रश्न विचारले व तिनेही मोठ्या आनंदाने त्या सर्वांना उत्तरे दिली. काही मिनिटांच्या अवधीतच त्याला माहीत झाले की, ती माध्यमिक शाळेत शिकली होती, दुरुस्ती खात्यात तिचे वडील काम करीत होते, पावेलला ती खूप दिवसांपासून ओळखत होती व त्याच्याशी ओळख करून घेण्याची तिची फार फार इच्छा होती.

"तुझं आडनांव काय?" पावेलने विचारले.

"वोलीनत्सेवा."

"तुझा भाऊ यार्डातल्या कम्सामोल संघटनेचा चिटणीस आहे ना?"

"हो."

आता पावेलला स्पष्ट समजून चुकले की, विभागातील एक सर्वांत जास्त क्रियाशील कम्सामोल सभासद असलेला वोलीनत्सेव आपल्या स्वतःच्या बहिणीकडे संपूर्ण दुर्लक्ष करून तिला क्षुद्रासारखे वागू देत होता. गेल्या वर्षांत तिने आणि तिच्या मैत्रीणींनी अशा अनेक चुंबनपाटर्यांना हजेरी लावली होती. आपल्या भावाकडे तिने पावेलला अनेकदा पाहिले असल्याचे मूराने सांगितले.

आपले वागणे पावेलला आवडले नाही याची मूराला जाणीव झाली. त्याच्या चेहऱ्यावरील तिरस्कार बघून तिने "कबूतरांना दाणे खाऊ घालण्याचे" बोलावणे साफ नाकारले. ती आणि पावेल आणखी काही मिनिटे एकमेकांशी बोलत बसली. त्या वेळात मूराने स्वतःबद्दल आणखी माहिती सांगितली. तेवढ्यात कात्युशा त्यांच्यापाशी आली.

"मी तुला ॲकॉर्डियन आणून देऊ?" तिने विचारले व

मूराकडे मिस्कील कटाक्ष टाकीत ती पुढे म्हणाली, "तुझी नवी मैत्री जमलेली दिसतेय!"

पावेलने कात्युशाला आपल्याशेजारी जबरदस्तीने खेचून बसवले आणि भोवतालच्या गोंगाटाचा व खिदळण्याचा फायदा घेत तो म्हणाला:

"मी वाजवणार नाही. मूरा आणि मी जातोय."

"अय्या! प्रेमात पडलास काय तिच्या?" कात्युशाने त्याला चिडवले.

"होय. कात्युशा, इथं आपल्याशिवाय आणखी कुणी कम्सामोल सभासद आहेत का? की आपणच फक्त 'कबूतर-प्रेमी' आहोत?"

"त्यांनी तो मूर्खपणा थांबवलाय," पडत्या सुरात कात्युशा म्हणाली. "आपण आता नाचू या."

कोर्चागिन उठला.

"ठीक आहे म्हातारे, तू खुशाल नाच. पण मी आणि मूरा चाललो."

एके दिवशी संध्याकाळी आन्ना बोरहार्त ओकुनेवकडे आली होती तेव्हा कोर्चागिन तेथे एकटाच बसलेला तिला आढळला.

"पावेल, तू खूप कामात गुंतलेला आहेस काय? शहर सोविएतच्या सर्वसदस्य बैठकीला माझ्याबरोबर येशील? मी एकटीनं जाणं ठीक नाही, कारण परत यायला बराच उशीर होईल."

कोर्चागिन ताबडतोब कबूल झाला. आपल्या बिछान्यावरच्या खिळ्यावर टांगलेले 'मॉसर' पिस्तूल घेण्याचा त्याचा इरादा होता, पण ते खूप जड होते म्हणून ड्रॉवर उघडून त्याने

ओकुनेवचे पिस्तूल काढले व खिशात टाकले. त्याने ओकुनेवला एक चिठ्ठी लिहिली आणि आपल्या खोली-सोबत्याला सापडेल अशा ठिकाणी किल्ली ठेवली.

बैठक जेथे भरणार होती त्या थिएटरपाशी त्यांना पानक्रातोव आणि ओल्गा युरेनेवा भेटली. हॉलमध्ये ते सारे एकत्र बसले आणि मधल्या विश्रांतीच्या वेळात एकाच गटाने चौकात गेले. आन्नाच्या अंदाजाप्रमाणे बैठक खूप उशीरा संपली.

"रात्रीच्या मुक्कामाला माझ्याकडं चलते का? खूप उशीर झालाय आणि तुला खूप दूर जायचं आहे," ओल्गा म्हणाली.

पण आन्नाने नकार दिला. "पावेलनं मला घरापर्यंत पोचवत द्यायचं कबूल केलंय," ती म्हणाली.

पानक्रातोव आणि ओल्गा मुख्य रस्त्यावरून खालच्या अंगाला चालू लागली व इतर दोघांनी सोलोमेन्काकडे जाणारा टेकडीचा रस्ता धरला.

रात्र अंधारी होती, वातावरण गुदमरणारे होते. निर्जन रस्त्यावरून ही तरुण मंडळी वाट काढीत निघाली होती तेव्हा सारे शहर झोपले होते. हळूहळू त्यांच्या पावलांचा आणि बोलण्याचा आवाज विरत गेला. शहराच्या केंद्रापासून उलट दिशेकडे पावेल आणि आन्ना झपझप पावले टाकीत निघाली होती. बाजारापाशी त्यांना गस्तीच्या लोकांनी थांबवले आणि त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करून नंतर त्यांना पुढे जाऊ दिले. दुतर्फा झाडीचा रस्ता ओलांडून ती दोघे एका नीरव अंधाऱ्या रस्त्यावर आली. तो रस्ता एका मोकळ्या जागेमधून जात होता. डावीकडे वळून रेल्वेच्या मुख्य गुदामांशी समांतर जाणाऱ्या हमरस्त्यावरून ती चालू लागली. गुदामांच्या काळपट

आणि छातीत धडकी भरविणाऱ्या काँक्रीटच्या इमारतींची लांबच लांब रांग पसरली होती. आन्नाच्या मनात भीतीची एक अंधुक भावना निर्माण झाली. अस्वस्थपणे ती अंधारातून डोळे फाड-फाडून बघत होती आणि आपल्या सोबत्याच्या प्रश्नांना घाबरट तुटक उत्तरे देत होती. एक भयानक सावली म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून टेलिफोनच्या तारेचा खांब होता असे जेव्हा तिला आढळले तेव्हा ती मोठ्यांदा हसली व आपल्या मनातील धास्ती तिने पावेलला बोलून दाखवली. तिने त्याचा दंड धरला आणि त्याच्या खांद्याचा स्पर्श तिच्या खांद्याला होताच तिला सुरक्षित वाटले.

"मी अवघी तेवीस वर्षांची आहे, पण एखाद्या म्हाताऱ्या बाईसारखी घाबरट आहे. मी भेकड आहे असं तुला वाटत असेल तर तो तुझा गैरसमज आहे. पण आज रात्री मात्र माझी मन:स्थिती काहीशी ताणल्यासारखी आहे. पण इथं तुझ्याबरोबर मला खूप सुरक्षित वाटतंय आणि माझ्या भित्रेपणाची खरंच मला लाज वाटतेय."

आणि खरोखरीच पावेलची शांत वृत्ती, क्षणभर त्याचा चेहरा उजळवून टाकणारा त्याच्या सिगारेटचा मंद झुरका, त्या प्रकाशात दिसणाऱ्या त्याच्या धारदार भुवया – ह्या सर्व गोष्टींमुळे त्या रात्रीच्या अंधारात निर्माण झालेली धास्ती आणि जागेचा एकलेपणा एकदम नाहीसा झाला. शहराच्या सीमेवर आदल्या रात्री घडलेल्या खुनाची कहाणी बैठकीच्या जागी ऐकल्यापासून मनात निर्माण झालेली अस्वस्थताही नाहीशी झाली.

गुदामे मागे पडली होती. एका छोट्या नाल्याला लाकडी फळीवरून ओलांडून पुन्हा ती दोघे मुख्य रस्त्याला लागली.

आन्ना पुढे बोगदा होता. हा बोगदा रूळांच्या खालून जात होता व शहराला आणि रेल्वे वस्तीला त्याने जोडलेले होते.

स्टेशनची इमारत त्यांच्या मागे खूप दूरवर उजव्या अंगाला राहिली होती. इंजिनशेडच्या पलिकडे एक सायडिंगचा रस्ता जात होता. एव्हाना ती दोघे आपल्या स्वतःच्या भागात पोचली होती. वरती रूळांवर स्विचचे रंगीत दिवे आणि सिग्नलच्या पट्ट्या अंधारात चमकत होत्या. शेडपाशी शंटिंग करणारे इंजिन रात्रीपुरते परत जाताना थकल्या भागल्या-प्रमाणे मुस्कारले.

बोगद्याच्या तोंडाशी एका गंजक्या आकड्यावर रस्त्यावरचा दिवा टांगलेला होता. वारा हलकेच त्याला झोके देत होता व त्याचा धूसर पिवळट प्रकाश बोगद्याच्या भिंतींवर नाचत होता.

बोगद्याच्या प्रवेशापासून सुमारे दहा यार्डांवर हमरस्त्याच्या कडेला एक एकाकी खोपटे उभे होते. दोन वर्षांपूर्वी एका जबरदस्त तोफगोळ्याचा त्या खोपटाला मार बसला होता, त्याचा आतील भाग जळून गेला होता, सांगाड्याची खूप मोडतोड झाली होती. त्यामुळे रस्त्याच्या कडेला उभे राहून भीक मागणाऱ्या एखाद्या विद्रूप भिकाऱ्याप्रमाणे भगदाड पडलेले ते खोपट दिसत होते. वरच्या रूळांवरून एक आगगाडी रोरावत गेली.

"आपण जवळ जवळ घरी पोचलो," सुटकेचा निश्वास टाकीत आन्ना म्हणाली.

आपला दंड सोडवून घेण्याचा पावेलने खूप प्रयत्न केला. बोगद्यामध्ये मोकळेपणी चालण्याची त्याची इच्छा होती. पण आन्ना त्याचा हात गच्च पकडून चालली होती. त्या उध्वस्त खोपटाजवळून ते चालत होते.

अचानक त्यांच्यामागे काहीतरी दण्णदिशी आवाज झाला. धावत्या पावलांचा आणि धापांचा आवाज ऐकू आला. त्यांच्या अंगावर कुणीतरी चालून आले.

कोर्चागिनने आपला हात झटकला, पण अधिक घाबरल्या-मुळे आन्नाने त्याला जास्तच घट्ट धरून ठेवले. तिच्या पकडीला ढिली करीपर्यंत खूप उशीर घडला होता. त्याच्या मानेभोवती पोलादी पकड बसली होती. दुसऱ्याच क्षणी त्याच्यावर हल्ला करणाऱ्याने त्याला गर्रकन फिरवून चेहऱ्यासमोर चेहरा आणला. त्याच्या मानेवरचा हात गळ्यापाशी सरकला व जीव घुसमटेपर्यंत शर्टाची कॉलर खेचली गेली. त्याच्या डोळ्यां-समोर अर्धवर्तुळाकार पिस्तुलाची नळी नाचवली जात होती.

पावेलची चकित नजर त्या अर्धवर्तुळाकडे अमानुष ताणातून पहात होती. रिवॉल्वरच्या त्या नळीमधून मृत्यू त्याच्याकडे आ वासून पहात होता. त्या नळीवरून आपली नजर बाजूला करण्याची त्याच्यात ताकद नव्हती आणि इच्छाही नव्हती. अखेर घडण्याची तो वाट पहात होता. पण हल्ला करणाऱ्याने गोळी झाडली नाही. पावेलच्या विस्फारलेल्या डोळ्यांनी त्या गुंडाचा चेहरा पाहिला, प्रचंड डोके पाहिले, भला मोठा जबडा व विस्कटलेल्या दाढीची काळी छाया पाहिली. पण टोपीच्या रुंद टोकाखालचे डोळे मात्र दिसले नाही.

डोळ्याच्या एका कोपऱ्यातून कोर्चागिनने आन्नाच्या पांढऱ्या-फटक पडलेल्या चेहऱ्यावर ओझरता कटाक्ष टाकला. त्याच क्षणी त्या तीन गुंडांपैकी एकाने तिला फरपटत खेचत खोपटाकडे नेले. क्रूरपणे तिचे हात पिरगाळून त्याने तिला जमिनीवर खाली पाडले. दुसरी आकृती त्यांच्या दिशेने झेपावली. तिची पडछाया फक्त पावेलला बोगद्याच्या भिंतीवर दिसली. पाठी-

…च्या त्या पडक्या घरातली झटापट त्याला ऐकू आली. …ना जिवाच्या आकांताने झगडत होती. तिची दबती किंकाळी …दम थांबली, कारण तिच्या तोंडात टोपी कोंबण्यात …ली. कोर्चागिनला पिस्तुलाच्या धाकावर उभे करून ठेव-…च्या त्या मोठ्या डोक्याच्या गुंडाला बलात्काराच्या जागी …ण्याची तीव्र इच्छा झाली होती. एखाद्या श्वापदाने सावजाकडे …त्रे नमा तो तिकडे ओढला जात होता. त्या टोळीचा तो …मुख होता आणि अशा क्षणी केवळ बघ्याची भूमिका घेणे …ला मानवण्यासारखे नव्हते. त्याने धरलेला हा पोरगा …गदीच कवळा वाटत होता, "रेल्वे यार्डातल्या बुळचटां" पैकी …एक होता. अशा शेळपटापासून भ्यायचे कारण नव्हते. …त्याच्या टाळक्यावर दोन तडाखे हाणले आणि चालते …व्हायला सांगितले म्हणजे मागे न बघता त्याने दोन्ही पाय …गणाला लावून धूम ठोकली असती." त्याने पावेलवरची …आपली पकड ढिली केली.

"ठीक आहे, तोंड काळं कर इथून! आलास त्या रस्त्यानं …न जा. पण बोंबलू नकोस, नाहीतर गोळी घालीन." …कोर्चागिनच्या कपाळाला पिस्तुलाची नळी टेकवीत तो घोगऱ्या अस्पष्ट आवाजात खेकसला: "चालता हो!" पावेलला …पाठीमागून गोळी येईल अशी भीती वाटू नये म्हणून त्या गुंडाने …पिस्तुल खाली धरले.

कोर्चागिन धडपडत मागे सरला आणि त्या गुंडावर नजर …ठेवीत रस्त्याच्या कडेने धावू लागला. हा पोरगा पिस्तुलाच्या …भीतीने अजून घाबरलेला आहे म्हणून असा धावतोय असे …त्या गुंडाला वाटले व तो खोपटाकडे वळला.

कोर्चागिनचा हात चटकन खिशाकडे गेला. त्याला घाई

करणे आवश्यक होते. तो मागे फिरला, डावा हात त्याने पुढे धरला व चटकन नेम धरून पिस्तूल झाडले.

त्या गुंडाला आपली चूक फार उशीरा समजली. हात उचलण्यापूर्वीच पावेलच्या गोळीने त्याचा वेध घेतला होता.

त्या आघातासरशी तोल जाऊन तो बोगद्याच्या भिंतीवर आपटला आणि अस्फुट किंकाळी मारून भिंतीला खरवडत हळूहळू खाली कोसळला. खोपटातून एक आकृती बाहेर आली व खालच्या गल्लीकडे धावू लागली. कोर्चागिनने तिच्या पाठोपाठ गोळी झाडली. दुसरी दबती आकृती बोगद्याच्या काळोख्या पोकळीकडे धावत होती. बार घुमला. गोळीने फोडलेल्या काँक्रीटची धूळ अंगावर उधळलेली काळी आकृती बाजूला उडी मारून अंधारात पसार झाली. ब्राऊनिंग पिस्तुलाने रात्रीची स्तब्धता तीनदा टराटरा फाडली. भिंतीशी तो मोठ्या डोक्याचा गुंड मरणयातनांमध्ये तळमळत होता.

कोर्चागिनने आन्नाला उठून उभे रहायला मदत केली. स्तंभित झालेल्या आणि हादरलेल्या आन्नाने त्या गुंडाच्या तळमळण्याकडे एकटक नजरेने पाहिले. आपण सुरक्षित राहिलो आहोत यावर तिचा विश्वासच बसत नव्हता.

कोर्चागिनने तिला जवळ जवळ ओढतच अंधारात शहराकडे नेले. त्या दिव्याच्या उजेडाच्या वर्तुळापासून दूर नेले. रेल्वे स्टेशनच्या दिशेने ती दोघे धावत होती तेव्हा बोगद्याच्या तोंडापाशी एव्हाना विजेऱ्यांचे झोत चमकू लागले होते व रूळांच्या दिशेने रायफलचा बार घुमला.

बातीयेव टेकडीवरील आन्नाच्या घरी ते पोचले तेव्हा पहाटेचे कोंबडे आरवत होते. आन्ना बिछान्यावर आडवी

होती. कोर्चागिन टेबलापाशी सिगारेट ओढीत आणि वर जाणारी धुराची वेटोळी एकाग्रतेने पहात बसला... आपल्या आयुष्यात त्याने आज चौथ्यांदा माणूस ठार मारला होता.

धैर्य नांवाची काही चीज आहे किंवा नाही याबद्दल त्याला शंका होती. अत्यंत परिपूर्ण स्वरूपात नेहमी आपण होऊन प्रकटणारे असे काहीतरी? घडलेल्या प्रसंगांची पुन्हा एकदा मनाने उजळणी करताना त्याने स्वत:शी कबुली दिली, की, जेव्हा पिस्तुलाची काळी नळी प्रथम नजरेला पडली तेव्हा भीतीची थंडगार पकड त्याच्या काळजावर पहिले काही क्षण घट्ट बसली होती. आणि त्याची दृष्टी अधू होती व डाव्या हाताने त्याला पिस्तूल झाडावे लागले होते म्हणून त्या दोन व्यक्त्या निसटू शकल्या होत्या का? मुळीच नाही. काही पावलांवरच्या त्या अंतरात त्याच्या काडतुसांनी आपल्या लक्ष्यांचा बरोबर वेध घेतला असता. पण मानसिक ताण आणि घाई ह्या घाबरटपणाच्या हमखास लक्षणांमुळे त्याचा नेम डळमळला होता.

टेबलावरील दिव्याचा प्रकाश त्याच्या तोंडावर पडला होता. अन्ना चिंतातुरपणे त्याचा चेहरा न्याहाळीत होती. पण त्याचे डोळे शांत होते. फक्त आठी घातलेल्या भुवईमुळे समजत होते की. तो खोल विचारात गढला होता.

"पावेल, कसला विचार करतोयस?"

अचानक प्रश्नामुळे त्याच्या मनातील विचार सिगारेटच्या धुराप्रमाणे दिव्याच्या वर्तुळापलिकडे विरून गेले आणि त्याच्या मनात आलेली पहिलीच गोष्ट त्याने बोलून टाकली:

"मला कमांडंटच्या कचेरीत गेलं पाहिजे. ही भानगड ताबडतोब सांगून टाकली पाहिजे."

तो मोठ्या अनिच्छेने उठून उभा राहिला. विलक्षण थकल्याची त्याला जाणीव झाली.

ती एकदम त्याच्या हाताला बिलगली, कारण एकटे पडण्याच्या धास्तीने तिच्या पोटात खड्डा पडला होता. पण मनाचा हिय्या करून तिने दारापर्यंत जाऊन त्याला निरोप दिला व अंधारात तो दिसेनासा होईपर्यंत दाराच्या उंबरठ्याशी ती उभी राहिली.

कोर्चागिनच्या निवेदनामुळे रेल्वे रक्षकांना खुनाचे रहस्य उलगडले. प्रेताची ओळख ताबडतोब पटली होती. प्रदीर्घ काळ तुरुंगवास भोगलेल्या, खुनी, लुटारू, मृत्यूची कवटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फीम्का नांवाच्या कुप्रसिद्ध गुन्हेगाराचे ते शव होते.

दुसऱ्या दिवशी, बोगद्यापासच्या घटनेची जो तो चर्चा करीत होता. योगायोगाने तीच घटना पावेल आणि त्स्वेतायेव यांच्या दरम्यान अचानक खटका उडण्यास कारणीभूत ठरली.

कामाची पाळी चालू असताना त्स्वेतायेव मध्येच वर्कशॉप-मध्ये आला व पावेलला त्याने बाहेर येण्यास सांगितले. कॉरिडॉरच्या दूरच्या टोकापर्यंत तो मुकाट चालत राहिला. तो कमालीचा बेचैन होता आणि बोलायला कशी सुरुवात करावी ते त्याला समजत नव्हते. शेवटी तो बरळला:

"काल काय घडलं ते मला सांग."

"मला वाटतं तुला माहीत आहे."

त्स्वेतायेवने आपल्या खांद्यांना अस्वस्थपणे एक हिसका दिला. बोगद्यातील घटनेचा परिणाम इतर कुणाहीपेक्षा त्स्वेता-येववर जास्त झाला होता याची पावेलला कल्पना नव्हती. त्याला माहीत नव्हते की, त्स्वेतायेवने बाहेरून कितीही

बेफिकीरीचा आव आणला तरी त्या लोहाराला आन्ना बोरहार्तबद्दल तिच्यावर प्रेम वाटू लागले होते. तिच्याकडे आकर्षित होणारा तो काही एकटाच नव्हता, पण त्याला प्रेमाची गंभीर बाधा झाली होती. आदल्या रात्री बोगद्यात काय घडले होते याची कथा लागूतिनाने त्याला आत्ताच सांगितली होती. पण एका प्रश्नाचे उत्तर त्याला न मिळाल्यामुळे त्याची आत्ता ऊलघाल चालली होती. पावेलला तो सरळ निर्लज्जपणे तसा प्रश्न करू शकत नव्हता, पण तरीही त्याला उत्तर हवे होते. त्याचे सद्भावी मन त्याला सांगत होते की, त्याच्या शंका स्वार्थी आणि नीच स्वरूपाच्या होत्या. तरीही त्याच्या अंतर्मनात चाललेल्या भावनांच्या संघर्षात पाशवी व आदिमानवी वृत्तींचे वर्चस्व राहिले होते.

"हे बघ कोर्चागिन," घोगऱ्या आवाजात त्स्वेतायेव म्हणाला. "हे संभाषण फक्त आपल्या दोघांमध्येच राहील. आन्नाच्या भल्यासाठी तुला त्याबाबत बोलावंसं वाटत नाही हे मला ठाऊक आहे, पण तू माझ्यावर विश्वास ठेवू शकतोस. त्या गुंडानं तुला रोखून धरलं होतं तेव्हा दुसऱ्यांनी आन्नावर बलात्कार केला का?"

बोलणे संपविण्यापूर्वीच गोंधळून त्याने आपली नजर खाली केली.

त्याच्या मनात काय होते याचा कोर्चागीनला आत्ता कुठे अंधुक अंदाज येऊ लागला. "आन्नाबद्दल त्याला विशेष प्रेम नसतं तर तो एवढा बेचैन झाला नसता. पण आन्ना जर त्याला एवढी प्रिय आहे तर..." आणि त्या प्रश्नात अंतर्भूत असणाऱ्या आन्नाच्या अपमानामुळे पावेल भडकून उठला.

"तू असं का विचारतोस?"

त्स्वेतायेव काहीतरी असंबद्ध पुटपुटला. त्या प्रश्नाचा अर्थ

पावेलला समजला होता. हे त्याच्या ध्यानी येताच त्याचा तोल सुटला :

"उगीच गुळूमुळू करू नकोस. मला सरळ उत्तर हवंय्!"

"तुझं आन्नावर प्रेम आहे?"

एक प्रदीर्घ शांतता पसरली. शेवटी त्स्वेतायेव कष्टाने उत्तरला : "हो."

कोर्चागिनने मोठ्या प्रयासाने आपला राग आवरला, तो मागे वळला आणि अजिबात मागे वळून न पाहता ताडताड कॉरिडॉरमधून निघून गेला.

एके रात्री ओकुनेव आपल्या मित्राच्या बिछान्याभोवती बराच वेळपर्यंत अनिश्चित मनाने घुटमळत राहिला. शेवटी तो पलंगाच्या कडेशी बसला व पावेल जे पुस्तक वाचत पडला होता त्या पुस्तकावर त्याने हात ठेवला.

"पावेल, माझ्या मनची एक गोष्ट तुला सांगायचीय. एका एका दृष्टीनं महत्त्वाची नसेलही, पण दुसऱ्या बाजूनं ती तेवढीच महत्त्वाची आहे. माझ्यात आणि ताल्या लागूतिनामध्ये काही गैरसमज झाला होता. सुरवातीला मला ती खूप आवडली होती." ओकुनेवने खिजून आपले डोके खाजवले. पण पावेलच्या चेहऱ्यावर थट्टेचे हसू न उमटलेले पाहून त्याला पुढे बोलायचा धीर आला. "पण मग ताल्या... छ्या! तुला माहीतच आहे रे! तर काल आम्ही दोघांनी समझोता केला आणि कसं काय जमतंय ते पहायचं ठरवलंय! मी आता बावीस वर्षांचा आहे. आम्ही दोघंही सज्ञान आहोत. समतेच्या तत्त्वावर आम्हाला एकत्र रहायचंय. तुला काय वाटतं?"

कोर्चागिनने या प्रश्नावर थोडा वेळ विचार केला.

"कोल्या, मी काय सांगू? तुम्ही दोघंही माझे चांगले

स्नेही आहात, आपण सारे एकाच विचाराचे लोक आहोत आणि इतर सगळ्या बाबी आपल्यात सामायिक आहेत. ताल्या फार छान मुलगी आहे. तुमचं सारं काही छान सुरळीत घडत आलंय."

दुसऱ्याच दिवशी कोर्चागिनने आपला बिस्तरा कामगारांच्या सदनीगृहात हलविला. त्यानंतर थोड्याच दिवसांनी ताल्या आणि निकोलाय यांच्या प्रीत्यर्थ आन्नाने एक पार्टी दिली. त्या माफक कम्युनिस्ट धर्तीच्या मेजवानीत खाण्याचे पदार्थ आणि मद्य यांचा समावेश नव्हता. त्या सायंकाळी जमलेल्या लोकांनी आपल्या आठवणी सांगितल्या, आवडत्या पुस्तकांमधील उताऱ्यांचे वाचन केले. त्यांनी अनेक गाणी गायली आणि चांगली गायली. त्यांच्या गीतांचे उंच सूर दूरवर घुमले. नंतर कात्यूशा झेलेनोवाने आणि वोलीन्त्सेवाने ॲकॉर्डियन आणले. त्याच्या खर्जातल्या सुरांनी आणि चंदेरी आलापींनी खोली भरली. त्या सायंकाळी पावेलने कधी नव्हते एवढे सुंदर वाजविले. आणि सर्वांना आनंदित करून पानक्रातोव जेव्हा नृत्याच्या रिंगणात उतरला तेव्हा पावेल आपली दुःखी सुरांची धाटणी विसरला व पूर्वीच्या बेफाम उसळत्या संगीताची लहर त्याच्या बोटांमधून उमटली.

अहो ऐका हो ऐका
सैबेरियाची चेका
उडवी कोल्चाकचा फन्ना,
होईल देनिकिनची दैना!

ॲकॉर्डियन भूतकाळ गात होते, पूर्वीचे वादळवाऱ्याचे दिवस गात होते, आजच्या मैत्रीची, संघर्षाची आणि आनंदांची गाणी

गात होते. पण वोलीन्त्सेवच्या हाती जेव्हा अ‍ॅकॉर्डियन देण्यात आले आणि "याब्लचको" नाचाचे सूर घुमले तेव्हा कोर्चागिनने टापांचे धुंद नृत्य करून सर्वांना चकित केले. आयुष्यात फक्त तिसऱ्यांदाच आणि अखेरचा तो नाचणार होता.

प्रकरण चौथे

सीमा प्रदेश. दोन चौक्या एकमेकींसमोर मूक शत्रुत्व राखून उभ्या आहेत. प्रत्येकीचे स्वतःचे जग वेगळे आहे. त्यांपैकी एक चौकी गुळगुळीत आणि चकचकीत आहे, पोलिसाच्या चबुतऱ्यासारखा तिला काळा-पांढरा रंग दिलाय व तिच्यावर एक डोके असलेल्या गरुडाचे चिन्ह भक्कम खिळयांनी ठोकून बसविले आहे. पंख पसरलेला, पट्टेदार खांबाला नख्यांचा विळखा घातलेला, बाकदार चोच पसरलेला तो शिकारी पक्षी दुष्ट नजरेने समोरच्या खांबावरच्या ओतीव लोखंडी ढालीवरच्या कोयता-हातोड्याच्या चिन्हाकडे टक लावून पाहतोय. ओकच्या लाकडापासून बनवलेली भक्कम, गोलाकार, खडबडीत तासलेली चौकी तेथे उभी आहे. ते दोन्ही खांब सपाट जमिनीवर एकमेकांपासून सहा पावले अंतरावर उभे आहेत. तरीही त्यांच्यात आणि ज्या दोन जगांचे ते प्रतीक आहेत त्या जगांमध्ये फार मोठे अंतर आहे. ही 'कुणाच्याही मालकीची नसलेली भूमी' ओलांडून जाणे म्हणजे स्वतःचा जीव धोक्यात घालण्यासारखे आहे.

ही सीमा.

आपल्या लोखंडी ढालींवर श्रमाचे महान चिन्ह लेवून सोविएत समाजसत्तावादी प्रजासत्ताकांच्या ह्या मूक पहारेकऱ्यांची

निश्चल रांग काळ्या सागरापासून ते अति-उत्तरेला आर्क्टिक महासागरापर्यंत हजारो किलोमीटर अंतरावर पसरली आहे. त्या हिंस्त्र पक्ष्याचे चिन्ह असलेली चौकी सोविएत युक्रेन आणि भांडवलदारी पोलंड यांच्यामधील सीमेचा आरंभ करते. युक्रेनच्या पाठीमागील प्रदेशातील बेरेझ्दोव नांवाच्या छोट्या शहरापासून ही चौकी दहा किलोमीटर अंतरावर आहे व तिच्या समोर कोरेत्स हे छोटे पोलिश गांव आहे. स्लावूत ते आनापोल या सीमाप्रदेशाचे रक्षण सीमा रक्षक बटालियन करते आहे.

सीमेवरील चौक्या बर्फाने झाकलेल्या मैदानांमधून गेल्या आहेत. जंगलांमध्ये झाडी तोडून स्वच्छ केलेल्या मोकळ्या जागी त्या उभ्या आहेत. खाली उतरलेल्या घळींमध्ये त्यांनी सूर मारले आहेत. टेकड्यांचे चढ चढलेल्या आहेत. पर्वतांच्या शिखरांमागे अदृश्य होऊन एकदम नदीच्या उंच तीरांवर अवतीर्ण होऊन परकी भूमीची बर्फाळ सपाट मैदाने निरखीत आहेत.

कमालीची चावरी थंडी आहे. नमदी बुटांच्या टाचांखाली बर्फ चुरचुर आवाज करतोय. कोयता-हातोड्याचे चिन्ह असलेल्या चौकीमधून प्रचंड शिरस्त्राण घातलेला एक धिप्पाड लाल सैनिक बाहेर पडला. मोठ्या कष्टाने पावले टाकीत तो नेहमीच्या फेरीवर निघाला. कॉलरवर हिरव्या पट्ट्या लावलेला करड्या रंगाचा मोठा कोट त्याने अंगात घातला आहे व पायात नमदी बूट आहेत. त्या मोठ्या कोटावर त्याने बकऱ्याच्या कातडीचा पायाच्या टाचांपर्यंत पोचणारा कोट घातला आहे. या कोटाची केसाळ कॉलर त्याच्या भव्यतेला साजेशी आहे. अत्यंत भयाण हिमवादळातही हा कोट माणसाला

उबदार ठेवू शकेल. डोक्यावर त्याने कापडी शिरस्त्राण घातले आहे व त्याच्या हातात बकऱ्याच्या कातडीचे हातमोजे आहेत. त्याच्या खांद्यावर रायफल लटकलेली आहे आणि पहाऱ्याच्या मार्गावरून आत्ता तो चालत जात असताना त्याच्या लांब कोटाची शेपटी बर्फात नक्षी कोरते आहे. घरगुती तंबाखूच्या सिगारेटचे झुरके तो मोठ्या मजेने घेतो आहे. उघड्या मैदानात सोविएत सीमारक्षक एकेक किलोमीटर अंतरावर ठेवले आहेत. त्यामुळे प्रत्येकजण आपल्या शेजाऱ्याला पाहू शकतो. पोलिश बाजूला दर किलोमीटरगणिक दोन पहारेकरी आहेत.

पोलिश पायदळ सैनिक आपल्या पहाऱ्याच्या मार्गावरून लाल सैनिकाच्या दिशेने आला. सैन्यात वाटण्यात येणारे ओबडधोबड बूट त्याने पायात चढविलेले आहेत, शेवाळी रंगाचा गणवेष घातला आहे व त्यावर चकचकीत बटणांच्या दोन ओळी लावलेला काळा कोट घातला आहे. डोक्यावर गणवेषाची चौकोनी टोपी आहे व त्या टोपीवर पांढऱ्या गरुडाचे चिन्ह आहे. त्याच्या खांद्यावरच्या पट्ट्यांवर आणि कॉलरवर आणखी पांढरे गरुड आहेत, पण त्याला ऊब आणायला त्यांचा काही उपयोग होत नाही. थंडी अगदी त्याच्या हाडां-पर्यंत घुसली आहे आणि चालताना तो आपले बधीर कान व नाक चोळतोय, टाचा एकमेकींवर आपटतोय. पातळ हातमोजांमधील त्याचे हात थंडीने गारठून आखडले आहेत. एक क्षणभरही थांबण्याचा धोका तो पोलिश सैनिक पत्करू शकत नाही. काही वेळा तर तो दुडक्या चालीने धावतोय, कारण जर तो एका जागी स्तब्ध उभा राहिला तर क्षणार्धात त्याचे सांधे जखडून जातील. जेव्हा दोन पहारेकरी एकमेकांच्या

जवळ आले तेव्हा पोलिश सैनिक लाल सैनिकाशी समांतर चालू लागला.

सीमेवर संभाषणाला बंदी आहे. पण एक किलोमीटरच्या अंतरात जेव्हा दुसरे कुणीही नसते तेव्हा ते दोघे पहारेकरी चुकाट राहून आपल्या क्षेत्रात पहारा देत आहेत किंवा आंतरराष्ट्रीय नियमाचा भंग करीत आहेत, याबद्दल खात्रीपूर्वक कोण सांगणार?

पोलिश सैनिकाला सिगारेट ओढायची जोरदार तलफ आलीय, पण काड्यापेटी तो बराकीत विसरलाय आणि सोविएत बाजूकडून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळकीबरोबर वहात येणारा तंबाखूचा उत्तेजित गंध त्याला अधिकच बेचैन करतोय. पोलिश सैनिकाने किंचित थांबून कान चोळीत हळूच मान वळवून मागे नजर टाकली. न जाणो, कॅप्टन किंवा पान लेफ्टनंट अचानक टेकाडापलिकडून घोड्यावरून पहाऱ्याची पहाणी करायला यायचा! अशा पहारे-तपासणीच्या त्यांच्या फेऱ्या अखंड चालूच होत्या. पण सूर्यप्रकाशामुळे झगझगणाऱ्या बर्फाच्या धवलतेशिवाय त्याला दुसरे काहीही दिसत नाही. आकाशात ढगाचा एकही ठिपका नाही.

"कॉम्रेड, काडी आहे का?" नियमाच्या पावित्र्याचा भंग त्या पोलिश सैनिकाने प्रथम केला. तलवारीच्या पात्याचे बाग-नेट लावलेली आपली फ्रेंच बनावटीची रायफल त्याने खांद्या-वरून मागे सारली व आखडलेल्या बोटांनी कोटाच्या खोल खिशातून स्वस्त सिगारेटींचे पाकीट त्याने मोठ्या कष्टाने बाहेर काढले.

लाल सैनिकाने त्या पोलिश सैनिकाचे बोलणे ऐकले, पण सीमेवरील नोकरीच्या नियमांनुसार सीमेपलिकडे संभाषण

करण्यास त्याला बंदी आहे. शिवाय, त्या सैनिकाला नेमके काय हवे आहे ते त्याला नीटसे समजत नाही. आपल्या उबदार, नरम नमदी बुटांनी बर्फ चुरडीत तो तसाच ताठ चालीने पुढे चालत राहतो.

"कॉम्रेड बोल्शेविक, काडी आहे का? काड्यापेटी जरा इकडं फेकता का?" यावेळी तो पोल रशियन भाषेत बोलतो.

लाल सैनिक आपल्या शेजाऱ्याला न्याहाळून पाहतो. "गारठ्यानं 'पान'ची आकडी वळलीय," तो स्वत:शीच म्हणतो. "गरीब भिकारी असेल भांडवलदारी सैनिक, पण अगदी कुत्र्याचं जिणं जगतोय. अशा अपुऱ्या कपड्यात त्याला थंडीत पहाऱ्याला पिटाळलाय. मग सशासारखा उड्या मारतोय आणि सिगारेटच्या झुरक्यासाठी तळमळतोय यात नवल नाही." मागे न वळताच त्या लाल सैनिकाने पोल सैनिकाकडे काड्या-पेटी फेकली. पोलिश सैनिकाने हवेतच ती झेलली आणि अनेक अयशस्वी प्रयत्नांनंतर सिगारेट पेटविल्यावर ताबडतोब काड्यापेटी परत फेकली.

"ठेव तुझ्यापाशी. माझ्याकडं दुसरी आहे," नियम विसरून लाल सैनिक म्हणाला.

सीमेपलिकडून तात्काळ प्रतिसाद आला:

"धन्यवाद. पण नसलेली बरी. जर त्यांना ती काड्यापेटी माझ्यापाशी सापडली, तर दोन वर्षं तरी मला तुरुंगाची हवा खावी लागेल."

लाल सैनिकाने काड्यापेटी निरखली. लेबलवर विमानाचे चित्र होते आणि पंख्याच्या जागी वळलेली मूठ होती व "निर्वाणीचा इशारा" असे शब्द होते.

"खरंच, त्यांना हे चालायचं नाही."

लाल सैनिकाशी गती राखून तो पोलिश सैनिक चालत राहिलाय. त्या वैराण मैदानात एकटे राहणे त्यालाही आवडत नाहीय !

माफक गतीने घोडे दुडक्या चालीने दौडत होते, खोगीरांची करकर तालसुरात होत होती आणि गोठलेल्या वातावरणात घोड्यांच्या उच्छ्वासांसरशी पांढऱ्या वाफेचे क्षणिक लोट निर्माण होत होते. काळ्या घोडीच्या नाकपुड्यांभोवती बर्फाची तुषारमय कडा जमली होती. आपली सुरेख मानेची डौलदार कमान करून बटालियन कमांडरची अबलख घोडी दौडत होती. दोन्ही घोडेस्वारांच्या अंगावर लष्करी मोठे कोट होते, कमरेशी त्यानी पट्टे आवळले होते व त्यांच्या दंडांवर तीन लाल चौकोन होते. फक्त फरक एवढाच होता की, बटालियन कमांडर गावरीलोव यांच्या कॉलरवर हिरव्या फिती होत्या आणि त्यांच्या सहकाऱ्याच्या कॉलरवर लाल फिती होत्या. गावरीलोव सीमारक्षक होते. ह्या सत्तर किलोमीटर लांबीच्या सीमेच्या पट्ट्यात येणाऱ्या सीमा-चौक्यांमध्ये त्यांच्या बटालियनचे लोक पहारे देत होते. त्यांचा सहकारी म्हणजे बेरेझ्दोवहून आलेला पाहुणा होता – सार्वत्रिक लष्करी शिक्षण व्यवस्थेचा बटालियन कमिस्सार कोर्चागिन.

रात्रभर हिमवर्षाव झाला होता आणि आता सर्वत्र मऊ शुभ्र बर्फ विखुरले होते. त्याला माणसाच्या किंवा जनावराच्या पायांचा स्पर्श घडला नव्हता. ते दोघे जंगलामधून दौडत बाहेर आले आणि सीमेवरील चौक्यांपासून सुमारे चाळीस पावलांचा मोकळा पट्टा ओलांडणार तोच अचानक गावरीलोव यांनी आपल्या घोड्याचा लगाम खेचला. कोर्चागिन गोल फेरी

मारून मागे वळला तेव्हा गावरीलोव खोगीरावरून खाली वाकून बर्फावरच्या विचित्र खुणांकडे पहात असलेले त्याला दिसले. कुणीतरी दातेरी चाक फिरवीत न्यावे तसा पट्टा बर्फाळ पृष्ठभागावर उमटला होता. गुंतागुंतीच्या नक्षीदार खुणांचे हे ठसे मागे ठेवून एखादे बेरकी छोटे जनावर पसार झाले होते. ते जनावर कोणत्या दिशेने प्रवास करीत होते याची निश्चिती करणे अवघड होते. पण बटालियन कमांडर त्यामुळे थांबले नव्हते. त्या खुणांपासून दोन पावले अंतरावर हिमाच्या पांढऱ्या भुकटीत माणसाच्या पावलांच्या खुणा उमटल्या होत्या. ते पायांचे ठसे अगदी स्पष्टपणे जंगलाच्या दिशेने गेले होते व तो आगंतुक पोलिश बाजूकडून आला होता यात तिळ-मात्र शंका नव्हती. बटालियन कमांडरनी घोड्याला टाच दिली आणि ठशांचा माग घेत ते पहाऱ्याच्या वाटेवर गेले. पोलिश बाजूला दहा-बारा पावले अंतरापर्यंत त्या पायांच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या.

"रात्री कुणीतरी सीमा ओलांडून आलं होतं," बटालियन कमांडर पुटपुटले. "तिसरी पलटण परत झोपा काढतेय! सकाळच्या अहवालात याचा काही उल्लेख नाही!" गावरीलोव यांच्या पांढऱ्या होत चाललेल्या मिशीवर श्वासोच्छ्वासामुळे रूपेरी चमक आली होती.

दूर अंतरावर दोन आकृती येताना दिसल्या. एका छोट्या आकृतीने काळा कोट घातला होता व तिच्या फ्रेंच बागनेटाचे पाते उन्हात चकाकत होते. दुसरी पिवळ्या कातडी कोटातली धिप्पाड आकृती होती. अबलख घोडीच्या कुशीत ढोसणी बसताच ती सावरली व दोन्ही घोडेस्वार वेगाने त्या जवळ येणाऱ्या आकृतींच्या जोडीपाशी दौडले. त्यांना नजीक आलेले पाहताच

लाल सैनिकाने खांद्यावरची रायफल सावरली आणि सिगरेटचे थोटुक बर्फात थुंकून टाकले.

"रामराम कॉम्रेड! तुमच्या भागातली परिस्थिती कशी आहे?" बटालियन कमांडरनी हस्तांदोलनासाठी हात पुढे करीत लाल सैनिकाला विचारले. त्या सैनिकाने घाईघाईने हातमोजा काढून हस्तांदोलन केले. तो सीमा रक्षक एवढा उंच होता की, त्याच्याशी हस्तांदोलन करताना कमांडरना घोगीरावरून फारसे ओणवे व्हावे लागले नाही.

पोलिश सैनिक दुरून पहात होता. ते दोन लाल सेनेचे अधिकारी एका साध्या सैनिकाशी अगदी मित्रासारखे वागत होते. (तीन चौकोन–म्हणजे मेजरचा हुद्दा). क्षणभर त्याच्या डोळ्यांसमोर दृश्य उभे राहिले की, तो मेजर झाक्झे-वस्कीबरोबर हस्तांदोलन करीत आहे. पण केवळ ह्या विचारानेच त्याला एवढा धक्का बसला की, त्याने पटकन मागे वळून आसपास कुणी नाही याची खात्री करून घेतली.

"आत्ताच पहाऱ्यावर हजर झालो कॉम्रेड बटालियन कमांडर." लाल सैनिकाने म्हटले.

"तिथले ठसे पाहिले?"

"अजून नाही."

"रात्री दोनपासून सकाळी सहापर्यंत इथं पहाऱ्यावर कोण होतं?"

"सूरोतेन्को."

"ठीक आहे. पण जरा डोळे उघडे ठेवा."

घोड्याला टाच मारण्यापूर्वी कमांडरनी थोड्या कडक शब्दात बजावले:

"त्या माणसांपासून जरा जपून रहा."

सीमेपासून बेरेझ्दोवकडे जाणाऱ्या रुंद रस्त्यावरून मंद चालीने घोड्यावरून जाता जाता कमांडर आपल्या सोबत्याला सांगू लागले : "सीमेवर डोळ्यात तेल घालून रहावं लागतं. छोट्याशा चुकीची फार मोठी किंमत द्यावी लागते. आमच्या कामात बारीकशी डुलकी घेणं परवडत नाही. दिवसाढवळ्या सीमा चोरून ओलांडणं तेवढं सोपं नाही. पण रात्री आम्हाला फार सावध रहावं लागतं. कॉम्रेड कोर्चागिन, आता तुम्हीच बघा – माझ्या क्षेत्रात सीमारेषा चार खेड्यांमधून गेलीय आणि त्यामुळं बरीच गुंतागुंत होते. तुम्ही कितीही जवळजवळ पहारेकरी ठेवलेत तरी एका बाजूचे नातेवाईक दुसऱ्या बाजूच्या नातेवाईकांकडं प्रत्येक लग्नसमारंभाला आणि सणाला हटकून हजर! आणि त्यात आश्चर्य तरी कसलं? दोन बाजूंच्या झोपड्यांमधलं अंतर जेमतेम वीस-पंचवीस पावलं! ओढ्याचं पात्र एवढं उथळ की कोंबडी सहज इकडून तिकडं धावते! थोडीफार चोरटी मालवाहतूकही होते. अर्थात प्रमाण फारच किरकोळ. म्हणजे एखादी म्हातारी पोलिश वोदकाच्या एक-दोन बाटल्या चोरून इकडं आणते. पण काही पैसेवाले लोक मात्र मोठ्या प्रमाणात चोरट्या मालाची वाहतूक करतात. पोलिश व्यापाऱ्यांनी सीमाभागातल्या सर्व खेड्यांमधून दुकानं उघडलीत आणि तिथं तुम्हाला हवा तो माल मिळतो, हे तुम्ही ऐकलंत? आपल्या स्वत:च्या दरिद्री शेतकऱ्यांसाठी काही त्यांनी ती दुकानं उघडलेली नाहीत हे स्पष्ट आहे."

बटालियन कमांडरचे बोलणे ऐकत असताना कोर्चागिनच्या मनात विचार येत होते की, सीमेवरचे जीवन म्हणजे अखंड टेहळणीची कामगिरी होती.

"चोरट्या मालवाहतुकीपेक्षाही आणखी गंभीर स्वरूपाच्या

ढाल्चाली चालू असाव्यात असं तुम्हाला वाटत नाही कॉम्रेड ...वरीलोव ?”

“नेच तर खरं दुखणं आहे...” बटालियन कमांडर खिन्नपणे म्हणाले.

बेरेझ्दोव हे जंगलपिछाडीचे एक छोटेसे गांव होते. यहुद्यांची ... प्रामुख्याने वस्ती होती. गांवात दोन-तीनशे छोटी घरे ...कळीतपणे विखुरलेली होती व गांवाच्या मधल्या मोठ्या ...कात पाच--पंचवीस दुकाने होती. चौकात कमालीची घाण ...ी. गांवाच्या सभोवताली शेतकऱ्यांच्या झोपड्या होत्या. ...द्यांच्या मध्यवर्ती विभागात, खाटिकखान्याच्या रस्त्यावर ... यहुद्यांचे देऊळ होते. ती अगदी मोडकळीला आलेली ...जुनाम इमारत होती. अजूनही शनिवारी देवळात लोकांची ...र्दी होत असली तरी त्याचे बहराचे दिवस सरले होते आणि ...थला राबी अनिच्छेने जगत होता. १९१७ साली जे काही ...डले होते ते खरोखरीच अतिवाईट असले पाहिजे असे राबीचे ... झाले होते. कारण ह्या एका टोकाच्या ओसाड गावातली ...का पोरेही राबीला योग्य तो मान देईनाशी झाली होती. ...तारी माणसे अजून निषिद्ध अन्न खात नव्हती हे खरे, ... परमेश्वराने वाईट ठरवलेले डुकराचे मांस बरीच तरुण ...ळी खाऊ लागली होती. केवळ या विचारानेच कसेसे होत ... आणि संतापाच्या भरात एकदा रेबे बोरुखने उकीरड्यावर ...ड. खुपमणाऱ्या एका डुकराच्या कुशीत सणसणीत लाथ ...ली होती. बेरेझ्दोवला प्रादेशिक केंद्र बनविले होते हे ...बेला मुळीच आवडले नव्हते. तसेच हे कम्युनिस्ट कुठून ...उगवले होते ते केवळ सैतानच जाणे! पण त्यांनी सगळया

गोष्टींची चालवलेली उलथापालथ राबीला अजिबात पसंत नव्हती. दररोज काही ना काही अप्रिय घडत होते. उदाहरणार्थ, काल पाद्र्याच्या घराच्या फाटकावर एक नवी पाटी लागलेली त्याने पाहिली होती. तिच्यावर लिहिले होते:

बेरेझ्दोव विभागीय समिती युक्रेनचा कम्युनिस्ट युवक संघ

या पाटीमुळे वाईटापेक्षा दुसरे काही घडेल अशी अपेक्षा करणेच व्यर्थ होते, असा विचार राबीच्या मनात आला. आपल्या विचारात राबी एवढा गुंतला होता की, त्याच्या देवळाच्या दारावरच एक छोटे निवेदन चिकटवलेले होते हे प्रत्यक्ष दाराशी जाईपर्यंत त्याच्या ध्यानात आले नाही. निवेदनात लिहिले होते:

> कामकरी तरुणांची सार्वजनिक सभा आज क्लबात होईल. कार्यकारी समितीचे अध्यक्ष लिसीत्सीन आणि कम्सामोल जिल्हा समितीचे हंगामी चिटणीस कोर्चागिन यांची भाषणे होतील. सभेनंतर नऊ-वार्षिक विद्यालया-च्या विद्यार्थ्यांचे करमणुकीचे कार्यक्रम होतील.

रागाने राबीने तो कागद टराटरा फाडला. "संघर्षाला सुरुवात झाली होती."

स्थानिक चर्चला लागूनच असलेल्या मोठ्या उद्यानाच्या मध्यभागी एक जुन्या धाटणीचे उभे होते. हे घर पूर्वी पाद्र्याचे होते. पाद्री आणि त्याची बायको अशी दोन एकमेकांना कमालीची कंटाळलेली म्हातारी माणसे त्या घरात रहात होती. घरातल्या रिकाम्या खोल्यांच्या कुबट वातावरणात निर्जीवपणा भरून राहिलेला होता. ते घर आणि त्यात

राहणारी माणसे अशी दोन्ही जीर्णशीर्ण बनलेली होती. पण त्या घराच्या नव्या मालकांनी तेथे प्रवेश करताच पूर्वीचा सारा भयाणपणा निघून गेला. धार्मिक वृत्तीचे पूर्वीचे निवासी केवळ धार्मिक सणांच्या दिवशी मोठ्या दिवाणखान्यात पाहुण्यांचे आगतस्वागत करीत असत. पण आता त्या हॉलमध्ये लोकांची सतत वर्दळ असे, कारण त्या घरात बेरेझ्दोवच्या कम्युनिस्ट पक्ष समितीचे मुख्य ठाणे होते. पुढील दालनाच्या आतल्या अंगाच्या उजवीकडील छोट्या खोलीच्या दरवाजावर खडूने लिहिले होते: "कम्सामोल विभागीय समिती." या ठिकाणी कोर्चागिन काही वेळ काम करीत बसे. सार्वत्रिक लष्करी प्रशिक्षणाच्या दुसऱ्या बटालियनचा लष्करी कमिस्सार म्हणून तो काम करीत होता, तसेच नव्याने संघटित केलेल्या कम्सामोल विभागीय समितीचा हंगामी चिटणीस म्हणूनही तो काम पहात होता.

आन्नाच्या घरी झालेल्या त्या मेळाव्याला आठ महिन्यांचा अवधी लोटला होता, पण अगदी कालच ती घटना घडल्याप्रमाणे भासत होते. कोर्चागिनने कागदांचा ढिगारा बाजूला सारला व खुर्चीत मागे रेलून तो स्वतःच्या विचारांमध्ये बुडला...

घर स्तब्ध होते. रात्र बरीच झाली होती आणि पक्ष समितीच्या कचेरीत सारा शुकशुकाट झाला होता. विभागीय समितीचे चिटणीस त्रोफीमोव काही वेळापूर्वीच घरी गेले होते व सबंध इमारतीत कोर्चागिन एकटाच राहिला होता. बाहेर गोठलेल्या बर्फाने खिडकीवर गंमतीदार नक्षी कोरली होती, पण खोलीत मात्र उबदार होते. टेबलावर रॉकेलचा दिवा डगडगत होता. अगदी अलिकडील घटनांची कोर्चागिनने

मनातल्या मनात उजळणी केली. ऑगस्ट महिन्यात वर्कशॉपच्या कम्सामोल संघटनेने दुरुस्ती आगगाडीमधून येकातेरीनोस्लावला युवक संघटक म्हणून कोर्चागिनची पाठवणी केली होती. शरदातील अखेरच्या दिवसांपर्यंत तो आगगाडीमधील दीडशे कर्मचाऱ्यांबरोबर प्रवास करीत होता. युद्धानंतरच्या उध्वस्त परिस्थितीतील वळणावर आणण्यासाठी प्रत्येक स्टेशनावर काम करीत होता, मोडलेले डबे दुरुस्त करीत होता, जळक्या आणि छिन्नभिन्न डब्यांचे अवशेष रेलमार्गावरून काढून रस्ता मोकळा करीत होता. त्यांचा मार्ग सिनेल्निकवोपासून पोलोगपर्यंत जात होता. माखनो नांवाच्या दरोडेखोराने पूर्वी या प्रदेशात धुमाकूळ घातला होता. त्याच्या अत्याचारांच्या खुणा अजून शिल्लक होत्या. गुलाय-पोले येथे पाण्याच्या टाकीचे विटांचे बांधकाम दुरुस्त करण्यात व सुरुंगाने उडवून लावलेल्या टाकीभोवती लोखंडी पत्रे बसविण्यात एक आठवडा लोटला होता. पावेलपाशी फिटरचे कसब नव्हते आणि एवढ्या कष्टाचे काम करण्याची त्याला सवयही नव्हती. पण तरीही इतरांबरोबर त्याने पान्हा घेऊन हजारो गंजके स्क्रू पिरगाळले होते.

शरदाच्या अखेरी दुरुस्ती आगगाडी घरी परतली होती व रेल्वेच्या यंत्रशाळांमध्ये पुन्हा एकदा दीडशे माणसांचे हात राबू लागले होते...

पावेल आता आन्नाकडे वारंवार जाऊ लागला होता. त्याच्या कपाळावरची आठी नाहीशी झाली होती आणि त्याचे खळखळून हसणे पुन्हा ऐकू येऊ लागले होते.

पुन्हा एकदा रेल्वे वर्कशॉपमधले मळल्या चेहऱ्याचे त्याचे सहकारी त्याच्या तोंडून पूर्वीच्या काळच्या लढ्याच्या कथा ऐकू लागले होते. रशियाच्या मानगुटीवर बसलेल्या मुकुटधारी

नक्षमाला उलथून टाकण्यासाठी गुलाम किसानांनी केलेल्या बंडाच्या हकिकती ऐकत होते, स्तेपान राझिन व पुगाचेव यांच्या उठावाच्या कहाण्या ऐकत होते.

एके संध्याकाळी आन्नाच्या घरी नेहमीपेक्षा जास्त तरुण मंडळी जमली होती. त्यावेळी पावेलने घोषणा केली की, अगदी लहान वयात त्याला जडलेली धूम्रपानाची अपायकारक सवय तो सोडून देणार होता.

"यापुढं मी धूम्रपान करणार नाही," त्याने ठामपणे जाहीर केले.

हे सारेच अनपेक्षितपणे घडले होते. तेथे हजर असलेला एक तरुण बोलता बोलता म्हणाला की, सवय – उदाहरणार्थ, धूम्रपानाची – ही निर्धारापेक्षा जास्त शक्तीमान असते. त्यावर बरेच मतभेद झाले. प्रथम पावेल काहीच बोलला नव्हता. मग त्याने त्याला वादविवादात ओढले.

"माणसाचं आपल्या सवयींवर नियंत्रण असतं. माणूस सवयींचा गुलाम नसतो. नाहीतर आपल्या पदरी पडणार काय?"

"ऐकायला चांगल वाटतं, होय की नाही?" एका कोपऱ्यातून त्स्वेतायेव उद्गारला. "कोर्चागिनला लंब्याचवडच्या बाता मारायची आवड आहे. पण आपला शहाणपणा तो स्वतःच्या बाबतीत का वापरत नाही? तो धूम्रपान करतो, होय ना? ही सवय घाण आहे हे त्याला माहीत आहे. अगदी छान माहीत आहे. पण म्हणून ती सवय सोडून देणाऱ्यातला तो नाही." मग सूर बदलून त्स्वेतायेव खवचटपणे म्हणाला: "अलिकडंच अभ्यास मंडळांमध्ये 'संस्कृतीप्रसार' करण्यात तो गुंतला होता. पण म्हणून अभद्र भाषा बोलायची सवय

त्यानं सोडलीय? ज्याला पावेल ठाऊक आहे तो कुणीही सांगील की, पावेल नेहमी शिवीगाळ करत नाही; पण जेव्हा त्याचा पट्टा सुटतो तेव्हा मात्र कहर करतो! स्वतः आदर्श आचरणात आणण्यापेक्षा दुसऱ्यांना आदर्शाचे धडे देणं खूप सोपं आहे."

एक विचित्र शांतता एकदम पसरली. त्स्वेतायेवच्या तिखट बोलण्यामुळे उपस्थित मंडळी गप्प झाली होती. कोर्चागिनने ताबडतोब प्रत्युत्तर केले नाही. सावकाशपणे त्याने ओठांमधील सिगारेट काढली आणि शांतपणे तो म्हणाला:

"यापुढं मी धूम्रपान करणार नाही."

मग थोडे थांबून तो पुढे म्हणाला:

"दीमकापेक्षा मी माझ्यासाठी म्हणून हे करतोय. जो माणूस वाईट सवय सोडू शकत नाही तो माणूस म्हणून जगायला लायक नाही. आता शिव्या वापरण्याची सवय घालवली पाहिजे मला! त्या लाजिरवाण्या सवयीवर मला अजून मात करता आली नाही याची जाणीव आहे मला! पण मी सतत शिवीगाळ करत नाही हे स्वतः दीमकानंसुद्धा कबूल केलं. धूम्रपान सोडण्यापेक्षा कटाक्षानं अपशब्द न वापरणं हे जास्त अवघड आहे. म्हणून ती सवयही मी आत्ताच सोडली असं जाहीर करत नाही. पण एक दिवस नक्की सोडीन."

गोठवणारी थंडी सुरू होण्याच्या जरा आधी नदीतून वाहणाऱ्या सर्पणाच्या लाकडाच्या तराफ्यांनी प्रवाह अडवला. मग शरदातील पुरांच्या पाण्याने त्यांचा बांध फोडला आणि अत्यावश्यक इंधन पाण्याच्या जोरदार लोंढ्यांबरोबर वाहून

…. पुन्हा एकदा मदतीसाठी सोलोमेन्काने आपली माणसे …वली. यावेळी बहुमोल लाकूड वाचविण्यासाठी ही मदत …वली होती.

…नरांच्या मागे रहायची तयारी नसल्यामुळे सुमारे आठव-… कोर्चागिनने आपल्याला झालेली थंडीची बाधा लपवून …वली आणि किनाऱ्यावर लाकडाचे उंच ढीग रचण्यात त्याने …भार लावला. पण बर्फाळ पाणी आणि शरदातील बोचरी …डी यांच्यामुळे त्याच्या शरीरातील जुन्या शत्रूने डोके वर …ले व त्याला सपाटून ताप चढला. दोन आठवडेपर्यंत …भिवाताने त्याचे शरीर खिळखिळे केले. जेव्हा तो इस्पित-…तून परतला तेव्हा बाकड्यावर पाय फाकून काम करणेच …वडे त्याला शक्य होते. फोरमन त्याची ती अवस्था पाहून …दाने मान हलवायचा. काही दिवसांनंतर वैद्यकीय मंडळाने …वेलला काम करण्यास अयोग्य ठरविले. पावेलला कामावरून …ी करतानाचा पगार देण्यात आला व तो पेन्शनयोग्य …ल्याचे कागदपत्र देण्यात आले. पण पेन्शन घेण्यास त्याने …तापाने नकार दिला.

अत्यंत जड अंतःकरणाने त्याने वर्कशॉप सोडले. आपल्या …ठीवर भार देऊन तो हळूहळू फिरत असे, पण प्रत्येक पाव-…गणिक त्याला अपरंपार यातना होत. घरी भेटायला ये, …ी त्याच्या आईची अनेक पत्रे त्याला आली होती. पण …वेळी तिची आठवण होई तेव्हा त्याला तिचे निरोपाचे शब्द …वत :

"तू चांगला झाल्याशिवाय मला कधीच भेटत नाहीस!"

गुबेर्निया समितीत त्याला त्याची कम्सामोलची व पक्षाची …ची कार्डे देण्यात आली. फारसा कुणाचा निरोप न घेता

त्याने घराची वाट धरली. दोन आठवडे त्याच्या आईने त्याचे सुजलेले पाय शेकले आणि चोळले. एक महिन्यानंतर जेव्हा तो काठीशिवाय चालू लागला तेव्हा त्याच्या आनंदाला पारावार उरला नाही. पुन्हा एकदा निराशेची जळमटे झटकली गेली. तात्काळ तो गुबेर्निया केंद्रात परतला. तिथे तीन दिवस त्याने काढले आणि लष्करी प्रशिक्षण तुकडी स्थापन करण्यात कार्यकर्ता म्हणून काम करण्यासाठी प्रादेशिक लष्करी मंत्राल-याकडे संघटन खात्याने त्याची पाठवणी केली.

आणखी दोन आठवडे उलटले आणि पावेल ह्या बर्फाने झाकलेल्या छोटया गांवी दोन नंबरच्या बटालियनचा लष्करी कमिस्सार म्हणून आला. कम्सामोलच्या प्रादेशिक समितीनेही त्याच्यावर कामगिरी सोपवली होती: आसपासचे विखुरलेले कम्सामोल सदस्य एकत्र करणे व विभागात युवक संघ स्थापन करणे. अशा रीतीने आयुष्याने एक नवी झेप घेतली!

बाहेर ऊष्म्यामुळे घुसमटत होते. कार्यकारी समितीच्या अध्यक्षांच्या कचेरीच्या उघडया खिडकीमधून चेरीच्या झुडुपाची एक फांदी आत डोकावत होती. पोलिश चर्चच्या घंटेच्या बुरुजावरचा मुलामा दिलेला क्रूस उन्हामध्ये चकाकत होता. खिडकीसमोरच्या अंगणात लवदार छोटे हंसपक्षी लगबग करीत आपले खाणे शोधत होते. भोवतालच्या गवतासारखाच हिर-वागार रंग असलेले ते पक्षी कार्यकारी समितीच्या आवाराची काळजी घेणाऱ्याची मालमत्ता होते.

नुकताच मिळालेला खलिता कार्यकारी समितीच्या अध्यक्षानी अखेरपर्यंत वाचून काढला. त्यांच्या चेहऱ्यावर चिंतेचे एक सावट उमटून गेले आणि त्यांचा मोठा राठ पंजा त्यांच्या



नुपकेदार केसांमधून फिरता फिरता एके जागी स्थिरावला.

वेरेझ्दोव कार्यकारी समितीचा अध्यक्ष निकोलाय निकोलायेविच लिसीत्सीन याचे वय अवघे चोवीस वर्षांचे होते. पण त्याच्या कचेरीत काम करणाऱ्या कुणाचाही, तसेच स्थानिक पक्ष कार्यकर्त्यांचाही त्यावर विश्वास बसला नसता. त्याच्या धिप्पाड, कणखर, कठोर आणि काहीवेळा भयावह वाटणाऱ्या व्यक्तित्वामुळे त्याचे वय निदान पस्तिशीचे वाटे. त्याची शरीरयष्टी भक्कम होती, जाडजूड मानेवर भलेमोठे डोके विसावलेले होते, त्याचे तपकिरी डोळे भेदक होते व जबडा चांगला रुंद आणि भलाभक्कम होता. निळी तुमान आणि विटलेला करडा लष्करी डगला तो घाली. त्याच्या छातीच्या डाव्या खिशावर लाल ध्वजेचा किताब तो लावीत असे.

आपल्या वडिलांप्रमाणे आणि आजोबांप्रमाणे, लिसीत्सीन लहानपणापासून धातूकामगार होता. ऑक्टोबर क्रांतीपूर्वी तुला येथील दारूगोळयाच्या कारखान्यात लेथवर "हुकमत" गाजवीत होता.

त्या शरदातील रात्री कोल्या लिसीत्सीनने ज्या क्षणी बंदूक खांद्यावर टाकली व कामगारांच्या सत्तेसाठी तो लढायला गेला, तेव्हापासून अनेक घडामोडींच्या आवर्तात तो सापडला होता. क्रांतीने आणि पक्षाने लिसीत्सीनला वैभवशाली मार्गावरून वेगवेगळया मोक्याच्या स्थळांना पाठवले. एका सामान्य शिपाया-पासून तो रेजिमेंटच्या कमांडर आणि कमिस्सार पदांपर्यंत वर चढला.

लढाईची आग आणि तोफांचा गडगडाट आता भूतकाळात जमा झाले होते. निकोलाय लिसीत्सीन आता सीमेवरील एका ठिकाणी काम करीत होता. आयुष्य विशिष्ट धीम्या गतीने

जात होते आणि कार्यकारी समितीचा अध्यक्ष रात्रीमागून रात्री उशीरापर्यंत कचेरीत बसून पिकांविषयीचे अहवाल वाचत होता. आत्ता ज्या खलित्याला तो न्याहाळत होता त्यामुळे क्षणभर त्याच्या मनात अलिकडील भूतकाळ जागा झाला. अत्यंत मुद्देसूद तारेच्या भाषेत तो इशारा दिलेला होता:

> "अत्यंत गुप्त. बेरेझ्दोव कार्यकारी समितीचे अध्यक्ष लिसीत्सीन यांना.
>
> "अलिकडील काळात सीमेवर विशेष हालचाली पाहण्यात आल्या असून सीमा-प्रदेशात दहशत घालण्यासाठी सीमेपलिकडून एक मोठी टोळी पाठवण्याचा पोल प्रयत्न करीत आहेत. सावधगिरी बाळगा. अर्थखात्यातील सर्व मौल्यवान वस्तू—त्यात वसूल केलेल्या करांचा समावेश आहे—प्रादेशिक केंद्राकडे हलवाव्या असे सुचवतो."

विभागी कार्यकारी समितीच्या इमारतीत प्रवेश करणाऱ्या प्रत्येकाला लिसीत्सीन आपल्या खिडकीमधून पाहू शकत होता. आत्ता त्याने सहज वर नजर टाकली तेव्हा पावेल कोर्चागिन पायऱ्या चढत असलेला त्याला दिसला. क्षणभरानंतर दारावर टकटक आली.

"बैस, मला तुला काही सांगायचंय," पावेलशी हस्तांदोलन करीत लिसीत्सीन म्हणाला.

सुमारे एक तासभर दोघे बंद कचेरीत खलबत करीत बसून होते.

कोर्चागिन जेव्हा कचेरीतून बाहेर पडला तेव्हा दुपारचा प्रहर झाला होता. तो बाहेर येताच लिसीत्सीनची छोटी,

सुंदरी, वयापेक्षा फार गंभीर वागणारी बहीण आन्यूत्का धावतच बागेमधून पावेलपाशी आली. कोर्चागिनला पाहताच ती नेहमी प्रेमळपणे हसत असे. आतासुद्धा तिने आपल्या कापलेल्या केसांची कपाळावर पुढे आलेली एक बट मागे सारीत लाजऱ्या चेहऱ्याने त्याला अभिवादन केले.

"कोल्या कामात आहे का?" तिने विचारले. "मरीया मिखायलोवना केव्हाच्या जेवण तयार करून बसल्यात."

"नाबडतोब आत जा आन्यूत्का. तो एकटाच आहे."

दुसऱ्या दिवशी पहाटेपूर्वीच, धष्टपुष्ट घोडे जुंपलेल्या तीन गाड्या कार्यकारी समितीच्या कचेरीसमोर येऊन उभ्या राहिल्या. त्या गाड्यांबरोबर आलेल्या लोकांनी हलक्या आवाजात एकमेकांशी काही शब्दांची देवाणघेवाण केली. नंतर अर्थ खात्यामधून अनेक मोहोरबंद थैल्या आणण्यात आल्या. त्या थैल्या गाड्यांमध्ये चढविण्यात आल्या व काही मिनिटां-नंतर गाड्यांच्या चाकांचा खडखडाट हमरस्त्याच्या दिशेने विरत गेला. कोर्चागिनच्या आधिपत्याखाली गाड्यांच्या काफल्याभोवती रक्षकांचा पहारा होता. प्रादेशिक केंद्रापर्यंतचा चाळीस किलोमीटरचा प्रवास (त्यांपैकी पंचवीस किलोमीटरचा मार्ग जंगलांमधून गेलेला होता) कोणतीही दुर्घटना न घडता पार पडला. प्रादेशिक अर्थखात्याच्या तिजोऱ्यांमध्ये बहुमोल वस्तू सुरक्षितपणे ठेवण्यात आल्या.

काही दिवसांनंतर एक घोडदळ सैनिक सीमेकडून बेरेझ्दोवमध्ये दौडत आला. तो रस्त्यांमधून भरवेगाने गेला तेव्हा गांवच्या रिकामटेकड्यांच्या चकित नजरा त्याला न्याहाळत होत्या.

कार्यकारी समितीच्या फाटकाशी त्याने जमिनीवर खाली

उडी मारली आणि एका हाताने तलवार सांभाळीत आपल्या अवजड बुटांचा खडखड आवाज करीत तो पायऱ्या चढून वर गेला. चिंताग्रस्त चेहऱ्याने कपाळाला आठी घालून लिसीत्सीनने त्याच्याकडून लिफाफा घेतला. काही मिनिटांनंतर तो दूत आला होता त्या मार्गाने परत दौडत गेला.

कार्यकारी समितीच्या अध्यक्षाशिवाय इतर कुणालाही त्या लिफाफ्यातील मजकूर माहीत नव्हता. पण अशा बातमीला आपोआप पंख फुटतात. विशेषत: छोटया प्रमाणावर चोरटया मालाची वाहतूक करणाऱ्या बऱ्याच स्थानिक दुकानदारांना धोक्याचा सुगावा तात्काळ लागतो.

लष्करी प्रशिक्षण बटालियनच्या मुख्य ठाण्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या पादपथावरून दोन माणसे झपझप चालत होती. त्यांपैकी एक पावेल कोर्चागिन होता. रस्त्यावर टेहळणी करणाऱ्यांना पावेल माहीत होता. तो नेहमी पिस्तूल बाळगीत असे. पण त्याचे सहकारी, पक्ष समितीचे चिटणीस त्रोफीमोव, यांनीही कमरेला पिस्तूल लटकावले होते हे दुश्चिन्ह होते.

काही मिनिटांनंतर मुख्य ठाण्यामधून बागनेट लावलेल्या रायफली घेऊन डझनभर माणसे धावत बाहेर पडली व चौकाशी उभ्या असलेल्या गिरणीपाशी भरभर चालत गेली. स्थानिक कम्युनिस्ट पक्षाच्या आणि कम्सामोलच्या सभासदांना पक्ष समितीच्या कचेऱ्यांमधून शस्त्रास्त्रे पुरविण्यात येत होती. कझाक टोपी घालून आणि नेहमीचे मॉसर लटकावून कार्यकारी समितीचा अध्यक्ष दौडत गेला. काहीतरी घडणार होते हे स्पष्ट होते. मुख्य चौक व बाजूचे रस्ते ओसाड पडले. आसमंतात चिटपाखरू दिसत नव्हते. क्षणार्धात छोटया दुकानांच्या दारांवर प्रचंड मध्ययुगीन कुलूपकडया बसल्या व खिडक्यांवर

झापडे टाकण्यात आली. फक्त निर्भय कोंबड्या आणि डुकरे घाणीच्या ढिगाऱ्यांमधून हुंदडत होती.

शहराच्या कडेच्या बागांआड लष्करी शिपाई लपले. तेथून उघड्या मैदानांना व दूरवर पोचणाऱ्या सरळ रस्त्याला ते पानपैकी पाहू शकत होते.

लिसीत्सीनला मिळालेला खलिता त्रोटक होता :

> "गेल्या रात्री पोद्दुबेत्समध्ये चकमक झडल्यानंतर शंभर घोडेस्वारांची एक टोळी दोन लाईट मशिनगनसकट सोविएत हद्दीत घुसली आहे. सावधगिरीचे उपाय योजा. स्लावूत जंगलात टोळीने हुलकावणी दिलीय. तिच्या पाठलागावर एक लाल कझाक कंपनी पाठवलीय. ही कंपनी बेरेझ्दोवमधून दिवसा जाईल. तिलाच चुकून शत्रू समजू नका.
>
> **गावरीलोव**
>
> अलग सीमा बटालियनचे कमांडर."

एक तास उलटला असेल-नसेल तोच शहराकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक घोडेस्वार उगवला. त्याच्या पाठीमागे एक किलोमीटर अंतरावर घोडेस्वारांचा एक गट येत होता. कोर्चागिनची तीक्ष्ण नजर त्यांच्या हालचाली निरखीत होती. तो एकाकी घोडेस्वार म्हणजे सातव्या लाल कझाक रेजिमेंटचा एक तरुण लाल सैनिक होता. टेहळणीच्या कामात तो नवखा होता. त्यामुळे सावधपणे जरी तो आपला मार्ग काढीत होता तरी रस्त्याकडेच्या बागांमध्ये लपून बसलेले सैनिक त्याने पाहिले नाही. त्याला समजण्यापूर्वीच त्याच्याभोवती गराडा

पडला. भोवतालच्या झाडीमधून सशस्त्र माणसे भराभरा बाहेर आली. पण जेव्हा त्याने त्या लोकांच्या लष्करी कुडत्यांवर कम्सामोलचे चिन्ह पाहिले तेव्हा तो किंचित हसला. थोडी बातचित करून त्याने आपला घोडा मागे वळवला आणि आता दुडक्या चालीने येणाऱ्या घोडेस्वारांच्या गटाकडे तो दौडत गेला. दबून बसलेल्या सैनिकांनी लाल कझाकांना पुढे जाऊ दिले आणि बागांमध्ये पुन्हा आपल्या जागा धरल्या.

आक्रमकांची धाड फसली होती हे लिसीत्सीनला समजायला बऱ्याच दिवसांचा अवधी लोटला. तोपर्यंतचे दिवस मोठे चिंतेत गेले. लाल घोडदळाने सतत पिच्छा पुरविल्यामुळे त्या टोळीला घाईघाईने सीमेपार माघार घ्यावी लागली होती.

त्या प्रदेशात सोविएत जीवनाची उभारणी करण्याच्या कामाला एकूण एकोणवीस बोल्शेविक मोठ्या जोमाने लागले. हा नवा शासकीय विभाग होता. त्यामुळे सर्व काही तळापासून सुरू करावे लागत होते. शिवाय, सीमा जवळ असल्यामुळे सतत दक्ष रहावे लागत होते.

लिसीत्सीन, त्रोफीमोव आणि कोर्चागिन यांनी क्रियाशील कार्यकर्त्यांचा एक छोटा गट गोळा केला होता. सोविएतांच्या फेरनिवडणुकांसाठी, दरोडेखोरांविरुद्ध लढण्यासाठी, सांस्कृतिक कार्य करण्यासाठी, चोरटी मालवाहतूक थांबविण्यासाठी, ही मंडळी पहाटेपासून रात्रीपर्यंत राबत होती. शिवाय संरक्षणव्यवस्था भक्कम करण्याचे पक्षाचे आणि कम्सामोलचे काम त्यांना करावे लागत होते.

खोगीरावरून टेबलावर, टेबलावरून तरुण लष्करी प्रशिक्षार्थींच्या तुकड्या मनोभावे कवायती करीत त्या चौकांमध्ये, तेथून क्लबात आणि शाळेत, त्यानंतर दोन-तीन समित्यांच्या

ल्भा – दोन नंबरच्या बटालियनचा लष्करी कमिस्सार कोर्चागिन ञ्चा असा दिनक्रम होता. अनेकदा रात्रीच्या वेळी तो आपले मॉसर लटकावून घोडयावरून गस्त घालण्याचे काम करी. "थांब, कोण आहे तिथं?" अशा त्याच्या करडया आवाजातील आरोळीने त्या रात्रींची स्तब्धता भंग पावे आणि सीमेपलिकडून चोरटा माल घेऊन आलेल्या गाडयांच्या लगबग चाकांचा आवाज त्या पाठोपाठ ऐकू येई.

बेरेझ्दोवच्या विभागीय कम्सामोल समितीमध्ये कोर्चागिन-व्यतिरिक्त लीदा पोलेवीख आणि झेन्का राझवालीखीन यांचा समावेश होता. लीदा ही वोल्गा प्रदेशातून आलेली मुलगी होती व महिला विभागाची प्रमुख होती. झेन्का हा उंचापुरा देखणा तरुण अगदी अलिकडेपर्यंत जिम्नाशियमचा विद्यार्थी होता. राझवालीखीनला रोमांचक साहसांची फार आवड होती. शेरलॉक होम्स आणि लुई बुस्सेनार यांच्या साहसकथा त्याला तोंडपाठ होत्या. तो पक्षाच्या विभागीय समितीच्या कचेरीचा व्यवस्थापक म्हणून काम करीत होता व कम्सामोलमध्ये फक्त चार महिन्यांपूर्वी दाखल झाला असला तरी "बनचुक्याचा" आव आणीत होता. राजकीय शिक्षणाच्या कामाचा ताबा घेण्यासाठी बेरेझ्दोवमध्ये माणसाची गरज होती आणि दुसरे कुणी पाठवायला नसल्यामुळे प्रादेशिक समितीने थोडया अनिच्छेनेच राझवालीखीन याची निवड केली होती.

सूर्य माथ्यावर आला होता. उन्हाच्या झळा सर्वत्र भाजून काढत होत्या आणि सर्व प्राणीमात्र सावलीच्या आसऱ्याला धावत होते. कुत्रीसुद्धा आडोशांखाली सरकून धापा टाकीत आडवी पडली होती. एक डुक्कर मात्र विहीरीशेजारच्या

डबक्यात मनमुराद डुंबत होते. सबंध खेड्यात जीवनाची तेवढी एकच निशाणी जाणवत होती.

कोर्चागिनने घोड्याचा लगाम सोडला व गुडघ्यातील कळ ओठ दाबून सोसत त्याने खोगीरावर मांड टाकली. सूर्यापासून आडोसा धरण्यासाठी डोळ्यांवर हाताचा पंजा आडवा धरून शिक्षिका शाळेच्या पायऱ्यांवर उभी होती.

"पुन्हा लौकर भेटा कॉम्रेड कमिस्सार," ती सस्मित चेहऱ्याने म्हणाली.

घोडा अधीरपणे खूर आपटीत होता, मानेला हिसके देऊन लगाम ओढीत होता.

"अच्छा, चलतो कॉम्रेड रकीतीना. मग ठरलं तर! उद्या तुम्ही पहिला पाठ घ्यायचा."

लगाम थोडा ढिला होताच घोडा वेगाने दुडक्या चालीत दौडला. अचानक कर्कश्य किंकाळ्या पावेलच्या कानी आल्या. खेड्यांमध्ये जेव्हा आगी लागतात तेव्हा बायका जशा किंचाळ्या फोडतात तसे ते ओरडणे होते. पावेलने गर्रकन आपला घोडा मागे फिरविला तेव्हा एक शेतकरी तरुणी धापा टाकीत खेड्यात धावत येत असलेली त्याने पाहिली. राकीतीना पुढे धावली आणि त्या तरुणीला तिने अडवले. आसपासच्या झोपड्यांमधील म्हातारी-कोतारी डोकावून पाहू लागली. सारी धडधाकट माणसे शेतांवर कामाला गेलेली होती.

ती शेतकरी तरुणी ओरडत होती: "अग आई ऽ ग ऽ! भल्या माणसांनो! लौकर चला! धावा! तिथं ते एकमेकांचा खून पाडतायत!"

कोर्चागिन जेव्हा दौडत त्या तरुणीपाशी पोचला तेव्हा एव्हाना तिच्याभोवती लोकांचा गराडा पडला होता व तिच्या

ंड्या पोलक्याच्या बाहीला ओढीत सारेजण अधीरपणे तिच्यावर प्रश्नांची सरबत्ती करीत होते. पण तिच्या असंबद्ध ओरडण्यातून त्यांना काहीच उमगत नव्हते. "खून! खून!! ते त्यांना कापून काढतायत..." एवढेच शब्द ती सारखी उच्चारीत होती. विस्कटलेल्या दाढीचा एक म्हातारा आपली खालच्या कापडाची विजार एका हाताने सावरीत धावत तेथे आला.

"बोंबलणं थांबव," वेड्यासारखे ओरडणाऱ्या त्या तरुणीवर तो खेकसला. "कुणाचा खून करतायत? काय भानगड आहे? आधी तुझं केकाटणं थांबव!"

"आपली माणसं आणि पोद्‌बेत्सची माणसं... शेतांच्या हद्दीवरून पुन्हा मारामारी चाललीय. आपल्या माणसांची ते कत्तल करताहेत!"

आता सर्व उलगडा झाला होता. बायकांनी विव्हळण्याचे सूर काढले आणि म्हातारे संतापाने गरजले. सबंध खेडेभर वेगाने बातमी पसरली: "पोद्‌बेत्सची माणसं आपल्या लोकांना त्यांनी कापून काढतायत!.. पुन्हा एकदा शेतांच्या हद्दीवरून भांडण पेटलंय!" फक्त आजाराने अंथरुणाला खिळलेली माणसे घरात राहिली. बाकीच्या सर्वांनी हाताला येईल तशी हत्यारे, कुऱ्हाडी किंवा कुंपणाच्या काठ्या हाती घेतल्या आणि ते सारे शेतांकडे धावले. दरवर्षी त्या दोन खेड्यांमध्ये शेतांच्या हद्दीवरून रक्तपात घडत होता.

कोर्चागिनने घोड्यावर चाबूक ओढला आणि ते जनावर भरवेगाने दौडत निघाले. थोड्याच वेळात घोड्याने धावणाऱ्या लोकांना मागे टाकले. त्याने आपले कान मागे मुडपले होते, त्याचे खूर जमिनीवर ठरत नव्हते, दर क्षणागणिक त्याचा

वेग वाढत होता. एका छोटया टेकाडावर एक पवनचक्की आपले पंख पसरून जणू रस्ता अडवून उभी होती. उजवीकडे नदीतीराला खोलगट कुरणे होती आणि डावीकडे रायचे विस्तीर्ण शेत पार क्षितिजापर्यंत पसरले होते. पिकलेल्या धान्याच्या कणसांना वारा झोके देत होता. रस्त्याच्या कडेला पॉपीच्या फुलांचा लाल सडा पडला होता. या ठिकाणी निवांत होते आणि कमालीचे गरम होत होते. पण दूर अंतरावर जेथे नदीच्या पाण्याचा रूपेरी पट्टा सूर्यप्रकाशात न्हाऊन निघत होता तेथे लढाईच्या आरोळ्या ऐकू येत होत्या.

घोडा भरवेगाने खालच्या अंगाच्या कुरणांकडे धावत होता. "जर आत्ता हा अडखळला तर आम्हा दोघांचीही शंभर वर्षं भरली!" पावेलच्या मनात विचार चमकून गेला. पण आता थांबणे शक्य नव्हते. कानात घुमणाऱ्या वाऱ्याची शीळ ऐकत व शक्यतो घोड्याच्या पाठीशी समांतर ओणवून त्या उतारावरून पावेल दौडत राहिला.

रक्तपाती लढाई चालू होती त्या स्थळी तो एखाद्या वादळी वाऱ्यासारखा आला. एव्हाना अनेक माणसे घायाळ अवस्थेत जमिनीवर पडली होती.

रक्ताचे ओघळ चेहऱ्यावरून वहात असलेल्या एका तरुणामागे हातात कोयतीचा दांडा घेऊन एक दाढीवाला शेतकरी धावत होता. घोड्याने त्या दाढीवाल्याला जोरात धडक मारली. शेजारीच उन्हाने चेहरा रापलेला एक धिप्पाड माणूस आपल्या अवजड बुटांनी जमिनीवर पडलेल्या आपल्या शत्रूला थडाथड लाथा हाणीत होता.

त्या झगडणाऱ्या माणसांच्या घोळक्यात कोर्चागिनने भरवेगाने आपला घोडा घुसवला व क्षणार्धात सर्वांना चारी दिशांना

…विले. ती माणसे आश्चर्याच्या धक्क्यातून सावरण्याच्या …च त्याने आपला घोडा तेवढ्याच वेगात मागे फिरवून …ई माणसांवर चाल केली. पाशवीपणे वागणाऱ्या ह्या …ना दहशत घालूनच शांत करणे शक्य होते याची पावेलला …व झाली होती.

"…हटा बाजूला, डुकरांनो!" संतापाने तो गरजला. "नाहीतर … मगळ्या हरामखोरांना एकामागून एक गोळ्या … ठार मारीन!"

…णि क्रुद्ध चेहऱ्याने त्याने कमरेचे मॉसर काढून हवेत …. घोडा भराभरा गिरक्या घेत होता आणि मॉसरचे … उडत होते. एव्हाना काही लोकांनी आपले कोयते खाली … होते व माघार घेतली होती. सबंध शेतामध्ये घोडा …वीत आणि अखंड गोळ्या झाडीत कमिस्सारने दहशत … केली व परिस्थिती शेवटी काबूत आणली. ह्या …नी भांडणाच्या जबाबदारीमधून स्वत:ला चुकविण्यासाठी … अखंडपणे गोळ्या झाडणाऱ्या त्या संतापलेल्या …स्वाराच्या तावडीतून बचावण्यासाठी शेतकरी ढुंगणाला … लावून पळाले.

…दैवाने कुणीही ठार झाले नव्हते आणि घायाळ माणसे …च सुधारली. पोद्‌बेत्सला जिल्हा कोर्टात खटल्याची …वणी सुरू झाली, पण टोळीचे म्होरके शोधून काढण्याचे …चे सर्व प्रयत्न वाया गेले. अस्सल बोल्शेविकाच्या …टीने व धीराने जज्जसाहेबांनी त्या दुर्मुखल्या शेतकऱ्यांना …च्या पाशवी वर्तनाची समज दिली आणि अशा प्रकारची …ना यापुढे सहन केली जाणार नाही असे बजावून …नले.

शेतकरी म्हणाले : “कॉम्रेड जज्जसाहेब, ह्या सगळयाला जबाबदार शेतांच्या हद्दी आहेत. त्या हद्दी एकमेकीत मिसळून गेल्यात आणि दरवर्षी आमची त्यावरून भांडणं होतात.”

तरीसुद्धा काही शेतकऱ्यांना भांडणाबद्दल जाब द्यावा लागला.

एक आठवड्यानंतर वादग्रस्त शेतांपाशी एक आयोग आला आणि हद्दीची काटेकोर मोजणी त्याने सुरू केली.

आयोगाबरोबर काम करणारा म्हातारा सर्व्हेयर टेप गुंडाळता गुंडाळता कोर्चागिनला म्हणाला : “मी जमिनीचा सर्व्हेयर म्हणून गेली तीस वर्षं काम करतोय आणि नेहमी ह्या हद्दींना विभागणाऱ्या रेषांनी सगळी संकटं आणलीत.” उन्हामुळे आणि श्रमांमुळे म्हातारबाबांना दरदरून घाम फुटला होता. “कुरणं कशी विभागलीत ते पाहिलंत तर तुमचा आपल्या डोळयांवर विश्वास बसायचा नाही. एखादा दारूडासुद्धा सरळ रेषा ओढील. शेतांची अवस्था तर त्याहून वाईट आहे. तीन पावलं रुंदीचे पट्टे आणि ते एकमेकांना आडवे गेलेले! त्यांना वेगळं करता करता डोकं फिरायची वेळ येते. आणि मुलं जशी मोठी होत चाललीत तसे बाप त्यांची जमीन जास्त जास्त विभागत चाललेत. माझ्यावर विश्वास ठेवा, आणखी वीस वर्षांनंतर कसायला जमीन शिल्लक उरायची नाही. नुसतेच बिननांगरल्या जमिनीचे बांधाचे पट्टे राहतील. आत्तासुद्धा दहा टक्के जमीन अशी वाया चाललीय.”

कोर्चागिन हसला. “कॉम्रेड सर्व्हेयर, आणखी वीस वर्षांनी आपल्याकडं एकही बिननांगरलेला बांध रहायचा नाही.”

म्हाताऱ्याने त्याच्याकडे एक सौम्य कटाक्ष टाकला.

"तुम्ही कम्युनिस्ट समाजाबद्दल म्हणताय? ती फार दूरची गोष्ट आहे."

"बुदानोव्का सामुदायिक शेताबद्दल तुम्ही ऐकलंत?"

"होय. मी बुदानोव्काला गेलो होतो. पण कॉम्रेड कोर्चागिन, तो अपवाद आहे."

आयोगाची माणसे जमिनीचे मोजमाप करीत चालली होती. दोन तरुण माणसे खुंटे ठोकत होती. पूर्वी ठोकलेल्या खुंट्या आता अर्ध्या कुजून गेल्या होत्या व गवतामधून जेमतेम दिसत होत्या. पण त्याच जागी नव्या खुंट्या ठोकल्या जात आहेत अथवा नाही ते पहायला दोन्ही बाजूंना शेतकरी डोळ्यात तेल घालून उभे होते.

आपल्या भिकार तट्टाला चाबूक हाणीत तो वटवट्या गाडीवान आपल्या प्रवाशांकडे वळून म्हणाला:

"ही कम्सामोलची पोरं कुठून उगवलीत काही समजत नाही बुवा! पूर्वी असं काही नव्हतं. त्या शाळेतल्या मास्तरणीनं हा सारा उद्योग सुरू केलाय. राकीतीना तिचं नांव. कदाचित माहीत असेल तुम्हाला! साली आहे फटाकडी — सगळीवांड पोरगी, पण तिनंच गोंधळ सुरू केलाय. खेड्यातल्या सगळ्या बायांना बिथरवून टाकलंय. नाही नाही त्या नव्या कल्पना त्यांच्या डोक्यात तिनं भरवून दिल्यात आणि कटकटीला सुरुवात झाली. म्हणजे आता नवऱ्यानं बायकोला मारायची चोरी! पूर्वीच्या काळी मनात येईल तेव्हा बायलीला एक तडाखा हाणायचो आणि ती मुकाट कोपऱ्यात अंग चोरून बसायची. पण आता एवढी बोंब मारते की, च्यायला झक मारली आन् अंगाला हात लावला असं वाटायला लागतं.

आता जनता कोर्टाची धमकी घालायला लागलीय बायको! तरुण्या पोरी तर काडीमोडीची भाषा बोलतात आणि कायद्यांची भेंडोळी तोंडावर फेकतात. माझ्या गान्काचीच गोष्ट घ्या. कशी अगदी गरीब गाय होती! पण आता बायकांची प्रतिनिधी झालीय म्हणे! म्हणजे बायकांची म्होरक्या असावी, असं मला वाटतं. सगळ्या खेड्यातल्या बायका तिच्यापाशी येतात. पहिल्यांदा जेव्हा तिची ही उसाभर ऐकली तेव्हा चाबकानं फोडून काढणार होतो तिला! पण मग म्हणलं, थूत् तिच्या बायला! मसणात जाईनात! खुश्शाल वटवट करू द्यात! तशी गान्का घरकामाला वाघीण आहे."

हातमागाच्या कापडाचा सदरा गाडीवानाने घातला होता. गुंड्या लावल्या नसल्याने त्याची केसाळ छाती उघडी दिसत होती. गाडीवानाने कराकरा छाती खाजवली आणि घोड्याच्या पोटाखाली चाबूक उडवला. गाडीमधले दोन प्रवासी म्हणजे राझवालीखीन आणि लीदा होते. दोघांनाही पोद्ुबेत्समध्ये काम होते. महिला प्रतिनिधींची परिषद भरविण्याचा लीदाचा इरादा होता, तर स्थानिक संघटनेला कामाची जुळवाजुळव करायला मदत करण्यासाठी राझवालीखीनला पाठविले होते.

"तर मग तुम्हाला कम्सामोलवाले आवडत नाहीत म्हणायचे?" लीदाने गंमतीने गाडीवानाला विचारले.

उत्तर देण्यापूर्वी त्याने थोडा वेळ आपल्या छोट्या दाढीचे केस उपटले.

"तसं काही नाही... तरुणांनी गंमत करावी, नाटकं बसवावी, अशा मताचा मी आहे. चांगली विनोदी नाटकं

—त्रा खूप आवडतात. सुरवातीला आम्हाला वाटलं होतं की, —ण मंडळी अगदीच हाताबाहेर जातील. पण घडलं उलटं! —ं आणि मारामाऱ्या अजिबात चालत नाहीत म्हणे त्यांना! —ं शिकायची हौस आहे त्यांना, असं लोक बोलतात. पण ईश्वरावर त्यांचा विश्वास नाही आणि चर्च ताब्यात घेऊन —थं क्लब सुरू करायचा नेहमी प्रयत्न करत असतात. आता —चं हे वागणं मात्र बरं नव्हे. त्यामुळं म्हातारी माणसं —च्या विरुद्ध जातात. एरवी ही मंडळी तशी वाईट नाहीत. आता मला विचाराल तर ती एक फार मोठी चूक करतात. —ड्यातली सगळी खालची माणसं ती आपल्यात घेतात. जे —जुरीवर काम करतात, ज्यांची शेतं धड नाहीत अशांना —ं आपल्यात घेतात. पण श्रीमंत शेतकऱ्यांच्या पोरांना मात्र —वळ करत नाहीत."

गाडी खडखडत टेकडी उतरली आणि शाळेच्या इमारती-—मोर उभी राहिली.

देखरेख करणाऱ्या बाईने पाहुण्यांची सोय आपल्या घरात —ली होती आणि स्वतः गवताच्या गंजीवर झोपायला गेली —ती. खूप उशीरा संपलेल्या सभेहून लीदा आणि राझवालीखीन —तेच परतले होते. झोपडीत अंधार होता. लीदा —टकन कपडे उतरवून अंथरुणात शिरली आणि तात्काळ झोपी —ली. पण अचानक तिला जाग आली. राझवालीखीनचे —त तिच्या सर्वांगावरून फिरत होते. त्याचा इरादा तिला —वडतोब समजला.

"काय पाहिजे तुला?"

"शू:! लीदा, ओरडू नकोस. इथं एकट्यानं पडून रहायचा

मला कंटाळा आलाय. घोरत पडण्यापेक्षा दुसरं काही गंमतीदार सुचत नाही तुला?"

"माझ्या अंगावरचा हात काढ आणि ताबडतोब माझ्या बिछान्यापासून दूर हो!" त्याला बाजूला ढकलीत लीदा म्हणाली. राझवालीखीनच्या ओशट हसण्याची तिला नेहमी किळस यायची. त्याला काहीतरी टोचून अपमानास्पद बोलायची तिला जबरदस्त इच्छा झाली होती. पण त्याहूनही झोपेनं तिला जास्त घेरले होते. तिने पुन्हा डोळे मिटले.

"चल, ऊठ ए! तू काही जोगिणींच्या मठात लहानाची मोठी झालेली नाहीस. भाबडेपणाचं सोंग पुरे आता! तू मला चकवू शकणार नाहीस. जर खरोखरी पुढारलेली बाई असशील तर आधी माझ्या इच्छा पुऱ्या करशील आणि मग हवी तेवढी घोरत पड!"

मामला ठरला असे समजून तो पुन्हा लीदापाशी गेला व तिच्या बिछान्याच्या कडेशी बसून त्याने तिचा खांदा आपल्या हाताने गच्च धरला.

"मेल्या मसणात जा!" आता टक्क जागी झालेली लीदा ओरडली. "उद्याच मी कोर्चागिनला हे सारं सांगते."

राझवालीखीनने तिचा हात धरला आणि तिखट आवाजात तो पुटपुटला: "तुझ्या कोर्चागिनची मी मुळीच पर्वा करत नाही. आणि प्रतिकार करायचा उगा प्रयत्न करू नको. मला हवं ते मी तुझ्याकडून जबरीनं घेईन."

थोडी झटापट झाली आणि दोन सणसणीत चपराकींचा आवाज घुमला. राझवालीखीनने बाजूला उडी मारली. लीदा अंधारात चाचपडत दाराशी गेली व दार ढकलून पटकन बाहेर पळाली. बाहेर चांदणे पडले होते. संतापाने

आणि तिरस्काराने धापा टाकीत लीदा अंगणात उभी राहिली.

"ए मूर्खे, आत ये!" राझवालीखीन चिडून ओरडला. त्याने आपला बिछाना बाहेर पडवीत आणला व बाकीची रात्री तेथेच घालवली. लीदाने दाराला घट्ट कडी घातली व बिछान्यावर अंगाची मुटकुळी करून ती पुन्हा झोपी गेली.

सकाळी ते दोघे परतीच्या प्रवासाला निघाले. राझवालीखीन सामानाच्या गाडीवानाशेजारी आंबट चेहऱ्याने बसला होता व एकामागून एक सिगारेटी फुंकत होता.

"ही सोवळी कारटी खरंच जाऊन त्या कोर्चागिनपाशी चुगली करायची!" राझवालीखीनच्या मनात विचार येत होते. "ती एवढी खट असेल याची काय कल्पना? वागते अशी की जणू सौंदर्याची पुतळी लागून गेलीय, पण तसं पाहिलं तर काय आहे तिच्यात? तरी तिच्याशी समझोता केलेला बरा, नाहीतर नसती पीडा व्हायची! कोर्चागिन तसा माझ्यावर खार खाऊन आहेच."

तो लीदाच्या जवळ सरकला. स्वतःची स्वतःलाच लाज वाटून असल्याचा त्याने बहाणा केला, अगदी दीनवाणा चेहरा केला आणि क्षमायाचनेचे चार शब्द तो कसेबसे पुटपुटला.

त्याची युक्ती लागू पडली. खेड्याच्या सीमेवर पोचण्या-पूर्वीच लीदाकडून त्याने वचन मिळविले होते. त्या रात्री काय घडले ते कुणालाही न सांगण्याचे आश्वासन तिने त्याला दिले होते.

सीमेवरील खेड्यांमधून भराभरा कम्सामोल संघटना निर्माण झाल्या. कम्युनिस्ट चळवळीच्या ह्या पहिल्या नव्या अंकुरांची

विभागीय समितीच्या सदस्यांनी खूप काळजीपूर्वक जोपासना केली. कोर्चागिन आणि लीदा पोलेवीख स्थानिक कम्सामोल सदस्यांबरोबर काम करण्यात वेगवेगळया ठिकाणी बराच वेळ खर्च करीत.

खेड्यांमधून हेलपाटे मारणे राझवालीखीनला आवडत नसे. शेतकरी तरुणांचा विश्वास संपादन करणे त्याला जमत नव्हते. उलट तो सगळा गोंधळ करून ठेवायचा. लीदा आणि पावेल मात्र तरुण शेतकऱ्यांशी अगदी पटकन मैत्री जमवीत. मुलींना लीदा तात्काळ आवडून जायची, त्या तिला आपल्यापैकीच एक मानायच्या आणि कम्सामोल चळवळीबद्दल त्या मुलींमध्ये आस्था निर्माण करण्याचे काम लीदा हळूहळू करायची. कोर्चागिनला त्या विभागातील सारे तरुण लोक ओळखीत. लष्करी सेवेचे बोलावणे येऊ घातलेले सोळाशे तरुण त्याच्या बटालियनमधून प्राथमिक प्रशिक्षण घेऊन गेलेले होते. खेड्यातील प्रचाराच्या कामी कोर्चागिनच्या ॲकॉर्डियनने जेवढी महत्त्वाची कामगिरी बजावली होती तेवढी यापूर्वी कधीही नव्हती. संध्याकाळच्या वेळी गल्लीत मनोरंजनासाठी जमणाऱ्या तरुणांमध्ये पावेल आपल्या ॲकॉर्डियनमुळे खूप लोकप्रिय झाला. शोकभऱ्या, सोत्सुक युक्रेनी गाण्यांप्रमाणे आवेगपूर्ण, चित्त विचलित करणारे, कधी कणखर आणि धीरोदात्त तर कधी नाजुक आणि हळुवार असे संगीत पावेलच्या ॲकॉर्डियनवर ऐकता ऐकता अनेक झुबकेदार केसांच्या तरुणांचा कम्सामोलच्या मार्गाचा आरंभ झाला होता. ते ॲकॉर्डियन ऐकत आणि एकेकाळी रेलकामगार असलेल्या व आता लष्करी कमिस्सार आणि कम्सामोल चिटणीस असलेल्या तरुण ॲकॉर्डियन वादकालाही ऐकत. तो तरुण कमिस्सार त्यांना जे काही सांगत असे

ने ॲकॉर्डियनच्या संगीताशी एकजीव झाल्यासारखे भासे. लौकरच प्रार्थना-पुस्तकांच्या आणि बायबलांच्या जोडीला झोपड्यांमधून नवी पुस्तके दिसू लागली व खेड्यांमधून नवी गाणी घुमू लागली.

चोरटा व्यापार करणाऱ्यांना आता सीमारक्षकांखेरीज आणखी काही लोकांचीही दखल घ्यावी लागली. कम्सामोल सदस्यांच्या रूपाने सोविएत सरकारला निष्ठावंत मित्रांचा आणि उत्साही साहाय्यकांचा लाभ झाला होता. सीमेलगतच्या गावांमधील कम्सामोल संघटना शत्रूंचा माग काढण्याच्या नादात अनेकदा फार वाहवत जात आणि मग कोर्चागिनला आपल्या तरुण कॉम्रेडांच्या मदतीसाठी धावणे भाग पडे. पोद्बेत्स संघटनेचा निळ्या डोळ्यांचा चिटणीस ग्रिशूत्का खोरोवोदको हा भडक माथ्याचा, वादविवादाची हौस असलेला आणि धर्मविरोधी चळवळीत क्रियाशील असलेला तरुण होता. एकदा त्याला खाजगीरीत्या बातमी समजली की, त्या रात्री खेड्यातल्या गिरणीत चोरटा माल येणार होता. त्याने साऱ्या कम्सामोल सदस्यांना हाका घातला व प्रशिक्षणाची रायफल आणि दोन बागनेटांनिशी शस्त्रसज्ज होऊन ते ऐन मध्यरात्री गिरणीजवळ गुपचूप दबा धरून आपल्या सावजाची वाट पहात बसले. सीमा-चौकीवरही चोरट्या व्यापाऱ्यांची खबर मिळाली होती व चौकीनेही आपली माणसे धाडली होती. अंधारात ह्या दोन्ही पक्षांची झटापट झाली आणि सीमारक्षकांनी जर दक्षता बाळगली नसती तर तरुण मंडळींना जबर प्राणहानी सोसावी लागली असती. पण सीमारक्षकांनी सफाईने ह्या तरुणांना निःशस्त्र केले व खेड्यापासून चार किलोमीटर अंतरावर कैदेत डांबले.

त्यावेळी गावरीलोव यांना भेटायला कोर्चागिन आला होता. बटालियन कमांडरनी दुसऱ्या दिवशी सकाळी कोर्चागिनला ती हकिकत सांगितली तेव्हा आपल्या पोरांना सोडवून आणण्यासाठी पावेल तात्काळ घोड्यावर स्वार होऊन दौडत गेला.

पावेलला सारी हकिकत सांगताना तेथील सीमारक्षक-प्रमुख हसत म्हणाले:

"कॉम्रेड कोर्चागिन, ती पोरं चांगली आहेत आणि त्यांना काही शासन करण्याचा आमचा मुळीच इरादा नाही. पण तू त्यांची एकदा चांगली हजेरी घे. म्हणजे पुढच्या काळात आमच्या कामात ती लुडबूड करायची नाहीत."

पहारेकऱ्याने चौकीचे दार उघडले तेव्हा आतील अकरा मुले उठून उभी राहिली. शरमिंद्या चेहऱ्यांनी ती जागच्याजागी चुळबूळ करीत होती.

"पहा यांच्याकडं," मुद्दामच कठोर आवाज काढीत सीमारक्षक-प्रमुख म्हणाले. "यांनी तिथं जाऊन सगळा विचका केला. आता यांना मुख्य ठाण्यावर पाठवावं लागणार."

मग ग्रिशूत्का उसळून बोलला:

"पण कॉम्रेड साखरोव, आम्ही असा कोणता गुन्हा केलाय? त्या कुलकावर आम्ही खूप दिवसांपासून पाळत ठेवून होतो. सोविएत अधिकाऱ्यांना मदत करण्याचा आमचा हेतू होता आणि तुम्ही आम्हाला दरोडेखोर असल्याप्रमाणं चौकीत डांबून ठेवलंत!" अपमानीत झाल्याप्रमाणे त्याने तोंड फिरवले.

कोर्चागिन आणि साखरोव यांनी मोठ्या कष्टाने गंभीर चेहरे ठेवून थोडा वेळ सल्लामसलत केली. मुलांना एवढी दहशत पुरेशी आहे असे त्यांनी ठरविले.

नंतर साखरोव पावेलला म्हणाले: "तू जर त्यांच्या वतीनं हमी देत असशील आणि ते पुन्हा असले उद्योग करणार नाहीत असं वचन देत असशील, तर मी त्यांना सोडून देईन. ते आम्हाला दुसऱ्या पद्धतीनं मदत करू शकतील."

"ठीक आहे, मी त्यांच्या वतीनं तुम्हाला हमी देतो. मला ते खोटा पाडणार नाहीत अशी आशा आहे."

तरुण मंडळी गाणी गात पोद्‌बेत्सला परतली. ती भानगड मिटवून टाकण्यात आली. त्यानंतर लौकरच कायदेशीररीत्या त्या गिरणीवाल्याला अटक करण्यात आली.

मैदान-व्हिला जंगलात श्रीमंत जर्मन शेतकऱ्यांची एक वसाहत रहात होती. छोट्या गढ्यांप्रमाणे भक्कम बंदोबस्त असलेली कुलकांची घरे एकमेकांपासून अर्ध्या किलोमीटरच्या अंतरावर उभी होती. या मैदान-व्हिला भागातून आन्तोन्यूक आणि त्याची टोळी आपल्या हालचाली करीत होती. आन्तोन्यूक हा एकेकाळी झारच्या सैन्यात सार्जंट मेजर होता. आपल्या नातेवाईकांमधून त्याने अत्यंत क्रूर अशा सात गुंडांचा आपल्या टोळीत समावेश केला होता. त्यांच्यापाशी पिस्तुले होती व खेड्यांमधून वाटमाऱ्या करीत त्यांनी धुमाकूळ घातला होता. आन्तोन्यूक रक्तपात घडवायला मुळीच कचरत नसे, श्रीमंत सट्टेबाजांना लुटायला तो मागेपुढे पहात नसे, पण सोविएत कामगारांचा छळही तो तितक्याच क्रूरपणे करी. वेग हे आन्तोन्यूकचे वैशिष्टय होते. आज तो सहकारी दुकानातील दोन कारकुनांना लुबाडी, तर दुसऱ्या दिवशी त्या ठिकाणापासून तब्बल वीस किलोमीटर अंतरावरच्या पोस्टाच्या कर्मचाऱ्याला त्याने निःशस्त्र केलेले असे आणि त्याच्याजवळचा

शेवटचा कोपेक काढून घेतलेला असे. गोर्देय नांवाच्या दुसऱ्या एका दरोडेखोराशी आन्तोन्यूकची सतत स्पर्धा चालू होती. क्रूरपणात दोघेही एक-दुसऱ्याहून वाईट होते. त्यांच्या हैदोसामुळे त्या प्रदेशातील शिपाई आणि सीमारक्षक अधिकारी यांना क्षणाची उसंत लाभत नव्हती. आन्तोन्यूक सध्या बेरेझ्दोवच्या अगदी जवळच्याच प्रदेशात फिरत होता व शहराकडे जाणाऱ्या रस्त्यांवरून प्रवास करणे धोक्याचे ठरले होते. तो दरोडेखोर सारख्या हुलकावण्या देत होता. त्याच्या भोवतालचा पोलिसांचा दाब जेव्हा खूप वाढे तेव्हा सीमेपलिकडे पसार होई व काही काळ गप्प बसून अचानक अनपेक्षितपणे धाड घाली. त्याच्या ह्या हुलकावण्यांमुळे त्याच्याबद्दल सर्वांना दहशत बसली होती. त्याच्या प्रत्येक नव्या गुन्ह्याची बातमी ऐकताना लिसीत्सीन संतापाने स्वत:चे ओठ चावीत होता.

"हा साप साला किती दिवस आम्हाला चावणार? वेळीच थांबला तर ठीक आहे, नाहीतर मला स्वत:लाच त्याचा बंदोबस्त करावा लागेल," दात-ओठ आवळीत लिसीत्सीन पुटपुटायचा. कोर्चागिन आणि इतर तीन कम्युनिस्टांना सांगाती घेऊन दोन वेळा लिसीत्सीनने दरोडेखोराचा जोरदार पाठलाग केला होता, पण प्रत्येक वेळी आन्तोन्यूक हुलकावणी देऊन पसार झाला होता.

दरोडेखोरांशी सामना करण्यासाठी प्रादेशिक केंद्राकडून बेरेझ्दोवला खास तुकडी पाठविण्यात आली होती. फिलातोव नांवाच्या एक नखरेबाज तरुणाकडे त्या तुकडीचे नेतृत्व होते. सीमेवरील नियमांनुसार कार्यकारी समितीच्या अध्यक्षांकडे येऊन वर्दी देण्याऐवजी हा आढ्यताखोर तरुण सरळ सेमाकी नांवाच्या जवळच्याच खेड्यात गेला. ऐन मध्यरात्रीच्या

सुमाराला तेथे जाऊन वेशीबाहेरच्या एका घरात त्याने आपल्या माणसांसह मुक्काम केला. शेजारच्याच घरात राहणाऱ्या एका कम्सामोल सभासदाने ह्या सशस्त्र माणसांचे गूढ आगमन पाहिले व लगोलग पळत जाऊन ग्राम-सोविएतच्या अध्यक्षाला बातमी दिली. अध्यक्षाला या तुकडीबद्दल काहीच माहिती नव्हती. ते दरोडेखोर असावेत असा त्याचा समज होऊन त्याने मदतीची मागणी करणारा निरोप देऊन त्याच पोराला जिल्हा केंद्राकडे पिटाळले. फिलातोवच्या मूर्खपणामुळे प्रचंड प्राणहानी होण्याची वेळ आली होती. लिसीत्सीनने ऐन मध्यरात्री शिपायांना गोळा केले व डझनभर लोकांना बरोबर घेऊन नेमाकीमधल्या "दरोडेखोरांचा" समाचार घ्यायला तो धावला. त्या घरापर्यंत दौडत जाऊन त्यांनी त्याला वेढा घातला. दारावरच्या पहारेकऱ्याच्या डोक्यावर पिस्तुलाच्या दांड्याचा दणका मारून लिसीत्सीनने त्याला बेशुद्ध केले आणि खांद्याच्या धक्क्याने दार मोडून आत प्रवेश केला. छतावर टांगलेल्या तेलाच्या दिव्याचा मंद उजेड पडलेल्या खोलीत लिसीत्सीन व त्याच्या बरोबरची माणसे घुसली. एका हातात हातबाँब आणि दुसऱ्या हातात मॉसर घेऊन लिसीत्सीन गरजला तेव्हा त्याच्या आवाजाने खिडक्यांची तावदाने थरथरली :

"शरण या नाहीतर एका धडाक्यात तुमचे तुकडे तुकडे करून टाकीन!"

आणखी एक सेकंदाचा अवधी आणि फरशीवर पसरलेली ती झोपाळू माणसे लटपटत उठून उभी राहीपर्यंत त्यांच्यावर काडतुसांचा पाऊस पडला असता व सारेजण खलास झाले असते. पण हातबाँब उगारलेल्या लिसीत्सीनच्या दर्शनाने त्या सर्वांना

एवढी धडकी भरली की, सर्वांनी तात्काळ दोन्ही हात वर करून शरणागती पत्करली. काही मिनिटांनंतर, त्या "दरोडेखोरांना" त्यांच्या अंतर्वस्त्रांमध्येच जेव्हा बाहेर नेण्यात आले तेव्हा फिलातोवने लिसीत्सीनच्या कुडत्यावरची सन्मानाची फीत पाहिली व घाईघाईने त्याने सारा खुलासा केला.

लिसोत्सीन कमालीचा संतापला. "मूर्ख कुठला!" तिरस्काराने तो उद्‌गारला.

जर्मन क्रांतीच्या लाटांचे, हॅम्बुर्ग शहरातील अडथळ्यांवरील रायफलींच्या बारांचे अस्पष्ट प्रतिध्वनी सीमाप्रदेशापर्यंत पोचले. सीमेवर तंग वातावरण निर्माण झाले होते. आतुरतेने वर्तमान-पत्रे वाचली जात होती. पश्चिमेकडून क्रांतीचे वारे वहात होते. लाल सैन्यात स्वेच्छेने दाखल होऊ पाहणाऱ्या कम्सामोल सभासदांचे विभागीय कम्सामोल समितीत ढिगाने अर्ज येत होते. सोविएत संघ शांततेच्या धोरणाचा पुरस्कार करतो आहे आणि आपल्या शेजारी राष्ट्रांविरुद्ध युद्ध करण्याचा त्याचा मुळीच इरादा नाही, हे कम्सामोल संघटनांमधील तरुणांना समजावून देण्याचे काम करण्यात कोर्चागिन गुंतला होता. पण त्याच्या बोलण्याचा तरुणांवर फारसा प्रभाव पडत नव्हता. सबंध विभागातील कम्सामोल सदस्यांच्या दर रविवारी पाद्र्याच्या घरापुढील मोठ्या बागेत सभा भरत होत्या. एके दिवशी दुपारी तर पोद्‌बेत्सची संघटना लष्करी पद्धतीने संचलन करीत विभागीय समितीच्या आवारात आली. खिडकीमधून कोर्चागिनने त्यांना पाहिले व तो बाहेर पोर्चमध्ये गेला. अकरा मुले गुडघ्यापर्यंतचे

बूट घालून व पाठींवर मोठ्या पिशव्या बांधून प्रवेशदाराशी उभी होती. खोरोवोदको त्यांचा म्होरक्या होता.

"हा काय प्रकार आहे ग्रीशा?" कोर्चागिनने आश्चर्याने विचारले.

पण उत्तर देण्याऐवजी खोरोवोदकोने नजरेनेच पावेलला इशारा केला अणि इमारतीच्या आत तो त्याच्याबरोबर गेला. लीदा, राझवालीखीन आणि दोन इतर कम्सामोल सभासद खोरोवोदकोभोवती खुलाशासाठी गोळा झाले. खोरोवोदकोने दार लावून घेतले आणि आपल्या पांढऱ्या भुवया आकुंचित करीत तो म्हणाला:

"कॉम्रेडहो, ही सैन्यभरतीची चाचणी आहे. माझी स्वतःची खास कल्पना. आज सकाळी मी मुलांना सांगितलं की, एक गुप्त तार आली आहे आणि जर्मन भांडवलदारांविरुद्ध आपण युद्ध पुकारणार आहोत, तसंच लौकरच पोलिश पानांबरोबर लढणार आहोत. मी त्यांना सांगितलं की, मॉस्कोच्या हुकुमानुसार सर्व कम्सामोलांना बोलावलंय. ज्या कुणाला भीती वाटतेय त्यानं अर्ज करावा, म्हणजे त्याला घरी बसण्याची परवानगी देण्यात येईल. युद्धाबद्दल कुणालाही चकार शब्दानं न बोलण्याची मी त्यांना ताकीद दिलीय. फक्त पावाचा आणि चरबीचा एकेक तुकडा प्रत्येकानं बरोबर घ्यावा, ज्यांच्याजवळ चरबी नसेल त्यांनी लसूण किंवा कांदे बरोबर घ्यावेत, असा मी हुकूम दिला. खेड्याच्या बाहेर गुप्तपणं जमायचं, तिथून विभागीय केंद्रापर्यंत जायचं, नंतर प्रादेशिक केंद्रात आणि तिथं आम्हाला शस्त्रं पुरवली जातील. पोरांवर याचा केवढा जबरदस्त परिणाम झाला ते तुम्ही पहायला हवं होतं! त्यांनी मला खूप खोदून खोदून माहिती विचारायचा प्रयत्न केला.

पण मी त्यांच्या प्रश्नांना उडवून लावलं आणि कामाला लागा म्हणून सांगितलं. ज्यांना घरी बसायचंय त्यांनी तसं सांगावं. आम्हाला फक्त स्वयंसेवक हवेत. एवढं झाल्यावर पोरं आपापल्या घरी गेली आणि मग मात्र मी चिंतेत पडलो. समजा, कुणीच आलं नाही तर? जर तसं घडलं तर सबंध संघटना विसर्जित करायची आणि दुसरीकडं जायचं असं मी ठरवलं. प्राण मुठीत आणून मी खेड्याच्या बाहेर त्यांची वाट पहात बसलो. थोड्या वेळानं एकेक येऊ लागला. त्यांच्यापैकी काहीजण रडल्याचं त्यांच्या चेहऱ्यांवरून स्पष्ट दिसत होतं. पण तसं बोलून मात्र कुणी दाखवलं नाही. सारे दहाच्या दहा आले. एकही चुकार ठरला नाही. बघा आमची पोद्दुबेत्सची संघटना कशी आहे!" विजयी सुरात त्याने बोलणे आटपले.

हा सारा प्रकार ऐकून धक्का बसलेल्या लीदा पोलेवीखने जेव्हा त्याची खरडपट्टी काढायला आरंभ केला, तेव्हा तो तिच्याकडे स्तंभित होऊन पहातच राहिला.

"तू काय मला सांगतेस? त्यांची चाचणी घेण्याचा हाच सर्वोत्तम मार्ग आहे. माझं ऐक, त्यांच्यातला प्रत्येकजण अस्सल आहे. कुणीही फितुर नाही. प्रादेशिक केंद्रापर्यंत मी त्यांना रपेट घडवणार होतो. पण बिचारे कमालीचे दमलेत. कोर्चागिन, तू त्यांच्यासमोर एक भाषण मात्र केलं पाहिजेस. करशील ना? भाषणाशिवाय काही खरं नाही. लष्करभरती तात्पुरती रद्द केलीय किंवा असंच काहीतरी त्यांना सांग. पण तरीही त्यांचा आपल्याला अभिमान वाटतो वगैरे वगैरेही सांग!"

कोर्चागिन प्रादेशिक केंद्राला क्वचितच भेट देत असे, कारण प्रवासात अनेक दिवस मोडत व कामाच्या जबरदस्त ताणामुळे

विभागीय केंद्रात त्याची सतत उपस्थिती आवश्यक होती. याउलट, कोणतेही निमित्त काढून शहरात जायला राझवालीखीन सदैव तयार असायचा. अगदी नखशिखांत शस्त्रसज्ज होऊन तो प्रवासाला निघत असे. फेनीमोर कूपरच्या नायकांपैकी आपण एक आहोत, अशी तो कल्पना करीत असे. जंगलामधून जाताना तो कावळ्यांवर अथवा चपळ खारींवर बार काढी, एकट्या-दुकट्या वाटसरूला अडवी आणि तो कुठून आला, कुठे चाललाय अशासारखे प्रश्न कडक सुरात विचारी. पण शहराच्या जवळ येताच तो अंगावरची सारी शस्त्रे उतरवून ठेवी, रायफल गाडीच्या गवताखाली खुपसून ठेवी, रिवॉल्वर खिशात कोंबी आणि कम्सामोलच्या प्रादेशिक समितीच्या कचेरीत अत्यंत साळसूदपणे प्रवेश करी.

अशाच एके दिवशी राझवालीखीनने कचेरीत प्रवेश करताच प्रादेशिक समितीचा चिटणीस फेदोतोव याने पृच्छा केली: "काय तुमच्या बेरेझ्दोवची बातमी?"

फेदोतोवच्या कचेरीत माणसांची नेहमी वर्दळ असायची व सगळेजण एकाचवेळी बोलत असल्यामुळे प्रचंड गोंगाट असायचा. चार वेगवेगळ्या लोकांचे आवाज ऐकायचे, पाचव्याला उत्तर द्यायचे आणि त्याच वेळी काहीतरी लिहीत असायचे, असे काम करणे सोपे नव्हते. फेदोतोव वयाने खूप लहान असला तरी १९१९ पासूनच तो पक्षाचा सभासद होता. केवळ त्या वादळी काळातच १५ वर्षांचा पोरगा पक्षात सामील केला जाणे शक्य होते.

"आमच्याकडं चिक्कार बातम्या आहेत," शांतपणे राझवालीखीन उत्तरला. "एकाच वेळी सांगायला खूप आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत अखंड दळण चालू असतं. इतक्या

गोष्टी पहाव्या लागतात! आम्हाला सारं काही आरंभापासून करावं लागलं. मी दोन संघटना स्थापन केल्यात. आता बोला – कशासाठी इथं मला बोलावलंत?" असे म्हणून तो मोठा कामाचा आव आणीत आरामखुर्चीत बसला.

अर्थविभागाचा उपप्रमुख क्रीम्स्की याने समोरच्या टेबलावरील कागदपत्रांच्या ढिगाऱ्यातून क्षणभर मान वर करून पाहिले.

"आम्ही कोर्चागिनला बोलावलं होतं, तुला नाही," तो म्हणाला. राझवालीखीनने तंबाखूच्या धुराचा एक मोठा लोट तोंडातून सोडला.

"कोर्चागिनला इथं यायला फारसं आवडत नाही. म्हणून हातातली सारी कामं बाजूला सारून मला यावं लागलं... तसं पाहिलं तर काही चिटणीस मजा करतात बेटे! स्वत: ते काहीच कामं करत नाहीत. माझ्यासारख्या ओझ्याच्या गाढवांना सारा बोजा वहावा लागतो. जेव्हा जेव्हा कोर्चागिन सीमेवर जातो तेव्हा तेव्हा दोन-तीन आठवडे गायब होतो आणि सारं काम मला पहावं लागतं!"

विभागीय चिटणीसाच्या कामासाठी राझवालीखीन हा जास्त लायक होता, अशी त्याने स्वत:च केलेली ढोबळ सूचना त्याच्या श्रोत्यांच्या ध्यानातून सुटली नाही.

राझवालीखीन जेव्हा परत गेला तेव्हा इतरांना उद्देशून फेदोतोव म्हणाला: "हा माणूस मला फारसा आवडत नाही."

राझवालीखीनचा धूर्तपणा एके दिवशी अचानकपणे उघडकीस आला. लिसीत्सीन पत्रे गोळा करायला फेदोतोवच्या कचेरीत आला होता. काही कामासाठी विभागीय केंद्राहून येणाऱ्या कुणाही माणसाचा, प्रादेशिक केंद्रातून टपाल गोळा करून

ण्याचा प्रघात होता. त्या दोन माणसांच्या संभाषणाच्या ओघात राझवालीखीनचे खरे रूप उघडकीस आले.

निरोप देताना फेदोतोव म्हणाला: "काही असलं तरी कोर्चागिनला पाठव. इथं आम्ही त्याचा चेहरा विसरायला लागलोय."

"ठीक आहे. पण त्याला आमच्यापासून हिरावून मात्र घेऊ नका. आम्ही ते खपवून घेणार नाही."

यंदा सीमेवर ऑक्टोबर क्रांतीचा वाढदिवस नेहमीपेक्षा जास्त उत्साहाने साजरा करण्यात आला होता. सीमेवरील खेड्यांमधून उत्सव संयोजित करणाऱ्या समितीच्या अध्यक्षपदी कोर्चागिनची निवड झाली होती. पोद्‌बेत्समध्ये सभा झाल्यानंतर, शेजारच्या तीन खेड्यांमधील पाच हजार शेतकऱ्यांची अर्धा किलोमीटर लांबीची एक मिरवणूक सीमेच्या दिशेने निघाली. मिरवणुकीच्या अग्रभागी प्रशिक्षण बटालियन होती, लष्करी बँड वाजत होता व शेतकऱ्यांच्या हाती तांबड्या-किरमिजी पताका होत्या. सीमाचौक्यांशी समांतर जाणाऱ्या रस्त्याने, सोविएत हद्दीमधून, अत्यंत शिस्तीने मिरवणूक जात होती. सीमारेषेने विभागलेल्या खेड्यांच्या दिशेने ती चालली होती. पोल लोकांनी आपल्या सीमेवर अशा तऱ्हेची मिरवणूक यापूर्वी कधीही पाहिली नव्हती. मिरवणुकीच्या अग्रभागी बटालियन कमांडर गावरीलोव आणि कोर्चागिन घोड्यांवरून चालले होते, त्यांच्यामागे बँड वाजत होता, झुळुकींबरोबर पताका सळसळत होत्या व लोकांच्या गाण्यांचे सूर दूरपर्यंत घुमत होते. सणासुदीचा उत्तम पोषाख केलेले किसान तरुण मोठ्या उत्साहात होते, खेडेगावच्या मुली चिवचिव करीत

आनंदाने खिदळत होत्या, मोठ्या वयाची माणसे गंभीर चेहऱ्याने चालत होती, तर म्हाताऱ्या-कोताऱ्यांच्या मुद्रांवर विजयाचा आनंद विलसत होता. नजरेचा पल्ला पोचत होता तिथपर्यंत हा मानवी प्रवाह पसरला होता. त्याचा एक किनारा म्हणजे सीमा होती, पण मनाई रेषेपलिकडे एकानेही पाऊल ठेवले नव्हते. जनसागर संचलन करीत जात असताना कोर्चागिन पहात होता. कम्सामोलच्या गाण्याचे सूर उमटत होते:

तैगा ते सागर ब्रिटनचा
डंका वाजतो लाल सेनेचा! –

त्या सुरांपाठोपाठ मुलींचे समूहगीत ऐकू आले:

अग्गोबाई पल्याड डोंगरी
गवत कापणी करतात पोरी ऽऽ...

सोविएत पहारेकऱ्यांनी या मिरवणुकीचे सुहास्य मुद्रेने स्वागत केले. पोलिश पहारेकरी मात्र गोंधळले होते. सीमेवरील ह्या उत्सवामुळे पलिकडच्या बाजूला बरीच त्रेधा उडाली होती. वास्तविक पोलिश सेनाधिकाऱ्यांना या मिरवणुकीबाबत आगाऊ सूचना देण्यात आली होती. पण तरीही गस्तीचे घोडेस्वार अस्वस्थपणे मागे-पुढे धावपळ करीत होते. सीमेवरील रक्षकांची संख्या पाचपटींनी वाढविण्यात आली होती व कोणतीही आणीबाणी निर्माण झाल्यास तिला तोंड देण्यासाठी जवळच्याच टेकड्यांमागे राखीव फौजा दडवून ठेवण्यात आल्या होत्या. मिरवणूक काटेकोरपणे सोविएत हद्दीतूनच गेली. सारेजण मजेने चालत होते व आनंदी गाण्यांच्या सुरांनी आसमंत भरून गेला होता.

एक पोलिश पहारेकरी टेकाडावर उभा होता. तालात नाचले टाकीत मिरवणूक त्याच्या जवळ आली. संघगीताचे पहिले सूर घुमले. पोलिश सैनिकाने झटकन रायफल बाजूला करून सलामी दिली आणि कोर्चागिनच्या कानांवर स्पष्टपणे शब्द आले: "कम्युन चिरायू होवो!"

त्या पोलिश सैनिकाने हे शब्द उच्चारले होते हे त्याच्या नजरेवरून कोर्चागिनला समजले. चकित होऊन पावेलने त्याच्याकडे टक लावून पाहिले.

तो मित्र होता! त्या सैनिकी गणवेषाच्या आतील हृदयाची स्पंदने मिरवणुकीविषयी सहानुभूती व्यक्त करीत होती. पावेलने हळू आवाजात पोलिश भाषेतून त्याला अभिवादन केले:

"नमस्ते, कॉम्रेड!"

सबंध मिरवणूक समोरून जाईपर्यंत तो पहारेकरी त्याच पवित्र्यात उभा राहिला. त्या काळसर छोट्या आकृतीकडे पावेलने अनेकवेळा वळून मागे पाहिले. आता दुसरा एक पोलिश सैनिक जवळ आला. त्याच्या मिशांचे काही केस पांढरे झाले होते. त्याच्या चकचकीत टोकदार टोपीखालच्या डोळयांमध्ये कसलाही भाव नव्हता. नुकतेच जे काही ऐकले होते त्या तंद्रीत असलेला पावेल पुन्हा एकदा जणू स्वतःशीच पुटपुटला:

"नमस्ते, कॉम्रेड!"

पण त्याला प्रत्युत्तर मिळाले नाही.

गावरीलोव हसले. जे काही घडले होते ते त्यांच्याही कानांवरून गेले होते. ते पावेलला म्हणाले: "तू फार अपेक्षा करतोस! ते सारेच साधे पायदळ सैनिक नाहीत. त्यांच्यात काही राजकीय पोलिस आहेत. त्याच्या दंडावरची

आकाराची पट्टी पाहिली नाहीस? तो खात्रीनं राजकीय पोलिस होता."

मिरवणुकीचा पुढचा भाग एव्हाना टेकडी उतरत होता. पुढे सीमारेषेने दोन भागात विभागलेले खेडे होते. खेड्याचा सोविएत अर्धा भाग पाहुण्यांचे शानदार स्वागत करण्यास सज्ज होता. नदीच्या प्रवाहाच्या काठी, सीमेवरील पुलावर सारे रहिवासी वाट पहात होते. रस्त्याच्या दुतर्फा तरुण मंडळी ओळीने उभी होती. पोलिश बाजूच्या झोपडयांच्या आणि गोठयांच्या छतांवर लोकांची झुंबड उडाली होती. दुसऱ्या तीरावरील मिरवणूक ते लोक मोठ्या उत्सुकतेने पहात होते. झोपडयांच्या पायऱ्यांवर आणि बागांच्या कुंपणांशी शेतकऱ्यांचे जमाव उभे होते. मिरवणूक जेव्हा ग्रामवासियांच्या चौकटीत शिरली तेव्हा बँडने 'इंटरनॅशनल' गीत वाजवायला सुरुवात केली. नंतर पाना-फुलांनी सजविलेल्या व्यासपीठावरून आवेगपूर्ण भाषणे झाली. तरुणांनी व पांढऱ्या केसांच्या श्रेष्ठींनी जमावाला उद्देशून भाषणे केली. कोर्चागिनही आपल्या युक्रेनी मातृभाषेत बोलला. त्याचे शब्द सीमेपलिकडे ऐकू जात होते. त्याच्या जहाल शब्दांमुळे पोलिश बाजूच्या लोकांची माथी भडकतील अशी भीती वाटल्यामुळे पोलिश राजकीय पोलिसांनी खेडुतांना पांगवायला आरंभ केला. हवेत चाबूक कडाडले आणि रायफलींचे बार वाजले.

रस्ते ओस पडले. राजकीय पोलिसांनी उडविलेल्या काडतुसांना घाबरून छपरांवरची तरुण मंडळी पसार झाली. सोविएत बाजूच्या लोकांनी हे दृश्य पाहिले तेव्हा त्यांचे चेहरे गंभीर झाले. जे काही घडले होते ते पाहून संतापलेला एक म्हातारा

...नगर काही खेडुत मुलांच्या मदतीने व्यासपीठावर चढला आणि आवेशाने बोलू लागला :

"माझ्या पोरांनो, पाहिलंत? हे अस्संच आपल्याला ...गवलं जात होतं. पण आता नाही. आम्हा शेतकऱ्यांवर चाबूक उडवायची आता कुणाचीही हिंमत नाही. श्रीमंतांचा आणि त्यांच्या चाबकाच्या माराचा आपण निकाल लावलाय. आपण आता सत्तेवर आहोत आणि माझ्या मुलांनो, ती सत्ता ...क्कम धरून ठेवणं तुमच्या हाती आहे. मी म्हातारा झालोय आणि भाषणं करणं मला जमत नाही. पण मला सांगायला ...नलं तर खूप काही सांगीन. झारच्या जमान्यात आम्ही बैलां-...रखे कसे राबत होतो ते सांगीन. म्हणून त्या पलिकडच्या ...कांची आत्ताची दैना बघून वाईट वाटतंय." आपल्या ...थरत्या हाताने त्याने नदीचा दुसरा तीर दाखवला व लहान ... अथवा म्हातारी माणसे जशी रडतात तसा तो रडू ...गला.

नंतर ग्रिशूत्का खोरोवोदको बोलला. त्याचे संतापाने भरलेले ...पण ऐकताना गावरीलोवनी घोडा वळवला व पलिकडील ...गावर कुणी टिपणे घेत होते अथवा नाही ते न्याहाळले. ...ण नदीतीर ओस होता. पुलावरच्या पहारेकऱ्यालाही हलविले ...ते.

"म्हणजे परराष्ट्र मंत्रालयाकडं कोणताही निषेध खलिता ...णार नाही असं दिसतंय," स्वत:शी हसून ते म्हणाले.

एका पावसाळी शारदीय रात्री, नोव्हेंबरच्या अखेरीस, ...ल्नोन्यूक आणि त्याचे सात साथीदार यांचा रक्तपाती पाठलाग ...ुप्टात आला. मैदान-व्हिलाच्या जर्मन वसाहतीमधील एका

श्रीमंत बागाईतदाराच्या घरच्या लग्नसमारंभात दरोडेखोरांना पकडण्यात आले. ख्रोलीन्स्की कम्यूनच्या शेतकऱ्यांनी त्याचा माग लावला होता.

वसाहतीमधील लग्नसमारंभाला हे "खासे पाहुणे" आल्याची बातमी स्थानिक बायकांकडून तोंडातोंडी समजताच बारा कम्सामोल तात्काळ एकत्र जमले. हाती येतील ती शस्त्रे घेऊन गाडीमधून ते मैदान-व्हिलाकडे निघाले व तसाच बेरेङ्दोवला लगोलग निरोप त्यांनी धाडला. सुदैवाने सेमाकी येथे निरोप्याची फिलातोवच्या तुकडीशी गाठ पडली व बातमी समजताच ती तुकडी वेगाने दरोडेखोरांच्या मागावर निघाली. ख्रोलीन्स्कीच्या लोकांनी शेतवाडीला वेढा घातला व आन्तोन्यूकच्या टोळीबरोबर त्यांची रायफलींची चकमक सुरू झाली. टोळीने वाड्याच्या एका छोट्या भागात दबा धरला व रायफलच्या पट्ट्यात येणाऱ्या प्रत्येकावर ते गोळीबार करू लागले. एकदा त्यांनी धडक मारून निसटायचा प्रयत्न केला, पण त्यांच्यातील एकजण ठार झाला आणि त्यांना आसऱ्यासाठी मागे पळावे लागले. अशाप्रकारच्या कोंडीमध्ये यापूर्वी अनेक-वेळा आन्तोन्यूक सापडला होता व हातबाँब आणि अंधार यांच्या साह्याने नेहमी तुरी देऊन निसटला होता. यावेळीही तो पळून जाण्यात यशस्वी झाला असता, कारण झटापटीमध्ये ख्रोलीन्स्कीचे दोन कम्सामोल कामी आले होते. पण तेवढ्यात ऐन मोक्याच्या क्षणी फिलातोव आला. सारा खेळ संपल्याचे आन्तोन्यूकला समजले. पण तरीही पहाटेपर्यंत सर्व खिडक्यां-मधून तो गोळ्या झाडीत राहिला. अखेर सकाळी त्याला पकडण्यात आले. सातांपैकी एकही शरण आला नाही. ह्या विषारी सापाचे कोंडाळे नष्ट करण्यासाठी चार प्राणांचा बळी

मोजावा लागला. त्यांपैकी तिघेजण नव्याने स्थापन झालेल्या झ्रोलीन्स्की कम्सामोल गटामधील जवान मुलगे होते.

प्रादेशिक सेनांच्या शारदीय कवायतींसाठी कोर्चागिनच्या बटालियनला बोलावणे आले होते. मुसळधार पावसात बटालियनने डिव्हिजनच्या छावणीपर्यंतचे चाळीस किलोमीटर अंतर अवघ्या एका दिवसात कापले. अगदी सकाळीच तिने प्रवास सुरू केला व मुक्कामाला रात्री उशीरा ती पोचली. बटालियन कमांडर गूसेव आणि त्याचा कमिस्सार घोड्यावर होते. आठशे प्रशिक्षार्थी बराकींपर्यंत पोचले तेव्हा पुरते दमून गेले होते. पथाऱ्यांवर अंगे टाकताच सारे तात्काळ गाढ झोपी गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी कवायती सुरू व्हायच्या होत्या. बटालियनला बोलावण्यात प्रादेशिक डिव्हिजनच्या मुख्य ठाण्याकडून उशीर झाला होता. आता गणवेष परिधान केलेली व रायफली हाती धरलेली बटालियन जेव्हा पाहणीसाठी रांगेत उभी करण्यात आली तेव्हा ती नेहमीपेक्षा एकदम वेगळी भासत होती. या तरुणांना प्रशिक्षित करण्यासाठी गूसेवने आणि कोर्चागिनने असे दोघांनीही खूप कष्ट घेतले होते व सारेजण उत्तीर्ण होतील अशी त्यांना खात्री होती. अधिकृत पाहणी झाल्यानंतर आणि बटालियनने कवायतीच्या मैदानावर आपले कौशल्य दाखविल्यानंतर, एका देखण्या पण लिबलिबीत चेहऱ्याच्या कमांडरने कोर्चागिनकडे वळून तिखट स्वरात विचारले :

"तुम्ही घोड्यावर का बसला आहात? आमच्या प्रशिक्षण बटालियनांच्या कमांडरना आणि कमिस्सारना घोडे बाळगण्याचा अधिकार नाही. तुमचे घोडे तबेल्यात पाठवा आणि कवायतीं-साठी पायी येऊन वर्दी द्या."

घोड्यावरून आपण खाली उतरलो तर कवायतींमध्ये भाग घेणे आपल्याला शक्य होणार नाही, कारण पायी एक किलोमीटर जाणेही शक्य नव्हते, याची कोर्चागिनला जाणीव होती. पण कातडी पट्ट्यांनी मढलेल्या ह्या वाचाळ घमेंडीनंदनाला तो ही परिस्थिती कशी समजावून सांगणार?

"पायी कवायतींमध्ये भाग घेणं मला शक्य होणार नाही."

"का?"

काहीतरी खुलासा देणे आवश्यक आहे याची जाणीव होऊन कोर्चागिन खालच्या आवाजात उत्तरला:

"माझे पाय सुजलेले आहेत. आठवडाभराचं पळणं आणि चालणं मला सोसणार नाही. माफ करा, पण आपण कोण ते मला समजेल का कॉम्रेड?"

"पहिली गोष्ट म्हणजे मी तुमच्या रेजिमेंटचा प्रमुख आहे. दुसरी गोष्ट, त्या घोड्यावरून तुम्ही ताबडतोब खाली उतरा असा मी हुकूम देतो. जर तुम्ही अपंग असलात तर सैन्यात राहण्याचा तुम्हाला अधिकार नाही."

तोंडावर फाडकन कुणी चाबूक मारावा तसे पावेलला झाले. त्याने लगामांना झटका दिला, पण गूसेवच्या भक्कम हातांनी त्याला थोपवले. काही क्षणपर्यंत दुखावलेला अभिमान आणि आत्मसंयमन यांचे पावेलच्या मनात तुंबळ युद्ध घडले. पण पावेल कोर्चागिन म्हणजे या तुकडीमधून त्या तुकडीत सहज जाणारा एक लाल सैनिक राहिला नव्हता. आता तो एक बटालियन कमिस्सार होता आणि त्याची बटालियन त्याच्या मागे उभी होती. त्याने जर अवज्ञा केली तर शिस्तीचे किती वाईट उदाहरण त्याने आपल्या लोकांना घालून दिले असते! ह्या बढाईखोर गाढवासाठी त्याने आपली बटालियन तयार

केलेली नव्हती. रिकीबींमधून त्याने पाय काढले, तो घोड्यावरून खाली उतरला आणि सांध्यांमधील असह्य कळ दाबीत बटालियनच्या उजव्या अंगाला जाऊन उभा राहिला.

अनेक दिवसपर्यंत हवा चांगली राहिली. कवायती संपत आल्या होत्या. पाचव्या दिवशी शिपाईगडी शेपेतोवकाच्या परिसरात होते व शेपेतोवकामध्ये कवायतींची अखेर होणार होती. क्लीमेन्तोविची खेड्याच्या दिशेने स्टेशन काबीज करण्याची कामगिरी बेरेझ्दोव बटालियनवर सोपविलेली होती.

स्वतःच्या मुलखात आलेल्या कोर्चागिनने गूसेवला साऱ्या वाटा दाखविल्या. दोन भागांमध्ये विभागलेल्या बटालियनने लांबच्या पल्ल्याने "शत्रूची" पिछाडी गाठली व अचानक छापा घालून विजयी आरोळ्या ठोकीत स्टेशनच्या इमारतीत प्रवेश केला. ह्या कारवाईची खूप प्रशंसा करण्यात आली. बेरेझ्दोवच्या लोकांच्या ताब्यात स्टेशन राहिले, तर ज्या बटालियनने स्टेशन लढविले होते तिचे पन्नास टक्के सैनिक "गमावले" असे मानून तिला जंगलात माघार घेण्याचा हुकूम देण्यात आला.

कोर्चागिनकडे अर्ध्या बटालियनचे नेतृत्व होते. आपल्या लोकांना एका ओळीत उभे राहण्याचा त्याने हुकूम दिला होता व तिसऱ्या कंपनीच्या कमांडर आणि राजकीय शिक्षका-बरोबर रस्त्याच्या मध्यभागी तो उभा होता, तेवढ्यात एक लाल सैनिक धावत त्याच्यापाशी आला.

धापा टाकीत तो सैनिक म्हणाला: "कॉम्रेड कमिस्सार, नशिनगनवाले रेल्वे क्रॉसिंग धरून आहेत किंवा नाहीत याची बटालियन कमांडरना माहिती पाहिजे. कमिशन इकडंच यायला निघालंय."

पावेल आणि त्याच्याबरोबरचे कमांडर एका क्रॉसिंगपाशी गेले. रेजिमेंटचे कमांडर आणि त्यांची सहकारी मंडळी तेथे होती. यशस्वी कारवाईबद्दल गूसेवचे अभिनंदन करण्यात आले. पराभूत बटालियनच्या अधिकाऱ्यांचे चेहरे दीनवाणे झाले होते. त्यांनी स्वतःचे समर्थन करण्याचा मुळीच प्रयत्न केला नाही.

गूसेव म्हणाला: "यशाचं श्रेय मला नाही. आम्हाला वाट दाखविणाऱ्या कोर्चागिनला ते श्रेय जातं. तो याच भागामधला आहे."

रेजिमेंटप्रमुख घोड्यावरून पावेलपाशी आला व छद्मी हसून म्हणाला: "कॉम्रेड, तुम्हाला चांगलं पळता येतं! मला वाटतं, घोडा हा नुसता नखरा होता, होय ना?" तो आणखी काही कुचकट बोलण्याच्या बेतात होता. पण कोर्चागिनच्या चेहऱ्यावरचे भाव पाहताच तो एकदम गप्प झाला.

वरचे अधिकारी निघून गेले तेव्हा कोर्चागिनने गूसेवला विचारले: "तुला त्याचं नांव माहीत आहे काय?"

गूसेवने पावेलच्या खांद्यावर थाप मारली.

"त्या उपटसुंभाकडं लक्ष देऊ नको. त्याचं नांव चुझानिन. मला वाटतं, पूर्वी खालच्या हुद्द्यावरचा अधिकारी असावा."

ते नांव आपण कुठे ऐकले ते आठवण्यासाठी त्या दिवसभरात पावेलने अनेकवेळा आपल्या स्मरणशक्तीला ताण दिला. पण त्याला काही केल्या आठवले नाही.

कवायती संपल्या. खूप वाहवा मिळवून बटालियन बेरेझ्दोवला परतली. अत्यंत दमलेला कोर्चागिन एक-दोन दिवसांच्या विश्रांतीसाठी मागे स्वतःच्या घरी राहिला. दोन दिवस

ने मतत झोपून काढले आणि तिसऱ्या दिवशी आर्त्योमला यला तो इंजिनांच्या शेडमध्ये गेला. त्या काजळी धरलेल्या, चट इमारतीत पावेलला एकदम घरच्यासारखे वाटले. शाप्रमाणे त्याने कोळशाचा धूर हुंगला. ही त्याची खरी गा होती आणि इथेच राहण्याची त्याची इच्छा होती. ऱ्याला अत्यंत प्रिय असे काहीतरी हरवल्याची त्याला लक्षण भावना झाली. इंजिनाची शिट्टी ऐकल्याला कित्येक हिने लोटून गेले होते. एखादा खलाशी ज्याप्रमाणे खूप वस किनाऱ्यावर राहिल्यानंतर असीम सागराच्या सफरीवर यला जसा तळमळतो, त्याप्रमाणे एकेकाळचा हा कोळसे णारा आणि इलेक्ट्रिशियन पोरगा त्या परिचित वातावरणा-ठी आसुसला होता. ह्या भावनेवर मात करण्यासाठी त्याला राच वेळ प्रयास करावा लागला. सुटसुटीत फोर्जवर काम रणाऱ्या आपल्या भावाशी तो फारच कमी बोलला. आर्त्योमच्या पाळावर आणखी एक रेषा उमटलेली त्याच्या ध्यानात आली. आर्त्योम आता दोन पोरांचा बाप होता. त्याचे दिवस ष्टात चालले होते हे स्पष्ट दिसत होते. आर्त्योमने त्याबद्दल तक्रार केली नाही, पण पावेलला ते सहज समजले.

एक-दोन तास त्यांनी जोडीने काम केले. मग त्यांनी एकमेकांचा निरोप घेतला.

रेल्वे क्रॉसिंगपाशी पावेलने लगाम खेचून घोडा उभा केला व खूप वेळपर्यंत स्टेशनच्या इमारतीकडे त्याने टक लावून पाहिले. मग त्याने घोड्याला टाच मारली आणि जंगलातल्या वाटेवरून तो दौडत निघाला.

जंगलातील वाटा आता खूप निर्धोक बनल्या होत्या. सर्व लहान-मोठ्या दरोडेखोरांचा बोल्शेविकांनी पुरता बंदोबस्त

लावला होता व आसपासची खेडी आता शांततेने रहात होती.

दुपारच्या सुमाराला पावेल बेरेझ्दोवला पोचला. विभागीय समितीच्या व्हरांड्यातून त्याला भेटायला लीदा पोलेवीख धावतच बाहेर आली.

"शेवटी एकदाचा आलास बाई!" प्रेमळपणे हसत ती म्हणाली. "आम्हाला तुझी इथं सारखी आठवण येत होती!" तिने त्याच्या गळयाभोवती हात टाकला व ती दोघे इमारती-मध्ये गेली.

"राझवालीखीन कुठाय?" अंगातील कोट काढता काढता त्याने प्रश्न केला.

"मला ठाऊक नाही," थोडचाशा अनिच्छेने लीदा उत्तरली. "खरंच, आत्ता आठवलं! तुझ्याऐवजी समाजशास्त्राचा पाठ घ्यायला शाळेत जाणाराय, असं सकाळी म्हणाला होता. तो म्हणतो, ते काम त्याचं आहे–तुझं नव्हे!"

पावेलला ही गोष्ट चकित करणारी होती, तशीच अप्रिय होती. राझवालीखीन त्याला कधीच आवडला नव्हता. "तो शाळेत सगळा विचका करून ठेवील" असा विचार पावेलच्या मनात आला व तो कमालीचा अस्वस्थ बनला.

"बरं ते जाऊं दे," मनातल्या विचारांना पिटाळून लावीत पावेल लीदाला म्हणाला. "इथल्या चांगल्या बातम्या सांग बघू! तू ग्रूशेव्काला गेली होतीस? तिथल्या पोरांची काय हालहवाल?"

लीदा जेव्हा सारी हकिकत सांगत होती तेव्हा आपल्या दुखऱ्या स्नायूंना आराम देत पावेल आरामखुर्चीत पहुडला होता. लीदा बोलत होती:

"परवा रकीतीनाला पक्षाची उमेदवार सदस्या म्हणून घेण्यात आलं. त्यामुळं आपली पोद्दुबेत्स संघटना खूपच बळकट झाली. रकीतीना फार छान मुलगी आहे, ती मला आवडते. शिक्षक आता आपल्या बाजूला यायला लागलेत. त्यांच्यापैकी काहीजण तर एव्हाना आपल्यात सामील झालेत."

कोर्चागिन आणि पक्षाच्या विभागीय समितीचा नवा चिटणीस लीचिकोव अनेकदा संध्याकाळच्या वेळी लिसीत्सीनच्या घरी एकत्र जमत. एका भल्या मोठ्या टेबलापाशी ते तिघेही अगदी पहाटेपर्यंत अभ्यास करीत बसत.

लिसीत्सीनची बायको व बहीण ज्या खोलीत झोपत त्या खोलीचे दार घट्ट लावून घेण्यात येई आणि एका छोट्या आकाराच्या जाडजूड पुस्तकावर वाकून हे तिघेही खालच्या आवाजात चर्चा करीत. लिसीत्सीनला फक्त रात्रीच्या वेळीच अभ्यास करायला सवड मिळत असे. पण असे असले तरी जेव्हा जेव्हा पावेल आपल्या वारंवार घडणाऱ्या इतर खेड्यांच्या फेऱ्यांवरून परत येई, तेव्हा तेव्हा आपले साथीदार आपल्यापेक्षा अभ्यासात फार पुढे गेलेले पाहून त्याचा हिरमोड होई.

एके दिवशी पोद्दुबेत्सहून निरोप्याने एक बातमी आणली. कुणा अज्ञात हल्लेखोरांनी आदल्या रात्री ग्रिशूत्का खोरोवोदकोचा खून केला होता. आपल्या पायांमधील वेदना विसरून पावेल तात्काळ कार्यकारी समितीच्या तबेल्यांकडे धावला, घाईघाईने त्याने घोड्यावर खोगीर चढवले आणि भरवेगाने दौडत सीमेकडे तो निघाला.

ग्राम-सोविएतच्या झोपडीत फरच्या डहाळ्यांमध्ये एका

टेबलावर ग्रिशूत्काचा पार्थीव देह ठेवला होता आणि सोविएतची लाल ध्वजा त्याच्या अंगावर पांघरलेली होती. एक सीमारक्षक आणि एक कम्सामोल बाहेर दारावर पहारा देत होते. अधिकारी येईपर्यंत ते कुणालाही आत जाऊ देत नव्हते. कोर्चागिन झोपडीत प्रवेशला, टेबलापाशी गेला व त्याने ध्वजा बाजूला केली.

मेणासारखा थिजलेल्या चेहऱ्याचा, मृत्यूच्या वेदनेने डोळे विस्फारलेला ग्रिशूत्का एका बाजूला मान कलंडून पडला होता. कुठल्यातरी तीक्ष्ण हत्याराने त्याच्या डोक्याच्या मागील बाजूस जेथे आघात करून त्याला ठार मारण्यात आले होते, त्या जागी फरची एक डहाळी झाकली होती.

कुणी ह्या तरुणाचा बळी घेतला होता? त्याच्या विधवा आईचा तो एकुलता एक मुलगा होता. चक्की कामगार आणि गरीब किसान समितीचे सभासद असलेले त्याचे वडील, क्रांतीसाठी लढता लढता धारातीर्थी पडले होते.

आपल्या मुलाच्या मृत्यूच्या धक्क्याने म्हातारीने अंथरुणच धरले होते. तिचे शेजारीपाजारी तिचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करीत होते. आणि तिचा मुलगा आपल्या अवेळी अखेरीचे रहस्य अद्याप स्वतःपाशीच राखून थंड गोळयासारखा पडला होता.

ग्रिशूत्काच्या खुनामुळे सारे खेडे संतापले होते. ह्या तरुण कम्सामोल पुढाऱ्याचे आणि गरीब किसानांच्या कैवाऱ्याचे त्या खेड्यात शत्रूंपेक्षा मित्र जास्त असल्याचे आढळून आले.

ह्या बातमीने कमालीची बेचैन झालेली रकीतीना आपल्या खोलीत बसून हमसाहमशी रडत होती. कोर्चागिन आत आला तरी तिने मान वर करून पाहिले नाही.

"रकीतीना, कुणी त्याला ठार मारलं असावं असं वाटतं तुम्हाला?" खुर्चीत धप्पकन बसत कोर्चागिनने घोगऱ्या आवाजात विचारले.

"चक्कीतली टोळी असणार. त्या चोरट्या व्यापाऱ्यांच्या दृष्टीने ग्रीशा नेहमीच काट्यासारखा त्यांना खुपत होता."

ग्रीशा खोरोवोदकोच्या अंत्ययात्रेला दोन खेड्यांमधली माणसे लोटली. कोर्चागिनने आपली बटालियन आणली होती. त्यांच्या कॉम्रेडला अखेरची श्रद्धांजली वाहण्यासाठी सबंध कम्सामोल संघटना हजर होती. ग्राम-सोविएतसमोरील चौकात गव्रीलोवनी अडीचशे सीमारक्षकांची एक कंपनी गोळा केली होती. लाल पताकांमध्ये गुंडाळलेली शवपेटिका शोकगीताच्या सुरावटीवर बाहेर आणून चौकात ठेवण्यात आली. यादवी युद्धात बलिदान केलेल्या बोल्शेविक गनिमी सैनिकांच्या थडग्यां-शेजारी एक ताजे थडगे खणण्यात आले होते, तेथे शवपेटिका आणून ठेवण्यात आली.

ज्यांचा ज्यांचा ग्रीशाने जोरदार कैवार घेतला होता ते सारे त्याच्या मृत्यूने एकवटले. तरुण शेतमजूरांनी आणि गरीब किसानांनी कम्सामोलला पाठिंबा देण्याच्या शपथा घेतल्या. खुन्यांना शासन केलेच पाहिजे, त्यांनी बळी घेतलेल्याच्या थडग्यापाशी भर चौकात त्यांच्यावर खटला चालविला जावा, म्हणजे शत्रू कोण होते हे प्रत्येकाला दिसेल, अशा आशयाची भाषणे दफनप्रसंगी झाली.

तीन फैरी झाडण्यात आल्या आणि थडग्यावर फरच्या ताज्या डहाळ्या पसरण्यात आल्या. त्याच संध्याकाळी संघटनेने रकीतीनाची नवी चिटणीस म्हणून निवड केली. सीमाचौकी-

वरील लोक खुन्यांच्या मागावर होते, असा निरोप तेथून कोर्चागिनसाठी आला होता.

एक आठवड्यानंतर, गांवातील थिएटरमध्ये, सोविएतांची दुसरी विभागीय कॉंग्रेस भरली, तेव्हा अत्यंत गंभीर पण विजयी सुरात लिसीत्सीन म्हणाला :

"कॉम्रेडहो, गेल्या वर्षात आपण खूप काही साध्य करण्यात यश मिळवलं आहे हे जाहीर करायला मला अत्यंत आनंद होत आहे. जिल्ह्यात सोविएत सत्ता भक्कमपणं स्थापन झालीय, दरोडेखोरीचं उच्चाटन झालंय आणि चोरटा व्यापार जवळ जवळ निपटून टाकण्यात आलाय. खेड्यांमधून गरीब किसानांच्या भरभक्कम संघटना अस्तित्वात आल्यात, कम्सामोल संघटना पूर्वीहून दहापटींनी बळकट झाल्यात आणि पक्षाच्या संघटनांचा विस्तार झालाय. आपल्या कॉम्रेड खोरोवोदकोचा ज्यात बळी गेला ते पोद्दुबेत्समधलं शेवटचं कुलक-कारस्थान उघडकीला आणण्यात आलंय. चक्कीवाला आणि त्याचा जावई अशा दोन्ही खुनींना अटक झालीय. थोड्याच दिवसात गुबेर्नियाच्या फिरत्या न्यायालयासमोर त्यांच्यावर खटला चालेल. खेड्यांमधल्या अनेक प्रतिनिधीमंडळांनी मागणी केली आहे की, ह्या दरोडेखोरांना आणि दहशतवाद्यांना सर्वोच्च शासन करण्यात यावे, अशा आशयाचा ठराव प्रस्तुत कॉंग्रेसने मंजूर करावा."

टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटाने सारे सभागृह दणाणले.

"शाब्बास! सोविएत सत्तेच्या शत्रूंचा नायनाट होवो!"

लीदा पोलेवीख एका बाजूच्या दारात येऊन उभी राहिली. तिने पावेलला बाहेर येण्याची खूण केली.

"तातडीचे" असे लिहिलेला एक लखोटा तिने बाहेर

...च्यान त्याच्या हवाली केला. त्याने तो लखोटा उघडून ...ला :

> "कम्सामोलच्या बेरेझ्दोव विभागीय समितीला उद्देशून. पक्षाच्या विभागीय समितीला एक प्रत. गुबेर्निया समितीच्या निर्णयानुसार, जबाबदारीच्या कम्सामोल कार्यासाठी, कॉम्रेड कोर्चागिनला विभागीय समिती-मधून गुबेर्निया समितीमध्ये परत बोलावून घेण्यात येत आहे."

...वर्षभर पावेलने जेथे काम केले होते त्या विभागाचा ...ने निरोप घेतला. त्याच्या प्रयाणापूर्वी भरलेल्या पक्षाच्या विभागीय समितीच्या शेवटच्या सभेत दोन विषय कार्यक्रम-पत्रिकेवर होते: (१) कॉम्रेड कोर्चागिन यांची कम्सामोलमधून कम्युनिस्ट पक्षाच्या सदस्यत्वामध्ये बदली (२) कम्सामोलच्या विभागीय समितीच्या चिटणीसपदामधून त्यांची मुक्तता करण्याच्या ...ठरावावर मान्यतेचे शिक्कामोर्तब.

निरोपाच्या वेळी लिसीत्सीनने आणि लीदाने पावेलशी हस्तांदोलन करून मनःपूर्वक अभिनंदन केले, त्याला प्रेमाने आलिंगने दिली. जेव्हा आवारातून पावेलचा घोडा रस्त्यावर वळला तेव्हा डझनभर पिस्तुलांनी बार उडवून निरोपाची सलामी दिली.

प्रकरण पाचवे

फुन्दुक्लेयेव्स्काया रस्त्याच्या चढावरून ट्रामगाडी मोठ्या कष्टाने सरपटत चालली होती. तिच्या इंजिनांचा घरघराट

जोराने होत होता. ऑपेरा हाऊसपाशी ती थांबली तेव्हा तरुण मंडळींचा एक घोळका तिच्यातून खाली उतरला. ट्रामगाडीने आपला पुढील रस्ता चढायला आरंभ केला.

"आपण जरा घाई करू या, नाहीतर नक्की उशीर होईल," पानक्रातोव इतरांना म्हणाला.

थिएटरच्या प्रवेशद्वाराशी ओकुनेवने त्याला गाठले.

"तुला आठवतं गेन्का, तीन वर्षांपूर्वी आपण इथं अशाच परिस्थितीत आलो होतो. त्यावेळी "कामगारांचा विरोध" घेऊन दुबावा आपल्याकडं परत आला होता. केवढी मोठी सभा झाली होती! आणि आज पुन्हा त्याच्याशी झुंज घ्यावी लागणार आहे!"

पानक्रातोवने त्यावर काही उत्तर देण्यापूर्वी प्रथम त्यांनी आपले पास दाराशी दाखविले आणि ते प्रेक्षागृहात दाखल झाले.

"होय, आज त्याच ठिकाणी मित्यायच्या इतिहासाची पुनरावृत्ती होते आहे."

त्यांना कुणीतरी शू: ऽऽ करून गप्प बसवले. परिषदेचे सायंकालीन अधिवेशन आधीच सुरू झाले होते व मिळतील त्या खुर्च्या पकडून त्यांना बसावे लागले. व्यासपीठावरून एक तरुणी श्रोत्यांना उद्देशून बोलत होती. ती ताल्या होती.

ओकुनेवच्या बरगडीत ढोसून पानक्रातोव अस्पष्ट आवाजात म्हणाला: "आपण अगदी वेळेवर आलो. आता मुकाट बैस आणि 'बायकू' काय बोलते ते ऐक!"

"...या चर्चेत आपण खूप वेळ आणि शक्ती खर्च केलीय हे खरं आहे, पण त्यामुळं आपल्याला बरंच काही शिकायला मिळालं असं मला वाटतं. आपल्या संघटनेत आज ट्रॉट्स्कीच्या

...यांचा पराभव झाला हे नमूद करायला मला आनंद ...तो. त्यांना आपली बाजू मांडायची संधी मिळाली नाही, ...री नकार ते करू शकणार नाहीत. उलट त्यांना आपले विचार मांडायची हरप्रकारची संधी उपलब्ध होती. खरं म्हणजे आम्ही त्यांना दिलेल्या स्वातंत्र्याचा त्यांनी दुरुपयोग ...ला आणि पक्षाच्या शिस्तीचा धडधडीत अवमान केला."

ताल्या घाबरली होती. ती बोलत असताना तिच्या डोळ्यांवर ...णारी केसाची बट ज्या रीतीने मागे उडवीत होती त्यावरून तिची मानसिक अवस्था स्पष्ट समजत होती.

"वेगवेगळ्या विभागातले अनेक कॉम्रेड इथं बोलले आणि ट्रॉट्स्कीवादी ज्या कार्यपद्धतींचा वापर करतात त्यांच्याविषयी प्रत्येक वक्ता काही ना काही बोलला. या परिषदेला अनेक ट्रॉट्स्कीवादी हजर आहेत. ह्या नगर पक्ष परिषदेत त्यांचं बोलणं ऐकायची पुन्हा एकदा संधी आम्हाला मिळावी म्हणून विभागीय समित्या त्यांना मुद्दाम इथं पाठवतात. ह्या संधीचा जर ते पुरेपूर उपयोग करून घेत नसतील तर तो आमचा दोष नव्हे. विभागांमध्ये आणि संघटनांमध्ये त्यांच्या घडलेल्या संपूर्ण पराभवाने त्यांना काही धडा शिकवला आहे हे स्पष्ट आहे. कालपर्यंत जे काही ते बोलत होते तेच आत्ता या परिषदेत उभं राहून बोलण्याची त्यांच्यात हिंमत नाही."

सभागृहाच्या उजव्या कोपऱ्यातून एका कठोर आवाजाने ताल्याला या मुद्द्याशी अडवले.

"आम्हाला अद्याप आमची बाजू मांडायला मिळालेली नाही!"

त्या आवाजाच्या दिशेने वळून ताल्या म्हणाली:

"ठीक आहे दुबावा, इथं वर ये आणि बोल. आम्ही तुझं भाषण ऐकून घेऊ."

दुबावाने तिच्याकडे खिन्नपणे टक लावून पाहिले. त्याचे ओठ संतापाने थरथरत होते.

"वेळ येईल तेव्हा आम्ही बोलू!" तो उलट ओरडला. स्वत:च्या विभागात आदल्या दिवशी घडलेल्या त्याच्या सपशेल पराभवाबद्दलचे विचार त्याच्या मनात आले. ती आठवण अद्याप डाचत होती.

सभागृहात हलकीशी कुजबुज उमटली. न राहवून पानक्रातोव ओरडला: "पुन्हा एकदा पक्षाला हादरा द्यायचा विचार करतोस काय?"

दुबावाने आवाज ओळखला, पण मागे वळून पाहिले नाही. त्याने केवळ खालचा ओठ दातांमध्ये गच्च आवळला आणि मान खाली घातली.

"ट्रॉट्स्कीवादी पक्षाच्या शिस्तीचा कसा भंग करताहेत याचं ठळक उदाहरण म्हणजे खुद्द दुबावा आहे," ताल्या पुढे म्हणाली. "त्यानं खूप काळ कम्सामोलमध्ये काम केलंय, आमच्यापैकी अनेकजण त्याला ओळखतात. विशेषत: दारूगोळा कारखान्यातले कामगार. तो खार्कोव कम्युनिस्ट विद्यापीठाचा विद्यार्थी आहे. तरी गेले तीन आठवडे तो इथं श्कोलेन्को-बरोबर आहे याची आम्हा सर्वांना माहिती आहे. विद्यापीठाच्या अभ्यासाला मध्येच सोडून ते इथं का आले? या शहरातल्या प्रत्येक विभागात त्यांनी सभांमधून भाषणं केली. गेल्या काही दिवसात मिखाईलो पुन्हा ताळयावर येण्याची चिन्हं दिसताहेत हे खरं आहे. पण त्यांना इथं कुणी पाठवलं? त्यांच्याशिवाय इतर संघटनांमधले बरेच ट्रॉट्स्कीवादी इथं आहेत. त्या सर्वांनी इथं कधी ना कधी काम केलंय आणि आता पक्षात अंतर्गत कलह माजवायला ते परत आलेत. त्यांचा



...काणा त्यांच्या पक्ष संघटनांना माहीत आहे काय? ...च नाही."

...स्कीवाद्यांनी स्वतःहून पुढे यावे आणि आपल्या चुका ... कराव्या, अशी परिषदेची अपेक्षा होती. हे पाऊल ...साठी त्यांचे मन वळवू पहाण्याच्या इराद्याने ताल्याने त्यांना ...ीने आवाहन केले. बांधिलकीच्या भावनेने अनौपचारिक ... बोलावे तसे तिने थेटपणे त्यांना आवाहन केले:

"तीन वर्षांपूर्वी याच थिएटरमध्ये दुबावा माजी "कामगारांचा ...ध्र" घेऊन आमच्यापाशी आला होता. आठवतं? ...ि त्यावेळी तो काय म्हणाला होता ते आठवतं? 'पक्षाची ... आम्ही आमच्या हातून कधीही खाली पडू देणार नाही.' ... जेमतेम तीन वर्षं उलटली नाहीत तोच दुबावानं नेमकं ...च केलंय. होय, मी पुन्हा सांगते, त्यानं पक्षाची ध्वजा ...ली पडू दिलीय. तो आत्ताच म्हणाला: 'आम्हाला आमची ...जू अद्याप मांडायला मिळालेली नाही.' याचा अर्थ आणखी ...ूर जाण्याचा त्याचा आणि त्याच्या ट्रॉट्स्कीवादी सहकाऱ्यांचा ...इरादा आहे."

"तुफ्ताला वायुभारमापकाबद्दल बोलूं दे," मागच्या ओळीं-मधून एक आवाज आला. "तो त्यांचा हवामानतज्ज्ञ आहे."

त्यावर संतापलेले उद्गार उमटले:

"पाचकळ कोटया करायची ही वेळ नव्हे!"

"पक्षाशी भांडायचं ते थांबवणार आहेत किंवा नाहीत? ...याचं उत्तर त्यांना द्यायला सांगा!"

"पक्षविरोधी निवेदन कुणी लिहिलं ते त्यांना सांगायला ...लावा!"

वातावरण वर वर तापत चालले होते. शांतता प्रस्थापित

करण्यासाठी अध्यक्ष प्रदीर्घकाळ व सतत घंटा वाजवीत होते. त्या गोंगाटात ताल्याचा आवाज संपूर्ण बुडून गेला होता. काही काळ उलटल्यानंतरच ती पुन्हा आपले बोलणे पुढे सुरू करू शकली.

"दूरच्या सीमाप्रदेशातली आमची कॉम्रेड मंडळी पत्रं पाठवतात त्यातून समजतं की, अमुक अमुक गोष्टींमध्ये ती आमच्या-बरोबर आहेत. त्यामुळं आमचा उत्साह वाढतो. अशाच एका पत्रातला काही भाग मी तुमच्यापुढं वाचून दाखवते. ओल्गा युरेनेवा हिनं हे पत्र पाठवलंय. तुमच्यापैकी बऱ्याच जणांना ती माहीत आहे. कम्सामोलच्या प्रादेशिक समितीच्या संघटन खात्याची ती प्रमुख आहे."

आपल्यापुढील कागदांच्या ढिगाऱ्यातून ताल्याने एक कागद ओढून काढला, त्यावर नजर फिरवली आणि वाचायला सुरुवात केली:

"सर्व व्यावहारिक कामाकडं दुर्लक्ष झालंय. कधी नव्हती एवढी जोरदार दुष्ट मोहीम ट्रॉट्स्कीवाद्यांनी सुरू केल्यामुळं सर्व ब्यूरो सभासद गेले चार दिवस वेगवेगळ्या विभागांमध्ये गेले आहेत. काल अशी एक घटना घडली, ज्यामुळं सबंध संघटनेत संतापाची लाट उसळली. शहरात एकाही संघटनेत बहुमत मिळविण्यात अपयश आलं तेव्हा आपल्या सर्व शक्ती एकवटून प्रादेशिक लष्करी मंत्रालयाच्या संघटनेत लढा देण्याचा विरोधकांनी डाव रचला. त्या मंत्रालयाच्या संघटनेत प्रादेशिक नियोजन आयोगातील आणि शिक्षण खात्यातील कम्युनिस्टांचाही समावेश आहे. संघटनेत बेचाळीस सभासद आहेत, पण सर्व ट्रॉट्स्कीवादी तिथं टोळकं जमवून आहेत. त्या सभेत जशी पक्षविरोधी भाषणं झाली तशी आम्ही कधीही ऐकली नव्हती.

लष्करी मंत्रालयाचा सभासद उठून सरळ म्हणाला : ‘ह्या यंत्रणेनं आमचं म्हणणं मानलं नाही तर आम्ही ही यंत्रणा मोडून काढू.’ विरोधकांनी या विधानावर टाळ्या वाजवल्या. मग कोर्चागिन बोलायला उठला. ‘त्या सभासदाच्या बोलण्यावर तुम्ही टाळ्या वाजवता आणि स्वत:ला पक्षाचे सभासद कसं काय म्हणवून घेता?’ तो म्हणाला. त्यावर त्यांनी एवढा गोंधळ माजवला, खुर्च्या आदळल्या, दंगा केला, की कोर्चागिनला पुढं बोलणं अशक्य ठरलं. या बेताल वर्तनानं संतापलेल्या सदस्यांनी मागणी केली की, कोर्चागिनचं भाषण ऐकून घेण्यात यावं. पण ज्या क्षणी तो पुन्हा बोलू लागला त्या क्षणी पुन्हा पूर्वीसारखाच गोंधळ माजवण्यात आला. त्या गोंगाटावर आपला आवाज चढवून कोर्चागिन म्हणाला : ‘यालाच तुम्ही लोकशाही म्हणता तर! मी माझं भाषण करणारच!’ त्या क्षणाला विरोधकांपैकी पाचसहाजण त्याच्यावर तुटून पडले आणि व्यासपीठावरून त्याला खाली खेचू लागले. एकच दंगा माजला. पावेल झटापट करून परत गेला आणि भाषण करू लागला, तेव्हा त्यांनी व्यासपीठावरून त्याला फरफटत खाली आणलं आणि बाजूच्या एका दरवाजामधून जिन्यावर फेकलं. त्याचा चेहरा रक्तबंबाळ झाला होता. एवढं घडल्यानंतर जवळ जवळ सगळे सभासद सभा सोडून गेले. त्या प्रसंगानं अनेकांचे डोळे उघडले...”

तल्या व्यासपीठावरून खाली उतरली.

गेले दोन महिने गुबेर्निया पक्ष समितीच्या आंदोलन आणि प्रचार खात्याचा प्रमुख म्हणून काम करणारे सेगाल, अध्यक्ष-

मंडळात तोकरेव यांच्या शेजारीच बसले होते व प्रतिनिधींची भाषणे लक्षपूर्वक ऐकत होते. आत्तापर्यंत परिषदेत झालेली सर्व भाषणे केवळ तरुण मंडळींची होती व ती सारी अद्याप कम्सामोलमध्ये काम करीत होती.

"गेल्या काही वर्षांत ही तरुण मंडळी किती प्रौढ बनलीत!" सेगाल यांच्या मनात येत होते.

"विरोधकांना आत्ताच बराच मार बसलाय," सेगाल तोकरेवना म्हणाले, "आणि अवजड तोफखाना अजून मैदानात उतरवलेला नाही. तरुण मंडळी ट्रॉट्स्कीवाद्यांचा धुव्वा उडवताहेत!"

तेवढ्यात तुफ्ता झेप घेऊन व्यासपीठावर आला. नापसंतीचा जोरदार गोंगाट झाला आणि काही हास्याच्या लकेरी उमटल्या. ह्या अशा प्रकारच्या स्वागताबद्दल निषेध व्यक्त करण्यासाठी तुफ्ता अध्यक्षमंडळाकडे वळला, पण तेवढ्यात प्रेक्षागृह शांत झाले होते.

"कुणीतरी इथं मला हवामानतज्ज्ञ म्हटलं. याचा अर्थ बहुमताच्या पक्षाचे कॉम्रेड माझ्या राजकीय विचारांची अशी टवाळी करतात!" एका दमात तो बोलला.

त्याच्या ह्या शब्दांवर हसण्याचा कल्लोळ उमटला. संतापून तुफ्ताने अध्यक्षमहाशयांना म्हटले:

"तुम्ही खुशाल हसा, पण मी पुन्हा एकवार सांगतो, युवक म्हणजे वायुभारमापक. लेनिन यांनी अनेकदा याबद्दल लिहिलंय."

सभागृहात एकदम स्तब्धता पसरली.

"लेनिननी काय लिहिलं होतं?" श्रोत्यांमधून आवाज आले.

नुफ्ताला आता जोर आला.

"ऑक्टोबर उठावाची पूर्वतयारी जेव्हा चालू होती तेव्हा इतर कामगारवर्गीय युवकांना एकवटून त्यांना शस्त्रसज्ज करण्याचे आणि खलाशांबरोबर अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये लढण्याचे आदेश लेनिननी दिले होते. तो उतारा मी तुम्हाला वाचून दाखवू काय? माझ्यापाशी सारी वचनं तयार आहेत." नुफ्ताने आपल्या कातडी बॅगेत हात खुपसला.

"आम्हाला ती माहीत आहेत!"

"पण ऐक्याबद्दल लेनिननी काय लिहिलं होतं?"

"आणि पक्षशिस्तीबद्दल?"

"जुन्या रक्षकांविरुद्ध बंड करायला लेनिननी युवकांना कधी सांगितलं?"

नुफ्ताची विचारमालिका ह्या गडबडीत तुटली आणि तो दुसऱ्याच विषयाकडे वळला.

"लागूतिनानं इथं युरेनेवाकडून आलेलं एक पत्र वाचलं. चर्चेच्या ओघात जे काही अतिरेक घडले त्यांचा जबाब देण्याची अपेक्षा अर्थातच आमच्यापासून करू नये."

स्कोलेन्को शेजारी बसलेला त्स्वेतायेव संतापून फूत्कारला:

"मूर्खाला देवाच्या पूजेला पाठवावं तर तो स्वतःचंच कपाळ फोडून घेतोय!"

"अगदी बरोबर. हा गधडा आपल्याला खड्डयात घालणार!" स्कोलेन्कोने दबत्या आवाजात दुजोरा दिला.

नुफ्ताचा कर्कश्य, तारस्वरातील आवाज श्रोत्यांच्या कानांना दडे पाडीत होता:

"तुम्ही जर बहुमतवादी गट बनवलाय, तर आम्हाला अल्पमतवाल्यांचा गट बनवायचा हक्क आहे."

सभागृहात कल्लोळ माजला.

तुफ्तावर सर्व बाजूंनी संतापाच्या उद्गारांचा पाऊस कोसळू लागला.

"हे काय? पुन्हा बोल्शेविक-मेन्शेविक?"

"रशियन कम्युनिस्ट पक्ष म्हणजे पार्लमेंट नव्हे!"

"अगदी म्यास्नीकोवपासून मार्तोवपर्यंत सगळ्या प्रकारच्या गटबाजांसाठी हे काम करतायत लेकाचे!"

नदीत सूर मारण्यापूर्वी हात करतात त्याप्रमाणे तुफ्ताने हात उडवले आणि उत्तेजित स्वरात त्याने उलट सरबत्ती झाडली :

"बरोबर, गट स्थापन करण्याचं स्वातंत्र्य आम्हाला असलं पाहिजे. नाहीतर अशा सुसंघटित, शिस्तबद्ध बहुमतवाल्यां-विरुद्ध आम्ही भिन्न भिन्न विचाराची माणसं आमच्या मतांसाठी कशी लढणार?"

ओरडा वाढला. पानक्रातोव उठून ओरडला :

"त्याला बोलू द्या. त्याला काय म्हणायचं ते ऐकून तर घेऊ. इतर जे मनात ठेवतात ते तुफ्ता निदान वरळून टाकील."

सभागृह शांत झाले. आपण फार वाहवत गेलो याची तुफ्ताला जाणीव झाली. कदाचित त्याने आत्ताच ते सारे बोलायला नको होते. असे विचार मनात चमकून जाताच त्याने घाईघाईने आपले भाषण आटोपते घेतले :

"अर्थात तुम्ही आमची हकालपट्टी करून आम्हाला ढकलून देऊ शकता. हा प्रकार एव्हाना सुरू झालाय. कम्सामोलच्या गुबेर्निया समितीमधून तुम्ही मला आधीच हाकलून लावलंय. पण काही हरकत नाही. कोणाची बाजू सत्याची ते आपण

वघ्र." आणि त्याने व्यासपीठावरून खाली प्रेक्षागृहात
...ली.

...नायेवने हळूच दुबावाकडे चिठ्ठी पाठवली.

...याय, पुढचं भाषण तू कर. अर्थात त्यामुळं परिस्थिती
... बदलायची नाही. आपली इथं वाईट अवस्था होतेय
... आहे. पण तुफ्ताची चूक निस्तरली पाहिजे. तो
...च गाढव आणि बेअकली आहे."

दुबावाने बोलण्याची परवानगी मागितली आणि त्याला
... नावडतीब देण्यात आली.

... व्यासपीठावर चढला तेव्हा प्रेक्षागृहात एक आतुर
...ना पसरली. कुठल्याही भाषणाआधी निर्माण होते
... नी शांतता होती. पण त्या शांततेत काठोकाठ विरोध
...याची दुबावाला जाणीव होती. ज्या उत्साहाने संघटनांच्या
...मध्ये तो बोलला होता, त्या उत्साहाचा जोर एव्हाना
...ला होता. दर दिवसागणिक त्याचा आवेग कमी होत
...ला होता. त्याच्या माजी कॉम्रेडांकडून त्याचा सपशेल
...भव झाल्यानंतर आणि त्याला जोरदार प्रतिटोला बसल्यावर
... त्याची अवस्था पाणी शिंपडलेल्या आगीसारखी झाली
...ती. आता दुखावलेल्या अभिमानाच्या कडवट धुरात तो
...टला गेला होता व आपली चूक कबूल न करण्याच्या
...ग्रहापायी तो जास्तच कडवट बनला होता. त्याने सरळ
... मारायचा निर्धार केला होता. त्यामुळे बहुमतवाल्यांपासून
... अधिकच दुरावणार होता याची त्याला कल्पना होती.
...लताना त्याच्या आवाजात स्वरांचा अजिबात चढउतार
...व्हता, पण त्याचे बोलणे स्पष्ट होते.

"टिंगल-टवाळी करून मला बोलताना मध्येच अडथळा

करू नका किंवा चिडवू नका, अशी मी आपल्याला विनंती करतो. आमची भूमिका मला स्पष्टपणं तुमच्यासमोर मांडायची आहे. अर्थात मला आधीच माहीत आहे की त्याचा काही उपयोग नाही. तुमचं बहुमत आहे."

शेवटी त्याने जेव्हा भाषण संपवले तेव्हा सभागृहात जणू बाँबचा गोळा फुटल्याचा भास झाला. रागीट आरोळ्यांचे त्याच्यावर अक्षरशः वादळ उठले. चाबकाच्या फटकाऱ्यांप्रमाणे लोकांचे संतापलेले शब्द त्याला डसू लागले.

"धिक्कार असो!"

"फूटपाडे मुर्दाबाद!"

"आता चिखलफेक पुरे!"

दुबावा आपल्या आसनावर परत चालला होता तेव्हा सभागृहात उपरोधिक हशा उमटला. सुरी खुपसली जावी तशी वेदना दुबावाला त्या हशामुळे होत होती. त्याच्यावर लोकांनी हल्ला चढवला असता आणि बेदम मारले असते तर त्याचे त्याला वाईट वाटले नसते. पण एखाद्या सामान्य दर्जाच्या गायक नटाचा आवाज भलत्याच सुरावर चिरकल्यानंतर जी टवाळी होते ती त्याच्या वाट्याला आली होती.

"आता श्कोलेन्को बोलतील," अध्यक्षानी जाहीर केले.

श्कोलेन्को उठला. "मी बोलायचं नाकारतो."

मागच्या ओळींमधून पानक्रातोवचा खर्जातला आवाज गडगडला.

"मला बोलायचंय!"

पानक्रातोव आतून उकळतोय हे दुबावाला त्याच्या आवाजावरूनच समजले. पानक्रातोवचा जोरदार अपमान झाला असला म्हणजे त्याचा घनगंभीर आवाज गर्जत असे. पानक्रातोवची

...च. किंचित पोक काढलेली आकृती व्यासपीठाकडे झपाट्याने ...लेली दुबावाने खिन्नपणे पाहिली तेव्हा त्याच्या अंतर्मनात ... विलक्षण खळबळ माजली. पानक्रातोव काय बोलणार ... ...ला ठाऊक होते. आदल्या दिवशी सोलोमेन्का इथे ...च्या जुन्या मित्रांची झालेली भेट व विरोधकांशी त्याने ... तोडून टाकावे म्हणून त्यांनी केलेली त्याची मनधरणी, ...ला आठवली. त्स्वेतायेव आणि श्कोलेन्को त्याच्या ... होते. तोकरेव यांच्या घरी ती भेट झाली होती. ...क्रातोव, ओकुनेव, ताल्या, वोलीन्त्सेव, झेलेनोवा, स्तारो-...व आणि आर्त्यूखिन तेथे हजर होते. पुन्हा एकी निर्माण ...ण्याच्या त्यांच्या प्रयत्नांकडे दुबावाने संपूर्ण दुर्लक्ष केले होते. ...च्या चुका मान्य करण्याबाबत आपली अनिच्छा ठासून ...दाखविण्यासाठी तो चर्चेच्या मधूनच त्स्वेतायेवबरोबर उठून ...ला होता. श्कोलेन्को तेथे थांबला होता. आणि आता त्याने ...पण करायला नकार दिला होता. "कणा नसलेला बुद्धिवंत ...ला! त्याला त्यांनी आपल्या बाजूला वळवून घेतलंय हे ...उघड आहे," कडवट तिरस्काराने दुबावा स्वत:शीच बोलला. ...ा वेड्या संघर्षात तो आपल्या एकूणएक मित्रांना गमावत ...लला होता. विद्यापीठात त्याची झार्कीयशी मैत्री तुटली ...ती. "शेहेचाळीसांच्या" निवेदनावर झार्कीयने पक्षाच्या ...रोमध्ये कडाडून हल्ला चढविला होता. पुढे संघर्ष जेव्हा अधिक तीव्र झाला तेव्हा तो बोलायचा बंद झाला. त्यानंतर अनेकवेळा आन्नाला भेटायला झार्कीय त्याच्या घरी आला ...ना. दुबावा आणि आन्ना यांचा विवाह होऊन एक वर्ष झाले होते. ते वेगवेगळ्या खोल्यांमध्ये रहात. आन्नाचे आणि दुबावाचे वैचारिक मतभेद झाले होते व झार्कीयच्या वारंवार

भेटींमुळे आन्नाशी आपले संबंध अधिकच बिघडले असे दुबावाचे मत झाले होते. त्याला मत्सर वाटत होता असे कबूल करण्याची त्याची तयारी नव्हती. पण त्या परिस्थितीत आन्नाची झार्कीयशी घनिष्ट होत चाललेली मैत्री त्याला त्रासदायक वाटत होती. त्याबद्दल तो आन्नाशी बोलला होता व त्यावर दोघांचे प्रचंड भांडण होऊन वातावरण अधिकच ताणले गेले होते. आपण कुठे चाललोय हे तिला न सांगताच तो परिषदेला आला होता.

भरवेगाने निघालेली त्याच्या विचारांची गाडी पानक्रातोवच्या शब्दांमुळे अचानक थांबली.

"कॉम्रेडहो!" व्यासपीठाच्या टोकाशी वक्त्याने आपली जागा घेताच सभागृहात शब्द घुमला. "कॉम्रेडहो! नऊ दिवसपर्यंत आपण विरोधकांची भाषणं ऐकून घेतली आहेत. आणि मला प्रांजलपणं असं म्हणायचंय की, बरोबरीचे लढवय्ये, क्रांतिकारक, वर्गलढ्यातले आमचे सहकारी अशा नात्यानं ते बोलले नाही. त्यांची भाषणं शत्रुत्वानं, अतिद्वेषानं, दुष्टाव्यानं आणि निंदेनं पुरेपूर भरलेली होती. मी पुनरुच्चार करतो, त्यांची भाषणं निंदेनं भरलेली होती! आम्ही बोल्शेविक म्हणजे पक्षातल्या आडदांट राजवटीचे पाठराखे आहोत, आपल्या वर्गाच्या आणि क्रांतीच्या हितसंबंधांचा विश्वासघात करणारे लोक आहोत, असं भासविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आमच्या पक्षातल्या अत्यंत तावूनसुलाखून निघालेल्या आणि विश्वासू विभागाला, बोल्शेविकांच्या गौरवशाली जुन्या रक्षकांना, रशियन कम्युनिस्ट पक्षाची उभारणी ज्यांनी केली, झारच्या तुरुंगांमध्ये ज्यांनी कारावास भोगले, जागतिक मेन्शेविकवादाविरुद्ध आणि ट्रॉट्स्कीविरुद्ध ज्यांनी कॉम्रेड लेनिन

पुढारीपणाखाली निष्ठुर लढा दिला, त्या लोकांना नोकरशहा म्हणून शिक्का मारण्याचा विरोधकांनी केला. शत्रूशिवाय असली विधानं कोण करू शकेल? आणि त्याचे कार्यकर्ते हे सारे मिळून एक नाहीत काय? काय चाललंय ते मला समजून घ्यायचंय! तरुण लाल त्यांच्या कमांडरांविरुद्ध आणि कमिस्सारांविरुद्ध, च्या मुख्य ठाण्याविरुद्ध चिथावण्याचा जे लोक प्रयत्न न – तोसुद्धा शत्रूनं तुकडीला घेरलेल्या परिस्थितीत – अशा ना तुम्ही काय म्हणणार? ट्रॉट्स्कीवाद्यांच्या मताप्रमाणं जोपर्यंत मेकॅनिक आहे तोपर्यंत "ठीक आहे;" पण जर मी पक्ष समितीचा चिटणीस झालो तर मात्र मी करशहा" आणि "खुर्ची उबवणारा" ठरतो! नोकरशाही- आणि लोकशाहीसाठी लढणाऱ्या विरोधकांमध्ये, ज्याला करशाही वर्तनाबद्दल नुकतंच कामावरून काढून टाकण्यात अशा तुफ्तासारखी माणसं आहेत, हे जरा विचित्र वाटत का? किंवा आपल्या "लोकशाही" बद्दल सोलोमेन्काच्या ना ठाऊक असलेला तस्वेतायेव? किंवा पदोल्स्क भागात उद्धटपणं कारभार चालवल्याबद्दल गुबेर्निया समिती- तीन वेळा कामावरून काढून टाकलेला अफानास्येव? आढळतंय की, पक्षानं ज्यांना शासन केलं ते सारे पक्षा- लढण्यासाठी एक झालेत. ट्रॉट्स्कींच्या "बोल्शेविकवादा-" जुन्या बोल्शेविकांना जरूर सांगू दे. बोल्शेविकांविरुद्ध कींनी दिलेल्या लढ्याचा इतिहास माहीत असणं, त्यांच्या घडणाऱ्या मतांतरांबद्दल माहीत असणं, हे युवकांच्या टीनं फार महत्त्वाचं आहे. विरोधकांविरुद्धच्या लढ्यात आमचे लोक एकत्र सांधले गेलेत आणि सैद्धांतिकदृष्ट्या युवक

अधिक बळकट बनलेत. मध्यमवर्गीय प्रवृत्तींविरोधी लढ्यात बोल्शेविक पक्ष आणि कम्सामोल कणखर बनलेत. विरोधकांमधले घबराट पसरवणारे वेडसर लोक भाकित करताहेत की, आर्थिक आणि राजकीय परिस्थिती संपूर्ण कोलमडणार! त्यांच्या ह्या भाकितांची लायकी आमचा भविष्यकाळ दाखवून देईल! तोकरेव यांच्यासारख्या जुन्याजाणित्या बोल्शेविकांना कारखान्यात कामावर जायला आम्ही सांगावं आणि आपला पक्षाविरुद्धचा लढा म्हणजे मोठा शूर पराक्रम आहे असं समजणाऱ्या दुबावासारख्या हवामानतज्ज्ञाला त्यांच्या जागी आणावं! आम्ही हे मान्य करणार नाही. जुन्या बोल्शेविकांजागी नव्यांची नेमणूक जरूर होईल, पण जेव्हा आम्ही अडचणीत असतो तेव्हा पक्षाच्या धोरणावर हिंस्त्र हल्ला चढविणाऱ्या लोकांमधून आम्ही कुणालाही नेमणार नाही. आमच्या महान पक्षाच्या ऐक्याला आम्ही तडा जाऊ देणार नाही. जुन्या आणि नव्या रक्षकांमध्ये कधीही फूट पडणार नाही. मध्यमवर्गीय प्रवृत्तींविरोधी निष्ठुर लढ्यात, लेनिन यांच्या ध्वजेखाली आम्ही विजयाकडं वाटचाल करू!"

टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात पानक्रातोव व्यासपीठावरून खाली उतरला.

दुसऱ्या दिवशी तुफ्ताच्या घरी दहा लोकांचा एक गट जमला.

"मी आणि श्कोलेन्को आज खार्कोवला जातोय," दुबावा म्हणाला. "इथं आम्हाला करण्यासारखं काही उरलेलं नाही. तुम्ही एकत्र राहण्याचा प्रयत्न करा. वाट पहायची आणि काय घडतंय ते बघायचं, एवढंच सध्या आपण करू शकतो. अखिल-रशिया परिषद आपला निषेध करणार हे स्पष्ट आहे.

आपल्याविरुद्ध दडपशाहीचे उपाय इतक्या लौकर योजले जातील असं मला वाटत नाही. आपल्याला आणखी एक संधी देण्याचा बहुमतवाल्यांनी निर्णय घेतलाय. आता उघडपणं धोरण चालवणं – विशेषत: परिषदेनंतर – म्हणजे स्वत:ची आपणहून हकालपट्टी करून घेण्यासारखं आहे आणि ते आपल्या धोरणात बसत नाही. भविष्यात आपल्यापुढं काय वाढून ठेवलंय ते आत्ता सांगणं कठीण आहे. मला वाटतं सांगण्यासारखं मी सगळं काही बोललो." दुबावा जाण्यासाठी उठला.

कृश शरीराचा, पातळ ओठांचा स्तारोवेरोवही उठला.

"मित्याय, तुझं बोलणं मला समजत नाही," किंचित चाचरत, बोबड्या सुरात तो म्हणाला. "याचा अर्थ परिषदेचा निर्णय आपल्याला बंधनकारक नाही?"

"औपचारिकरीत्या बंधनकारक आहे," त्स्वेतायेव त्याचे बोलणे मध्येच तोडून म्हणाला. "नाहीतर तू तुझं पक्षाचं कार्ड गमावून बसशील. पण आपण वाट बघू आणि वारा कोणत्या दिशेनं वाहतोय याचा अंदाज घेऊ. दरम्यान आपण थांबून राहू."

तुफ्नाने खुर्चीत अस्वस्थपणे चुळबूळ केली. चेहरा पांढरा-फटक पडलेला आणि डोळ्यांखाली काळी वर्तुळे उमटलेला ग्रोलेन्को हताशपणे खिडकीपाशी बसून नखे कुरतडीत होता. त्स्वेतायेवचे बोलणे ऐकताच त्याने आपला नखे कुरतडण्याचा उद्योग बंद केला आणि संभाषणाकडे लक्ष वळविले.

"अशा कारवायांना माझा विरोध आहे," एकदम संतापून तो म्हणाला. "परिषदेचा निर्णय आपल्याला बंधनकारक आहे असं मी वैयक्तिकरीत्या मानतो. आपल्या मतांसाठी

आपण लढलो, पण आता घेतलेला निर्णय आपण बिनबोभाट मानला पाहिजे."

स्तारोवेरोवने त्याच्याकडे पाहून संमतीदर्शक मान डोलावली.

"मलासुद्धा तेच म्हणायचंय," बोबड्या सुरात तो म्हणाला.

दुबावाने श्कोलेन्कोवर आपली नजर रोखली व छद्मीपणे तो म्हणाला:

"तू काही करावंस अशी सूचना तुला कुणीही करत नाही. गुबेर्नियां परिषदेत "पश्चात्ताप" व्यक्त करण्याची अजून तुला संधी आहे."

श्कोलेन्को ताडकन उठून उभा राहिला.

"द्मीत्री, मला तुझा हा सूर मुळीच आवडत नाही! आणि स्पष्ट बोलायचं तर तू जे काही बोलतोस त्याची मला किळस येते. त्यामुळं माझी भूमिका बदलणं मला भाग पडतंय!"

दुबावाने तुच्छपणे हात झटकून म्हटले:

"तू असंच वागशील अशी माझी नेमकी अपेक्षा होती. जा, धाव आणि उशीर होण्यापूर्वी पश्चात्ताप व्यक्त कर!" एवढे बोलून दुबावाने तुफ्ताशी व इतरांशी हस्तांदोलन केले आणि तो निघून गेला. श्कोलेन्को आणि स्तारोवेरोव त्यानंतर लौकरच तिथून निघाले.

कडाक्याची थंडी घेऊन एकोणीसशे चोवीस साल इतिहासात उगवले. बर्फाच्छादित जमिनीवर जानेवारी महिन्याने आपला थंडगार विळखा घातला. महिन्याच्या उत्तरार्धात घोंघावत्या वादळांनी आणि हिमवादळांनी हैदोस घातला.

नैर्ऋत्य लोहमार्ग बर्फाने पुरता झाकला गेला होता. पिसाटलेल्या पंचमहाभूतांशी माणसे झगडत होती. बर्फ साफ करणाऱ्या

फाळांचे पोलादी दाते बर्फात घुसत होते आणि आगगाड्यांचा मार्ग साफ करीत होते. अतिथंडीमुळे आणि हिमवादळांमुळे बर्फाने माखलेल्या टेलिफोनच्या तारा वाकल्या होत्या. बारा-पैकी फक्त तीन मार्गांचे – एक इंडो-युरोपीय व दोन सरकारी – दळणवळण चालू होते.

शेपेतोवका स्टेशनच्या तारकचेरीत तीन यंत्रांची कडकड अखंड चालू होती. फक्त सरावलेल्या कानांनाच त्या कडकडीचा अर्थ समजला असता.

ऑपरेटरचे काम करणाऱ्या मुली नवख्या होत्या. त्यांनी पाठवलेल्या तारांच्या फितीची लांबी वीस किलोमीटरपेक्षा जास्त भरली नसती. पण त्यांच्या शेजारी बसलेल्या जुन्या तारमास्तरने दोनशे किलोमीटरची मर्यादा एव्हाना ओलांडली होती. आपल्या तरुण सहकारीणींप्रमाणे संदेश लिहून काढायला त्याला फीत वाचावी लागत नव्हती किंवा अवघड शब्दांचा आणि वाक्यांचा अर्थ लावायला कपाळाला आठ्या घालाव्या लागत नव्हत्या. उलट तारयंत्राच्या कडकट्टीबरोबर तो भराभरा शब्द टिपून घेत होता. आता त्याच्या कानांनी शब्द हेरले : "सर्वांसाठी, सर्वांसाठी, सर्वांसाठी!"

"बर्फ साफ करण्याबाबतची आणखी एक सूचना असावी," शब्द लिहून घेता घेता जुना तारमास्तर स्वतःशी म्हणाला. बाहेर हिमवादळ उठले होते, खिडक्यांवर बर्फाची जोरदार उधळण करीत होते. कुणीतरी खिडकीवर टकटक करते आहे असे वाटून तारमास्तरने आवाजाच्या दिशेने नजर वळवली. तावदानांवर गोठलेल्या थंडीमुळे उमटलेल्या नक्षीने क्षणभर त्याचे लक्ष वेधून घेतले. पानांची आणि देठांची ती नक्षी कुणाही कारागिराला कोरता आली नसती!

त्याचे विचार दुसरीकडे भरकटले आणि काही काळ तारयंत्राची कडकट्ट ऐकण्याचे तो थांबला. पण लौकरच त्याने न ऐकलेले शब्द वाचण्यासाठी फितीवर नजर फिरवली :

तारेवर पुढील शब्द उमटले होते :

"२१ जानेवारीला सायंकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी..."

ते शब्द चटकन लिहून घेऊन त्याने फीत खाली टाकली व हातावर डोके टेकवून तो पुन्हा तारसंदेश ऐकू लागला.

"काल 'गोर्की' येथे देहावसान झाले..." मंदपणे त्याने शब्द कागदावर लिहून घेतले. आपल्या प्रदीर्घ आयुष्यात त्याने कितीतरी संदेश लिहून घेतले होते. आनंदाचे तसेच दुःखाचे! इतरांचे सुख किंवा दुःख सर्वांत प्रथम ऐकून घेण्याचा त्याच्यावर कितीवेळा प्रसंग आला होता! त्रोटक, संक्षिप्त वाक्यांच्या अर्थावर विचार करण्याची सवय त्याने केव्हाच सोडून दिली होती. तो केवळ यांत्रिकपणे आवाज ऐकी आणि त्यांना कागदावर लिहून काढी.

आतासुद्धा कुणीतरी मेले होते आणि कुणालातरी ती बातमी कळवली जात होती. तारमास्तर सुरवातीचे शब्द विसरला होता : "सर्वांसाठी, सर्वांसाठी, सर्वांसाठी." तारयंत्राने अक्षरे ठोकली : "व्ला-दी-मि-र-इ-ल्यि-च" आणि तारमास्तरने त्यांना शब्दांमध्ये लिहिले. मुळीच विचलित न होता, काहीसा थकून तो बसला होता. कुणी व्लादीमिर इल्यिच नांवाचा कुठेतरी मेला होता, दुःखाच्या लाटा घेऊन ही बातमी कुणीतरी ऐकणार होता, कुणाच्यातरी तोंडून वेदनेचा चीत्कार उमटणार होता, पण या सर्व गोष्टींशी तारमास्तरला काहीएक कर्तव्य नव्हते; कारण तो केवळ योगायोगाने या सर्वाला साक्षी होता! तारयंत्राने टिंब ठोकले, आडवी रेघ, पुन्हा टिंबे,

...चे आडवी रेघ, आणि परिचित आवाजांमधून त्याला ... अक्षर समजले: "ले." नंतर अक्षर उमटले, "नि" ... यांत्रिकपणे त्याने तिसरे अक्षर टिपले: "न."

...यंत्र किंचित थांबले व दरम्यान तारमास्तरने कागदावर ... घेतलेल्या शब्दावर नजर टाकली **"लेनिन."**

...यंत्राची पुढील कडकड सुरू झाली. पण ते परिचित ... तारमास्तरच्या काळजात आता टोचत होते. त्याने ...च्या शेवटच्या शब्दांवर पुन्हा एकदा नजर फिरवली — **"लेनिन."** काय? लेनिन? तारेचा संपूर्ण मजकूर झर्रकन ...च्या नजरेपुढून चमकून गेला. तारेच्या कागदावर त्याने ... विस्फारून पाहिले. आणि आपल्या बत्तीस वर्षांच्या ...स्तरच्या कामाच्या कारकीर्दीत, आपण काय लिहिले ... प्रथमच त्याचा विश्वास बसेना.

...या ओळींवर त्याने तीनदा झरझर नजर फिरवली. पण ... शब्द हट्टाने बदलायला तयार नव्हते: "व्लादीमिर इल्यिच ...निन यांचे देहावसान झाले." म्हातारा तारमास्तर ताडकन ...ठला, वेटोळेदार तारेची फीत त्याने खेचून घेतली आणि ...दी डोळ्यांपाशी नेऊन काळजीपूर्वक वाचली. ज्या बातमीवर ...श्वास ठेवायची त्याची तयारी नव्हती ती बातमी त्या दोन ...टर लांबीच्या पट्टीने खरी ठरवली होती! पांढऱ्याफटक ...ऱ्याने तो आपल्या सहकाऱ्यांकडे वळला आणि त्याची ...दरलेली आरोळी सर्वांना ऐकू गेली: "लेनिन वारले!"

ती भयंकर बातमी तारकचेरीच्या रुंद उघड्या दारामधून बाहेर निसटली आणि वादळाच्या वेगाने स्टेशनभर पसरून बाहेर थैमान घालणाऱ्या हिमवादळात मिसळली व रूळांना

आणि स्विचना तडाखे देत रेल्वे वर्कशॉपच्या लोखंडी फाटकांमधून बर्फाळ वाऱ्याच्या झोतांबरोबर आत घुसली.

पहिल्या खळग्यापाशी उभ्या असलेल्या इंजिनाला वंगणपाणी करण्याचे काम करण्यात दुरुस्ती खात्याची माणसे गुंतली होती. वयोवृद्ध पलितोवस्की स्वत: इंजिनाच्या पोटाखाली सरपटत गेले होते व बिघाड झालेल्या जागा मेकॅनिकना दाखवीत होते. झखार ब्रुझ्झाक आणि आर्त्योम असे दोघेही भट्टीच्या जाळीचे वाकलेले दांडे सरळ करीत होते. झखारनी जाळी ऐरणीवर धरली होती आणि आर्त्योमच्या हाती घण होता.

झखार यांचे वय झाले होते. गेल्या काही वर्षांत त्यांच्या कपाळावर खोल सुरकुत्या उमटल्या होत्या आणि केसांना रूपेरी झाक आली होती. त्यांच्या पाठीला बाक आला होता व खोल गेलेल्या डोळयांमध्ये सावट दाटले होते.

दरवाजात एका माणसाच्या आकृतीची क्षणभर सावली दिसली आणि मग सायंकाळच्या सावल्यांमध्ये तो गडप झाला. लोखंडावर होणाऱ्या घणाच्या आवाजात त्याची पहिली आरोळी बुडून गेली, पण तो जेव्हा इंजिनापाशी काम करणाऱ्या लोकांपर्यंत पोचला तेव्हा घण वर उचललेल्या अवस्थेतच आर्त्योम थांबला.

"कॉम्रेडांनो! लेनिन वारले!"

आर्त्योमच्या हातातला घण सावकाश खाली आला व खालच्या कॉंक्रीटच्या फरशीवर आवाज न होईल अशा बेताने त्याने तो खाली ठेवला.

"काय? काय म्हणालास?" ती भयानक बातमी घेऊन येणाऱ्या माणसाच्या मेंढकातडी कोटाला खेचत आर्त्योमने विचारले.

ऱ्हाने नखशिखांत माखलेल्या, कोंडलेला श्वास मोकळा करण्याचा प्रयत्न करणाऱ्या त्या माणसाने खालच्या, घोगऱ्या आवाजात पुन्हा सांगितले :

"होय कॉम्रेडांनो! लेनिन वारले!"

तो माणूस मोठ्यांदा ओरडला नाही यावरून आर्त्योमला समजले की, ती भयंकर बातमी खरी होती. आत्ता कुठे त्याने त्या माणसाला ओळखले होते – तो स्थानिक पक्ष संघटनेचा चिटणीस होता.

माणसे खळग्यातून बाहेर आली व ज्याच्या नांवाची कीर्ती जगभर दुमदुमत होती त्या माणसाच्या मृत्यूची बातमी मुकाटपणे त्यांनी ऐकून घेतली.

फाटकाबाहेर कुठेतरी इंजिनाची कर्कश्य शिटी वाजली आणि उभ्या असलेल्या माणसांच्या अंगांमधून शहारा गेला. त्या वेदनामय आवाजाचा प्रतिध्वनी स्टेशनच्या अगदी टोकाला असलेल्या दुसऱ्या इंजिनाने काढला, त्या पाठोपाठ तिसरे इंजिन ओरडले. त्यांच्या प्रचंड कोरसमध्ये वीज केंद्राच्या भोंग्याने आपला तारस्वरातील व भणभणत जाणाऱ्या तोफ-गोळ्यासारखा कानठळ्या बसविणारा आवाज मिसळला. आणि कीव्हला जायला निघालेल्या उतारू आगगाडीच्या देखण्या इंजिनाच्या घनगंभीर दणदणीत गर्जनेत ते सारे आवाज लोपून गेले.

आगगाड्यांच्या शिट्या का वाजताहेत याचे कारण जेव्हा शेपेतोवका – वॉर्सा एक्स्प्रेसच्या पोलिश इंजिनाच्या ड्रायव्हरला समजले तेव्हा त्याने क्षणभर ते आवाज ऐकले व मग हळूच हात वर उचलून शिटीची तार खेचली. त्याच्या ह्या कृत्याने "मुख्य राजकीय कचेरी"चा एजंट चकित झाला. पोलिश

ड्रायव्हरला माहीत होते की, ही त्याची शेवटची कृती होती, यापुढे ही आगगाडी चालविण्याची त्याला कधीही परवानगी मिळणार नव्हती; पण तरीही त्याचा शिटीच्या तारेवरचा हात खाली आला नाही व पोलिश जासूद आणि मुत्सद्दी आपापल्या मऊ मऊ शयनयानांमधून खडबडून जागे झाले.

रेल्वे वर्कशॉपमध्ये लोकांनी गर्दी केली. सगळ्या गेटांमधून त्यांचे लोंढे वर्कशॉपच्या प्रचंड इमारतीत वाहत येत होते. सारी इमारत लोकांनी गच्च भरून गेली तेव्हा विलक्षण गंभीर शांततेत शोकसभा सुरू झाली. पक्षाच्या शेपेतोवका प्रादेशिक समितीचे चिटणीस, जुनेजाणिते बोल्शेविक, शाराब्रीन यांनी जमलेल्या लोकांसमोर भाषण केले.

"कॉम्रेडहो! जागतिक कामगारवर्गाचे पुढारी लेनिन वारले. पक्षाची अपरिमित हानी झालीय, कारण बोल्शेविक पक्ष निर्माण करणारा आणि शत्रूंशी कडवेपणानं त्याला वागायला शिकवणारा माणूस आता आपल्यात राहिला नाही... आपल्या पक्षाच्या आणि आपल्या वर्गाच्या पुढाऱ्याची मृत्यूची बातमी म्हणजे कामगारवर्गाच्या सुपुत्रांनी आमच्या पक्षात दाखल होण्याचं बोलावणं आहे..."

शोकगीताचे सूर उमटले तेव्हा सर्वांनी डोक्यावरच्या टोप्या काढल्या आणि गेली पंधरा वर्षे रडणे माहीत नसलेल्या आर्त्योमच्या घशात मोठा आवंढा आला व त्याचे भक्कम खांदे गदगदा हलले.

रेलकामगारांच्या क्लबाच्या भिंती जणू मानवी समुदायाच्या दाबाखाली कण्हत होत्या. बाहेर कमालीचा गारठा होता. सभागृहाच्या बाहेर उभे असलेले दोन उंच फर वृक्ष बर्फाने आणि बर्फाच्या काड्यांनी माखले होते. पण आत मात्र तापवलेल्या

चुलाण्यांमुळे आणि पक्ष संघटनेमार्फत भरविण्यात आलेल्या शोकसभेला हजर राहिलेल्या सहाशे लोकांच्या गरम श्वासांनी वातावरण गुदमरले होते.

संभाषणाची नेहमीची गजबज स्तब्ध झाली होती. अतिदु:खाने माणसांचे आवाज घुसमटले होते. ते अत्यंत खालच्या आवाजात बोलत होते. अनेकांच्या डोळ्यांमध्ये दु:खाच्या आणि चिंतेच्या छटा स्पष्ट दिसत होत्या. तुफानामध्ये आपला कर्णधार गमावलेल्या गलबताच्या खलाशांप्रमाणे त्यांची अवस्था झाली होती.

ब्यूरोच्या सदस्यांनी व्यासपीठावर मुकाटपणे आपली आसने घेतली. आडव्या बांध्याच्या सीरोतेन्कोनी काळजीपूर्वक घंटा उचलून ती हळूच वाजवली आणि परत टेबलावर ठेवली. सभागृहात गंभीर शांतता निर्माण होण्यास एवढे पुरेसे होते.

मुख्य भाषण झाल्यानंतर पक्ष संघटनेचे चिटणीस सीरोतेन्को बोलायला उठले. त्यांनी केलेली घोषणा शोकसभेसारख्या प्रसंगी जरी आगळी वाटली, तरी तिचे कुणालाही आश्चर्य वाटले नाही.

ते म्हणाले: "पक्षाच्या सदस्यत्वासाठी केलेल्या अर्जाचा या सभेत विचार व्हावा, अशी अनेक कामगारांनी मागणी केलीय. अर्जावर सदतीस कॉम्रेडांच्या सह्या आहेत." त्यांनी अर्ज वाचून दाखवला:

"शेपेतोवका स्टेशनच्या बोल्शेविक पक्षाच्या रेल्वे संघटनेला उद्देशून, नैर्ऋत्य रेल्वे.

"आमच्या प्रिय पुढाऱ्याचा मृत्यू म्हणजे बोल्शेविक पक्षात सामील होण्यासाठी आम्हाला आलेलं बोलावणं

आहे आणि लेनिन यांच्या पक्षात दाखल होण्याच्या आमच्या पात्रतेबद्दल या सभेत निर्णय द्यावा, अशी आम्ही मागणी करतो."

ह्या छोटया निवेदनाखाली दोन स्तंभ भरून सह्या होत्या. सीरोतेन्को यांनी ती नांवे मोठ्यांदा वाचून दाखवली. सभेला ती नांवे लक्षात रहावीत म्हणून प्रत्येक नांव उच्चारल्यानंतर थोडा वेळ ते थांबत होते.

"स्तानीस्लाव झिगमून्दोविच पलितोवस्की, इंजिन ड्रायव्हर, छत्तीस वर्षे सेवा."

संमतीदर्शक कुजबुजीची लाट सभागृहात पसरली.

"आर्त्योम आन्द्रेयेविच कोर्चागिन, मेकॅनिक, सतरा वर्षे सेवा."

"झखार वासील्येविच ब्रुझ्झाक, इंजिन ड्रायव्हर, एकवीस वर्षे सेवा."

राकट हातांच्या रेलकामगारांच्या बांधवांपैकी श्रेष्ठ सदस्यांची नांवे व्यासपीठावरून जसजशी पुकारण्यात येत होती, तसतसा कुजबुजीचा आवाज मोठा होत चालला होता.

यादीच्या आरंभी नांव असलेले पलितोवस्की जेव्हा सभागृहासमोर उभे राहिले तेव्हा पुन्हा एकदा स्तब्धतेचे साम्राज्य पसरले.

तो म्हातारा इंजिन ड्रायव्हर आपली जीवनकहाणी सांगू लागला तेव्हा त्याची आंतरिक चलबिचल त्याच्या गदगदलेल्या आवाजामधून जाणवत होती.

"...कॉम्रेडहो, मी तुम्हाला काय सांगणार? जुन्या काळात कामगाराचं आयुष्य कसं होतं ते तुम्हा सर्वांना ठाऊकच आहे. सबंध आयुष्यभर एखाद्या गुलामासारखा राबलो आणि

म्हातारपणी भिकारी राहिलो. क्रांती आली तेव्हा कौटुंबिक काळज्यांनी वाकलेला मी एक म्हातारा माणूस आहे अशी स्वतःची समजूत करून घेतली आणि पक्षात जायचा मार्ग पाहिला नाही. आणि शत्रूची मी कधी बाजू घेतली नाही, तरी लढ्यातसुद्धा मी क्वचितच भाग घेतला. एकोणीसशे पाचमध्ये वॉर्सा रेल्वे वर्कशॉपच्या संप कमिटीचा मी सभासद होतो आणि बोल्शेविकांच्या बाजूचा होतो. त्यावेळी तरुण होतो आणि लढायची खुमखुमी होती. पण भूतकाळ आठवून उपयोग काय! इल्यिच यांचं मरण सरळ काळजाला जाऊन भिडलंय. आमचा मित्र आणि कैवारी आम्ही गमावलाय. म्हातारा असल्याबद्दल आता मी अखेरचं बोलतोय. कसं सांगावं ते मला समजत नाही, कारण भाषणं करणं मला कधीच जमलं नाही. पण मला एवढंच सांगायचंय: माझा रस्ता हा बोल्शेविकांचा रस्ता आहे, दुसरा कुठलाही नाही!"

इंजिन ड्रायव्हरनी आपले पिकल्या केसांचे डोके वर केले आणि पांढऱ्या भुवयांखालील डोळे प्रेक्षकांकडे स्थिरपणे व खंबीरपणे रोखून लोकांचा कौल काय मिळतो त्याची ते वाट पाहू लागले.

त्या छोट्या चणीच्या वृद्ध गृहस्थाच्या अर्जाला कुणीही विरोध केला नाही. मतदानामध्ये बिगर-पक्षीय लोकांनाही आमंत्रण करण्यात आले होते व सर्वांनी मतदानात भाग घेतला.

पलितोवस्की जेव्हा अध्यक्षीय मेजापासून दूर चालत गेले तेव्हा ते कम्युनिस्ट पक्षाचे सभासद बनले होते.

काहीतरी फार महत्त्वाचे घडत होते याची प्रत्येकाला जाणीव झाली होती. इंजिन ड्रायव्हर जेथे उभे राहिले होते तेथे आता आर्त्योमची भव्य आकृती अवतरली होती. त्याला

आपल्या हातांचे काय करावे ते समजत नव्हते आणि भेदरलेल्या मन:स्थितीत त्याने आपल्या केसाळ टोपीला गच्च धरले होते. त्याचा कडांशी लक्तरे लोंबणारा मेंढकातडी कोट खुला होता, पण करडया रंगाच्या, उंच कॉलरच्या लष्करी कुडत्याची वरची पितळी बटणे मात्र त्याने लावल्यामुळे त्याचा एकूण थाट व्यवस्थित दिसत होता. सभागृहाला सामोरे जाण्यासाठी आर्त्योमने मान वळवली आणि एका परिचित स्त्रीच्या चेहऱ्याचे त्याला ओझरते दर्शन घडले. ती पाथरवटाची मुलगी गलीना होती. शिवणकामाच्या दुकानातल्या आपल्या सहकाऱ्यांबरोबर ती बसली होती. ती त्याच्याकडे टक लावून पहात होती. तिने त्याला क्षमा केली असल्याचे तिच्या स्मितामधून जाणवत होते. त्या स्मितामध्ये त्याने तिची मान्यता वाचली. त्या स्मितामध्ये आणखी काहीतरी होते जे त्याला शब्दात मांडता आले नसते.

"आर्त्योम, तुझ्याबद्दलची माहिती लोकांना सांग!" सीरोतेन्कोंचा आवाज त्याच्या कानी पडला.

आर्त्योमला आपली कहाणी सांगायला सुरवात करणे खूप अवघड गेले. एवढया मोठया श्रोतृसमुदायासमोर बोलण्याची त्याला सवय नव्हती. जीवनाने जे काही त्याच्या काळजात साठवले होते ते व्यक्त करणे आपल्या शक्तीबाहेरचे आहे असे त्याला एकाएकी वाटले. शब्द शोधण्यासाठी त्याने डोक्याला खूप ताण दिला. भेदरल्या मन:स्थितीमुळे त्याला आणखीच कष्ट झाले. असा अनुभव यापूर्वी त्याला कधीही आला नव्हता. हे त्याच्या आयुष्यामधील फार महत्त्वाचे वळण होते याची त्याला जाणीव झाली. आता तो जे पाऊल उचलणार

होता त्यामुळे त्याच्या खडतर, बहकलेल्या आयुष्यात ऊब येणार होती, त्या आयुष्याला अर्थ येणार होता.

"आम्ही चौघं होतो," आर्त्योमने सुरुवात केली.

सभागृहात स्तब्धता पसरली. बाकदार चोचीसारखे नाक असलेल्या आणि दाट काळ्या भुवयांमध्ये डोळे दडलेल्या ह्या उंच कामगाराचे बोलणे सहाशे लोक मोठ्या आतुरतेने ऐकत होते.

"माझी आई श्रीमंताघरी स्वैंपाकीण म्हणून काम करत होती. माझे वडील मला फारसे आठवत नाहीत. त्यांचं आणि आईचं पटायचं नाही. ते खूप दारू प्यायचे. तेव्हा आम्हा मुलांची जबाबदारी आईवरच पडली. एवढ्या तोंडांना खाऊ घालणं तिला जड जायचं. सकाळपासून रात्रीपर्यंत ती राबायची तेव्हा तिला महिन्याला जेऊन-खाऊन चार रूबल मिळायचे. मला दोन हिवाळे शाळेत शिकायला मिळालं. तिथं मी लिहा-वाचायला शिकलो पण मला नऊ वर्षं होताच आईनं मला यंत्र दुरुस्तीच्या दुकानात उमेदवार म्हणून काम करायला धाडलं. तीन वर्षं मी नुसता अन्नावारी काम करत होतो... फेर्स्तेर नांवाचा एक जर्मन माणूस दुकानाचा मालक होता. पहिल्यांदा मला तो कामावर घ्यायला तयार नव्हता. मी वयानं फार लहान होतो असं म्हणाला. पण मी अंगापिंडानं मजबूत होतो आणि आईनं माझं वय दोन वर्षांनी वाढवून सांगितलं. त्या जर्मनासाठी मी तीन वर्षं राबलो. पण कामाचं कसब शिकण्याऐवजी मला घरची किरकोळ कामं करावी लागायची आणि वोदका आणायला पळावं लागायचं. मालक पाण्यासारखी दारू प्यायचा... कोळसे आणि लोखंड आणायलाही तो मला पाठवायचा... मालकीण तर मला गुलामासारखंच

वागवायची. मला बटाटे सोलावे लागायचे आणि भांडी घासावी लागायची. मला नेहमी लाथा-बुक्क्यांचा मार खावा लागायचा. बहुतेक वेळा काही कारण नसायचं. निव्वळ सवय. माझी मालकीण खूष नसली म्हणजे मला बडवायची. तिचा नवरा दारू खूप प्यायचा म्हणून ती सदा संतापलेली असायची. मी तिच्यापासून पळून रस्त्यावर जायचा. पण पुढं जाणार कुठं? कुणापाशी मी तक्रार करणार? माझी आई तिथून चाळीस मैल दूर होती आणि ती मला पोसू शकत नव्हती... दुकानातली परिस्थितीही फारशी चांगली नव्हती. मालकाचा भाऊ तिथं कारभार बघायचा. तो दुष्ट माणूस मला छळण्यात गंमत मानायचा. मला म्हणायचा, 'ए पोऱ्या, तो वॉशर मला आणून दे' आणि कोपऱ्यातल्या फोर्जकडं बोट दाखवायचा. मी धावत जाऊन वॉशर उचलायचा आणि एकदम किंकाळी फोडायचा. तो नुकता फोर्जमधून निघालेला असायचा आणि जमिनीवर जरी त्याचा रंग काळा दिसला तरी हात लावताच चर्रकन भाजून निघायचा. वेदनेनं किंचाळत मी तिथं उभा रहायचा आणि तो माणूस बरगड्या दुखेपर्यंत हसायचा. मला ते सहन करणं अशक्य झालं आणि मी आईपाशी घरी पळालो. पण माझं काय करावं ते तिला समजेना आणि ती मला परत घेऊन आली. मला आठवतं, सारा रस्ताभर ती रडत होती. माझ्या तिथल्या तिसऱ्या वर्षात त्यांनी मला धंदा शिकवायला थोडी सुरुवात केली, पण मारहाण चालूच होती. मी पुन्हा पळालो, यावेळी स्तारोकॉन्स्तन्तिनोवला. एका सॉसेज फॅक्टरीत मला काम मिळालं. तिथं खोकी धुण्यात दीड वर्ष वाया घालवलं. मग आमच्या मालकानं फॅक्टरी जुगार खेळण्यात गमावली. चार महिने त्यानं एक कोपेकसुद्धा

पगार आम्हाला दिला नाही आणि एक दिवस गायब झाला. त्या बिळातून बाहेर पडलो, आगगाडीत बसून इमेरीन्काला येऊन काम शोधू लागलो. तिथं एका रेलकामगाराला माझी दया आली. मी मेकॅनिक आहे असं त्याला सांगितलं, तेव्हा तो मला घेऊन आपल्या मालकाकडं गेला आणि मी त्याचा पुतण्या आहे असं सांगून माझ्यासाठी काहीतरी काम द्यायला सांगितलं. माझ्या आकारावरून मी त्यांना सतरा वर्षांचा वाटलो आणि मेकॅनिकचा मदतनीस म्हणून मला काम मिळालं. इथलं सध्याचं काम मी आठ वर्षं करतोय. माझ्या पूर्वीच्या दिवसांबद्दल मी एवढंच सांगू शकतो. इथलं माझं आयुष्य तुम्हा सगळ्यांना माहीतच आहे."

आर्त्योमने घामेजलेली भुवई आपल्या टोपीने पुसली व एक दीर्घ निश्वास टाकला. अजून त्याने मुख्य गोष्ट सांगितली नव्हती. ती सांगणे सर्वांत अवघड होते, पण कुणीतरी अपरिहार्यपणे तो प्रश्न विचारण्याआधी त्याला ती सांगणे भाग होते. आपल्या झुपकेदार भुवयांना आठी घालीत त्याने आपली कहाणी पुढे सुरू केली:

"मी यापूर्वी बोल्शेविकांमध्ये का सामील झालो नाही, असं कुणीही विचारील. मी काय सांगू? मी काही अजून म्हातारा झालो नाही. आजपर्यंत मला रस्ता कसा सापडला नाही हे कसं काय? मी सरळ उत्तर देतो, कारण लपवण्या-मारखं माझ्यापाशी काही नाही. जर्मनांविरुद्ध आपण १९१८ त उठाव केला तेव्हाच हा रस्ता मी पत्करायला पाहिजे होता. पण त्यावेळी माझा मार्ग चुकला. खलाशी झुखरायनी मला तसं अनेकवेळा सांगितलं. पण १९२० पर्यंत मी रायफल हाती घेतली नाही. वादळ शमलं आणि पांढऱ्यांना आपण काळ्या

सागरावर हाकलून लावलं तेव्हा आपण घरी परतलो. मग कुटुंब, मुलं... मी कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये पुरता अडकलो. पण आता आपले कॉम्रेड लेनिन आपल्यामधून गेलेत, पक्षानं आवाहन केलंय, तेव्हा मी माझ्या आयुष्याकडं मागं वळून पाहिलं आणि कसली उणीव भासतेय तिचा शोध घेतला. आपल्या सत्तेचं रक्षण करणं एवढंच पुरेसं नाही. लेनिन यांच्या जागी आपण सर्वांनी एका मोठ्या कुटुंबासारखं एकमेकांना घट्ट धरून राहिलं पाहिजे. म्हणजे एखाद्या पोलादी पहाडा-सारखी सोविएत सत्ता भक्कम उभी राहील. आपण बोल्शेविक बनलं पाहिजे. पक्ष आपला आहे, होय की नाही?"

जेव्हा त्याने भाषण संपवले, तेव्हा एवढे लांबलचक भाषण केल्याबद्दल त्याला थोडेसे शरमल्यासारखे झाले. पण आपल्या खांद्यांवरचे फार मोठे ओझे उतरल्यासारखे त्याला वाटले व सरळ ताठ उभे राहून तो लोकांकडून प्रश्न येण्याची वाट पाहू लागला.

"कुणाला प्रश्न विचारायचेत?" सीरोतेन्कोच्या आवाजाने शांततेचा भंग झाला.

लोकांमध्ये चुळबुळ झाली, पण अध्यक्षांच्या आवाहनाला प्रथम कुणीच प्रतिसाद दिला नाही. नंतर एक कोळसे मारणारा कामगार उभा राहिला. तडक इंजिनावरून आला असल्याने तो काळया भुकटीने नखशिखांत माखला होता. तो म्हणाला:

"कसले आलेत प्रश्न? आम्ही काय त्याला ओळखत नाही? मतदान घ्या आणि निवडून टाका!"

उष्णतेमुळे आणि उत्तेजित झाल्यामुळे लालबुंद चेहरा बनलेला लोहार गिल्याका घोगऱ्या आवाजात ओरडला:

"हा कॉम्रेड पक्का आणि खात्रीचा आहे. त्याच्यावर विसंबायला हरकत नाही. सीरोतेन्को, निवडा त्याला!"

सभागृहाच्या अगदी पाठीमागील बाजूस कम्सामोलचे सभासद बसले होते. तेथे कुणीतरी उठून राहिले, पण अर्धवट उजेडामुळे कोण ते मात्र स्पष्ट दिसले नाही. फक्त आवाज आला:

"कॉम्रेड कोर्चागिन यांनी खुलासा करावा – शेतीत स्थायिक व्हायचा निर्णय त्यांनी का घेतला आणि त्यांच्या कामगारवर्गीय मनानं शेतकऱ्याच्या व्यवसायाशी कसं जुळवून घेतलं?"

सभागृहात नाराजीची एक अस्पष्ट लाट उमटली. एक आवाज निषेधासाठी उमटला:

"साध्या माणसांना समजेल अशा भाषेत का बोलत नाही? स्वत:ची अक्कल पाजळायला काय पण वेळ शोधून काढलीय..."

पण आर्त्योमने उत्तर द्यायला सुरुवात केली होती:

"ठीक आहे कॉम्रेड. मी शेतीत स्थायिक होण्यासंबंधी त्या मुलानं विचारलेला प्रश्न बरोबर आहे. मी शेतीत स्थायिक झालोय हे खरं आहे, माझ्या कामगारवर्गीय सारासार विचाराशी मी बेइमान नाही. आजपासून तोसुद्धा निर्णय घेतलाय. शेती यापुढं बंद. मी माझ्या घरच्या माणसांना रेल्वे वर्कशॉपच्या जवळच हलवतोय. इथंच जास्त चांगलं. त्या जमिनीच्या तुकड्यानं आत्तापर्यंत माझी दमछाक केली तेवढी पुरे!"

हातांचे जंगल त्याला अनुकूलता दाखविण्यासाठी उभे झालेले जेव्हा आर्त्योमने पाहिले तेव्हा त्याचे काळीज पुन्हा एकदा थरारले. ताठ मानेने तो आपल्या आसनाशी परत गेला. त्याच्या मागोमाग सीरोतेन्कोंचा आवाज आला:

"एकमतानं निवड."

व्यासपीठावर तिसरे आले झखार ब्रुझ्झाक. ते पूर्वी पलितोवस्कीचे मदतनीस होते. हा अबोल म्हातारा काही काळापासून स्वतः इंजिन ड्रायव्हर होता. ब्रुझ्झाक यांनी आपली पूर्वकहाणी संपवून जेव्हा वर्तमानकाळाला सुरुवात केली तेव्हा त्यांचा आवाज एकदम खाली पडला. अत्यंत हळू आवाजात ते बोलू लागले तरी सर्वांना त्यांचे बोलणे ऐकू जात होते :

"माझ्या मुलांनी जे सुरू केलं ते तडीला नेणं हे माझं कर्तव्य आहे. स्वतःचं दुःख कुरवाळत एका कोपऱ्यात मी बसून राहणं त्यांना आवडलं नसतं. त्यासाठी त्यांनी बलिदान केलं नाही. त्यांच्या मरणानं निर्माण झालेली पोकळी भरून काढायचा मी प्रयत्न केला नाही. पण आता आपल्या पुढाऱ्याच्या मृत्यूनं माझे डोळे उघडलेत. भूतकाळाबद्दल उत्तर द्यायला मला भाग पाडू नका. आजपासून आपल्या आयुष्याला नव्यानं आरंभ होतोय."

पूर्वीच्या दुःखदायी आठवणी मनात दाटल्यामुळे झखार यांचा चेहरा काळवंडून गेला. त्यांच्या चेहऱ्यावरचे स्नायू ताठरले. पण त्यांच्या उमेदवारीला मान्यता देण्यासाठी हातांचा सागर उसळला तेव्हा त्यांची नजर उजळली. त्यांचे खाली झुकलेले पिकल्या केसांचे मस्तक वर झाले.

पक्षातील ह्या नव्या नेमणुकांचा आढावा घेण्याचे काम रात्री बराच उशीरापर्यंत चालले होते. ज्यांच्याबद्दल सर्वांना माहिती होती, ज्यांची चरित्रे निष्कलंक होती, अशाच सर्वोत्तम लोकांना पक्षात प्रवेश देण्यात आला होता.

लेनिन यांच्या मृत्यूमुळे हजारो कामगार बोल्शेविक पक्षात दाखल झाले. पुढारी गेला होता, पण पक्षाच्या फळ्या

अविचल राहिल्या. ज्या वृक्षाची मुळे खोल जमिनीत रुजलेली असतात त्या वृक्षाचा तुरा छाटला गेला तरी तो वृक्ष नाश पावत नाही.

प्रकरण सहावे

हॉटेलमधील मैफलीच्या हॉलच्या दाराशी दोन पुरुष उभे होते. त्या दोघांपैकी अधिक उंच असलेल्या माणसाने चापाचा चष्मा लावला होता आणि "कमांडंट" अशी अक्षरे लिहिलेली तांबडी पट्टी दंडाला बांधली होती.

"युक्रेनी प्रतिनिधीमंडळ इथंच भेटणार आहे काय?" रीताने चौकशी केली.

"होय," उंच माणसाने थंडपणे उत्तर दिले. "तुमचं काय काम आहे कॉम्रेड?"

त्या माणसाने प्रवेशाचा रस्ता अडवला आणि रीताला आपादमस्तक न्याहाळले.

"प्रतिनिधी कार्ड आहे तुमच्यापाशी?"

"मध्यवर्ती समितीची सदस्या" असे सोनेरी मुलाम्यात कोरलेल्या अक्षरांचे कार्ड रीताने पुढे करताच त्या माणसाचा नाठरपणा एकदम मावळला.

"आत जावं कॉम्रेड," आर्जवी सुरात तो म्हणाला. "डाव्या बाजूला तुम्हाला काही रिकाम्या जागा आढळतील."

खुर्च्यांच्या रांगांमधल्या जागेतून रीता चालत गेली, एक मोकळी खुर्ची पाहून तिच्यावर बसली.

सभा संपत आल्याचे स्पष्ट दिसत होते, कारण अध्यक्ष आढावा घेत होते. त्यांचा आवाज रीताला परिचित वाटला.

"अखिल-रशिया काँग्रेसच्या कौन्सिलची निवड आता

झालीय. आणखी दोन तासांनी काँग्रेस सुरू होईल. दरम्यान मी पुन्हा एकदा प्रतिनिधींची यादी वाचतो."

तो अकीम होता! तो घाईघाईने यादी वाचत होता तेव्हा रीता ध्यान देऊन ऐकत होती. नांव जाहीर झालेला प्रत्येक प्रतिनिधी हात वर करून स्वतःचा लाल किंवा पांढरा पास दाखवत होता.

अचानक रीताने एक माहितीचे नांव ऐकले: पानक्रातोव.

हात वर झाला त्या दिशेला तिने झटकन नजर टाकली. पण मधल्या रांगांमधील गर्दीतून तिला त्या गोदीकामगाराचा चेहरा दिसू शकला नाही. नांवे पुकारली जातच होती. पुन्हा एकदा रीताने परिचित नांव ऐकले: ओकुनेव आणि त्यापाठोपाठ आणखी एक परिचित नांव आले: झार्कीय.

प्रतिनिधींचे चेहरे निरखताना तिला झार्कीय दिसला. तो फारसा दूर बसला नव्हता आणि त्याचा अर्धा चेहरा रीताच्या दिशेने वळलेला होता. होय, तो वान्याच होता! त्याचा तो चेहरा जवळ जवळ ती विसरली होती. कारण गेल्या कित्येक वर्षांत तिने त्याला पाहिलेच नव्हते.

नांवांची यादी वाचणे चालूच होते. अकीमने एक नांव वाचले तेव्हा मात्र रीता एकदम जोरात दचकली:

"कोर्चागिन."

खूप दूरवर पहिल्या रांगांमध्ये एक हात वर झाला आणि खाली गेला. आपल्या मृत कॉम्रेडच्या नांवाशी साधर्म्य असलेल्या त्या व्यक्तीचा चेहरा पाहण्याची रीताला तीव्र इच्छा झाली. जेथे हात वर झाला होता तेथून नजर हलविणे तिला शक्य होईना, पण तिच्या पुढच्या रांगांमधील सर्व डोकी सारखीच दिसत होती. रीता उठली व मधल्या मोकळ्या मार्गातून

पुढील रांगांच्या दिशेने निघाली. तेवढ्यात अकीमचे वाचणे संपले. खुर्च्या मागे सारल्याचे आवाज झाले व सबंध हॉलमध्ये तरुणांच्या बोलण्याचा आणि हसण्याचा आवाज भरला. त्या गोंगाटापेक्षा आपला आवाज वर चढविण्याचा प्रयत्न करीत अकीम ओरडला :

"बल्शोय थिएटर... सात वाजता. उशीर करू नका!"

बाहेर जाण्याचे एकच दार होते, तेथे प्रतिनिधींनी गर्दी केली. त्या दाटीत आपल्या एकाही जुन्या मित्राला शोधणे शक्य होणार नाही असे रीताला जाणवले. अकीम निघून जाण्यापूर्वी तिने त्याला भेटणे आवश्यक होते. इतरांना शोधायला त्याची मदत झाली असती. तेवढ्यात प्रतिनिधींचा एक गट अगदी तिच्या जवळून गेला आणि कुणीतरी बोलताना तिने ऐकले :

"कोर्चागिन, लेका आपणसुद्धा चलू या आता!"

आणि रीताच्या चांगल्या आठवणीत असलेला आवाज उत्तरला :

"ठीक आहे. चला!"

रीता झर्रकन मागे वळली. खाकी कुडता, निमुळता कॉकेशियन पट्टा आणि निळी तुमान अशा वेषातील एक रापट रंगाचा तरुण माणूस तिच्यासमोर उभा होता.

रीता त्याच्याकडे डोळे फाडफाडून पहात राहिली. तेवढ्यात त्याच्या हातांचा तिच्याभोवती विळखा पडला आणि त्याचा कापरा आवाज तिच्या कानी हळूच आला: "रीता!" तिला तत्काळ समजले की, तो पावेल कोर्चागिन होता.

"तू जिवंत आहेस?"

त्या शब्दांमधून त्याला सर्व काही समजले. त्याच्या

मृत्यूची बातमी चुकीची होती हे तिला ठाऊक नव्हते.

हॉल केव्हाच रिता झाला होता व शहरातील रहदारीचा एक मुख्य रस्ता असलेल्या त्वेर्स्कायावरचा गोंगाट उघड्या खिडकीमधून आत ओसंडत होता. घड्याळाने सहाचे टोल दिले, पण आपण केवळ क्षणापूर्वीच भेटलो असे त्या दोघांना वाटले. बल्शोय थिएटरकडे जायची वेळ झाल्याची सूचना त्या घड्याळाने दिली होती. बाहेर जायच्या दाराकडे रुंद जिन्यावरून चालत ती दोघे गेली तेव्हा रीताने पावेलला पुन्हा एकदा संपूर्ण न्याहाळले. आता तो तिच्यापेक्षा वीतभर उंच झाला होता, अधिक परिपक्व झाला होता. त्याच्यात अधिक आत्मविश्वास निर्माण झालेला जाणवत होता. अन्यथा तिला परिचित असलेला पावेल पूर्वीसारखाच होता.

"तू कुठं काम करतोस ते मी तुला अजून विचारलं नाही," ती म्हणाली.

"कम्सामोलच्या प्रादेशिक समितीचा मी चिटणीस आहे. दुबावाच्या भाषेत 'कारकून'!" स्मित करीत पावेल उत्तरला.

"तू भेटलास त्याला?"

"होय. आणि त्या भेटीच्या अगदी सर्वांत अप्रिय आठवणी आहेत."

ती दोघे रस्त्यावर आली. मोटारींचे कर्णे वाजत होते, माणसांची पादपथांवरून गोंगाट करणारी गर्दी लगबगत होती. थिएटरच्या वाटेवर ती दोघे एकमेकांशी जवळ जवळ एकही शब्द बोलली नसली, तरी त्या दोघांच्या मनात विचार मात्र एकच चालले होते. थिएटरच्या समोर जनसागर तुफान उसळलेला त्यांनी पाहिला. प्रवेशद्वारांपाशी पहाऱ्याला उभे राहिलेल्या लाल सैनिकांच्या कड्याला तोडून आत जाण्याचा

प्रयत्न करणाऱ्या लोकांच्या लाटा थिएटरच्या दगडी इमारतीवर आपटून पुन:पुन्हा जणू उसळत होत्या. पण फक्त प्रतिनिधींनाच पहारेकरी प्रवेश देत होते. आपली ओळखपत्रे दिमाखाने झळकवीत, सैनिकांच्या कड्यामधून प्रतिनिधी आत जात होते.

थिएटरला पडलेला वेढा कम्सामोलच्या सागराचा होता. काँग्रेसच्या उद्घाटनाची तिकीटे मिळविण्यास असमर्थ ठरलेल्या तरुणांचा तो सागर होता. कोणत्याही परिस्थितीत आत जाण्याचा त्यांचा निर्धार जाणवत होता. लाल कागदाचे चिटोरे सरकावून प्रतिनिधींच्या गटांमागोमाग आत घुसण्यात काही चपळ तरुण यशस्वी झाले होते. पण त्यांची धाव प्रवेशद्वारापर्यंतच पोचत होती. दारांमधून आत निसटून जाण्यातही काहींनी यश मिळविले होते. पण कामावरच्या मध्यवर्ती समितीच्या माणसाने किंवा नियोजित जागी प्रतिनिधींना आणि पाहुण्यांना बसविण्याचे काम करणाऱ्या कमांडंटने अशा घुसखोरांना नेमके अडवले होते. आणि नंतर, "तिकीटविहीन" बांधवांच्या गर्दीसमोरून त्यांची जेव्हा हकालपट्टी होई तेव्हा बाहेरच्या मंडळींना अतीव समाधान वाटे.

उद्घाटनाला हजर राहू इच्छिणाऱ्यांच्या एकूण संख्येपैकी अवघा एक टक्का लोकांनासुद्धा थिएटर सामावू शकत नव्हते.

रीता आणि पावेल मोठ्या मुष्कीलीने वाट काढीत प्रवेशद्वारापाशी पोचले. प्रतिनिधींचे लोंढे येतच होते. कुणी ट्राममधून, बाकीचे मोटारींमधून. प्रवेशद्वाराशी त्यांची मोठी गर्दी जमली होती आणि स्वत: कम्सामोलच असलेले लाल सैनिक पार भिंतीशी मागे रेटले गेले होते. एवढ्यात प्रवेशद्वाराशी गर्दीतून एक दणदणीत आरोळी उमटली :

"बौमन विभाग चाललाय!"

"शाब्बास बंधो, आपली बाजू जिंकतेय!"

"हुर्रे ऽऽऽ!"

दारामधून पावेल आणि रीताबरोबर एक तीक्ष्ण डोळ्यांचा तरुण पोरगा झटकन आत घुसला. त्याच्या दंडावर कम्सामोलची फीत होती. त्याने कमांडंटची नजर चुकवून सरळ फॉयरची वाट धरली आणि प्रतिनिधींच्या गर्दीत तो गडप झाला.

स्टॉल्सच्या मागच्या दोन रिकाम्या आसनांकडे बोट दाखवून रीता म्हणाली, "तिथं बसू या."

ती दोघे बसल्यानंतर रीता म्हणाली:

"मला एक प्रश्न विचारायचाय. त्याचा संबंध पूर्वीच्या दिवसांशी आहे, पण उत्तर द्यायचं तू टाळणार नाहीस अशी मला खात्री आहे. त्यावेळी आपला अभ्यास आणि आपली मैत्री तोडून का टाकलीस?"

हा प्रश्न रीता हमखास विचारणार असे रीताची भेट झाल्यापासून पावेलला ठाऊक होते, तरी तिने तो प्रत्यक्ष विचारताच त्याची धांदल उडाली. त्यांची नजर एकमेकांना भिडली आणि उत्तर तिला माहीत असल्याचे पावेलला दिसले.

"रीता, मला वाटतं उत्तर तुला ठाऊक आहे. त्या गोष्टीला आता तीन वर्षं लोटली आणि त्यावेळी पावेलने जे काही केलं त्याबद्दल आत्ता त्याची मी फक्त कानउघाडणी करू शकेन. खरं म्हणजे कोर्चागिननं आपल्या आयुष्यात लहान-मोठे अनेक गोंधळ केले. त्यातलाच तो एक होता!"

रीता हसली. "प्रस्तावना झकास आहे. आता उत्तर दे!"

"केवळ माझाच दोष होता असं नाही," खालच्या आवाजात

पावेल बोलू लागला. "त्यात 'गोमाशी'चाही दोष आहे
त्याच्या क्रांतिकारक रोमँटिक वृत्तीचा! आपल्या पवित्र कार्याला
वाहून घेतलेल्या खंबीर, धैर्यशील क्रांतिकारकांची ठळक
वर्णनं करणाऱ्या पुस्तकांचा त्याकाळात माझ्यावर फार मोठा
पगडा होता. त्या लोकांचा माझ्या मनावर खोल ठसा उमटला
होता आणि त्यांच्यासारखं होण्याची माझी धडपड होती.
तुझ्या बाबतीतसुद्धा माझ्या ज्या भावना निर्माण झाल्या होत्या
त्यांच्यावर 'गोमाशी' पुस्तकाचा प्रभाव होता. आता मला
तो सारा वेडपटपणा वाटतो आणि त्याहूनही जास्त पश्चात्ताप
होतो."

"म्हणजे 'गोमाशी' बाबत तुझं मत बदललं?"

"नाही रीता, मूलतः माझं मत तेच आहे. पण एखाद्याच्या
निर्धारशक्तीची कसोटी बघण्याचा पीडादायी प्रकार मात्र
मी सोडून दिला. अगदी निष्कारण शोकांतिका कशासाठी?
'गोमाशी'च्या नायकाचं धैर्य, त्याची विलक्षण सहनशक्ती,
सर्वांसमोर आपल्या वेदनेचं प्रदर्शन न करता ते मुकाट सोसू
शकण्याची त्याची ताकद—ह्या त्यातल्या अत्यंत महत्त्वाच्या
गोष्टींचा मी अजूनही आदर करतो. एकूण समाजाच्या आयुष्यापुढं
स्वतःचं वैयक्तिक सुखदुःख कःपदार्थ मानणारा क्रांतिकारक
मला आवडतो."

"पावेल, हे सारं तू मला तीन वर्षांपूर्वी सांगितलं नाहीस
याबद्दल फार वाईट वाटतं," स्मित करीत रीता म्हणाली.
तिचे विचार दूर कुठेतरी भरकटत असल्याचे तिच्या मुद्रेवरून
जाणवत होते.

"वाईट अशासाठी की, केवळ एक कॉम्रेड यापलिकडं
तुझं-माझं नातं कधीच गेलं नाही म्हणून?"

"नव्हे पावेल. त्याहून जास्त काही तुझं-माझं नातं जमलं असतं!"

"मग त्यावेळच्या चुकीची आत्ता भरपाई करता येईल."

"नाही कॉम्रेड गोमाशी, त्याला आता फार उशीर झालाय. मला आता एक छोटी मुलगी आहे," रीताने हसत खुलासा केला. "आणि तिच्या वडिलांवर माझं खूप प्रेम आहे. एकूण आम्ही तिघंही एकमेकांचे छान मित्र आहोत आणि अजूनपर्यंत आमचं त्रिकुट अभंग आहे."

पावेलच्या हाताला तिने आपल्या बोटांनी हलकासा स्पर्श केला. त्याच्याबद्दल वाटणाऱ्या काळजीपायी तिची ती कृती घडली होती. पण तिची आवश्यकता नव्हती हे तिला तात्काळ उमजले. गेल्या तीन वर्षांत शरीरानेच नव्हे तर मनानेही तो वाढला होता. तिच्या खुल्या कबुलीमुळे त्याला विलक्षण वाईट वाटल्याचे त्याच्या नजरेवरून ती सांगू शकली असती. पण पावेल फक्त एवढेच बोलला:

"आत्ता मी जे काही गमावलं त्यापेक्षा जे मी ठेवलंय ते खूपच मोठं आहे." त्याचे हे शब्द पोकळ नव्हते, त्यांच्यात सत्य सामावले होते याची रीताला जाणीव होती.

व्यासपीठाशेजारी जागा घेण्याची त्यांची वेळ झाली होती. ती दोघे उठली आणि युक्रेनी प्रतिनिधी बसले होते त्या रांगेकडे गेली. बँड वाजला. "भविष्यकाळ आमचा आहे" असे शब्द झळकवणाऱ्या किरमिजी पताका हॉलमध्ये फडकल्या. थिएटरचा कोपरा न् कोपरा माणसांनी गच्च भरला होता. अखंड शक्तीच्या झऱ्याने स्पंदणाऱ्या एका महाबलाढ्य यंत्रणेमध्ये ते सारे एकवटले होते. देशाच्या महान औद्योगिक बांधिलकीच्या तरुण रक्षकांमधले सर्वोत्तम प्रतिनिधी तेथे जमले

होते. भारी पडद्यावरच्या "भविष्यकाळ आमचा आहे" ह्या झगमगत्या अक्षरांचे तेज डोळयांच्या हजारो जोड्यांमधून प्रतिबिंबित झाले होते. अजूनही मानवी लाट आत येत होती. आणखी काही सेकंदांचा अवधी आणि तो भारी मखमाली पडदा बाजूला जाणार होता व रशियन कम्युनिस्ट युवक संघाच्या मध्यवर्ती समितीचे चिटणीस त्या पवित्र प्रसंगाच्या गांभिर्याने भारावून जाऊन किंचित सद्‌गदित आवाजात म्हणणार होते :

"रशियन कम्युनिस्ट युवक संघाची सहावी काँग्रेस सुरू झाल्याचं मी जाहीर करतो."

क्रांतीच्या वैभवाची आणि सामर्थ्याची एवढ्या प्रकर्षाने जाणीव पावेल कोर्चागिनला यापूर्वी कधीही झाली नव्हती. बोल्शेविकवादाच्या तरुण रक्षकांच्या ह्या दिग्विजयी मेळाव्याला हजर राहण्याचे भाग्य आपल्यासारख्या लढवय्याला आणि बांधणीकाराला लाभले, ह्या विचारासरशी त्याचे मन आनंदोर्मींनी आणि अभिमानाने उचंबळून आले.

काँग्रेसच्या बैठकांमध्ये भाग घेण्यात अगदी सकाळपासून रात्री उशीरापर्यंत त्याचा वेळ गुंतून जात होता. त्यामुळे जवळ जवळ शेवटच्या एका अधिवेशनात पावेलची पुन्हा रीताशी भेट झाली. ती युक्रेनी गटाबरोबर होती.

"काँग्रेसचा समारोप होताच उद्या मी निघणार," तिने त्याला सांगितले. "आपल्याला बोलायची पुन्हा संधी मिळेल किंवा नाही हे मला ठाऊक नाही. म्हणून मी माझ्या डायरीच्या दोन जुन्या वह्या तुझ्यासाठी तयार ठेवल्यात आणि जोडीला एक छोटं पत्र आहे. त्या वह्या वाचून पोस्टानं मला परत

पाठव. मी तुला अजून जे सांगितलं नाही ते सारं त्या तुला सांगतील."

त्याने तिचा हात दाबला आणि खूप वेळपर्यंत तिच्याकडे टक लावून पाहिले. जणू तिचा चेहरा तो आपल्या आठवणीत साठवून घेत होता.

आदल्या दिवशी ठरविल्याप्रमाणे ती दोघे दुसऱ्या दिवशी मुख्य दाराशी भेटली. रीताने त्याच्या हाती वह्यांचे पार्सल आणि बंद लखोटा दिला. सभोवताली खूप माणसे असल्यामुळे त्यांनी अत्यंत मन आवरून संयतपणे एकमेकांचा निरोप घेतला. पण तिच्या किंचित ओलावलेल्या डोळयांमध्ये खेदमिश्रित गाढ प्रेमाच्या भावना पावेलने वाचल्या.

दुसऱ्या दिवशी त्यांच्या आगगाड्या त्यांना भिन्न दिशांना घेऊन गेल्या. पावेल ज्या आगगाडीत बसला होता तिचे अनेक डबे युक्रेनी प्रतिनिधींनी व्यापले होते. कीव्हच्या काही प्रतिनिधींबरोबर तो एका कंपार्टमेंटमध्ये बसला होता. संध्याकाळी जेव्हा इतर प्रवासी आपापल्या जागी गेले आणि शेजारच्या बर्थवर ओकुनेव शांतपणे घोरू लागला, तेव्हा पावेल दिव्यापाशी गेला आणि त्याने पत्र उघडले.

"माझ्या लाडक्या पावलूशा,

आपण एकत्र होतो तेव्हा हे सारं मी तुला सांगू शकले असते, पण हीच तऱ्हा जास्त बरी. माझी एकच इच्छा आहे: कॉंग्रेसपूर्वी आपण जे काही बोललो त्याच्या जखमेचा वण तुझ्या आयुष्यावर राहू नये. तू खंबीर मनाचा आहेस हे मला ठाऊक आहे आणि तुला वाटलं तेच तू बोलला असा माझा विश्वास आहे. मी जीवनाकडं

केवळ औपचारिकपणं पहात नाही. एखाद्याच्या वैयक्तिक भावना खऱ्याखुऱ्या आणि प्रगाढ प्रेमावर आधारलेल्या असल्या, तर त्यानं अपवादात्मक वागायला — क्वचित — हरकत नसावी, असं मला वाटतं. हा अपवाद मी तुझ्या संदर्भात केला असता. पण आपल्या तारुण्याचा गौरव करण्याची माझी ऊर्मी मी दाबून टाकली. आपल्या दोघांच्याही दृष्टीनं ते हिताचं ठरणार नाही असं वाटलं. तरीही, आपल्या आयुष्याशी एवढा कठोर होऊ नकोस पावेल! आपलं जीवन म्हणजे काही अखंड संघर्ष नाही. त्यात खऱ्या प्रेमामुळं लाभणाऱ्या सुखाला जागा आहे.

"बाकी तुझ्या इतर जीवनाच्या बाबतीत, तुझ्या जीवनाच्या मुख्य आशयाबाबतीत, मला तुझ्याबद्दल धास्ती वाटत नाही. मनःपूर्वक निरोप घेते.

रीता."

पावेलने विचारपूर्वक पत्र फाडले. त्याने हात खिडकीबाहेर धरला तेव्हा त्याच्या हातातील कागदाचे कपटे वारा खेचून नेत असलेला त्याला जाणवले.

सकाळपर्यंत त्याने रीताच्या रोजनिशीच्या दोन्ही वह्या वाचून काढल्या, त्या कागदामध्ये गुंडाळून पोस्टाने पाठविण्यासाठी त्यांचे पार्सल तयार ठेवले. खार्कोव येथे ओकुनेव, पानक्रातोव व इतर प्रतिनिधींबरोबर तो गाडीतून उतरला. कीव्ह येथे आन्नाबरोबर राहिलेल्या ताल्याला आणण्यासाठी ओकुनेव कीव्हला जाणार होता. युक्रेनी कम्सामोलच्या मध्यवर्ती समितीवर सदस्य म्हणून निवड झालेल्या पानक्रातोवलाही

काही कामानिमित्त कीव्हला जायचे होते. त्यांच्या बरोबरच कीव्हपर्यंत जाऊन झार्कीयची आणि आन्नाची भेट घेण्याचा बेत पावेलने केला.

कीव्ह स्टेशनच्या पोस्ट ऑफिसातून रीताला पार्सल पाठवून पावेल बाहेर पडला, तोपर्यंत बाकीचे सारे निघून गेले होते. म्हणून तो एकटाच निघाला. आन्ना आणि दुबावा रहात होते त्या घरासमोरच ट्राममधून पावेल उतरला. दुसऱ्या मजल्यावर जाऊन डावीकडे आन्ना रहात होती त्या दारावर पावेलने ठोठावले. कुणीच उत्तर दिले नाही. एवढ्या लौकर ती कामावर जाणे शक्य नव्हते. "कदाचित ती झोपलेली असेल" असा विचार पावेलच्या मनात आला. तेवढ्यात शेजारच्या खोलीचे दार उघडले गेले आणि झोपाळू डोळ्यांचा दुबावा बाहेर आला. त्याचा चेहरा कमालीचा निस्तेज बनला होता आणि डोळ्यांखाली मोठी काळी वर्तुळे होती. त्याच्या उच्छ्‌श्वासाबरोबर कांद्याचा आणि मद्याचा उग्र भपकारा येत होता. पावेलच्या तीक्ष्ण नाकाने हे वास चटकन हेरले. दाराच्या अर्धवट उघड्या फटीमधून त्याला बिछान्यावर पडलेल्या एका स्त्रीचा गुबगुबीत पाय आणि उघडे खांदे दिसले.

पावेलच्या नजरेची दिशा लक्षात येताच दुबावाने लाथेने फाडकन दार बंद केले.

"मला वाटतं तू कॉम्रेड बोरहार्तला भेटायला आलायस, होय ना?" पावेलच्या नजरेला नजर देण्याचे टाळीत त्याने घोगऱ्या आवाजात विचारले. "ती आता इथं रहात नाही. तुला माहीत नव्हतं?"

कोर्चागिनचा चेहरा कठोर बनला. त्याने चौकसपणे दुबावाला न्याहाळीत म्हटले :

"नाही. मला माहीत नव्हतं. कुठं गेली ती?"

एकाएकी दुबावाचा तोल सुटला.

"माझा काय संबंध तिच्या जाण्याशी?" तो ओरडला. त्याने ढेकर दिली आणि खवटपणे तो पुढे म्हणाला : "तिच्या सांत्वनाला आलास होय? चिंता करू नको. अगदी वेळेवर आलास. आता मोकाट सुटलीय. तुला ती नाही नाकारायची. तिला तू किती आवडायचास ते तिनं मला खूप वेळा सांगितलं होतं... बायकांच्या मूर्ख तऱ्हेनं! जा जा, तवा तापलाय तोवर पोळी भाजून घे! आत्म्याचं आणि शरीराचं खरंखुरं मीलन घडेल!"

पावेलची कानशिले तापली. मोठ्या कष्टाने स्वतःला आवरून तो खालच्या सुरात म्हणाला :

"मित्याय, तू स्वतःची काय दशा करून घेतोयस? एवढा खाली जाशील असं मला कधीही वाटलं नव्हतं. एकेकाळी तू काही इतका वाईट नव्हतास. स्वतःचा अधःपात का करून घेतोस?"

दुबावा मागे भिंतीला टेकला. त्याच्या अनवाणी पायांना गार फरशीचा स्पर्श होताच तो एकदम शहारला.

दरवाजा उघडला गेला आणि सुजलेल्या डोळयांचा व फुगीर गालांचा एक स्त्रीचा चेहरा डोकावला.

"माझ्या लाडक्या, आत ये लौकर. इथं कशाला उभा राहिलायस?"

तिने आणखी काही पुढे बोलण्यापूर्वीच दुबावाने धाडकन दार बंद केले आणि त्या दारासमोरच तो उभा राहिला.

"चांगली सुरुवात झालीय..." पावेल म्हणाला. "कुणाची संगत करतोयस? अशानं शेवटी कुठं जाशील?"

पण दुबावाने त्याला पुढे बोलू दिले नाही.

"मी कुणाशी झोपावं ते तू कोण मला सांगणार?" तो ओरडला. "तुझ्या उपदेशाचे डोस खूप झाले! आता आलास तिथं परत चालता हो! जा, सगळ्यांना जाऊन सांग, दुबावा दारू झोकतो आणि रांडबाजी करतो!"

पावेल त्याच्या जवळ गेला. आपल्या भावनांना आवरून दबत्या सुरात म्हणाला:

"मित्याय, त्या बाईला हाकलून दे. मला तुझ्याशी बोलायचंय, शेवटचं..."

दुबावाचा चेहरा काळवंडला. तो झर्रकन टाचांवरच मागे वळला आणि एकही शब्द न बोलता खोलीत निघून गेला.

"डुक्कर कुठला!" पावेल संतापाने पुटपुटला आणि हळू हळू जिना उतरला.

दोन वर्षे उलटली. काळाने दिवस आणि महिने यांची गणना केली. पण बाह्यतः एकसूरी वाटणाऱ्या जीवनामधील बहुविध घटनांचा पट एवढ्या झरझर उलटत होता, की कुठलेही दोन दिवस एकमेकांसारखे नव्हते. अज्ञात संपत्तीसह आपल्या प्रचंड भूमीचे भवितव्य स्वतःच्या हाती घेणाऱ्या जगातल्या पहिल्याच लोकांचे – सोळा कोटींचे – महान राष्ट्र आपल्या युद्धजर्जर अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन घडविण्याच्या विराट कार्यात गुंतले होते. देश अधिक सामर्थ्यवान बनला होता, त्याच्या धमन्यांमधून नवा जोम वाहू लागला होता. धूरविहीन ओसाड कारखान्यांचे भयाण दृश्य इतःपर दिसत नव्हते.

पावेलची ही दोन वर्षे अखंड कामात भराभरा संपली. शांतपणे आयुष्य जगणाऱ्यांपैकी तो नव्हता. आल्या दिवसाचे स्वागत लांबलचक जांभईने करायचे आणि दहाच्या ठोक्याला अंथरुणावर आडवे व्हायचे, हे त्याच्याने जमण्यासारखे नव्हते. तो अत्यंत वेगाने जगत होता. वाया जाणाऱ्या प्रत्येक क्षणा-बद्दल स्वतःवर आणि इतरांवर चिडत होता.

झोपेसाठी त्याने अगदी किमान वेळ राखला होता. अनेकदा रात्री उशीरापर्यंत त्याच्या खिडकीत दिवा जळत असे आणि आत टेबलाभोवती काही लोकांचा गट अभ्यास करण्यात गढलेला असे. या दोन वर्षांमध्ये 'भांडवल' च्या तिसऱ्या खंडाचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला होता व भांडवलदारी शोषणामधील सूक्ष्म तंत्राची त्यांना आता माहिती झाली होती.

कोर्चागिन ज्या प्रदेशात सध्या काम करीत होता तेथे राझवालीखीनचे आगमन झाले होते. विभागीय कम्सामोल संघटनेचा चिटणीस म्हणून त्याची नेमणूक करावी, अशी गुबेर्निया समितीकडून शिफारस घेऊन तो आला होता. राझवालीखीन आला तेव्हा पावेल कुठेतरी दूरच्या ठिकाणी गेलेला होता. त्याच्या गैरहजेरीत ब्यूरोने राझवालीखीनला एका विभागात पाठवले. पावेलला आल्यानंतर जेव्हा ही बातमी समजली तेव्हा तिच्यावर काहीही भाष्य न करता तो गप्प राहिला.

एक महिन्यानंतर पावेलने राझवालीखीनच्या विभागाला अनपेक्षित भेट दिली. तेथे फारसा पुरावा आढळला नाही तरी जे काही सापडले ते पुरेसे हानीकारक होते. नवा चिटणीस दारू पीत होता, आपल्याभोवती खुषमस्कऱ्यांचा घोळका

जमवून फिरत होता आणि सुजाण मुलांचा पुढाकार दडपून टाकीत होता. पावेलने ब्यूरोपुढे अहवाल सादर केला. राझवालीखीनला कडक ताकीद द्यावी असा ठराव बैठकीत सादर करण्यात आला तेव्हा पावेल ताडकन उठून उभा राहिला आणि म्हणाला :

"त्याला हाकलून देण्यात यावं आणि ही हकालपट्टी कायमची करण्यात यावी, असा ठराव मी मांडतो."

त्याच्या या बोलण्याने सारे चकित झाले. प्राप्त परिस्थितीत तो उपाय फारच कठोर वाटत होता. पण पावेल आपल्या आग्रहाला धरून राहिला. "त्या हरामखोराला हाकललंच पाहिजे. चांगला सभ्य माणूस व्हायची त्याला पुरेपूर संधी दिली होती. पण कम्सामोलमध्ये तो नेहमीच "परका" वागला." आणि पावेलने ब्यूरोमध्ये बेरेझ्दोव येथील हकीकत सांगितली.

"मी याचा निषेध करतो!" राझवालीखीन ओरडला. "कोर्चागिन वैयक्तिक हेव्यादाव्यांचा इथं सूड घेऊ पाहतोय. तो जे काही बोलतोय ती बाष्कळ बडबड आहे. आपले आरोप त्यानं पुराव्यांनिशी सिद्ध करून दाखवावेत. समजा, मी जर तुमच्यापाशी येऊन सांगितलं असतं की, कोर्चागिन चोरट्या व्यापारात गुंतलेला होता, तर माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवून तुम्ही त्याची हकालपट्टी केली असतीत काय? त्यानं लेखी पुरावा सादर केला पाहिजे!"

"काळजी करू नको. आवश्यक ते सगळे पुरावे मी मांडीन," कोर्चागिन उत्तरला.

राझवालीखीन खोलीतून बाहेर गेला. अर्ध्या तासानंतर पावेलने ब्यूरोची खात्री पटविली व "परकी घटक" म्हणून

राझवालीखीनची कम्सामोलमधून हकालपट्टी करावी, असा ठराव ब्यूरोत मंजूर झाला.

उन्हाळा आला आणि त्याच्याबरोबर सुटीचा मोसमही सुरू झाला. पावेलचे सहकारी आपल्या हक्काच्या सुट्यांवर एकापाठोपाठ एक गेले. ज्यांना आरोग्यासाठी सुटी घेणे आवश्यक होते त्यांना सागरतीरी आरोग्यधामांमध्ये जागा मिळवून देण्यात व आर्थिक साहाय्य करण्यात पावेलने मदत केली. अशी माणसे सुटीवर जाताना अगदी फिकुटलेली आणि दमलेली होती. पण आगामी सुटीच्या विचाराने त्यांचे चेहरे उजळलेले होते. त्यांच्या कामाचे ओझे पावेलच्या खांद्यांवर पडले होते, पण हा जादा भार तो न कुरकुरता सहन करीत होता. योग्य वेळी सुटी संपताच, ती माणसे चांगले ऊन खाऊन रापल्या कांतीने आणि नव्या जोमाने कामावर परतली व दुसरी माणसे सुटीवर गेली. सबंध उन्हाळाभर कचेरीत काम करणाऱ्या माणसांचा तुटवडा जाणवत होता. पण जीवनाची गती पूर्वीसारखीच वेगवान होती व एक दिवससुद्धा कामापासून सुटी घेणे पावेलला शक्य होत नव्हते.

उन्हाळा सरला. शरदाच्या आणि हिवाळ्याच्या आगामी चाहुलीची पावेलला भीती वाटत होती, कारण ह्या दोन्ही मोसमांमध्ये त्याला विलक्षण शारीरिक पीडा भोगावी लागे. त्या वर्षी उन्हाळ्याच्या आगमनाची त्याने विशेष आतुरतेने वाट पाहिली होती. त्याची ताकद दर वर्षागणिक क्षीण होत चालली होती. हे स्वतःशी मान्य करणे जरी त्याला त्रासदायक वाटत होते, तरी ते सत्य होते. याला दोनच पर्याय होते: त्याच्या कामासाठी पडणारा ताण सहन होत नाही असे मान्य

करून स्वत:ला अपंग म्हणून जाहीर करणे, अथवा जमेल तितके दिवस काम करीत राहणे. त्याने दुसरा मार्ग पत्करला होता.

एके दिवशी, पक्षाच्या प्रादेशिक समितीच्या ब्यूरोच्या बैठकीला डॉ. बार्तेलिक आले होते. ते पक्षाचे जुने भूमिगत कार्यकर्ते होते व आता प्रादेशिक सार्वजनिक आरोग्य खात्याचे प्रमुख म्हणून काम करीत होते. बैठकीला ते आले तेव्हा पावेलच्या शेजारी बसले.

"कोर्चागिन, तुझा चेहरा काही बरा दिसत नाही. प्रकृती कशी काय? वैद्यकीय तपासणी मंडळानं तुला तपासलं? नाही ना? मला वाटलंच. पण मित्रा, संपूर्ण वंगणपाणी करण्याची आवश्यकता आहे असं तुझ्याकडं बघून वाटतंय. गुरुवारी संध्याकाळी ये, म्हणजे तुझी तपासणी करू."

पावेल डॉक्टरांकडे गेला नाही. तो खूप कामात होता. पण बार्तेलिक त्याला विसरले नव्हते. काही दिवसांनंतर ते आले व स्वत: पावेलला घेऊन वैद्यकीय तपासणी मंडळाकडे गेले. त्या मंडळात ते मज्जाविकारतज्ज्ञ म्हणून काम करीत होते. वैद्यकीय तपासणी मंडळाने शिफारस केली की, पावेलने "तात्काळ क्रिमियात जाऊन प्रदीर्घ काळ उपचार घ्यावेत आणि त्यानंतर पुन्हा नियमित उपचार घ्यावेत. असे केले नाही तर त्याला गंभीर परिणामांना अटळपणे तोंड द्यावे लागेल."

ह्या शिफारशीआधी लॅटिनमध्ये लिहिलेल्या रोगांच्या लांबलचक यादीवरून पावेलला एवढेच समजले की, मुख्य त्रास त्याच्या पायांमध्ये नव्हता, तर त्याच्या केंद्रीय मज्जासंस्थेत होता व तिची गंभीर प्रकारची हानी झाली होती.

बार्तेलिकनी वैद्यकीय तपासणी मंडळाचा निर्णय ब्यूरोपुढे

मांडला आणि कोर्चागिनला ताबडतोब कामामधून मुक्त करावे असा प्रस्ताव मांडला. त्यांच्या प्रस्तावाला कुणीही विरोध केला नाही. पण संघटन खात्याचे प्रमुख स्बीत्नेव परत येईपर्यंत आपली सुटी पुढे ढकलावी असे खुद्द कोर्चागिननेच सुचविले. पुढाऱ्याशिवाय समिती सोडून जाणे त्याला नको होते. जरी त्रार्तेलिकनी विलंबाला आक्षेप घेतला तरी ब्यूरोने पावेलचे म्हणणे मान्य केले.

आणखी तीन आठवड्यांनी पावेल सुटीवर जाणार होता. आयुष्यातील त्याची पहिलीच सुटी. येवपातोरिया सॅनाटो-रियममध्ये त्याच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती व त्यासंबंधातील कागदपत्र त्याच्या टेबलाच्या कप्प्यात एव्हाना येऊन पडले होते.

या काळात त्याच्यावर कामाचा जास्तच ताण होता. प्रादेशिक कम्सामोलची सर्वसदस्य बैठक त्याने भरविली होती व सुटीवर जाण्यापूर्वी सर्व काही ठाकठीक असावे म्हणून सर्व अपुऱ्या बाबी पूर्ण करण्यासाठी तो अहोरात्र झटत होता.

सागराचे आयुष्यात पहिल्याप्रथम दर्शन घ्यायला जाण्याच्या नेमक्या आदल्या दिवशी एक विलक्षण अतर्क्य घटना घडली.

त्या दिवशी काम संपल्यानंतर पक्षाच्या प्रचार विभागात एका बैठकीला हजर राहण्यासाठी पावेल तेथे गेला होता. तो तेथे खोलीत पोचला तेव्हा अजून कुणीच आले नव्हते म्हणून उघड्या खिडकीपाशी एका पुस्तकाच्या कपाटामागे शांतपणे बसून इतरांच्या येण्याची तो वाट पाहू लागला. थोड्याच वेळात बरीच माणसे खोलीत आली. त्या कपाटा-मागून तो त्यांना पाहू शकत नव्हता, पण त्याने एका व्यक्तीचा आवाज ओळखला. प्रादेशिक अर्थखात्याचा प्रमुख फाईलो याचा

तो आवाज होता. फाईलो हा उंच, देखणा, लष्करी बाण्याचा तरुण होता व बाई-बाटलीच्या नादाबाबत त्याने बरीच कीर्ती मिळविली होती.

फाईलो एकेकाळी गनिमी सैनिक होता. माखनो दरोडेखोरांची मुंडकी डझनांनी छाटल्याच्या गप्पा हसत हसत इतरांना सांगण्याची संधी तो कधीही दवडत नसे. पावेलला हा माणूस मुळीच आवडत नसे. एक दिवस कम्सामोलची सभासद असलेली एक मुलगी रडत रडत पावेलकडे आली व सांगू लागली की, फाईलोने तिला लग्नाचे वचन दिले होते, पण आठवडाभर तिच्याबरोबर राहिल्यानंतर त्याने तिला सोडून दिले होते व आता समोरासमोर भेट झाली तर तिला ओळख द्यायला तो तयार नव्हता. ही बाब जेव्हा नियंत्रण मंडळापुढे आली तेव्हा ती मुलगी कसलाही पुरावा सादर करू न शकल्यामुळे फाईलो सहीसलामत सुटला होता. पण पावेलचा त्या मुलीच्या सांगण्यावर विश्वास बसला होता. पावेल आता त्या खोलीत बसून फाईलोचे व त्याच्या सहकाऱ्यांचे बोलणे ऐकत होता, मात्र इतरांना त्याच्या अस्तित्वाची कल्पना नसल्याने ते अगदी मोकळेपणाने बोलत होते.

"काय फाईलो, कसं काय चाललंय? अलिकडं नवा उद्योग काय?"

प्रश्न विचारणारा ग्रीबोव होता. फाईलोच्या मदिरा मंडळातील तो एक साथी होता. वस्तुतः ग्रीबोव हा अडाणी, संकुचित वृत्तीचा आणि मूर्ख होता. पण तरीही काही कारणाने त्याला प्रचारक मानले जात असे. एवढेच नव्हे तर स्वतःला प्रचारक म्हणवून घेण्यात त्याला मोठा अभिमान वाटत असे

त्र नेहमी सर्वत्र आपण प्रचारक आहोत याची तो इतरांना कटाक्षाने जाणीव करून देत असे.

"मित्रा, माझं अभिनंदन कर. कालच मी एक नवा विजय मिळवला. कोरोतायेवा. तू म्हणाला होतास, तिथं डाळ शिजणार नाही. पण दोस्ता, तिथंच तू चुकलास. एकदा का मी एखाद्या बाईच्या मागं लागलो तर आज ना उद्या मी तिला मिळवणारच," फाईलो बढाई मारीत म्हणाला व त्याने आणखी काही अश्लील वाक्ये उच्चारली.

पावेलचे शरीर एकदम शहारले. त्याला खूप संताप आला म्हणजे तसे होत असे. कोरोतायेवा ही महिला विभागाची प्रमुख होती आणि तो आला होता त्याच सुमाराला ती प्रादेशिक समितीत काम करायला आली होती. एक चांगली आल्हादक व्यक्तिमत्वाची निष्ठावंत पक्ष कार्यकर्ती म्हणून पावेल तिला ओळखीत होता. मदत मागण्यासाठी आणि सल्ला विचारण्यासाठी येणाऱ्या बायकांशी कोरोतायेवा अत्यंत प्रेमाने आणि समंजसपणे वागत असे. समितीमध्ये तिचे साथीदार तिचा आदर करीत. ती विवाहित नव्हती हे पावेलला ठाऊक होते व फाईलो तिच्याचविषयी आत्ता बोलला होता याबद्दल त्याला संदेह नव्हता.

"चल रे फाईलो! तू थापा मारतोस! ती तुझ्या पंजात येणं शक्यच नाही!"

"मी थापा मारतोय? तू मला समजलास काय? यापेक्षा कठीण मामल्यांना मी सर केलय. फक्त कशी चाल करायची ते माहीत पाहिजे. योग्य रीत वापरली पाहिजे. काही पोरी सरळ फशी पडतात, पण त्यांच्यासाठी तसदी घ्यायची गरज नसते. काही पोरी वळणावर यायला आख्खा महिना घेतात.

त्यांचं मानसशास्त्र समजून घेणं हे महत्त्वाचं असतं. नेमका मार्ग चोखाळला पाहिजे. मित्रा, अरे ते एक शास्त्र आहे आणि त्या शास्त्रातला मी निष्णात प्रोफेसर आहे. हा: ! हा: ! हा: !"

स्वत:वर खूष होऊन फाईलो मनापासून हसत होता. अधिक रसभरीत वर्णने ऐकायला मिळावी म्हणून त्याचे श्रोते त्याला आणखी बोलायला डिवचत होते.

कोर्चागिन उठून उभा राहिला. त्याने हातांच्या मुठी गच्च आवळल्या. आपल्या काळजाचे ठोके जोरजोराने पडत असल्याचे त्याला जाणवत होते.

"नेहमीच्या पद्धतीनं कोरोतायेवा गळाला लागणार नाही हे मला ठाऊक होतं. पण तरीही शिकारीचा खेळ सोडायची माझी तयारी नव्हती, कारण ग्रीबोवशी मी डझनभर पोर्ट वाईनच्या बाटल्यांची पैज लावली होती. म्हणून मी घातपाती डावपेच वापरले. एक दोनदा मी तिच्या कचेरीत डोकावलो, पण माझा काही फारसा प्रभाव पडत नव्हता हे मला जाणवत होतं. शिवाय माझी अपकीर्ती तशी सगळीकडं पसरली असल्यानं त्यातल्या काही बातम्या तरी तिच्या कानांपर्यंत पोचलेल्या असणारच... तर थोडक्यात सांगायचं म्हणजे समोरून केलेला हल्ला अपयशी ठरल्यानंतर मी बाजूचे डावपेच वापरले. हा: ! हा: ! मी तिला माझी करुण कहाणी ऐकवली, मी आघाडीवर कसा लढलो, माझी किती वाताहात झाली, किती संकटं सोसावी लागली, पण योग्य स्त्री मला कधीच न भेटल्यानं इथं येऊन प्रेमाविना एकटाच तळमळतोय, वगैरे वगैरे... आणखी असंच बरंच काही बरळलो. मी तिच्या कमजोरींवर आघात करत होतो, समजलं? तिच्याबरोबर

मला बरेच सायास करावे लागले हे खरं! एकदा तर वाटलं, च्यायला सोडून द्यावा हा उद्योग, जहन्नमध्ये गेली साली! पण एव्हाना तो तत्त्वाचा मामला बनला होता आणि तत्त्वासाठी मला तिचा पाठलाग करणं भागच होतं! सरतेशेवटी मी तिचा प्रतिकार मोडून काढला आणि मित्रहो तुम्हाला काय सांगू? अरे, तिच्या आयुष्यातला मी चक्क पहिला पुरुष होतो! हा:! हा:! सगळाच विनोद!"

आणि फाईलो पुढे आपली कहाणी चवीने चघळत सांगू लागला.

संतापाने थरथर कापणारा पावेल फाईलोसमोर येऊन उभा ठाकला.

"हरामखोरा!" पावेल गरजला.

"मी हरामखोर काय? आणि चोरून ऐकणारा तू कोण?"

पावेल त्याला आणखी काहीतरी बोलला असावा, कारण किंचित नशेत असलेल्या फाईलोने त्याच्या कुडत्याची पुढील बाजू खेचली.

"माझा अपमान करतोस काय?" तो ओरडला आणि त्याने पावेलला जोरात ठोसा मारला. त्याच्यावर मद्याचा अंमल होता.

पावेलने झटक्यात ओकच्या लाकडाचे अवजड स्टूल उचलले आणि एकाच दणक्यात फाईलोला आडवे केले. फाईलोच्या सुदैवाने पावेलजवळ त्या दिवशी त्याचे पिस्तूल नव्हते. नाहीतरी फाईलोचा मुडदाच पडला असता.

पण काहीतरी विचित्र अतर्क्य गोष्ट घडली होती व क्रिमियाला जाण्याच्या दिवशी पावेल प्रत्यक्षात पक्षाच्या कोर्टासमोर उभा होता.

शहरातील थिएटरमध्ये पक्षाची संपूर्ण संघटना जमली होती. त्या घटनेने सर्वत्र खळबळ माजली होती आणि सुनावणीमध्ये पक्षाची आचारसंहिता, नीतीनियम व वैयक्तिक संबंध यांच्यावर गंभीर चर्चा सुरू झाली. त्या खटल्यामधून संबंधित सर्वसाधारण प्रश्नांवर वादविवादाला आरंभ झाला व मूळ घटना मागेच पडली. फाईलो अत्यंत उर्मटपणे वागला. कुत्सित हसत त्याने जाहीर केले की, जनता न्यायालयासमोर तो खटला नेणार होता आणि त्याच्यावर हल्ला चढविल्याबद्दल कोर्चागिनला तेथे नक्की सक्तमजुरीवर पाठवतील. कोणत्याही प्रश्नांना उत्तर देण्यास त्याने ठाम नकार दिला.

"माझ्या नांवाचं निमित्त करून तुम्हाला इथं कुटाळक्या करायची इच्छा आहे काय? ते काही चालणार नाही. तुम्ही माझ्यावर काय वाट्टेल ते आरोप करू शकता. पण बायकांकडं मी लक्ष देत नाही म्हणून त्यांचा माझ्यावर दात आहे, ही वस्तुस्थिती उरतेच! तुमच्या ह्या खटल्यात काहीच दम नाही. आत्ता जर १९१८ साल असतं तर त्या वेड्या कोर्चागिनशी मी माझ्या पद्धतीनं हिशेब चुकते केले असते. आता माझ्याशिवाय तुम्ही खुशाल खटल्याचं काम पुढं चालवा," असे म्हणून फाईलो हॉलमधून निघून गेला.

नंतर अध्यक्षांनी पावेलला काय घडले ते कथन करण्यास सांगितले. पावेलने शांतपणे हकिकत सांगण्यास आरंभ केला. मात्र संयम राखणे त्याला फार जड जात होते.

"मी स्वतःवर ताबा ठेवू न शकल्यानं तो प्रसंग घडला. पण जेव्हा माझ्या डोक्यापेक्षा माझ्या हातांनी जास्त काम करत होतो ते दिवस आता केव्हाच संपलेत. यावेळी जे काही घडलं तो केवळ अपघात होता. मी काय करतोय याची

मला जाणीव व्हायच्या आतच मी फाईलोवर प्रहार केला. गेल्या काही वर्षांत 'गनिमी' कृतीबद्दल दोषी ठरण्याचा माझ्या बाबतीत हा एकमेव प्रसंग आहे, त्याचा मी स्वतः निषेध करतो. पण माझा प्रहार योग्यच होता असं मला वाटतं. फाईलोसारखी माणसं किळसवाणी आहेत. एक क्रांतिकारक, एक कम्युनिस्ट हा त्याचवेळी एक नीच पशू आणि हरामखोर असू शकतो, यावर माझा कधीही विश्वास बसणार नाही. या प्रसंगामधून एकच विधायक बाब घडली ती म्हणजे आपल्या सहकारी कम्युनिस्टांच्या खाजगी जीवनातील वर्तनावर आपलं लक्ष वेधलं गेलं."

फाईलोला पक्षातून हाकलून देण्याच्या ठरावाला बहुसंख्य सदस्यांनी दुजोरा दिला. खोटा पुरावा दिल्याबद्दल ग्रीबोवला कडक ताकीद देण्यात आली आणि पुढील गुन्हा घडल्यास पक्षातून हाकलले जाईल असे सांगण्यात आले. संभाषणात भाग घेतलेल्या इतरांनी आपली चूक कबूल केली आणि कडक समज मिळण्यावर त्यांची सुटका झाली.

नंतर बार्तेलिक यांनी उपस्थितांना पावेलच्या मनःस्थिती-बद्दलचा वैद्यकीय तपासणी मंडळाचा अहवाला सांगितला. कोर्चागिनला ताकीद देण्यात यावी, असा ठराव पक्षाने खटल्यात तपासणीसाठी पाठवलेल्या कॉम्रेडने मांडताच सभेत जोरदार निषेध व्यक्त झाले. तपासनीसाने आपला ठराव मागे घेतला व पावेलची निर्दोष मुक्तता झाली.

त्यानंतर काही दिवसांनी पावेल खार्कोवच्या वाटेवर होता. पक्षाच्या प्रादेशिक समितीच्या कामातून आपल्याला मुक्त करावे आणि युक्रेनी कम्सामोलच्या मध्यवर्ती समितीच्या

हवाली करावे, अशी पावेलने सतत केलेली मागणी अखेरीस मान्य करण्यात आली होती. त्याला चांगले शिफारसपत्र देण्यात आले. मध्यवर्ती समितीच्या चिटणीसांमध्ये अकीमचा समावेश होता. खार्कोवमध्ये येताच पावेल त्याला भेटायला गेला व त्याने सर्व हकिकत सांगितली.

अकीमने पावेलच्या शिफारसपत्रावर नजर टाकली. त्यात म्हटले होते: "पक्षावर अमर्याद निष्ठा," पण पुढे म्हटले होते: "एकूण शांत डोक्याचा पक्ष कार्यकर्ता, पण काही वेळा स्वत:वरचा ताबा गमावतो. त्याची मज्जासंस्था बिघडल्यामुळे असे घडते."

"ह्या नोंदीनं चांगलं शिफारसपत्र बिघडलंय," अकीम म्हणाला. "पण काही हरकत नाही. आपल्यातल्या भक्कम लोकांनासुद्धा असं काही वेळा घडतं. दक्षिणेत जाऊन तब्येत सुधार आणि परत येशील तेव्हा कामाबद्दल बोलू.

अकीमने पावेलला प्रेमाने निरोप दिला.

मध्यवर्ती समितीचे "कोम्युनार" सॅनाटोरियम. गुलाबांच्या झुडुपांच्या बागांमध्ये आणि चमचमत्या कारंज्यांमध्ये द्राक्षवेलींनी वेढलेल्या पांढऱ्याशुभ्र इमारती. शुभ्र उन्हाळी पोषाखातील आणि पोहण्याच्या वेषातील सुटी घालविणारी माणसे... एका तरुण डॉक्टरणीने पावेलचे नांव नोंदबुकात लिहिले आणि कोपऱ्यावरच्या इमारतीत त्याला एक प्रशस्त खोली मिळाली. पांढरीशुभ्र बिछान्यावरची चादर, विलक्षण स्वच्छता आणि शांतता. अगदी पवित्र अभंग शांतता!

ताजेतवाने करणाऱ्या आंघोळीनंतर व स्वच्छ कपडे परिधान केल्यावर पावेल लगबगीने सागरतीरावर गेला.

त्याच्यासमोर शांत, भव्य सागर पसरला होता. निळसर-काळसर रंगाचा तो चकचकीत संगमरवरी विस्तार पार क्षितिजापर्यंत पसरला होता. दूर अंतरावर जेथे सागर आकाशाशी भिडला होता तेथे निळसर धुके दाटले होते व त्याच्या पृष्ठभागावर सूर्याच्या ओतीव गोळ्याची लाल आभा फाकली होती. सकाळच्या धुक्यामधून पर्वतराजीच्या प्रचंड कडांची अस्पष्ट रेषा दिसत होती. सागरावरून येणाऱ्या ताज्या, जोमदार झुळुकीला पावेलने श्वास भरून छातीत सामावले. समोरची निःस्तब्ध विस्तीर्ण निळाई पाहून त्याचे डोळे निवले.

किनाऱ्यावरच्या सोनेरी वाळूला चाटत एक लाट लडिवाळपणे त्याच्या पायांशी उलगडत गेली.

प्रकरण सातवे

केंद्रीय पॉलिक्लिनिकची बाग केंद्रीय समितीच्या सॅनाटोरियमच्या आवाराला लागूनच होती. किनाऱ्यावरून परत येताना जवळची वाट म्हणून रुग्ण तिचा वापर करीत. उंच चुनखडी भिंतीलगत वाढलेल्या एका उंच आणि विस्तीर्ण झाडाच्या सावलीत तेथे आराम करायला पावेलला आवडत असे. ह्या निवांत कोपऱ्यामधून तो बागेत फिरणाऱ्या आनंदी लोकांना पाहू शकत असे आणि संध्याकाळच्या वेळी उत्साही लोकांची धक्काबुक्की टाळून बँडवरचे संगीत ऐकू शकत असे.

आजही तो आपल्या ह्या खास आवडत्या जागी येऊन बसला होता. नुकतीच आंघोळ करून आल्यामुळे आणि सूर्यप्रकाशात बसल्यामुळे त्याला आरामखुर्चीत पडल्या पडल्या गुंगी आली

होती. त्याच्या खुर्चीशेजारीच त्याचा टॉवेल पडला होता व फुर्मानोव यांनी लिहिलेले 'उठाव' हे पुस्तक वाचता वाचता त्याने तसेच बाजूला ठेवले होते. सॅनाटोरियमच्या मुक्कामातील पहिल्या काही दिवसात त्याच्या तणावलेल्या स्नायूंना मुळीच आराम लाभला नव्हता व त्याचे डोके दुखणे चालूच होते. सॅनाटोरियमचे डॉक्टर त्याच्या आजारापायी अजूनही गोंधळलेले होते. पावेलच्या आजाराचे मूळ शोधण्याचा त्यांचा सतत प्रयत्न चालू होता. सारख्या चालू असलेल्या तपासण्यांनी पावेल अगदी पिडला होता. त्या तपासण्यांपायी तो थकून जात असे. म्हणून आपल्या वॉर्डातल्या डॉक्टरणीला तो चुकवू पाही. वस्तुत: त्याची वॉर्ड डॉक्टरीण एक प्रसन्न व्यक्तिमत्वाची तरुणी होती. येरूसालीमचिक असे तिचे थोडे वेगळेच आडनांव होते. आपल्या ह्या अनुत्सुक पेशंटला हुडकून काढून या ना त्या तज्ज्ञ डॉक्टरकडे त्याला घेऊन जाता जाता तिची पुरेवाट व्हायची :

"मला ह्या सगळ्याचा कंटाळा आलाय," पावेल तिला पटवून देऊ पहायचा. "दिवसातून पाच वेळा मला तीच तीच कहाणी सांगावी लागते आणि सगळ्या मूर्ख प्रश्नांना उत्तरं द्यावी लागतात : तुमचे आजोबा वेडे होते का, किंवा तुमचे पणजोबा संधिवातानं आजारी होते का? ते कशानं आजारी होते हे मला कसं माहीत असणार? मी त्यांना जन्मात कधी पाहिलं नाही! प्रत्येक डॉक्टर माझ्याकडून वदवून घ्यायला बघतो की, मला एकदा तरी परमा झाला होता किंवा त्याहून वाईट रोग लागला होता! त्यांची टकलं फोडण्याची मी धमकी घालतो तेव्हा थांबवतात असले आचरट प्रश्न विचारायचे! मला फक्त विश्रांती घेऊ द्या. बस्स! माझ्या इथल्या

सहा आठवड्यांच्या मुक्कामात मी जर माझ्या अशाच तपासण्या करवून घेऊ लागलो तर समाजाला माझ्यापासून नक्की धोका निर्माण होईल !"

येरूसालीमचिक हसायची, त्याच्याबरोबर विनोद करायची. पण काही मिनिटांनंतर हळूच त्याच्या दंडाला धरून उठवायची आणि सबंध वाटभर काहीतरी अखंड बडबड करीत सर्जनकडे घेऊन जायची.

पण आज कुठल्याही तपासणीचा संभव नव्हता आणि जेवणाला अजून एक तासाचा अवधी होता. आत्ता गुंगीत असतानाच पावेलला कुणाची तरी पावले जवळ येत असलेली ऐकू आली. त्याने आपले डोळे उघडले नाही. "मी झोपलोय अशा समजुतीनं ते निघून जातील," असा त्याने विचार केला. पण त्याची आशा खोटी होती. शेजारची खुर्ची करकरली आणि कुणीतरी बसल्याचा आवाज झाला. सेंटचा मंद सुगंध त्याच्या नाकाला स्पर्शून गेला त्यावरून शेजारची व्यक्ती स्त्री होती हे त्याला समजले. त्याने डोळे उघडले. प्रथम त्याच्या नजरेला पांढराशुभ्र झगा आणि केशरी रंगाच्या कातडी सपातांमधले उन्हाने करपलेले तांबूस पाय दिसले. मग पुरुषी थाटाचा बॉब, दोन टप्पोरे डोळे आणि उंदरासारख्या तीक्ष्ण दातांची शुभ्र पंक्ती दिसली. तिने त्याच्याकडे पाहून लाजून स्मित केले.

"मी तुमच्या विश्रांतीत व्यत्यय तर आणला नाही ना?"

पावेलने उत्तर दिले नाही. त्याचे तसे वागणे सभ्यतेला धरून नव्हते. पण ती तिथून निघून जाईल अशी त्याला अजूनही आशा वाटत होती.

"हे तुमचं पुस्तक?" ती 'उठाव'ची पाने चाळीत होती.

"होय."

क्षणभर शांततेत गेला.

"तुम्ही कोम्युनार सॅनाटोरियममध्ये आहात ना?"

पावेलने अस्वस्थपणे हालचाल केली. "का ती त्याला निवांत पडू देत नव्हती? आता तिने त्याच्या आजाराच्या चौकशा सुरू केल्या असत्या. त्याला तिथून उठून जाणे भाग पडणार होते."

"नाही," तो तुटकपणे उत्तरला.

"मी तिथं तुम्हाला पाहिल्याचं खात्रीनं मला आठवतं."

पावेल अगदी उठायच्या बेतात होता तेवढ्यात एका स्त्रीचा भरदार, प्रसन्न आवाज त्याला पाठीमागून ऐकू आला:

"दोरा, तू इथं काय करतेस?"

गुबगुबीत, उन्हात करपलेल्या कांतीची, सोनेरी केसांची, पोहण्याच्या पोषाखातील एक तरुणी खुर्चीच्या कडेशी येऊन बसली. तिने कोर्चागिनकडे एक ओझरता कटाक्ष टाकला.

"कॉम्रेड, मी तुम्हाला यापूर्वी कुठंतरी पाहिलंय. तुम्ही खार्कोवचे आहात?"

"हो."

"तुम्ही कुठं काम करता?"

ह्या संभाषणाला विराम देण्याचा पावेलने निर्धार केला.

"केरकचरा खात्यात," तो उत्तरला. त्या पाठोपाठ उमटलेल्या हास्याच्या खळखळाटाने त्याला दचकायला झाले.

"कॉम्रेड, तुम्ही फारसे अदबशीर दिसत नाही. होय ना?"

तर त्यांची मैत्री ही अशी सुरू झाली. दोरा रोद्किना ही पक्षाच्या खार्कोव नगर समितीच्या ब्यूरोची सदस्या असल्याचे आढळून आले. पुढे त्यांची एकमेकांशी अधिक चांगली ओळख

झाली, तेव्हा त्यांच्या प्रथम परिचयाच्या वेळच्या मनोरंजक प्रसंगावरून त्याला ती वारंवार चिडवीत असे.

एके दिवशी दुपारच्या भोजनानंतरच्या खुल्या पटांगणातील करमणुकीच्या कार्यक्रमाला "तालास्सा" सॅनाटोरियमच्या आवारात पावेलची त्याच्या जुन्या मित्राशी – झार्कीयशी – अचानक गाठ पडली. आणि गंमत म्हणजे फॉक्सट्रॉट नाचामुळे ते एकत्र आले.

'जळत्या वासनेच्या रात्री' हे अत्यंत भावनाप्रधान गीत एका भरदार गायिकेने म्हटल्यानंतर एक जोडपे उडी मारून रंगमंचावर अवतरले. त्यातल्या पुरुषाने डोक्यावर नळकांड्या-सारखी लाल टोपी घातली होती, पण तो जवळ जवळ अर्धनग्न होता. कमरेला त्याने चमचमणाऱ्या टिकल्या चिकटवल्या होत्या, पांढराशुभ्र सदरा आणि त्यावर बो लावून जंगली माणसाचे सोंग आणले होते. त्याच्या बाहुलीसारख्या चेहऱ्याच्या साथीदारीणीने प्रचंड घेराचा घागरा घातला होता. सॅनाटोरियमच्या रुग्णांच्या आरामखुर्च्यांच्या आणि खाटांच्या मागे उभ्या असलेल्या माजलेल्या मानांच्या दुकानदारांच्या आनंदप्रदर्शक चीत्कार-आरोळ्यांच्या साथीवर ते जोडपे फॉक्सट्रॉटच्या वेगवेगळ्या मुद्रा नाचत होते. तसे किळसवाणे दृश्य क्वचितच पहायला मिळाले असते. ती खुळचट टोपी घातलेला तो जाडा पुरुष आणि त्याला बिलगलेली ती बाई अत्यंत सूचक अश्लील हालचाली रंगमंचावर करीत होते. मागील बाजूस कुणी लठ्ठ व्यक्ती ध्वनीयुक्त श्वासोच्छ्वास करीत असल्याचे पावेलला जाणवले. तो तेथून निघून जाण्यासाठी

वळणार तोच पुढच्या रांगेतून कुणीतरी उठून उभा राहिला आणि ओरडला.

"कुंटणखान्यातला हा खेळ बंद करा! भिक्कार साले!"

तो झार्कीय होता.

पियानोवादक वाजवायचा थांबला आणि व्हायोलिन कुई ऽऽ आवाज करून थंडावले. रंगमंचावरचे जोडपे वळवळायचे थांबले. पाठीमागच्या प्रेक्षकांनी दुष्ट फूत्कार टाकले.

"कार्यक्रम थांबवायचा काय हा बेशरमपणा!"

"सगळा युरोप फॉक्सट्रॉट नाचतोय!"

"कहर झाला!"

पण चेरेपोवेत्स कम्सामोल संघटनेचा चिटणीस आणि कोम्युनार सॅनाटोरियमचा एक पेशंट सेर्योझा इबानोव याने चार बोटे तोंडात घालून कर्कश्य शीळ वाजवली. इतरांनी त्याचे अनुकरण केले आणि वाऱ्याच्या झोताने उडून जावे त्याप्रमाणे क्षणार्धात ते जोडपे रंगमंचावरून अदृश्य झाले. जुन्या काळच्या लाळघोटचा माणसाप्रमाणे दिसणाऱ्या खुशामत्या निवेदकाने जाहीर केले की, कार्यक्रम-पथक निघून जात होते.

"साली घाणीची ब्याद टळली!" सॅनाटोरियमच्या लांब झग्यातला एक तरुण सार्वत्रिक हशामध्ये ओरडला.

पावेलने पुढच्या ओळींमध्ये जाऊन झार्कीयला गाठले. त्या दोन मित्रांनी पावेलच्या खोलीत खूप वेळपर्यंत गप्पा मारल्या. पक्षाच्या प्रादेशिक समित्यांच्या एका प्रचार विभागात आपण काम करीत असल्याचे झार्कीयने पावेलला सांगितले.

"मी लग्न केलं ते तुला ठाऊक आहे?" झार्कीयने विचारले. "लौकरच मला मुलगा किंवा मुलगी होण्याची मी वाट पाहतोय."

"काय? लग्न केलंस?" पावेलने आश्चर्याने विचारले "कोण तुझी बायको?"

झार्कीयने खिशामधून एक फोटो बाहेर काढला आणि पावेलला दाखवला.

"ओळखलंस हिला?"

तो खुद्द झार्कीयचा आणि आन्ना बोरहार्तचा फोटो होता.

"दुबावाचं काय झालं?" अधिकच आश्चर्य वाटून पावेलने विचारले.

"तो मॉस्कोत आहे. पक्षामधून त्याला हाकलून लावल्यानंतर त्यानं विद्यापीठ सोडलं. आता तो बौमन तांत्रिक संस्थेत आहे. त्याला परत पक्षात घेतलं असं ऐकलं. ती बातमी खरी असेल तर फार वाईट! तो अगदी पार वाया गेलेला माणूस आहे... पानक्रातोव काय करतोय असं वाटतं तुला? तो जहाजबांधणी कारखान्याचा उपसंचालक झालाय. बाकीच्यांबद्दल मला फारशी माहिती नाही. अलिकडं आमचा संपर्क सुटलाय. आपण सारे देशाच्या वेगवेगळ्या भागांमधून काम करतोय. पण कधीमधी एकत्र जमून जुन्या आठवणींना उजाळा द्यायला चांगलं वाटतं."

तेवढ्यात अनेक लोकांना सांगाती घेऊन दोरा खोलीत आली. झार्कीयच्या जाकीटावरच्या सन्मानपदकाकडे नजर टाकीत तिने पावेलला विचारले.

"तुझा मित्र पक्षाचा सभासद आहे ना? तो कुठं काम करतो?"

बुचकळ्यात पडलेल्या पावेलने तिला झार्कीयबद्दल थोडक्यात माहिती सांगितली.

"छान. मग काही हरकत नाही," दोरा म्हणाली. "तो

इथं राहू शकतो. माझ्याबरोबरचे हे कॉम्रेड नुकतेच मॉस्कोहून आलेत. पक्षातल्या ताज्या बातम्या ते आपल्याला सांगणार आहेत. तुझ्या खोलीत येऊन एक गुप्त पक्ष-बैठक भरवायचं आम्ही ठरवलं," तिने खुलासा केला.

पावेल आणि झार्कीय यांचा अपवाद वगळता, आलेली सर्व नवी माणसे ही जुनी बोल्शेविक होती. मॉस्को नियंत्रण आयोगाचे एक सदस्य बार्तशेव यांनी ट्रॉट्स्की, झिनोव्येव व कामेनेव यांच्या पुढारीपणाखाली निघालेल्या नव्या विरोधी गटाबद्दल माहिती दिली.

"अशा कसोटीच्या क्षणी आपण आपापल्या जागी असायला हवं," समारोप करताना बर्तशेव म्हणाले. "मी उद्या चाललोय."

पावेलच्या खोलीत झालेल्या बैठकीनंतर तीन दिवसांनी सारे सॅनाटोरियम ओस पडले. पावेलसुद्धा आपली मुदत पुरी होण्याच्या आधीच तेथून बाहेर पडला.

कम्सामोलच्या मध्यवर्ती समितीने त्याला खोळंबून ठेवले नाही. एका औद्योगिक प्रदेशात कम्सामोल चिटणीस म्हणून त्याची नेमणूक करण्यात आली आणि आठवडाभराच्या आतच तो स्थानिक नगर संघटनेच्या सभेपुढे भाषण देत होता.

त्या वर्षाच्या शरदाच्या अखेरीस पावेल आणखी दोन पक्ष कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन एका दूरच्या विभागात मोटारी-मधून जात असताना, मोटार खड्ड्यात घसरून उलटी झाली.

आतील सर्व प्रवाशांना इजा झाल्या. पावेलच्या उजव्या गुडघ्याचा चुरा झाला. काही दिवसांनंतर त्याला खार्कोवच्या शल्यक्रिया संस्थेत नेण्यात आले. दुखावलेल्या अवयवाची



क्ष-किरणांनी तपासणी केल्यानंतर तपासणी मंडळाने तात्काळ शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला.

पावेलने शस्त्रक्रियेला संमती दिली.

"तर मग उद्या सकाळी," तपासणी मंडळाचे प्रमुख असलेले धिप्पाड प्राध्यापक म्हणाले. ते उठले आणि इतर त्यांच्या पाठोपाठ निघाले.

एक कॉट असलेला छोटा चकचकीत वॉर्ड. निष्कलंक स्वच्छता आणि बऱ्याच काळापूर्वी तो विसरलेला इस्पितळातील एक विशिष्ट वास. पावेलने सभोवार नजर टाकली. कॉटशेजारी एक पांढराशुभ्र कपडा पसरलेले छोटे टेबल होते आणि पांढऱ्या रंगाचे स्टूल होते. बस्स, एवढेच!

नर्स त्याचे रात्रीचे जेवण घेऊन आली. पावेलने ते परत पाठवले. बिछान्यात अर्धवट उठून बसून तो पत्रे लिहित होता. त्याच्या गुडघ्यातील वेदना त्याच्या विचारांमध्ये बाधा आणत होती आणि त्याची भुकेची वासना पार नष्ट झाली होती.

त्याचे चौथे पत्र लिहून पुरे होत असतानाच दार हळूच उघडले गेले व पांढऱ्या झग्यातली आणि पांढरी टोपी घातलेली एक तरुणी त्याच्या बिछान्यापाशी आली.

संधिप्रकाशात त्याला तिच्या कमानदार भुवया आणि काळे भासणारे मोठे डोळे दिसले. तिच्या एका हातात पोर्टफोलिओ होता व दुसऱ्या हातात कागदाचा एक ताव आणि पेन्सिल होती.

"मी तुमच्या वॉर्डची डॉक्टर," ती म्हणाली. "आता मी तुम्हाला खूप प्रश्न विचारणार आहे आणि तुम्हाला आवडो अथवा न आवडो, पण तुम्ही मला तुमची सारी माहिती सांगितली पाहिजे."

तिने प्रसन्नपणे स्मित केले. त्या स्मितामुळे तिच्या "उलटतपासणी"ची धार बोथट बनली. पावेलने केवळ स्वत:बद्दलच नव्हे तर अनेक पिढ्यांमागच्या आपल्या सर्व नातेवाईकांबाबत तिला जवळ जवळ तासभर माहिती सांगितली.

...ऑपरेशन थिएटर. नाकांवर आणि तोंडांवर जाळीदार मुखवटे चढविलेली माणसे. चकाकती निकेलची उपकरणे. प्रचंड बेसिन खालच्या बाजूस असलेले एक लांबट अरुंद टेबल.

पावेलला ऑपरेशन टेबलवर झोपविण्यात येत होते तेव्हा प्राध्यापक अजून हात धूत होते. त्याच्या पाठीमागे ऑपरेशनची सारी तयारी जलद गतीने चालू होती. पावेलने मान वळवली. एक नर्स चिमटे आणि शस्त्रक्रियेची हत्यारे मांडून ठेवीत होती.

"कॉम्रेड कोर्चागिन, तिकडं पाहू नका," पावेलची वॉर्ड डॉक्टरीण बाझानोवा म्हणाली. त्याच्या पायावरचे बँडेज सोडता सोडता ती म्हणाली: "मनाचा धीर सुटतो एखादवेळी!"

"कुणाच्या मानसिक धीरासंबंधी बोलताय डॉक्टर?" उपहासाने स्मित करीत पावेलने विचारले.

काही मिनिटातच त्याच्या चेहऱ्यावर एक जड मुखवटा ठेवण्यात आला. प्राध्यापकांचे शब्द त्याला ऐकू आले:

"आम्ही तुम्हाला बेशुद्धीचं औषध देतोय. नाकानं दीर्घ श्वास घ्या आणि आकडे मोजा."

"ठीक आहे" मुखवट्याआडचा घुसमटलेला शांत आवाज उत्तरला. "काही अश्लील उद्‌गार माझ्या तोंडून निघण्याची शक्यता आहे म्हणून आधीच माफी मागून ठेवतो."

प्राध्यापक हसू दाबू शकले नाही.

ईथरचे पहिले थेंब. जीव गुदमरून टाकणारा नकोसा वाटणारा वास.

पावेलने खोल श्वास घेतला आणि स्पष्ट बोलण्याचा प्रयत्न करीत तो आकडे मोजू लागला. त्याच्या शोकांतिकेच्या पहिल्या अंकाचा पडदा वर गेला होता.

आर्त्योमने पाकीट फोडले व धडधडत्या काळजाने आतील पत्र उलगडले. पहिल्या काही ओळींवर त्याचे डोळे खिळले आणि मग बाकीच्या पानावरून त्याची नजर झरझर फिरली.

"आर्त्योम! आपण एकमेकांना अगदी क्वचितच लिहितो. वर्षातून फार तर एकदा किंवा दोनदा! पण आकडा थोडाच महत्त्वाचा आहे? मूळे उपटून टाकायची तुझी इच्छा होती म्हणून शेपेतोवकाहून कझा-तिन रेल यार्डात तू मुक्काम हलवलास असं लिहितोस. ती मूळं स्तेशाच्या आणि तिच्या नातेवाईकांच्या छोटया मालकीहक्काच्या मनोवृत्तीत रुजलेली आहेत. स्तेशासारखी माणसं बदलवणं फार कठीण आहे आणि तुला त्याबाबतीत कितपत यश येईल याची मला शंका वाटते. 'तुझ्या म्हातारपणात' अभ्यास करणं तुला फार जड जातं असं म्हणतोस, पण तुझी प्रगती काही वाईट नाही. कारखाना सोडून नगर सोविएतचं अध्यक्षपद स्वीकारण्यास तू हट्टानं नकार देतोस हे चुकीचं आहे. तू सोविएत सत्तेसाठी लढलास ना? मग तिचा स्वीकार कर! उद्याच नगर सोविएतमध्ये जाऊन कामाला लाग!

"आता माझ्याविषयी! माझ्यात काहीतरी गंभीर

विघाड झालाय. मी वारंवार इस्पितळांमध्ये मुक्कामाला असतो. त्यांनी मला दोनदा कापलाय. मी बरंच रक्त आणि ताकद गमावलीय, पण हे सारं केव्हा संपेल याबद्दल अजून मला कुणीच सांगत नाही.

"मी आता काम करायला लायक राहिलो नाही. मी आता नवा व्यवसाय पत्करलाय – 'अपंग' होण्याचा! मला बरीच वेदना सहन करावी लागते. आणि या सगळ्याची गोळाबेरीज म्हणजे माझ्या उजव्या गुडघ्याच्या सांध्याची हालचाल अजिबात थांबलीय, माझ्या शरीराच्या वेगवेगळ्या भागांमध्ये जखमांचे वण उमटलेत आणि वैद्यकशास्त्राचा सर्वांत नवा शोध: सात वर्षांपूर्वी माझ्या मणक्याला जखम झाली होती त्याबद्दल मला आता फार मोठी किंमत मोजावी लागणार, असं सांगण्यात आलंय! पण परत पक्षात जाऊन काम करता यावं यासाठी मी वाट्टेल तेवढं सोसायला तयार आहे.

"पक्षाच्या कामापासून बाहेर राहणं यापेक्षा भयंकर माझ्या दृष्टीनं दुसरं काही नाही. तसा विचारच मला सहन होत नाही. म्हणूनच त्यांना काय हवं ते मी त्यांना करू देतो. पण अजिबात सुधारणा घडत नाही. निराशेचे ढग अधिकच काळवंडत आणि दाटत चालले आहेत. पहिल्या ऑपरेशननंतर हिंडू फिरू लागताच मी ताबडतोब कामावर परतलो. पण लौकरच त्यांनी मला परत आणलं. आता मला येवपातोरियाला "मायनाक" सॅनाटोरियममध्ये पाठवताहेत. मी उद्या चाललोय. आर्त्योम, तू या बातमीनं धीर सोडू नको. मी सहजासहजी हार मानत नाही हे तुला ठाऊक आहे. तीन

आयुष्यांचं बळ अजून माझ्यात आहे. बंधू, तू आणि मी अजूनही काही चांगलं काम करू शकू. तुझ्या प्रकृतीची काळजी घे. ताकदीपेक्षा जास्त बोजा वाहू नको, कारण तब्येतीच्या दुरुस्तीसाठी पक्षाला फार मोठा भुर्दंड सोसावा लागतो. कामामधून मिळालेला अनुभव आणि अभ्यासामधून मिळवलेलं ज्ञान इस्पितळांमध्ये वाया घालवणं योग्य नव्हे. मनःपूर्वक नमस्कार.

पावेल कोर्चागिन."

आर्त्योम आपल्या दाट भुवया आकुंचित करून जेव्हा आपल्या भावाचे हे पत्र वाचत होता तेव्हा पावेल इस्पितळात डॉ. बाझानोवाचा निरोप घेत होता.

"उद्या क्रिमियाला जायला निघणार तर?" आपला हात पावेलच्या हाती देत ती म्हणाली. "आजचा दिवस कुठं घालवणार आहात?"

"लौकरच कॉम्रेड रोद्किना येईल," पावेल उत्तरला. "तिच्या घरच्यांच्या भेटीसाठी ती मला तिच्या घरी नेणार आहे. तिथं मी रात्री राहीन आणि उद्या ती मला स्टेशनावर नेऊन जाईन."

बाझानोवाला दोरा माहीत झाली होती, कारण पावेलला इस्पितळात भेटण्यासाठी दोरा वारंवार येत असे.

"कॉम्रेड कोर्चागिन, तुम्ही इथून जाण्यापूर्वी एकदा माझ्या वडिलांना भेटायचं कबूल केलं होतं, हे विसरलात काय? तुमच्या आजाराबद्दलची इत्थंभूत माहिती मी त्यांना दिलीय आणि त्यांनी तुम्हाला एकदा तपासावं अशी माझी इच्छा आहे. आज संध्याकाळी जमेल?"

पावेलने तात्काळ संमती दिली.

त्या संध्याकाळी बाझानोवा पावेलला आपल्या वडिलांच्या प्रशस्त ऑफिसात घेऊन गेली.

त्या विख्यात सर्जनने पावेलची अत्यंत काळजीपूर्वक तपासणी केली. बाझानोवाने क्लिनिकमधून सर्व क्ष-किरण फोटो आणि तपासणी अहवाल आणले होते. तिच्या वडिलानी लॅटिनमध्ये काहीतरी लांबलचक शेरा मारला तेव्हा तिचा चेहरा एकदम पांढराफटक पडल्याचे पावेलच्या नजरेतून सुटले नाही. पुढे झुकून पावेलची तपासणी करणाऱ्या प्राध्यापकमहाशयांच्या मोठ्या टकलाकडे पावेलने नजर टाकली व त्यांच्या चौकस डोळ्यांमध्ये रोखून पाहिले. पण सर्जन बाझानोव यांच्या चेहऱ्यावरून पावेलला कशाचाही थांग लागला नाही.

पावेलने अंगात परत कपडे घातले तेव्हा प्राध्यापकांनी अदबीने त्याचा निरोप घेतला. त्यांना एका परिषदेला जायचे होते असा त्यांनी खुलासा केला व आपल्या तपासणीचा अहवाल पावेलला सांगण्याचे काम आपल्या मुलीवर सोपवले.

इरीना वासील्येवना बाझानोवाच्या कलात्मक रीतीने सजविलेल्या खोलीत एका कोचावर पडून पावेल तिच्या बोलण्याची वाट पहात होता. पण सुरुवात कशी करावी ते तिला समजेना. आपल्या वडिलांनी जे काही सांगितले होते ते पुन्हा सांगण्याचा धीर तिला होत नव्हता. पावेलच्या शरीरात घडणाऱ्या विनाशकारी सूजीच्या प्रक्रियेला आळा घालण्यास वैद्यकशास्त्र असमर्थ होते. आता ऑपरेशन करू नये असे प्राध्यापकांचे मत होते. त्यांनी सांगितले होते: "या तरुणाचे अवयव हळूहळू लुळे पडत जाणार आहेत आणि त्याची शोकांतिका टाळण्याचं सामर्थ्य आमच्यात नाही."

एक डॉक्टर अथवा स्नेही अशा दोन्ही नात्यांनी संपूर्ण सत्य पावेलला सांगणे शहाणपणाचे नव्हते असे तिचे मत होते. म्हणून अत्यंत निवडक शब्दात तिने त्याला त्या सत्याचा फक्त काही अंश सांगितला.

"कॉम्रेड कोर्चागिन, माझी खात्री आहे की येवपातोरिया-मधले मृत्तिका उपचार तुम्हाला उपयोगी पडतील आणि शरदाच्या मोसमाच्या दरम्यान तुम्ही परत कामावर हजर व्हाल."

पण त्याचे तीक्ष्ण डोळे सारा वेळ तिच्याकडे टक लावून पहात होते हे ती विसरली होती.

"तुम्ही जे काही सांगता आहात, किंबहुना तुम्ही जे काही सांगितलं नाही त्यावरून परिस्थिती गंभीर आहे असं मला दिसतं. माझ्याशी नेहमी संपूर्ण खुलेपणानं बोला असं मी तुम्हाला सांगितल्याचं आठवतं ना? माझ्यापासून काहीही लपवून ठेवायचं कारण नाही. मला भोवळ येणार नाही किंवा माझा गळा कापून घ्यायचा मी प्रयत्न करणार नाही. पण माझ्या पुढ्यात काय वाढून ठेवलंय ते मला जाणून घ्यायचंय."

काहीतरी विनोद करून थेट उत्तर देण्याचे बाझानोवाने टाळले आणि त्या रात्री पावेलला स्वतःच्या भविष्याविषयीचे सत्य समजू शकले नाही.

"कॉम्रेड कोर्चागिन, मी तुमची स्नेही आहे हे विसरू नका," निरोपाच्या वेळी डॉक्टरीण हळुवारपणे म्हणाली. "तुमच्या आयुष्यात पुढं काय घडणार आहे हे कोण सांगणार? पण कधी मदत किंवा सल्ला यांची गरज भासली तर मला जरूर लिहा. मला शक्य ती सर्व मदत मी करीन."

हातात्या काठीवर भार देत, दारापासून रस्त्यावर थांबलेल्या

टॅक्सीकडे मोठ्या कष्टाने जाणारी पावेलची उंच, कातडी कपडयांमधली आकृती इरीना बाझानोवा आपल्या खोलीच्या खिडकीमधून खिन्नपणे पहात होती.

पुन्हा एकदा येवपातोरिया. दक्षिणेकडचा तापणारा सूर्य. विणकाम केलेल्या गोल टोप्या घातलेले, उन्हाने करपलेल्या कांतीचे गोंगाट करणारे लोक. दहा मिनिटाच्या मोटार-प्रवासानंतर नवागत मंडळी "मायनाक" सॅनाटोरियमच्या करडया रंगाच्या दोन मजली चुनखडी इमारतीपाशी पोचली.

युक्रेनी कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीमार्फत पावेलची जागा राखण्यात आली होती असे कामावरच्या डॉक्टरना समजताच त्यांनी पावेलला खोली क्र. ११ पाशी नेले.

"मी तुम्हाला कॉम्रेड एब्नेर यांच्याबरोबर रहायला जागा देतो. आपल्या खोलीतला साथीदार रशियन असावा असं ते म्हणाले होते," दारावर ठोठावीत डॉक्टर म्हणाले. आतून जर्मन उच्चारात रशियन शब्द उच्चारले गेले: "आत या!"

पावेलने आपली प्रवासी ट्रंक खाली ठेवली व बिछान्यावर पडलेल्या सोनेरी केसाच्या आणि चमकदार निळया डोळयांच्या माणसाकडे तो वळला. त्या जर्मन माणसाने पावेलचे प्रेमळ स्मिताने स्वागत केले.

"गुट मोर्गेन गेनोस्सेन, अं... मला म्हणायचं होतं नमस्कार..." त्याने स्वतःला सुधारीत पावेलशी हस्तांदोलन करायला फिकट, लांबसडक बोटांचा हात पुढे केला.

त्यानंतर काही क्षणांच्या अवधीतच पावेल त्या जर्मनाच्या बिछान्यापाशी बसून गप्पा मारण्यात पुरता गढून गेला होता. अशा 'आंतरराष्ट्रीय भाषे' मधील संभाषणात शब्दांपेक्षा

हातवारे, मूकाभिनय इत्यादी गोष्टीच मधले सुटलेले धागे जोडीत असतात.

एब्नेर हे जर्मन कामगार होते आणि १९२३ च्या हॅम्बुर्ग उठावात कमरेच्या खाली त्यांना जखम झाली होती. जुनी जखम पुन्हा चिघळली होती व ते अंथरुणाला खिळले होते. पण आपल्या यातना ते हसऱ्या चेहऱ्याने सोसत होते व त्यामुळेच पावेलच्या आदरास ते तात्काळ पात्र ठरले होते.

यापेक्षा चांगल्या साथीदाराची पावेलची अपेक्षा नव्हती. आपल्या आजारपणांविषयी सकाळपासून संध्याकाळपर्यंत रडगाणे गाणाऱ्यांपैकी आणि स्वतःच्या नशीबाला दोष लावीत बसणाऱ्यांपैकी एब्नेर नव्हते. उलट त्यांच्या संगतीत माणसाला स्वतःच्या दुःखांचा विसर पडत असे.

"तरी पण मला जर्मन अजिबात येत नाही हे वाईट," असा खेदपूर्वक विचार पावेलच्या मनात आला.

सॅनाटोरियमच्या आवारातील एका कोपऱ्यात अनेक डोलणाऱ्या खुर्च्या, वेताचे एक टेबल आणि चाकांच्या दोन खुर्च्या होत्या. दिवसातले वैद्यकीय उपचार संपल्यानंतर या ठिकाणी येऊन वेळ घालवायची पाच पेशंटना सवय लागली होती. त्यांना इतर सारेजण "कोमिन्टर्नची कार्यकारिणी" असे म्हणत.

चाकाच्या एका खुर्चीत एब्नेर अर्धवट लवंडून पडले होते. चालायला बंदी असल्यामुळे पावेल दुसऱ्या खुर्चीत होता. त्या गटातल्या इतर तीन माणसांपैकी एक होते वायमन. भक्कम आडव्या बांध्याचा हा एस्तोनियाचा माणूस क्रिमियाच्या प्रजासत्ताकीय व्यापार मंत्रालयात काम करीत होता. मार्ता

लौरीन ही तपकिरी डोळ्यांची लात्वियाची तरुणी अगदी अठरा वर्षांच्या मुलीसारखी भासायची. आणि कपाळाशी केस पांढरे होत असलेले उंच, धिप्पाड बांध्याचे सैबेरियाचे लेदेनेव. ह्या छोटया गटात खरोखरीच पाच भिन्न राष्ट्रीयत्वांची माणसे एकवटली होती: जर्मन, एस्तोनियन, लात्वियन, रशियन आणि युक्रेनी. मार्ता व वायमन जर्मन बोलत आणि एब्नेर त्यांचा दुभाषी म्हणून उपयोग करून घेत. पावेल आणि एब्नेर एकाच खोलीत रहात असल्यामुळे ते मित्र झाले होते. मार्ता, एब्नेर, वायमन हे समान भाषा बोलत असल्यामुळे एकमेकांच्या जवळ आले होते. लेदेनेव आणि कोर्चागिन यांच्यामध्ये बुद्धिबळे हा दुवा होता.

लेदेनेव येण्यापूर्वी कोर्चागिन हा सॅनाटोरियमचा "बुद्धिबळपटु" मानला जात होता. वायमन यांच्याशी जोरदार झुंज देऊन त्याने तो किताब जिंकला होता. कफ प्रवृत्तीच्या त्या एस्तोनियन माणसाला आपल्या पराभवाचा जबर हादरा बसला होता व आपल्याला उखडून काढल्याबद्दल कित्येक दिवसपर्यंत तो कोर्चागिनला क्षमा करू शकला नाही. पण एके दिवशी एक उंच, वयाच्या पन्नाशीपेक्षा खूपच तरुण भासणारा माणूस सॅनाटोरियममध्ये दाखल झाला व त्याने कोर्चागिनला बुद्धिबळाचा एक डाव खेळण्याचे आमंत्रण दिले. धोक्याची अजिबात जाणीव नसलेल्या पावेलने आपली पहिली खेळी शांतपणे केली. पण लेदेनेवनी मधली प्यादी हलवून त्याला प्रतिशह दिला. "बुद्धिबळपटु" या नात्याने, येणाऱ्या सर्व नव्या खेळाडूंशी खेळणे पावेलला भाग पडत असे आणि अशावेळी डावाभोवती बघ्यांचा गराडा पडत असे. नवव्या खेळीनंतर पावेलला जाणवले की, त्याचा प्रतिस्पर्धी सतत प्यादी पुढे

सरकवून त्याची कोंडी करीत होता. आपला प्रतिस्पर्धी फार धोकेबाज आहे याची आत्ता कुठे पावेलला जाणीव झाली व आरंभी अगदी सहजपणे खेळल्याचा त्याला पश्चात्ताप होऊ लागला.

पावेलने तीन तासपर्यंत आपले सारे कौशल्य आणि बुद्धी पणाला लावून जोरदार लढा दिला. पण शेवटी त्याला हार मानावी लागली. कुणाही बघ्याच्या आधी त्याला त्याचा पराभव कळून चुकला होता.

त्याने आपल्या प्रतिस्पर्ध्याकडे एक कटाक्ष टाकला. लेदेनेव त्याच्याकडे प्रेमळ नजरेने पहात असल्याचे त्याला आढळले. खेळ कसा संपणार ते त्यांनाही समजले होते हे स्पष्ट होते. एस्तोनियन वायमन मोठ्या उत्सुकतेने खेळ पहात होते. कोर्चागिनचा पराभव व्हावा ही आपली इच्छा ते उघडपणे व्यक्त करीत होते, पण अद्याप त्यांनाही पुढचा अंदाज आला नव्हता.

"शेवटच्या प्याद्यापर्यंत मी नेहमी टिकाव धरतो," पावेल म्हणाला आणि लेदेनेवनी संमतीदर्शक मान डोलावली.

पावेल पाच दिवसात लेदेनेव यांच्याबरोबर दहा डाव खेळला. त्यातले सात तो हरला, दोन जिंकला आणि एक डाव अनिर्णित राहिला.

वायमन यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

"धन्यवाद कॉम्रेड लेदेनेव, मनःपूर्वक धन्यवाद! भली खाशी खोड मोडलीत त्याची! त्याची कुणीतरी जिरवणं भागच होतं! आम्हा सगळ्या म्हाताऱ्या बुद्धिबळवाल्यांचा त्यानं पराभव केला होता आणि आता एका म्हाताऱ्यानंच त्याचा फज्जा उडवला! हा ऽ! हा ऽऽ!"

"हरल्यानंतर कसं वाटतं, आँ?" पराभूत पावेलला ते चिडवू लागले.

"बुद्धिबळपटु" हा किताब पावेलने गमावला, पण लेदेनेव यांच्या रूपाने त्याला एक अत्यंत चांगला मित्र लाभला. पुढे हेच लेदेनेव त्याला बहुमोल मदत करणारे ठरणार होते. त्याचा बुद्धिबळात पराभव होणे अगदी स्वाभाविक होते याची त्याला आता जाणीव झाली. त्याचे बुद्धिबळाचे ज्ञान अगदीच वरवरचे होते आणि ज्याला खेळाची सारी रहस्ये अवगत होती अशा एका निष्णात खेळाडूशी तो हरला होता.

कोर्चागिन आणि लेदेनेव यांना असे आढळले की, त्यांच्यात एक महत्त्वाची तारीख समान होती: ज्या वर्षी पावेल जन्मला होता त्याच वर्षी लेदेनेव पक्षात दाखल झाले होते. दोघेही बोल्शेविकांच्या तरुण आणि जुन्या रक्षकांचे अगदी वैशिष्ट्यपूर्ण प्रतिनिधी होते. लेदेनेव यांच्या पाठीशी तीव्र राजकीय कार्याचे प्रदीर्घ जीवन होते, भूमिगत चळवळीच्या कार्याची आणि झारच्या तुरुंगात भोगलेल्या कारावासाची वर्षे होती. त्यानंतर त्यांनी महत्त्वाच्या सरकारी कारभारात कामगिरी बजावली होती. पावेलपाशी ज्वलंत तारुण्याचा आणि अवघा आठच वर्षांचा लढ्याचा अनुभव होता. पण ती वर्षे एकाहून अधिक आयुष्यांच्या मोलाची होती. आणि ते दोघेही, म्हातारा आणि तरुण, जीवनोत्सुक होते, प्रकृतीने मोडलेले होते.

संध्याकाळच्या वेळांना एब्नेर व कोर्चागिन यांच्या खोलीला क्लबाचे स्वरूप प्राप्त होई. साऱ्या राजकीय बातम्या तेथून बाहेर पडत. खोलीत हसण्याचा आणि गप्पांचा आवाज दुमदुमत राही. वायमन नेहमी संभाषणात एखादा अश्लील विनोद कोंबण्याचा प्रयत्न करीत. पण मार्ता आणि कोर्चागिन

अशा दोघांकडून त्यांच्यावर हमखास हल्ला होत असे. सहसा मार्ता एखादा खवट शेरा मारून वायमनना काबूत ठेवीत असे, पण जेव्हा त्याचाही उपयोग होत नसे तेव्हा कोर्चागिन मैदानात उतरीत असे.

"वायमन, तुमच्या 'विनोदांचा नमुना आमच्या आवडीला अजिबात रुचणारा नाही," मार्ता म्हणायची.

"अशा गोष्टी तुम्ही बोलूच कशा शकता ते मला कळत नाही," अस्वस्थ सुरात कोर्चागिन बोलू लागायचा.

वायमन आपला खालचा जाड ओठ पुढे काढायचे आणि आपल्या बारीक लबाड डोळ्यांनी एकदा जमलेल्या मंडळींकडे उपहासाने पहायचे.

"आपल्याला राजकीय प्रबोधन खात्याच्या अख्त्यारात एक नीतीमत्ता विभाग काढला पाहिजे आणि कोर्चागिनला तिथं मुख्य इन्स्पेक्टर म्हणून नेमा, अशी शिफारस केली पाहिजे. मार्ताचा आक्षेप मी समजू शकतो. ती पुरुषांना विरोध करणाऱ्या जातिवंत बायकांची प्रतिनिधी आहे. पण कोर्चागिन उगीचच भाबडेपणाचा आव आणतो. जणू कडेवरचं कम्सामोली बाळ... शिवाय अंड्यानं कोंबडीला शहाणपण शिकवण्याला माझा कडक विरोध आहे."

कम्युनिस्ट नीतीमत्तेच्या प्रश्नावर एक खडाजंगी चर्चा झडल्यानंतर, तात्त्विक भूमिकेमधून अश्लील विनोदांचा विषय चर्चिला गेला. तेथे प्रकट झालेल्या वेगवेगळ्या विचारांचा अनुवाद मार्तानि एब्नेरना सांगितला.

"लैंगिक विषयावरचे विनोद सांगणं चांगलं नाही. मी पावेलशी सहमत आहे," एब्नेर म्हणाले.

वायमनना माघार घेणे भाग पडले. त्यांनी तो विषय

हसण्यावारी नेला, पण पुन्हा कधीही वाह्यात गोष्टी सांगितल्या नाही.

मार्ता फारतर एकोणीस वर्षांची असावी असें समजून पावेल तिला कम्सामोल सभासद समजत होता. पण ती १९१७ पासून पक्षात होती, तिचे वय आता एकतीस होते व लात्वियाच्या कम्युनिस्ट पक्षाची ती क्रियाशील कार्यकर्ती होती, हे ऐकून तो कमालीचा चकित झाला. १९१८ मध्ये श्वेतरक्षकांनी तिला गोळी घालून ठार मारण्याची शिक्षा दिली होती. पण पुढे कैद्यांच्या अदलाबदलीत काही कॉम्रेडांबरोबर तिलाही सोविएत सरकारकडे सोपविण्यात आले होते. आता ती 'प्रावदा'च्या संपादकीय मंडळात काम करीत होती व त्याचवेळी विद्यापीठाचा अभ्यासक्रम पुरा करीत होती. पावेलला काही जाणवायच्या आतच त्यांच्यात मैत्री निर्माण झाली होती. एब्नेरना पहायला वारंवार येणारी ती छोटीशी लात्वियन महिला "पाच" गटातली एक अविभाज्य सदस्या बनली होती.

एग्लीत नांवाचा एक भूमिगत लात्वियन कामगार यावरून तिला चिडवायचा: "मार्तोच्का, बिचाऱ्या अझोलचं तिकडं मॉस्कोत काय होत असेल? झुरतोय बिच्चारा! मार्ता, हे बरं नव्हे हं!"

दररोज सकाळी उठण्याची घंटा वाजण्याच्या जरा आधी, सबंध सॅनाटोरियमभर एक कोंबड्याची बांग खणखणून वाजायची. गोंधळलेले सेवक ह्या मोकाट सुटलेल्या कोंबड्याला धरण्यासाठी खूप पळापळ करायचे. पण कोंबड्याच्या आरवण्याची हुबेहूब नक्कल करण्यात पटाईत असलेले एब्नेर हा चावटपणा करीत असतील, असे बिचाऱ्या सेवकांच्या कधी मनातसुद्धा

आले नाही. एब्नेरना हा वात्रटपणा करणे मनापासून आवडायचे.

पावेलला, सॅनाटोरियममध्ये येऊन महिना होत आला आणि त्याची प्रकृती जास्तच बिघडली. डॉक्टरांनी त्याला फक्त झोपून राहण्याची ताकीद दिली. एब्नेर कमालीचे बेचैन झाले. ह्या तरुण धाडसी बोल्शेविकाचा त्यांना फार लळा लागला होता. एवढा चैतन्याने रसरसलेला तरुण एवढ्या अकाली वयात अंथरुणाला खिळावा याचे त्यांना वैषम्य वाटत होते. कोर्चागिनच्या आगामी शोकांतिकेबाबत डॉक्टरांची निदाने कोणती होती ते मार्ताने एब्नेरना सांगितले, तेव्हा ते फारच खचले.

सॅनाटोरियमच्या उरलेल्या मुक्कामात पावेल अंथरुणालाच खिळून होता. आपल्या भोवतालच्या लोकांपासून आपल्या वेदना लपवून ठेवणे त्याला जमत असे. पण त्याच्या भयानक पांढुरक्या चेहऱ्यावरून एकट्या मार्ताला जाणवायचे की, त्याला कमालीच्या यातना होत असल्या पाहिजेत. प्रयाण करण्यापूर्वी आठवडाभर आधी पावेलला युक्रेनच्या मध्यवर्ती समितीकडून आलेले पत्र मिळाले. सॅनाटोरियमच्या डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्याची रजा आणखी दोन महिन्यांनी वाढविल्याचे त्याला त्या पत्रामधून कळविण्यात आले होते. डॉक्टरांनी त्याला काम करण्यास अयोग्य ठरविले होते. त्या पत्राबरोबरच खर्चा-साठी पावेलला पैसेही पाठविण्यात आले होते.

कित्येक वर्षांपूर्वी बॉक्सिंगचे धडे घेताना झुखराय यांचे प्रहार झाल्यावर पावेल जसा वागला होता, तसाच हा पहिला प्रहार त्याने सोसला. त्यावेळीही तो खाली पडला होता, पण तात्काळ उठून पुन्हा उभा राहिला!

त्याच्या आईचे पत्र आले होते. येवपातोरियापासून जवळच एका छोटया बंदरगावी आल्बीना क्युत्साम नांवाची तिची एक जुनी मैत्रीण रहात होती. तिला पावेलने भेटावे असे आईने पत्रातून सुचविले होते. पावेलच्या आईने गेल्या पंधरा वर्षांत आपल्या मैत्रिणीला पाहिले नव्हते, म्हणून पावेलने क्रिमियात असून तिला जरूर भेटावे असे तिने आवर्जून लिहिले होते. या पत्रामुळे पावेलच्या जीवनात फार मोठा बदल घडावयाचा होता!

आणखी एक आठवड्यानंतर पावेलच्या सॅनाटोरियममधल्या मित्रांनी त्याला धक्क्यावर खूप प्रेमाने निरोप दिला. मोठ्या भावाच्या भावनेने एब्नेरनी पावेलला आलिंगन दिले व त्याचे चुंबन घेतले. मार्ता त्यावेळी तेथे नव्हती, त्यामुळे तिचा निरोप घ्यायचे पावेलचे राहून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी धक्क्यावरून पावेलला घेऊन आलेली घोड्याची बग्गी एका छोटया घरासमोर थांबली. त्या घराला पुढे छोटीशी बाग होती.

क्युत्साम कुटुंबात पाच माणसे होती: आल्बीना, ही आई, काळयाभोर उदास डोळयांची आणि उतारवय होत चाललेल्या चेहऱ्यावर सौंदर्याचे काही अवशेष राहिलेली स्थूल अंगाची वयस्क बाई; तिच्या दोन मुली लेल्या आणि ताया, लेल्याचा छोटा मुलगा व कुटुंबप्रमुख म्हातारा क्युत्साम. हा गलेलठ्ठ, अप्रिय म्हातारा एखाद्या अस्वलासारखा दिसायचा.

म्हातारा क्युत्साम एका सहकारी भांडारात काम करीत होता. धाकटी मुलगी ताया तेथेच किरकोळ कामे करीत होती. टायपिस्ट असलेली लेल्या नुकतीच आपल्या दारुड्या आणि दांडगट नवऱ्यापासून विभक्त झाली होती. सध्या ती

घरीच राहून आपल्या छोट्या मुलाचे संगोपन करीत होती व आईला घरकामात मदत करीत होती.

त्या दोन मुलींशिवाय क्युत्सामना जॉर्ज नांवाचा एक मुलगा होता. पावेल आला त्यावेळी जॉर्ज लेनिनग्रादमध्ये होता.

पावेलचे क्युत्साम कुटुंबात मोठ्या अगत्याने स्वागत झाले. फक्त म्हातारबाबा तेवढे पाहुण्याकडे रोषाने आणि संशयाने पहात होते.

पावेलने मोठ्या नेटाने आल्बीनाला घरची सर्व हकिकत सांगितली व तेवढ्याच नेटाने क्युत्साम कुटुंबाची कहाणी ऐकली.

लेल्या बावीस वर्षांची होती. तपकिरी बॉब केसाच्या, रुंद चेहऱ्याच्या, साध्या वागणाऱ्या लेल्याने पावेलला चटकन आपल्या विश्वासात घेतले व घरातल्या सर्व खाजगी बाबी त्याला सांगून टाकल्या. तिने त्याला सांगितले की, म्हातारबाबा सबंध कुटुंबावर अरेरावी गाजवीत होता, जरा कुणी स्वतंत्रपणे वागायचा प्रयत्न केला की ताबडतोब त्या व्यक्तीला दडपून टाकीत होता. संकुचित मनाच्या, हेकेखोर आणि हुज्जती म्हाताऱ्याने आख्ख्या कुटुंबाला सतत दहशतीच्या वातावरणात ठेवले होते. त्यामुळे त्याच्या मुलांना त्याच्याबद्दल अप्रीती निर्माण झाली होती व गेली पंचवीस वर्षे त्याच्या जुलमी वृत्तीविरुद्ध व्यर्थ झगडणारी त्याची बायको त्याचा दु:स्वास करीत होती. मुली नेहमी आपल्या आईची बाजू घेत. ह्या सततच्या कौटुंबिक भांडणांमुळे त्यांची आयुष्ये नासून गेली होती. अखंड शिव्यागाळीत आणि संघर्षात दिवस चालले होते.

कौटुंबिक कलहाचा आणखी एक उगम आपला भाऊ जॉर्ज

होता, असे लेल्याने पावेलला सांगितले हा जॉर्ज अगदी कुचकामी होता, बढाईखोर आणि उर्मट होता. चांगलेचुंगले खाणे, पिणे व भपकेबाज कपडे करणे यापलिकडे त्याला कशातही रस नव्हता. शाळेचे शिक्षण संपल्यानंतर विद्यापीठात जाण्याचे जॉर्जच्या मनाने घेतले होते व आईचा तो लाडका असल्याने ह्या सफरीचे पैसे त्याने आईकडून उकळले होते.

जॉर्ज आईला म्हणाला होता: "लेल्या आपली अंगठी विकील आणि पैसे उभे करता येण्यासारख्या तुझ्यापाशी काही वस्तू आहेत. मला पैसे हवेत. ते तू कसे मिळवशील त्याची मला पर्वा नाही."

आपली आई आपल्याला काहीही नाकारणार नाही हे जॉर्जला पक्के ठाऊक होते व तिच्या ह्या प्रेमाचा तो असा बेशरमपणे फायदा उपटत होता. आपल्या बहिणींकडे तो तुच्छतेने पाही. नवऱ्यापासून काढता येतील तेवढे पैसे काढून व तायाची सर्व मिळकत घेऊन आईने आपल्या मुलाला पैसे पाठवले होते. दरम्यान जॉर्ज प्रवेश परीक्षेत नापास झाला होता. तरीही लेनिनग्रादमध्ये आपल्या मामाकडे राहून तो चैन करीत होता आणि अधूनमधून दटावणीवजा तारा पाठवून आईकडे अधिक पैशाच्या मागण्या करीत होता.

पावेल ज्या दिवशी आला त्या दिवशी संध्याकाळी उशीरापर्यंत त्याची तायाशी भेट झाली नव्हती. ती घरी आली तेव्हा तिची आई लगबगीने व्हरांड्यातच तिला भेटली. आपल्या आगमनाची वार्ता ती हलक्या आवाजात तायाला सांगत असल्याचे पावेलने ऐकले. या परक्या तरुणाशी तायाने लाजतच हस्तांदोलन केले. लज्जेने तिच्या कानाच्या छोट्या पाळ्यासुद्धा लालबुंद झाल्या होत्या. तिचा मजबूत, घट्टे पडलेला छोटा

हात पावेलने काही वेळ तसाच आपल्या हातात धरून ठेवला व मग सोडला.

तायाला एकोणीसावे वर्ष चालू होते. तशी ती सुंदर नव्हती. पण तिचे टपोरे बदामी डोळे, तिच्या कलत्या मंगोलियन भुवया, सुरेख नाक आणि रसरशीत ओठ अशा सर्व गोष्टी लक्षात घेता ती आकर्षक दिसत होती. तिच्या पट्ट्या-पट्ट्याच्या ब्लाऊजमधून तिचे उभार कोवळे उरोज उठून दिसत होते.

त्या बहिणींच्या स्वतःपुरत्या दोन छोटया खोल्या होत्या. तायाच्या खोलीत एक निरुंद लोखंडी कॉट, सटरफटर वस्तूंनी झाकलेली कपडे ठेवण्याची खणांची पेटी, एक छोटा आरसा व भिंतींवर चिकटवलेली अनेक छायाचित्रे आणि पोस्टकार्डे होती. खिडकीच्या चौकटीत दोन फुलदाण्या उभ्या होत्या. एका फुलदाणीत शेंदरी जरेनिअमची आणि दुसरीत फिकट गुलाबी अॅस्टरची फुले होती. लेसच्या पडद्याला फिकट निळी फीत लावलेली होती.

"ताया आपल्या खोलीत पुरुषांना सहसा येऊ देत नाही. तुमच्यासाठी मात्र आज ती अपवाद करतेय," लेल्या आपल्या बहिणीला चिडवीत म्हणाली.

दुसऱ्या दिवशी सायंकाळी त्या म्हाताऱ्या जोडप्याच्या अर्ध्या घराच्या भागात सारेजण चहा पीत बसले होते. ताया स्वतःच्या खोलीत बसून बाहेरील संभाषण ऐकत होती. म्हातारा क्युत्साम भराभरा चहा ढवळीत होता आणि चष्म्याच्या वरून पाहुण्याकडे रागीट कटाक्ष टाकीत होता.

"आजकाल लग्नाच्या कायद्यांना काही अर्थच राहिलेला नाही," क्युत्साम म्हणाला. "आज लग्न केलं, तर उद्या

घटस्फोट! अगदी मनाला येईल तसं खुशाल वागावं! संपूर्ण मोकळीक!"

म्हाताऱ्याला ठसका लागून चहाचे शिंतोडे सर्वत्र उडाले. पुन्हा श्वास ठिकाणावर आला तेव्हा त्याने लेल्याकडे बोट दाखवून म्हटले:

"आता हिचंच पहा. हिनं आणि हिच्या त्या नवऱ्यानं कुणालाही न विचारता लग्न केलं, तसंच कुणालाही न विचारता घटस्फोट घेऊन मोकळी झाली. पण हिला आणि हिच्या कारट्याला गिळायला घालायची जबाबदारी मात्र आता माझ्यावर पडली. अगदी कहर आहे!"

शरमेने लेल्याचा चेहरा लालबुंद झाला आणि आपले अश्रुभरले डोळे तिने पावेलपासून दडविले.

"म्हणजे त्या नालायकाबरोबर तिनं रहायला हवं असं तुमचं म्हणणं आहे?" डोळे वटारीत पावेलने विचारले.

"कुणाशी लग्न करतोय हे तिला आधी माहीत असायला पाहिजे होतं."

आल्बीनाने मध्येच हस्तक्षेप केला. आपला राग कसाबसा आवरून ती पटकन म्हणाली: "परक्या माणसासमोर कशाला या गोष्टींची चर्चा करायची? बोलायला दुसरा विषय सापडत नाही का?"

म्हातारा वळून तिच्यावर खेकसला:

"मी काय बोलतोय ते मला चांगलं माहीत आहे. मी काय करावं ते केव्हापासून तू मला सांगायला लागलीस?"

त्या रात्री क्युत्साम कुटुंबाविषयी विचार करीत पावेल बराच वेळ अंथरुणात जागा होता. योगायोगाने तो येथे आला होता आणि ह्या कौटुंबिक नाटकात नकळत तो सामील झाला होता.

ह्या बंधनातून आईला आणि मुलींना कसे मुक्त करावे याचा तो विचार करीत होता. त्याचे स्वतःचे आयुष्य मुळीच स्थिर नव्हते, अनेक प्रश्न अजून तसेच लोंबकळत पडले होते आणि ठाम कृती करणे पूर्वीपेक्षाही आता जास्त अवघड बनले होते.

एकच स्पष्ट मार्ग होता: कुटुंब विभक्त होणे आवश्यक होते. आईने आणि मुलींनी म्हाताऱ्याला सोडायला पाहिजे होते. पण ही गोष्ट तेवढी सोपी नव्हती. ही कौटुंबिक क्रांती घडविण्याची जबाबदारी पावेल स्वतःच्या शिरावर घेऊ शकत नव्हता, कारण थोड्याच दिवसात तो तेथून जाणार होता व ह्या माणसांना कदाचित पुढे कधीच तो न भेटण्याची शक्यता होती. हे साठलेले गढुळ पाणी ढवळण्यापेक्षा गोष्टी आपल्या क्रमाने घडू देणे इष्ट नव्हते काय? पण त्या म्हाताऱ्याची निरस्करणीय प्रतिमा त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. पावेलच्या मनात अनेक योजना आल्या, पण विचारांती त्याने त्या सर्व अव्यवहार्य ठरवून पुसून टाकल्या.

दुसऱ्या दिवशी रविवार होता. गावात भटकून पावेल घरी आला तेव्हा ताया एकटीच बसलेली त्याला आढळली. बाकीची माणसे नातेवाईकांच्या भेटींना गेली होती.

पावेल तिच्या खोलीत गेला आणि थकून खुर्चीत बसला.

"तू बाहेर फिरायला जाऊन आपलं मन का रमवीत नाहीस?" त्याने तिला विचारले.

"मला कुठंही जावंसं वाटत नाही," खालच्या सुरात ती उत्तरली.

रात्रीच्या वेळी त्याने आखलेल्या योजना त्याला आठवल्या आणि त्या तिच्यासमोर मांडण्याचे त्याने ठरविले.

इतर परत येण्याच्या आत बोलणे संपावे म्हणून त्याने चटकन मुद्द्याला हात घातला.

"हे बघ ताया, आपण दोघं चांगले मित्र आहोत. तेव्हा उगीच औपचारीक घोळ कशाला घालायचा? लौकरच मी जाणार आहे. मी स्वतःच संकटात असताना तुमच्या कुटुंबाशी माझी ओळख घडावी हे दुर्दैव आहे. नाही तर गोष्टी वेगळया घडल्या असत्या. हेच जर वर्षापूर्वी झालं असतं तर आपण सगळेच इथून जाऊ शकलो असतो. तुझ्यासारख्या आणि लेल्यासारख्या लोकांना सगळीकडं चिक्कार काम आहे. म्हातारा बदलेल अशी अपेक्षा करणं व्यर्थ आहे. तुम्ही घरातून बाहेर पडणं एवढा एकच रस्ता आहे. पण ते सध्या अशक्य आहे. माझं स्वतःचं काय होणार आहे ते अजून माझं मलाच माहीत नाही. मला कामावर परत पाठवा, असा मी आग्रह धरणार आहे. डॉक्टरांनी माझ्याबद्दल काय वाट्टेल तो मूर्खपणा लिहून ठेवलाय आणि मी अखंड उपचार घेत बसावं असा कॉम्रेड प्रयत्न करताहेत. त्याचं काय करायचं ते मागाहून पाहू... मी आईला पत्र लिहून तुमच्या अडचणीवर तिचा सल्ला विचारतो. गोष्टी अशाच चालू ठेवू देणं मला जमणार नाही. पण ताया, एक गोष्ट लक्षात ठेव. हे करणं म्हणजे तुमच्या सध्याच्या आयुष्यापासून संपूर्ण संबंध तोडणं! हे करायची तुझी इच्छा आहे का? त्या दिव्यातून जाण्याची तुझ्यात ताकद आहे का?"

तायाने मान वर करून पाहिले.

"माझी इच्छा आहे," अस्फुटपणे ती म्हणाली. "ताकदीचं मला ठाऊक नाही."

तिच्या मनाची अनिश्चितता पावेल समजू शकत होता.

"काही हरकत नाही तायूशा! जोवर इच्छा आहे तोवर सारं काही ठीक होईल. तुझ्या घरातल्या लोकांशी तुझा जीव फार जडलेला आहे का?"

क्षणभर ताया घुटमळली.

"मला आईची फार दया येते," अखेरीस ती म्हणाली. "बाबांनी तिच्या आयुष्याची माती केली आणि आता जॉर्ज तिला छळतोय. तिनं माझ्यावर जॉर्जइतकं प्रेम कधीच केलं नाही हे खरं असलं, तरी मला तिच्याबद्दल फार फार वाईट वाटतं..."

खूप वेळपर्यंत त्या दोघांनी जिवाभावाच्या गोष्टी केल्या. घरातली बाकीची माणसे परतण्याची वेळ होण्याच्या जरा आधी पावेल विनोदाने म्हणाला:

"म्हाताऱ्यानं अजून तुझं कुणाशी लग्न लावून टाकलं नाही हे आश्चर्यच म्हणायचं!"

या नुसत्या विचारासरशी तायाने घाबरून हात वर उडवीत म्हटले:

"छे: छे:! मी कधीच लग्न करणार नाही. बिचारी लेल्या किती हालांमधून गेली ते मी पाहिलंय. कोणत्याही परिस्थितीत मी लग्न करणार नाही."

पावेल हसला.

"म्हणजे पुढच्या आयुष्याचा प्रश्न तू सोडवून टाकलायस? पण एखादा छान, देखणा तरुण भेटला तर?"

"तरीसुद्धा नाही. लग्न होईपर्यंत पिंगा घालीत सगळेच छान वागतात."

समजूत घालण्याच्या भावनेने पावेलने तायाच्या खांद्यावर हात ठेवला.

"ठीक आहे ताया. नवऱ्याशिवाय तू छान जगू शकशील हे खरं. पण तरुणांबाबत एवढं कठोर कशाला व्हायचं? आता मी तुझ्याभोवती पिंगा घालतोय अशी शंका तुला येत नाही म्हणून बरं, नाहीतर पंचाईत व्हायची!" असे म्हणून त्याने भावाच्या मायेने तिचा दंड थोपटला.

"तुझ्यासारखे पुरुष वेगळ्या प्रकारच्या मुलींशी लग्न करतात," ती हळूच म्हणाली.

काही दिवसांनंतर पावेल खार्कोवला जायला निघाला. ताया आणि लेल्या, तसेच रोझा नांवाच्या आपल्या बहिणी-बरोबर आल्बीना — अशा सगळ्याजणी पावेलला निरोप द्यायला स्टेशनावर आल्या होत्या. आपल्या मुलींना विसरू नकोस आणि दुःखामधून वाट बाहेर काढायला सर्वांना मदत कर, असे आल्बीनाने पावेलला विनवले. कुणीतरी अत्यंत जवळचा प्रिय नातेवाईक जावा, तसा त्या सर्वांनी त्याचा निरोप घेतला. तायाच्या डोळ्यांमध्ये तर अश्रू उभे होते. लेल्याचा पांढरा हात-रुमाल आणि तायाचा पट्ट्यापट्ट्याचा ब्लाऊज लहान होत होत संपूर्ण अदृश्य होईपर्यंत पावेल आगगाडीच्या खिडकीतून बाहेर पहात होता.

खार्कोवमध्ये त्याने पेत्या नोवीकोव नांवाच्या मित्राच्या घरी मुक्काम टाकला. दोराला त्रास देण्याची त्याची इच्छा नव्हती. प्रवासातील शीण जावा म्हणून थोडा आराम करून तो तात्काळ मध्यवर्ती समितीच्या कचेरीत गेला. तेथे तो अकीमच्या भेटीची वाट पहात बसला. सरतेशेवटी ते दोघेच उरले, तेव्हा आपल्याला ताबडतोब कामावर पाठव अशी पावेलने अकीमला विनंती केली. अकीमने नकारार्थी मान हलवली.

"शक्य नाही पावेल! वैद्यकीय मंडळाचा निर्णय आमच्यापाशी आहे आणि तुझी परिस्थिती गंभीर आहे असं मध्यवर्ती समिती म्हणते. तुला मज्जाविकारउपचार संस्थेत उपचारांसाठी पाठवायचं ठरलंय. काम करायला तुला परवानगी नाही."

"अकीम, ते काय म्हणतात त्याची मला मुळीच पर्वा नाही! मी तुला विनंती करतोय. मला काम करायची संधी दे! एका इस्पितळातून दुसऱ्या इस्पितळात फिरत राहणं अगदी जीवघेणं आहे."

अकीमने पावेलचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. "डॉक्टरांच्या निर्णयाविरुद्ध आम्हाला जाता येत नाही. पावेल, हे सारं तुझ्याच हितासाठी चाललंय ते तुला समजत नाही का?" पण पावेलने आपली बाजू एवढ्या हिरीरीने पटवून दिली, की शेवटी अकीमने त्याचे म्हणणे मान्य केले.

दुसऱ्याच दिवशी मध्यवर्ती समितीच्या सचिवालयाच्या खास विभागात पावेल कामाला लागला. आपण कामाला लागलो म्हणजे गेलेली ताकद आपोआप परत येईल, असे त्याला वाटत होते. पण आपली ती गैरसमजूत झाल्याचे लौकरच त्याच्या ध्यानात आले. दुपारचे जेवण न घेता तो सतत आठ तास टेबलाशी बसूनच काम करू लागला, कारण तीन जिने उतरून खाली कँटीनपर्यंत जाण्याचे श्रम त्याला सोसत नव्हते. त्याचा हात किंवा पाय वारंवार अचानकपणे बधीर होई आणि अनेकदा त्याचे संपूर्ण शरीर काही क्षणपर्यंत लुळे पडत असे. त्याला जवळ जवळ नेहमी ताप असे. काही वेळा सकाळी बिछान्यातून उठणेच त्याला अशक्य होई आणि तो झटका जाऊन परिस्थिती पूर्ववत होईपर्यंत कामावर जायला त्याला तब्बल तासभर उशीर झालेला असे. अशा वेळी तो कमालीचा

निराश होई. शेवटी असा एक दिवस उजाडला की, उशीरा कामावर येण्याबद्दल त्याला अधिकृतरीत्या ताकीद देण्यात आली. पक्षामधून वेगळे पडण्याची त्याला जी भीती वाटत होती, त्याच गोष्टीची ती सुरुवात होती.

त्याची दुसऱ्या कामावर बदली करून अकीमने दोनदा त्याला मदत केली. पण अपरिहार्य ते घडलेच. कामावर रुजू होऊन महिना झाला न झाला तोच पावेल पुन्हा अंथरुणाला खिळला. यावेळी त्याला बाझानोवाच्या निरोपाच्या वेळच्या शब्दांची आठवण झाली. त्याने तिला पत्र लिहिले आणि ते मिळताच ती त्याच दिवशी त्याला भेटायला आली. त्याला हवी होती ती माहिती तिने सांगितली: इस्पितळात राहण्याची आवश्यकता नव्हती!

"म्हणजे आता आणखी उपचार करून घ्यायची गरज नाही? किती छान!" तो खोटया उत्साहाने म्हणाला. पण त्याचा विनोद फुसका ठरला.

अंगात थोडी ताकद येताच तो परत मध्यवर्ती समितीमध्ये गेला. यावेळी मात्र अकीम निग्रही राहिला. पावेलने इस्पितळात गेलेच पाहिजे असा त्याने आग्रह धरला.

"मी नाही जाणार," थकल्या सुरात पावेल म्हणाला. "काही उपयोग नाही. एका उत्तम अधिकारी व्यक्तीनं मला सांगितलंय. आता एकच गोष्ट माझ्यासाठी उरलीय—पेन्शन घेऊन सेवानिवृत्त व्हायचं! पण ती गोष्ट मी कधीच करणार नाही. काम सोडायला तुम्ही मला भाग पाडू शकत नाही. मी अवघा चोवीस वर्षांचा आहे आणि उरलेलं आयुष्यभर कामाला नालायक म्हणून या इस्पितळातून त्या इस्पितळात अपंग या नात्यानं फिरणं मला शक्य नाही. विशेषत: उपचारांचा

काहीही उपयोग होणार नाही हे माहीत असताना! तुम्ही मला काही तरी करायला दिलंच पाहिजे. माझ्या परिस्थितीला अनुरूप असं काम द्या. मी घरी काम करू शकेन किंवा ऑफिसातच राहीन. मात्र कारकुनी काम मला देऊ नका. मी अजून उपयुक्त आहे असं समाधान मला मिळवून देणारं काम हवंय्!"

भावनावेगाने कंपित होणारा पावेलचा आवाज अधिकाधिक वर चढत गेला.

अकीमला पावेलबद्दल कमालीची सहानुभूती वाटत होती. आपले छोटे संपूर्ण जीवन पक्षाला अर्पण केलेल्या ह्या मनस्वी तरुणाला पक्षापासून तुटून बाजूला पडण्याचा आणि युद्धआघाडी-पासून अतिदूरचे जीवन जगण्याचा किती विलक्षण त्रास होत असेल, याची अकीमला कल्पना होती. शक्य ती सर्व मदत पावेलला करण्याचा त्याने निर्धार केला.

"ठीक आहे पावेल, आता शांत हो. उद्या सचिवालयाची बैठक होईल तेव्हा तुझी केस मी कॉम्रेडांसमोर मांडीन. मला शक्य ते सारं करण्याचं मी तुला वचन देतो."

जडपणे पावेल उठला आणि त्याने अकीमचा हात गच्च पकडला.

"आयुष्य मला एका कोपऱ्यात ढकलत नेऊन चिरडून टाकील असं खरंच तुला वाटतं का अकीम? जोपर्यंत माझं काळीज धडधडतंय–" आणि आपल्या छातीतली मंद धडधड अकीमला जाणवावी म्हणून पावेलने त्याचा हात आपल्या काळजाशी दाबला– "तोपर्यंत कुणीही मला पक्षापासून दुरावू शकणार नाही. फक्त मृत्यूच मला पक्षामधून बाहेर नेईल. मित्रा, माझ्या या शब्दांची आठवण ठेव."

अकीम काहीही बोलला नाही. पावेलचे बोलणे पोकळ नव्हते हे त्याला माहीत होते. लढाईत मरणांतिक घायाळ झालेल्या सैनिकाची ती आरोळी होती. कोर्चागिनसारखी माणसे दुसऱ्या पद्धतीने बोलू अथवा जाणवू शकणार नव्हती हे अकीमला ठाऊक होते.

दोन दिवसांनंतर अकीमने पावेलला सांगितले की, एका मोठ्या वर्तमानपत्रात काम करण्याची संधी त्याला देऊ करण्यात येणार होती. मात्र साहित्यिक कामाला तो पात्र ठरला तरच त्याची निवड व्हायची होती. संपादक कचेरीत पावेलचे अगत्याने स्वागत झाले. एका साहाय्यक संपादिकेने त्याची मुलाखत घेतली. ती पक्षाची जुनी भूमीगत कार्यकर्ती होती आणि युक्रेनच्या मध्यवर्ती नियंत्रण समितीच्या अध्यक्षमंडळाची सदस्या होती.

"कॉम्रेड, तुमचं शिक्षण किती झालंय?" तिने पावेलला विचारले.

"प्राथमिक तीन ईयत्ता."

"पक्षाच्या एखाद्या राजकीय विद्यालयात होतात?"

"नाही."

"हरकत नाही. या गोष्टींशिवायही एखादा माणूस चांगला पत्रकार बनू शकतो. कॉम्रेड अकीमनी तुमच्याबद्दल आम्हाला सांगितलंय. आम्ही तुम्हाला घरी करण्यासारखं काम देऊ शकू आणि कामाला योग्य त्या सोयी पुरवायची आमची तयारी आहे. मात्र अशा प्रकारच्या कामाला खूप ज्ञान असण्याची गरज आहे. विशेषतः साहित्याच्या आणि भाषेच्या क्षेत्रात."

ही परिस्थिती काही उत्तेजनपर नव्हती. त्या अर्ध्या

तासाच्या मुलाखतीत पावेलला जाणवले होते की, त्याचे ज्ञान अपुरे होते आणि चाचणीसाठी म्हणून त्याने लिहिलेला लेख त्याला परत देण्यात आला तेव्हा त्यात शैलीच्या आणि शुद्धलेखनाच्या सुमारे तीन डझन चुका लाल पेन्सिलीने केलेल्या आढळल्या.

"कॉम्रेड कोर्चागिन, तुमच्या अंगी खूपच पात्रता आहे आणि थोडे कष्ट केल्यानंतर तुम्ही चांगलं लेखन करू शकाल. पण सध्या तुमचं व्याकरण फार सदोष आहे. रशियन भाषा तुम्हाला चांगली येत नाही, असं तुमच्या लेखावरून दिसून येतं. तुम्हाला शिक्षण घ्यायला सवडच सापडली नाही, तेव्हा त्या गोष्टीबद्दल आश्चर्यकारक असं काही नाही. दुर्दैवानं आम्ही तुमचा उपयोग करून घेऊ शकत नाही. तुमच्या अंगी पात्रता आहे हे मघाच मी कबूल केलं असलं तरी! आशय न बदलता तुमच्या लेखाचं जर संपादन केलं तर तो लेख उत्तम होईल. पण आधीच आमच्यापाशी संपादकांचा तुटवडा आहे."

आपल्या काठीवर जोराने भार देत कोर्चागिन उठला. त्याची उजव्या भुवईवरची शीर ताडताड उडत होती.

"तुमचा मुद्दा मला समजला. कसा काय मी पत्रकार बनणार? एकेकाळी मी कोळसा मारायचं काम छान करायचा आणि इलेक्ट्रिशियन म्हणूनही काही वाईट नव्हतो. घोड्यावर बसण्यात मी पटाईत होतो आणि कम्सामोलच्या युवकांना कसं जागं करायचं ते मला माहीत होतं. पण तुमच्या क्षेत्रात मी काही करू शकीन असं वाटत नाही."

हस्तांदोलन करून त्याने निरोप घेतला.

व्हरांड्याच्या वळणाशी तो अडखळला आणि जवळून जाणाऱ्या एका स्त्रीने त्याला सावरले नसते तर तो नक्कीच पडला असता.

"कॉम्रेड, काय झालं? तुमची प्रकृती खूप बिघडलेली दिसते!" ती बाई म्हणाली.

पावेलला ठिकाणावर यायला कित्येक सेकंदांचा अवधी लागला. मग त्याने हळूच स्वतःला सोडवून घेतले आणि काठीवर जोराने भार देत तो चालू लागला.

त्या दिवसापासून आपल्या आयुष्याचा उतार सुरू झाला असे पावेलला वाटले. वारंवार तो अंथरुणाला खिळून राहू लागला. मध्यवर्ती समितीने त्याला कामातून मुक्त केले आणि त्याच्या पेन्शनीची सोय केली. योग्य काळात पेन्शन आली व तिच्याबरोबर काम करण्यास शारीरिकदृष्टया अपात्र ठरल्याचा दाखलाही आला. मध्यवर्ती समितीने त्याला पैसे दिले व त्याला हवे त्या ठिकाणी जाण्याचा हक्क देणारे कागदपत्र दिले.

मॉस्कोला येऊन भेट आणि विश्रांती घे, असे मार्ताचे पत्र त्याला मिळाले. कोणत्याही परिस्थितीत मॉस्कोला जाण्याचा पावेलचा इरादा होताच. फारसे फिरावे लागणार नाही असे काम शोधून देण्यात अखिल-संघ मध्यवर्ती समिती त्याला मदत करील, अशी एक धुगधुगती आशा त्याच्या मनात तेवत होती. पण मॉस्कोतही त्याला वैद्यकीय उपचार घेण्याचा सल्ला देण्यात आला व चांगल्या इस्पितळात जागा देऊ करण्यात आली. त्याने नकार दिला.

मार्ता आणि तिची फ्लॅटमधली जोडीदारीण नाद्या पेतेरसोन यांच्याबरोबर पावेलचे एकोणीस दिवस भुर्रकन गेले. पावेल बराच काळ एकटाच असायचा, कारण त्या दोघी तरुणी सकाळीच कामावर जायच्या आणि संध्याकाळपर्यंत घरी परतत नसत. मार्ताच्या सुसज्ज लायब्ररीमधली पुस्तके वाचत पावेल

वेळ घालवीत असे. संध्याकाळी त्या मुलींच्या आणि त्यांच्या स्नेह्यांच्या संगतीत प्रसन्न वेळ जात असे.

क्युत्साम यांच्याकडून भेटीला येण्याची निमंत्रणे देणारी पत्रे पावेलला आली. तेथे त्या बायकांचे जीवन असह्य बनले होते आणि त्याने मदत करण्याची जरूरी होती.

आणि एके दिवशी सकाळी, गुस्यात्नीकोव गल्लीतला तो छोटा निवांत फ्लॅट पावेलने सोडला. आगगाडीने त्याला वेगाने दक्षिणेला समुद्रकिनारी आणून सोडले. दमट पावसाळी शारदीय वातावरणातून तो एकदम दक्षिण क्रिमियाच्या उबदार सागरतीरांवर येऊन पोहोचला. वेगाने मागे जाणारे टेलिफोनच्या तारांचे खांब पहात पावेल आगगाडीच्या डब्यातल्या खिडकीशी बसला होता. त्याच्या भुवया जुळल्या होत्या व त्याच्या काळ्या डोळ्यांमध्ये एक हट्टी लहर चमकत होती.

प्रकरण आठवे

खाली खडबडीत खडकांवर सागराच्या लाटा फुटत होत्या. दूरच्या तुर्कीहून येणारे कोरड्या समुद्रवाऱ्यांचे झोत त्याच्या तोंडाला स्पर्शत होते. काँक्रीटच्या एक धक्क्याने समुद्रापासून बंदराचे रक्षण केले होते. वेड्यावाकड्या कमानदार आकारात हा धक्का किनारपट्टीत घुसला होता. शहराच्या सीमेवर डोंगरउतारांवर पांढऱ्या छोट्या छोट्या झोपड्या दिसत होत्या. ती डोंगरांची ओळ समुद्राशी येऊन एकदम तुटली होती.

शहराबाहेरच्या जुन्या उद्यानात अगदी निवांत होते. गवत

वाढलेल्या वाटांवर मेपलची पिवळी पाने सावकाश तरंगत येऊन कोसळत होती.

पावेलला शहरामधून ह्या बागेपर्यंत एका म्हाताऱ्या पर्शियन गाडीवानाने आणले. पावेल जेव्हा गाडीतून उतरला तेव्हा गाडीवानाने न राहवून आपल्या विचित्र प्रवाशाला विचारले:

"सगळ्या जागा सोडून इथं कशाला आलात? इथं तरुण्या पोरी नाहीत, मनाला रिझवायला काही नाही. फक्त कोल्ही फिरतात... इथं काय करणार? श्रीयुत तवारीश (कॉम्रेड – अनु.), मी तुम्हाला परत शहरात घेऊन जातो!"

पावेलने भाडे चुकते केले व म्हातारा गाडी घेऊन निघून गेला.

बाग खरोखरीच उजाड होती. जेथून समुद्र दिसत होता अशा एका कड्यावरच्या बाकड्यावर पावेल जाऊन बसला. शारदीय कोवळ्या उन्हात तो आपले तोंड शेकू लागला.

एकूण गोष्टींचा सारासार विचार करून आपल्या आयुष्याचे काय करायचे, यावर चिंतन करण्यासाठी तो ह्या निवांत ठिकाणी आला होता. एकूण आढावा घेऊन निर्णय घेण्याची वेळ ठेपली होती.

क्युत्साम कुटुंबाला त्याने दुसऱ्यांदा दिलेल्या भेटीमुळे त्या घरातला वाद पुन्हा भडकला होता. पावेल आल्याचे समजताच म्हातारा कमालीचा बिथरला होता. प्रतिकाराचे नेतृत्व करण्याचे काम साहजिकच कोर्चागिनवर पडले होते. म्हाताऱ्याला अनपेक्षितपणे बायकोकडून आणि मुलींकडून जोरदार प्रतिटोला बसला होता. पावेल आल्याच्या पहिल्याच दिवशी घरात दोन तट पडले. म्हाताऱ्या जोडप्याच्या घराच्या अर्ध्या भागाकडे जाणारा

दरवाजा बंद करण्यात आला होता व बाजूची एक खोली पावेलला भाड्याने देण्यात आली होती. पावेलने भाडे आगाऊ चुकते केल्यामुळे म्हातारा थोडासा नरम आला होता. शिवाय त्याच्या मुली स्वतःच त्याच्यापासून वेगळ्या झाल्यामुळे त्यांच्या भरण-पोषणाची जबाबदारी आता त्याच्या अंगावर राहिली नव्हती.

आल्बीना मात्र धोरणीपणाने आपल्या नवऱ्याबरोबरच राहिली. म्हातारा काटेकोरपणे आपल्या घराच्या अर्ध्या भागातच वावरत असे. पावेलचा तो मनापासून तिरस्कार करीत होता व पावेलचे तोंडही पाहण्याची त्याला इच्छा नव्हती. मात्र घराचे मालक अजून आपणच आहोत हे सिद्ध करण्यासाठी बाहेर अंगणात तो खूप आरडाओरडा करीत असे.

सहकारी भांडारात कामाला जाण्यापूर्वी म्हातारा क्युम्नाम जोडे शिवून आणि सुतारकाम करून उदरनिर्वाह करीत असे. त्यासाठी त्याने परसदारी एक छोटे वर्कशॉप बांधलेले होते. पावेलला त्रास देण्याच्या उद्देशाने म्हाताऱ्याने आता नवाच मार्ग अवलंबिला. पावेलच्या खिडकीच्या नेमके खाली त्याने काम करायला सुरुवात केली. तासन्तास तो ठोकाठोक करीत बसत असे. पावेलच्या वाचनात आपल्या ठोकाठोकीमुळे व्यत्यय येतो याचा म्हाताऱ्याला आसुरी आनंद लाभत असे.

"बेट्या, जरा थांब," म्हातारा स्वतःशीच फूत्कारायचा, "तुझी इथून उचलबांगडी केली नाही तर नांव बदलीन..."

दूर क्षितिजावर एका सागरगामी बोटीने काळ्या धुराचा बारीक पट्टा उमटवला होता. सागरपक्षी कलकलाट करीत लाटांवर झेपावून खाद्य शोधत होते.

हनुवटीवर हात ठेवून पावेल विचारमग्न बसला होता. अगदी बालपणापासून ते आत्तापर्यंतचा त्याचा संपूर्ण जीवनपट त्याच्या मन:चक्षूंसमोरून झरझर सरकला होता. ही चोवीस वर्षे तो कशी जगला होता? ती कारणी लागली होती अथवा नाही? पुन्हा एकदा त्याने एक एक वर्ष घेऊन उजळणी केली. विचारपूर्वक, नि:पक्षपातीपणे त्यांची छाननी केली व आपण आयुष्य काही अगदीच वाया घालविले नाही असे त्याला आढळले तेव्हा त्याला कमालीचे हलके वाटले. अर्थात त्या आयुष्यात चुका घडल्या होत्या. त्या चुका तारुण्या-पोटी घडल्या होत्या, पण सर्वांत जास्त अज्ञानापायी घडल्या होत्या. पण सोविएत सत्तेसाठी घडलेल्या लढ्याच्या वादळी दिवसात तो ऐन धुमश्चक्रीत गुंतलेला होता व क्रांतीच्या लाल पताकेवर त्याच्या स्वत:च्या रक्ताचे चार थेंब मिसळलेले होते.

त्याची ताकद संपेपर्यंत तो पक्षाच्या आघाडीत राहिला होता. पण आता घायाळ झाल्यामुळे युद्धमोर्च्यांवर उभे राहणे त्याला शक्य नव्हते आणि रणांगणावरच्या इस्पितळात राहण्या-खेरीज इतरत्र जागा उरली नव्हती. वॉर्सावर चढाई केली होती तेव्हाच्या काळाची पावेलला आठवण झाली. त्यांच्यातला एकजण रणांगणावर पडला. आपल्या घोड्याच्या टापांखालीच तो सैनिक कोसळला होता. त्याच्या साथीदारांनी चटकन त्याच्या जखमांवर मलमपट्टी केली व स्ट्रेचरवाल्यांच्या हाती त्याला सोपवून पुन्हा शत्रूचा पाठलाग धरला होता. एका पडलेल्या सैनिकासाठी त्या स्क्वाड्रनने आपले कूच थांबवले नाही. मोठ्या ध्येयासाठी करण्याच्या लढ्यात हे असे घडते आणि ते तसेच घडले पाहिजे. काही अपवाद घडतात हे खरे. लढाईत तोफगाड्यांवर पांगळे मशिनगनवाले बसलेले त्याने

पाहिले होते. शत्रूच्या फौजेत त्या लोकांनी दहशत बसविली होती, त्यांच्या तोफांनी शत्रूपक्षात मृत्यूचे आणि विनाशाचे थैमान घातले होते, त्यांच्या पोलादी धैर्यामुळे व अचूक नेमबाजीमुळे आपल्या तुकड्यांमध्ये ते अभिमानविषय बनले होते. पण अशी माणसे फार थोडी होती.

आता पराभवाने त्याच्यावर कुरघोडी केली होती आणि पक्षात परत जाण्याची काही आशा उरली नव्हती, अशा परिस्थितीत तो काय करणार होता? भविष्यामध्ये त्याच्या लेखी अधिक यातना वाढून ठेवलेल्या होत्या याची कबुली वाझानोवाकडून त्याने घेतली नव्हती का? काय केले पाहिजे होते? पायाशी प्रचंड दरी आ वासून उभी असावी तसा तो प्रश्न त्याच्यापुढे आ वासून उभा होता.

लढण्याची ताकद त्याने गमावली होती. आपले प्रेयस हरवून बसल्यानंतर जगण्यात काय अर्थ होता? आजच्या आणि आनंदविहीन उद्याच्या आपल्या अस्तित्वाचे तो कसे समर्थन करणार होता? आपले दिवस तो कसे कंठणार होता? केवळ श्वास घेण्यासाठी, खाण्यापिण्यासाठी जगत रहायचे? आपले साथीदार लढत लढत पुढची वाट आक्रमीत असताना अगतिक बघ्याची भूमिका पत्करून बसायचे? छे: छे: ! त्यापेक्षा हे नतद्रष्ट शरीर नष्ट केलेले काय वाईट? तुकडीला भार होऊन कशाला राह्यचे? काळजात एक गोळी आणि खलास! चांगले जगलेल्या जीवनाची योग्य वेळी अखेर! आपल्या यातनेमधून स्वत:ची मुक्तता केल्याबद्दल सैनिकाला कोण बोल लावील?

खिशातले चपटे ब्राऊनिंग पिस्तूल त्याने चाचपले. त्याच्या मुठीवर त्याची बोटे आवळली गेली व सावकाशपणे ते शस्त्र त्याने खिशामधून बाहेर काढले.

"अशा थरापर्यंत तू येऊन पोचशील याची कुणाला कल्पना ?"

पिस्तुलाची नळी थंड तिटकाऱ्याने त्याच्याकडे रोखून पहात होती. पावेलने पिस्तूल गुडघ्यावर ठेवले आणि एक जोरदार शिवी हासडली.

"बंधो, हा सगळा कागदी पराक्रम! कुणीही मूर्ख स्वतःला गोळी घालू शकतो. हा अगदी सोपा रस्ता, भेकडाचा रस्ता! आयुष्य जेव्हा जोरदार तडाखे मारते तेव्हा केव्हाही मस्तकात गोळी झाडता येते. पण याहून चांगले आयुष्य प्राप्त करण्याचा प्रयत्न केलास? हा पोलादी सापळा तोडण्याचे सारे यत्न करून संपले अशी तुझी खात्री झाली? नोवग्राद-वोलीन्स्की इथे लढताना एका दिवसात आपण सतरा वेळा चढाई केली होती आणि सारे प्रतिकूल असूनही आपण ती लढाई जिंकलो होतो, याची आठवण विसरलास काय? मुकाट पिस्तूल बाजूला ठेव आणि कुणापाशी चकार शब्दाने याचा उच्चार करू नकोस! जीवन असह्य होते तेव्हा कसे जगायचे ते शीक. आपले जीवन उपयोगी बनव."

तो उठला आणि रस्त्यावर आला. एका पहाडी माणसाने आपल्या गाडीतून त्याला शहरापर्यंत सोडले. शहरात गेल्यावर पावेल गाडीतून उतरला आणि त्याने एक वर्तमानपत्र विकत घेतले. देम्यान बेदनी क्लबात शहरातल्या पक्ष-गटाची सभा असल्याचे निवेदन त्याने वृत्तपत्रात वाचले. त्या सभेहून तो रात्री घरी परतला तेव्हा बराच उशीर झाला होता. सभेत त्याने भाषण केले होते. मोठ्या सार्वजनिक मेळाव्यापुढे बोलण्याची त्याची ही अखेरची वेळ होती, अशी त्यावेळी त्याला तिळमात्र कल्पना नव्हती.

तो घरी आला तेव्हा ताया अजून जागी होती. पावेल

इतक्या उशीरापर्यंत घरी न आल्यामुळे ती काळजीत पडली होती. काय झाले त्याला? त्या दिवशी सकाळी पावेलच्या डोळ्यात एक प्रकारची गंभीर, थंडपणाची छटा उमटलेली तिने पाहिली होती, याची तिला आठवण झाली. एरवी पावेलचे डोळे नेहमी सतेज आणि प्रेमळ असत. स्वत:बद्दल बोलणे त्याला कधीही आवडत नसे, पण तो कसल्यातरी मानसिक ताणाखाली असावा असे तिला जाणवले.

तिच्या आईच्या खोलीतल्या घड्याळात रात्री दोनचे टोले वाजलेले तिने ऐकले. तेवढ्यात फाटक करकरल्याचा आवाज तिच्या कानी पडला. पटकन जाकीट अंगात सरकवून ती दार उघडायला गेली. तायाला लेल्याची खोली ओलांडून बाहेर जावे लागे. तायाच्या हालचालीमुळे झोप चाळवलेली लेल्या काहीतरी पुटपुटली.

पावेल आत आला तेव्हा सुटकेचा नि:श्वास टाकीत ताया हलक्या आवाजात म्हणाली: "मला काळजी वाटायला लागली होती."

"ताया, जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत मला काहीही धाड भरणार नाही," तो खालच्या सुरात म्हणाला. "लेल्या झोपली? मला मात्र का कुणास ठाऊक, अजिबात झोपावंसं वाटत नाहीय! मला तुला काही सांगायचंय. तुझ्या खोलीत जाऊ या. उगीच लेल्याला जागं करायला नको."

ताया घुटमळली. बरीच रात्र झालेली होती. एवढ्या उशीराच्या वेळी त्याला आपल्या खोलीत ती कशी घेऊन जाणार? आईला काय वाटेल? पण त्याचा अपमान होईल या धास्तीने नकार देणेही तिला शक्य नव्हते. त्याला आपल्या खोलीकडे घेऊन जात असताना, नेमके तो काय सांगू इच्छित होता याबद्दल ती मनातल्या मनात नवल करीत होती.

"त्याचं असं आहे ताया," त्याने खालच्या आवाजात बोलायला आरंभ केला. मंद उजेडातल्या खोलीत तो तिच्यासमोर इतक्या जवळ बसला होता की त्याचा श्वास तिला जाणवत होता. "आयुष्य अशी विचित्र वळणं घेतं की अनेकदा आश्चर्य वाटायला लागतं. गेले काही दिवस माझ्या आयुष्यात फार वाईट गेलेत. मी कसा काय जगणार तेच मला समजत नव्हतं. एवढी निराशा कधीच वाटली नव्हती. पण आज मी माझ्या स्वतःच्या खाजगी 'पोलिट ब्यूरो'ची बैठक घेतली आणि खूप महत्त्वाचा एक निर्णय घेतला. मी काय बोलणार आहे ते ऐकल्यावर चकित होऊ नको."

गेले काही महिने तो कोणत्या दिव्यामधून गेला होता ते त्याने तिला सांगितले. तसेच बागेमध्ये त्या दिवशी त्याच्या मनात काय काय विचार आले होते, त्यापैकी बरेच काही त्याने तिला सांगून टाकले.

"तर परिस्थिती अशी आहे. आता अत्यंत महत्त्वाची गोष्ट. ह्या कुटुंबातल्या वादळाला आत्ता कुठं सुरुवात होतेय. इथून बाहेर मोकळ्या वातावरणात आपल्याला गेलं पाहिजे. ह्या बिळामधून जास्तीत जास्त दूर गेलं पाहिजे. आपण नव्यानं आयुष्याची सुरुवात केली पाहिजे. एकदा मी या लढाईत भाग घेतलाय, तर अखेरपर्यंत मला लढलं पाहिजे. सध्या आपलं आयुष्य – तुझं आणि माझं – काही फार सुखाचं नाही. त्यात काही प्राण ओतावा असं मी ठरवलंय. माझ्या म्हणण्याचा अर्थ तुला समजला? माझी आयुष्याची जोडीदारीण होशील? माझी बायको होशील?"

त्याच्या ह्या प्रांजल कबुलीमुळे ताया कमालीची भारावून गेली. पण त्याच्या शेवटच्या शब्दांनी ती दचकली.

"आजच मी तुझ्याकडून उत्तराची अपेक्षा करत नाही," तो पुढे म्हणाला. "यावर तू खूप काळजीपूर्वक विचार केला पाहिजेस. आधी कसलंही प्रणयाराधन न करता सरळ अशी लग्नाची मागणी मी घातल्यामुळं कदाचित तू गोंधळून गेली असशील. पण तुला-मला त्या सगळ्या उपचारांची गरज नाही. माझ्या सोनुली, हा माझा हात मी तुला देतो. माझ्यावर विश्वास टाकलास तर त्याचा तुला कधीही पश्चात्ताप करावा लागणार नाही. आपण दोघं एकमेकांना खूप काही देऊ शकू. मी असं ठरवलंय बघ: तू खऱ्या अर्थानं मोठी होईपर्यंत, अस्सल बोल्शेविक होईपर्यंत, आपलं एकत्र आयुष्य चालवायचं. त्या बाबतीत जर मी तुला मदत केली नाही तर माझ्या आयुष्याला कवडीची किंमत नाही, असं मी मानीन. तोपर्यंत आपण आपली जोडी फोडायची नाही. पण तू मोठी झालीस म्हणजे सर्व जबाबदाऱ्यांमधून मुक्त ठरशील. काय घडेल ते कुणाला माहीत आहे? कदाचित मी पुरता पांगळा होईन. तेव्हा मात्र तू माझ्याशी जखडून राहिलंच पाहिजे असं मुळीच समजायचं नाही."

काही क्षण तो गप्प राहिला. नंतर प्रेमळ, गोंजारणाऱ्या सुरात म्हणाला: "आत्ता मी तुला माझी मैत्री आणि माझं प्रेम देऊ करतो."

त्याने तिच्या बोटांमध्ये आपली बोटे गुंतवली. जणू काही तिने होकार दिला होता अशा भावनेने त्याला शांत शांत वाटत होते.

"तू मला कधीही टाकणार नाहीस, असं वचन देतोस?" तायाने विचारले.

"ताया, मी फक्त तुला वचन देऊ शकतो. पण माझ्या-

सारखे पुरुष आपल्या मित्रांचा कधी विश्वासघात करत नाही यावर विश्वास ठेवणं तुझ्यावर अवलंबून आहे... माझ्या मित्रांनी माझा विश्वासघात करू नये एवढीच आशा मी बाळगतो," शेवटचे वाक्य तो थोडचा कडवट सुरात म्हणाला.

"आजच्या आजच मी तुला उत्तर देऊ शकणार नाही. सारं फार अचानक घडलंय," ती म्हणाली.

पावेल उठला.

"झोप आता ताया. लौकरच उजाडेल."

तो आपल्या खोलीत गेला आणि कपडे न काढता तसाच अंथरुणावर पडला. ज्या क्षणी त्याचे डोके उशीला टेकले त्याच क्षणी त्याला गाढ झोप लागली.

पावेलच्या खोलीतील खिडकीजवळच्या टेबलावर पक्षाच्या लायब्ररीतून आणलेल्या पुस्तकांचा, वर्तमानपत्रांचा आणि टिपणे काढलेल्या वह्यांचा भला उंच ढीग साठला होता. एक पलंग, दोन खुर्च्या आणि त्याच्या व तायाच्या खोलीच्या मधल्या दारावर लावलेला, काळ्या आणि लाल ध्वजांचे ठिपके असलेला चीनचा भलामोठा नकाशा—एवढेच काय ते पावेलच्या खोलीत सामान होते. पुस्तके आणि नियतकालिके पुरविण्याचे वचन स्थानिक पक्ष समितीमधील लोकांनी पावेलला दिले होते. पावेलला ज्या ज्या पुस्तकांची गरज भासेल ती ती पुस्तके त्याला देण्यासंबंधी शहरातल्या सर्वांत मोठ्या ग्रंथालयाच्या प्रमुखांना सूचना देऊ, असे कार्यकर्त्यांनी आश्वासन दिले होते. लौकरच पुस्तकांचे गठ्ठे पावेलकडे येऊ लागले. अगदी सकाळपासून पावेल वाचनाला आणि टिपणे काढायला सुरुवात करी. न्याहरी आणि जेवण एवढ्या दोनच गोष्टींसाठी

तो अगदी थोडा वेळ उठायचा. बाकी सारा वेळ त्याचे वाचन, लेखन आणि चिंतन चालायचे. लेल्याला या बाबतीत पावेलचे भारी कौतुक वाटे. संध्याकाळच्या वेळा तो नेहमी त्या दोघी बहिणींबरोबर घालवीत असे आणि दिवसभरात जे काही वाचलेले असे त्याचा गोषवारा सांगी.

आपल्या अप्रिय भाडेकरूच्या खोलीच्या झापांच्या फटीतून मध्यरात्रीनंतरसुद्धा उजेड येत असलेला म्हाताऱ्या क्युत्सामला दिसत असे. तो खिडकीशी चोरपावलांनी जाई आणि फटीतून आत डोकावून पाही तेव्हा पावेल पुस्तकात डोके खुपसून वाचण्यात गढलेला त्याला दिसत असे.

"सभ्य माणसं या प्रहराला बिछान्यात असतात, पण हा आख्खी रात्र दिवे जाळतोय. जणू या घराचा मालक असल्या-सारखा वागतो. हा आल्यापासून पोरी अगदी हाताबाहेर गेल्यात," आपल्या खोलीकडे परतताना म्हातारा स्वतःशीच कुरकुरत जायचा.

जवळ भरपूर पुस्तके आहेत आणि दुसरे काहीही काम करावे लागत नाही, अशी परिस्थिती गेल्या आठ वर्षांत पावेलला प्रथमच लाभत होती. आपल्या वेळाचा तो सदुपयोग करीत होता. नव्याने ज्ञान प्राप्त झालेला माणूस ज्या हावरेपणाने पुस्तके वाचतो तसा तो वाचत होता. दिवसाचे अठरा तास तो अभ्यास करी. हा ताण त्याच्या प्रकृतीला किती दिवसपर्यंत झेपला असता ते सांगणे कठीण होते. पण बाह्यतः किरकोळ वाटणाऱ्या तायाच्या एका उद्गाराने एके दिवशी सारी परिस्थिती बदलून गेली.

"तुझ्या खोलीला लागून असलेल्या दाराजवळची कपड्याची खणाची पेटी मी सरकवून दुसरीकडं ठेवलीय. तुला कधी

माझ्याशी गप्पा माराव्याशा वाटल्या तर सरळ त्या दारानं आत येत जा. लेल्याच्या खोलीमधून यायची गरज नाही."

पावेलचे सर्वांग एकदम तापले. ताया आनंदाने किंचित हसली. त्यांच्यातला करार पक्का झाला होता!

कोपऱ्यातील खोलीच्या खिडकीच्या झडपांमधून रात्रीच्या वेळी उजेड झिरपताना म्हाताऱ्याला इतःपर दिसत नव्हता. तायाच्या डोळ्यांमध्ये एक वेगळीच चमक आल्याचे तिच्या आईच्या ध्यानात आले होते. तायाचे डोळे तिच्या सुखाचे गुपित लपवू शकत नव्हते. तिच्या डोळ्यांखाली आलेली फिकट वर्तुळे अपुऱ्या झोपेची कहाणी सांगत होती. त्या छोट्या घरात तायाच्या गाण्याचे आणि छेडलेल्या गिटारचे प्रतिध्वनी वारंवार घुमू लागले होते.

पण तरीही तायाचे सुख निर्भेळ नव्हते. तिचे जागे झालेले स्त्रीत्व त्या गुप्त संबंधाविरुद्ध बंड करू लागले होते. प्रत्येक आवाजासरशी तिचा थरकाप होई. आपल्या आईची पावले ऐकल्याचा तिला सतत भास होई. रात्रीच्या वेळी ती आपल्या दाराला कडी का लावायला लागली होती असे आईने विचारले तर ती काय उत्तर देणार होती? हा विचार तिला छळत होता. तिची धास्ती पावेलच्या लक्षात आली आणि त्याने तिला समजावण्याचा प्रयत्न केला.

"तुला एवढी कशाची भीती वाटते?" तो तिला हळुवारपणे विचारायचा. "आपण दोघंही सज्ञान आहोत. शांत झोप. कुणीही आपल्या आयुष्यांमध्ये ढवळाढवळ करणार नाही."

समजूत पटून ती आपला गाल त्याच्या छातीशी दाबायची

आणि आपल्या प्रियतमाच्या अंगाभोवती हाताची मिठी घालून झोपी जायची. आणि तिचा संथ श्वास ऐकत तो न झोपता नुसता पडून रहायचा. तिची झोप मोडू नये म्हणून काही हालचाल न करता स्तब्ध रहायचा. आपले जीवन त्याच्या हाती समर्पण केलेल्या ह्या मुलीविषयीच्या प्रेमभावनांनी त्याला उचंबळून यायचे.

तायाच्या डोळ्यामधील चमकीचे रहस्य सर्वांत प्रथम लेल्याला समजले. त्या दिवसापासून दोघी बहिणींमध्ये दुराव्याचे सावट पडले. लौकरच आईच्याही ध्यानी ही गोष्ट आली, किंवा तर्काने तिने ती जाणली. ती चिंतेत पडली. कोर्चागिनकडून तिने ही अपेक्षा केली नव्हती.

"ताया त्याला बायको म्हणून योग्य नव्हे," ती लेल्यापाशी म्हणाली. "यातून काय निष्पन्न होणार हे मला तरी समजत नाही."

आल्बीना खूप बेचैन झाली, पण कोर्चागिनपाशी विषय काढण्याचे धैर्य तिला होईना.

तरुण मंडळी पावेलच्या भेटीला येऊ लागली आणि काहीवेळा तर त्याची छोटी खोली त्या सर्वांना मावून घ्यायला अपुरी पडे. मधमाशांच्या पोवळ्यासारखी त्यांची गजबज म्हाताऱ्याच्या कानी पडत असे. काहीवेळा त्यांचे सामूहिक गाणे त्याला ऐकू येई:

आमचा सागर एकाकी
रात्रंदिन गर्जत राही...

तसेच पावेलचे आवडते गाणे ऐकायला यायचे:

जग सारे भिजले आसवांनी...

ते पावेलच्या घरी जमणारे तरुण कामगारांचे अभ्यास मंडळ होते. प्रचारकार्य करायला द्या, असा पावेलने सतत लकडा लावल्यामुळे पक्षाच्या समितीने त्याला हे अभ्यास मंडळ चालवायला दिले होते.

पुन्हा एकदा दोन्ही हातांनी त्याने सुकाणू घट्ट धरले होते आणि काही काळ संकटात सापडलेली त्याची जीवननौका पुन्हा नव्या वळणाला लागली होती. अभ्यास अणि ज्ञान यांच्याद्वारे पुन्हा पक्षात जाण्याचे त्याचे स्वप्न वास्तवात उतरण्याच्या मार्गावर होते.

पण आयुष्य त्याच्या वाटेत सतत अडथळे आणीत होते आणि प्रत्येक अडथळा त्याला ध्येयाप्रत जाण्यास विलंब करीत होता, याची पावेलला कडवट जाणीव होत होती.

एक दिवस अनपेक्षितपणे जॉर्ज आला. सोबत त्याने आपली बायको आणली होती. आपल्या वकील सासऱ्याच्या घरी त्याने मुक्काम टाकला व आईकडे पैशासाठी तगादा सुरू केला.

जॉर्जच्या येण्यामुळे क्युत्साम कुटुंबातील दरी अधिकच रुंदावली. जॉर्जने ताबडतोब आपल्या वडिलांची बाजू घेतली. त्याच्या बायकोच्या घरची माणसे सोविएतविरोधी कलाची होती. त्यांना व म्हाताऱ्या क्युत्सामला हाताशी धरून वाकड्या मार्गांनी कोर्चागिनला हुसकावून लावण्याचा आणि तायाला त्याच्यापासून तोडण्याचा जॉर्जने चंग बांधला.

जॉर्ज येऊन दोन आठवडे उलटले नाहीत तोच लेल्याने दुसऱ्या एका शहरात काम मिळविले आणि आपल्या आईला व छोट्या मुलाला सांगाती घेऊन ती निघून गेली. त्यानंतर लौकरच, पावेल आणि ताया यांनी दूरच्या एका सागरगावी मुक्काम हलविला.

आर्त्योमला आपल्या भावाकडून क्वचितच पत्र मिळत असे. नगर सोविएतच्या कचेरीत त्याच्या टेबलावर परिचित हस्ताक्षरामधले पाकीट त्याची वाट पहात असलेले जेव्हा जेव्हा त्याच्या नजरेस पडे, तेव्हा तेव्हा त्याच्या काळजाचे ठोके जलद पडू लागत. आजही पत्र उघडताना त्याच्या मनात विचार आला :

"अरे पावलूशा! माझ्या अगदी जवळ राहिला असतास तर किती बरं झालं असतं! बंधू, तुझ्या सल्ल्याचा मला उपयोग झाला असता!"

तो पत्र वाचू लागला :

"आर्त्योम! माझ्या अलिकडच्या सर्व घडामोडी तुला कळविण्यासाठी हे पत्र लिहितोय. अशा गोष्टी मी फक्त तुलाच लिहितो. कारण तू मला चांगला जाणत असल्याने मी तुला विश्वासातल्या चार गोष्टी सांगू शकतो आणि तू समजून घेशील.

"प्रकृतीच्या बाबतीत आयुष्याने माझी दशा दशा करून टाकलीय. माझ्यावर एकामागून एक आघात होत आहेत. एका आघातामधून मी सावरतो न सावरतो तोच दुसरा अधिक निष्ठुर आघात माझ्यावर होतो. प्रतिकार करण्याची माझ्यात शक्ती नाही ही फार भयानक गोष्ट आहे. पहिल्यांदा माझ्या डाव्या हातामधली शक्ती गेली. आणि तेवढे पुरेसे नव्हते म्हणून की काय, माझे पायही लुळे पडलेत. आधीच मी जेमतेम हालचाल करू शकत होतो (अर्थात माझ्या खोलीच्या मर्यादेत), पण आता बिछान्यापासून टेबला-

पर्यंत सरपटत जायला मला अडचण पडते. याहून अवस्था आणखी वाईट व्हायची आहे. उद्या माझ्या नशिबी काय लिहून ठेवलेय त्याची कुणालाच कल्पना नाही.

"आता मी घर सोडून कुठेही बाहेर जात नाही. माझ्या खिडकीतून सागराचा एक छोटासा तुकडा दिसतो तेवढाच! ज्याची स्वतःची आज्ञा मानीत नाही असे घातकी शरीर, पण ज्याचे काळीज मात्र अस्सल बोल्शेविकाचे आहे, असा संयोग घडलेला माझ्यासारखा माणूस किती दुर्दैवी असला पाहिजे? माझे बोल्शेविकाचे अंतःकरण काम करण्यासाठी तळमळतेय. वादळी हिमप्रपातामध्ये सबंध आघाडीवर लढणाऱ्या तुम्हा योद्ध्यांच्या जोडीने उभे ठाकण्यासाठी मी आसुसलोय.

"माझी अजून श्रद्धा आहे की, पक्षाच्या कार्यकर्त्यां-मध्ये मी परत येईन. चढाई करणाऱ्या सैनिकांच्या रांगांमध्ये माझे बागनेट योग्य वेळी आपल्या जागी उभे असेल. मला यावर विश्वास ठेवलाच पाहिजे. तसा विश्वास न ठेवण्याचा मला हक्कच नाही. दहा वर्षेपर्यंत पक्षाने आणि कम्सामोलने मला लढायला शिकवले. आपल्या सर्वांना उद्देशून आपल्या नेत्याने उच्चारलेले शब्द मलाही लागू पडतात: 'बोल्शेविक सर करू शकणार नाहीत असे किल्ले नाहीत.'

"सध्या माझे संपूर्ण आयुष्य अभ्यासात जाते. पुस्तके, पुस्तके आणि आणखी पुस्तके. आर्त्योम, मी फार मोठी गोष्ट साध्य केलीय. सर्व अभिजात साहित्य मी वाचून काढले, त्याचा अभ्यास केला आणि कम्युनिस्ट

विद्यापीठाच्या टपाली अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षा मी पास झालोय. संध्याकाळी मी कम्युनिस्ट युवकांचे अभ्यास मंडळ घेतो. हे तरुण कॉम्रेड म्हणजे पक्ष-संघटनेच्या प्रत्यक्ष जीवनाशी माझा दुवा आहेत. शिवाय तायाचे शिक्षण चालू आहे. माझी छोटी बायको खूप प्रेम करते, माझी काळजी घेते. ताया आणि मी दोघे छान मित्रांसारखे वागतो. आमचे घरगुती जीवन अगदी साधे आहे. माझी बत्तीस रूबल पेन्शन आणि तायाची कमाई, यांच्यात घर चांगले चालते. पक्षात मी ज्या मार्गावरून गेलो तोच तायाने अनुसरला आहे. काही काळ ती घरकाम करणारी मोलकरीण होती आणि आता कॅन्टीनमध्ये बशा विसळते (या शहरात कारखाने नाहीत).

"काही दिवसांपूर्वीच महिला विभागाने तिला प्रतिनिधित्वाचे अधिकारपत्र दिले. तिने ते मोठ्या अभिमानाने मला दाखवले. तिच्या दृष्टीने तो केवळ कार्डबोर्डाचा तुकडा नाही. तिच्यामधून मला नव्या स्त्रीचा जन्म झालेला दिसतो. आणि ह्या जन्माला सुलभ करण्यासाठी मी शक्य ते सर्व काही करतोय. एका मोठ्या कारखान्यात काम करण्याची वेळ लौकरच तिच्यावर येईल आणि एका विशाल कामकरी समूहाचा घटक या नात्याने ती राजकीयदृष्टया परिपक्व होईल. पण इथे मात्र केवळ उपलब्ध असलेला एकमेव मार्ग तिने पत्करलाय.

"तायाची आई दोनदा आमच्याकडे येऊन गेली. नकळतपणे ती तायाला पुन्हा क्षुद्र, वैयक्तिक स्वार्थी

काळज्यांच्या आयुष्याकडे खेचू पाहतेय. आल्बीनाने आपल्या स्वतःच्या असुखी भूतकाळाचे सावट आपल्या मुलीने निवडलेल्या वाटेवर पाडू नये हे आल्बीनाला समजावून सांगण्याचा मी खूप प्रयत्न केला. पण काही उपयोग झाला नाही. मला असे वाटते की, एक दिवस आई आपल्या मुलीच्या वाटेत आडवी येण्याचा प्रयत्न करणार आणि मग झगडा अटळ ठरणार. माझा तुला प्रेमपूर्वक नमस्कार.

तुझा पावेल."

जुन्या मात्सेस्तामधील सॅनाटोरियम क्र. ५ ... डोंगराची एक बाजू खोदून काढून कंगोऱ्यावर उभी राहिलेली तीनमजली विटकरी इमारत. सभोवती सर्वत्र दाट जंगले आणि समुद्रापर्यंत वळसे घेत जाणारे रस्ते. खिडक्या खुल्या आहेत आणि वाऱ्याच्या झुळुकीबरोबर गंधकाच्या झऱ्यांचा वास खोलीत येतोय. पावेल कोर्चागिन खोलीत एकटाच आहे. उद्या एक नवा पेशंट येईल आणि मग त्याला खोलीत सोबती मिळेल. खिडकीबाहेर त्याने पावले वाजलेली ऐकली आणि परिचित आवाज त्याच्या कानी पडला. अनेक माणसे बोलताहेत. पण हा खोल खर्जातला आवाज त्याने पूर्वी कुठे बरे ऐकला होता? त्याच्या स्मृतीच्या खोल अंधाऱ्या कप्प्यांमध्ये लपलेले — पण विसरलेले नव्हे — नांव पटकन पुढे आले: "लेदेनेव. होय तेच. दुसरे कुणीही नव्हे."

मोठ्या आत्मविश्वासाने पावेलने त्या नांवाची साद घातली व क्षणभरानंतर लेदेनेव त्याच्या बिछान्यापाशी हजर राहून प्रेमाने त्याच्याशी हस्तांदोलन करीत होते.



"तर कोर्चागिन अजून जोरात आहे म्हणायचा? कोणती चांगली बातमी सांगतोस मला? तू खरंखुरं आजारी पडायचं मनावर घेतलंयस असं मात्र सांगू नकोस हं! ते कधीही चालणार नाही. माझ्या उदाहरणापासून काही शीक. डॉक्टरांनी मलासुद्धा मोडीत काढलं होतं, पण त्यांच्या नाकावर टिच्चून मी अजून जिवंत राहिलोय." लेदेनेव मनापासून आनंदाने हसले.

पण त्या हसण्यामागील सहानुभूती आणि निराशा पावेलला जाणवली.

दोन तास ते गप्पा मारीत होते. लेदेनेवनी मॉस्कोच्या सर्व ताज्या बातम्या पावेलला सांगितल्या. शेतीचे सामुदायिकीकरण करण्याचे व ग्रामीण जीवनाचे पुनर्संघटन करण्याचे महत्त्वाचे निर्णय पक्षाने घेतल्याचे त्यांच्याकडूनच पावेलला प्रथम समजले. त्यांचा प्रत्येक शब्द तो आधाशासारखा पिऊन घेत होता.

"मला वाटलं, तू तुझ्या युक्रेनमध्ये काहीतरी उद्योगात गुंतलेला असशील," लेदेनेव म्हणाले. "तू माझी निराशा केलीस. पण काही हरकत नाही. माझी अवस्था तर त्याहून वाईट होती. मी कायमचा अंथरुणाला खिळणार असं मला वाटलं होतं, पण मी चक्क माझ्या पायांवर उभा असल्याचं आत्ता तू पाहतोच आहेस. आजकाल आयुष्य सहजी घेऊन चालत नाही. मुळीच चालत नाही! मी प्रांजलपणं कबूल करतो की, थोडी विश्रांती मिळाली, थोडी उसंत घ्यायला मिळाली, तर किती छान होईल असे विचार हल्ली अधून-मधून मनात डोकावतात. मी काही पूर्वीसारखा तरुण राहिलेलो नाही आणि दिवसाचे दहा-बारा तास काम करणं काही वेळा

मला कष्टाचं जातं. या गोष्टीचा विचार करून मी कामाचा बोजा थोडा हलका करू पाहतो, पण काही उपयोग होत नाही. काही समजायच्या आतच तुम्ही गळ्यापर्यंत कामात बुडता आणि मध्यरात्रीआधी घरात कधी पाय पडत नाही. यंत्र जेवढं जास्त दमदार तेवढी चाकं जास्त वेगानं धावतात आणि आपल्या बाबतीत दरदिवशी वेग वाढत असल्यानं आम्हा म्हाताऱ्यांना तरुण राहणं भागच पडलंय."

आपल्या भव्य कपाळावरून हात फिरवीत लेदेनेव प्रेमळ आवाजात म्हणाले :

"आता तुझ्याविषयी मला सांग."

मागील वेळी त्या दोघांची भेट घडली होती त्यानंतर आपल्या आयुष्यात काय काय घडामोडी झाल्या, त्यांचा इत्थंभूत आढावा पावेलने त्यांना दिला. त्याची हकिकत ऐकताना लेदेनेव अधूनमधून त्याच्याकडे प्रेमळ संमतीदर्शक कटाक्ष टाकीत होते हे पावेलच्या ध्यानात आले.

पसरलेल्या झाडांच्या सावलीत गच्चीच्या एका कोपऱ्याशी सॅनाटोरियममधले काही पेशंट एका छोट्या टेबलाभोवती घोळका करून बसले होते. त्यांच्यापैकी एकजण आपल्या झुपकेदार भुवया एकत्र जुळवून 'प्रावदा' वाचत होता. त्याचा काळा रशियन सदरा, मळकी जुनी टोपी, खोल गेलेले निळे डोळे आणि दाढी वाढलेला चेहरा—हा त्याचा एकूण अवतार तो खंदा खाणकामगार असल्याची साक्ष देत होता. वस्तुत: प्रादेशिक समितीमध्ये महत्त्वाची जागा घेण्यासाठी बारा वर्षां-पूर्वी ख्रिसान्फ चेर्नोकोझोव खाणी सोडून आला होता. पण त्याच्याकडे नजर टाकल्यावर जणू तो आत्ताच खाणीवरून

आला आहे असे भासे. त्याची वागण्याची ढब, त्याची चाल, त्याचे बोलणे अशा प्रत्येक गोष्टीमधून त्याचा धंदा प्रकट होई.

शिवाय चेर्नोकोझोव हा प्रादेशिक पक्षीय ब्यूरोचा सभासद होता. एक यातनादायी रोग त्याला क्षीण करीत चालला होता. चेर्नोकोझोवचा एक पाय सडत होता व त्यामुळे गेले महा महिने तो बिछान्याला खिळून होता. ह्या आपल्या मडक्या पायाचा चेर्नोकोझोव मनस्वी रागा करीत होता.

त्याच्यासमोर विचारमग्न अवस्थेत बसून सिगारेट फुंकत होती झीगीच्योवा. सदतीस वर्षांची अलेक्सान्द्रा अलेक्सेयेवना झीगीऱ्योवा गेली एकोणीस वर्षे पक्षाची सदस्या होती. पीटर्सबुर्गच्या भूमिगत चळवळीतील तिचे सहकारी त्यावेळी तिला "धातूकामगार शूरोच्का" म्हणून ओळखीत. तिला सैबेरियात हद्दपार करण्यात आले होते तेव्हा ती अगदी पोरवयाची मुलगी होती.

त्या गटातील तिसरी व्यक्ती होती पान्कोव. एखाद्या कोरीव शिल्पासारखा त्यांचा देखणा चेहरा एका जर्मन मासिकावर झुकला होता. शिंगाच्या कडा बसविलेला आपला भलामोठा चष्मा ठीक करण्यासाठी वारंवार त्यांचा एक हात वर जात होता. चपळ शरीरयष्टीच्या ह्या तीस वर्षांच्या माणसाला आपला पक्षाघाताने लुळा पडलेला पाय खुरडत जात असताना पाहणे मोठे तापदायक होत असे. संपादक आणि लेखक असलेले पान्कोव शिक्षण जन-मंत्रालयात काम करीत होते. युरोपचा त्यांचा गाढा व्यासंग होता आणि अनेक परदेशी भाषा त्यांना येत होत्या. ह्या ज्ञानी माणसाविषयी अलिप्त स्वभावाच्या चेर्नोकोझोवलासुद्धा फार आदर वाटत असे.

"तो तुझ्या खोलीतला सोबती काय?" पावेल कोर्चागिन

ज्या खुर्चीवर बसला होता तिकडे मानेने दर्शवीत झीगीऱ्योवाने हलक्या आवाजात चेर्नोकोझोवला विचारले.

चेर्नोकोझोवने वर्तमानपत्रातून नजर वर उचलली आणि त्याच्या जुळलेल्या भुवया एकदम सरळ झाल्या.

"होय! तो कोर्चागिन. तुम्ही त्याची ओळख करून घेतली पाहिजे शूरा! त्याच्या आजारपणानं खूप अडथळे आणलेत त्याच्या आयुष्यात! नाहीतर अनेक अवघड प्रसंगी हा पोरगा फार उपयोगी पडला असता आपल्या! कम्सामोलच्या पहिल्या पिढीतला तो आहे. आपण जर त्याला पाठबळ दिले—आणि तसं देण्याचा मी तरी ठरवलंय— तर अजूनही तो काम करू शकेल."

पान्कोवसुद्धा चेर्नोकोझोवचे बोलणे ऐकत होते

"कशानं आजारी आहे तो?" शूरा झीगीऱ्योवाने हळूच विचारले.

"यादवी युद्धानंतरचे परिणाम. त्याच्या पाठीच्या मणक्यात काही गडबड आहे. इथल्या डॉक्टरांशी मी त्याच्या आजाराबाबत बोललो. ते म्हणतात की, तो संपूर्ण लुळा पडण्याचा धोका आहे. बिच्चारा!"

"मी त्याला आपल्याकडं आणते," शूरा म्हणाली.

त्यांची मैत्री अशी सुरू झाली. झीगीऱ्योवा आणि चेर्नोकोझोव हे आपले अत्यंत जवळचे स्नेही बनणार होते व पुढील आजारपणाच्या काळात तेच त्याचे मुख्य आधार ठरणार होते, याची त्यावेळी पावेलला कल्पना नव्हती.

जीवनाचा प्रवाह पूर्वीप्रमाणेच वहात होता. ताया काम करीत होती आणि पावेल अभ्यास करीत होता. अभ्यास

मंडळांबरोबर पुन्हा कामाला सुरुवात करण्यापूर्वीच एक अनपेक्षित नवी आपत्ती पावेलवर कोसळली. त्याचे दोन्ही पाय संपूर्ण लुळे पडले. आता फक्त त्याचा उजवा हात काम करीत होता. अनेकवार प्रयत्न केल्यानंतरही आपल्याला हालचाल करता येत नाही अशी जेव्हा त्याची खात्री पटली तेव्हा ओठातून रक्त ठिपकेपर्यंत त्याने संतापाने स्वत:चे ओठ चावले. त्याला आपण काहीही मदत करू शकत नाही याबद्दल वाटणारी मनस्वी खंत आणि निराशा तायाने धीराने गिळून टाकली. खजिल स्मित करीत पावेल तिला म्हणाला :

"ताया, आपण आता वेगळं झालं पाहिजे. आपल्या करारात ह्याचा समावेश नव्हता. माझ्या सोनुली, आज मी या गोष्टीवर नीट विचार करतो."

पण ती त्याला बोलूच देईना. तिला एकदम हुंदके फुटले आणि त्याच्या छातीवर तोंड लपवून ती हमसाहमशी रडू लागली.

आर्त्योमला जेव्हा आपल्या भावावरील नवी आपत्ती समजली तेव्हा त्याने आपल्या आईला लिहून कळविले. मरीया याकोवलेवनाने हातातले सारे टाकले आणि तात्काळ ती आपल्या धाकट्या मुलाकडे धावली. आता तिघे एकत्र राहू लागली. ताया आणि म्हातारी प्रथम भेटीतच एकमेकींच्या मैत्रिणी बनल्या.

एवढ्या आपत्तींमध्येही पावेलने आपला अभ्यास चालू ठेवला होता.

हिवाळ्यातील एका संध्याकाळी ताया आपल्या पहिल्या विजयाची बातमी घेऊन घरी आली. नगर सोविएतवर तिची निवड झाली होती. त्यानंतर तिचे दर्शन पावेलला दुर्मीळ

घडू लागले. सॅनाटोरियमच्या भटारखान्यात दिवसा काम केल्यानंतर ताया सरळ सोविएतमध्ये जाई. रात्री ती खूप उशीरा थकून येत असे, पण तिच्यापाशी अनेक बातम्या असत. पक्षाच्या उमेदवार सदस्यत्वासाठी आता ती अर्ज करणार होती आणि त्या प्रदीर्घकाळ वाट पाहिलेल्या दिवसाची मोठ्या आतुरतेने ती वाट पहात होती. पण दुर्दैवाने नवा घाला घातला. हळू हळू वाढत जाणारा रोग आपली कामगिरी बजावीत होता. पावेलच्या उजव्या डोळयात एक पेटती असह्य कळ उमटली आणि ती वेदना वेगाने डाव्या डोळयापर्यंत पोचली. एक काळा पडदा पडला आणि पावेलच्या भोवतीच्या सर्व गोष्टी त्याने गिळून टाकल्या. संपूर्ण आंधळेपणाची महाभयानकता पावेलने जीवनात प्रथमच अनुभवली.

हलक्या पावलांनी एक नवा अडथळा त्याच्या वाटेत येऊन आडवा पडला होता. एक महाभयानक, अलंघ्य भासणारा अडथळा. त्या अडथळयामुळे ताया आणि पावेलची आई निराशेत बुडून गेल्या. पण पावेल मात्र कमालीचा शांत राहिला. त्याने निर्धार केला:

"मला थोडं थांबून काय घडतंय ते पाहिलं पाहिजे. जर पुढं जाण्याची खरंच शक्यता नसेल, पक्षात जाऊन परत काम करता यावं म्हणून मी जे काही आजवर केलं त्यावर या आंधळेपणानं संपूर्ण बोळा फिरणार असेल, तर मलाच या सर्व गोष्टींचा अंत घडवला पाहिजे."

पावेलने आपल्या मित्रांना परिस्थिती लिहून कळविली. त्याने धीर धरून लढा चालू ठेवावा, असे त्यांनी उलटटपाली त्याला लिहिले.

अशा ह्या गंभीर संघर्षाच्या काळात एक दिवस उत्साहाने फुललेली ताया घरी आली आणि तिने घोषणा केली :

"पावेल, मी पक्षाची उमेदवार बनले!"

तिचा अर्ज ज्या बैठकीत स्वीकारण्यात आला होता त्या बैठकीचा थरारक वृत्तांत पावेलने तिच्याकडून ऐकला. पक्षामधील स्वतःच्या पहिल्या पावलांची त्याला आठवण झाली.

"अरे वा कॉम्रेड कोर्चागिना, आपण दोघं आता कम्युनिस्ट गटातले बनलो," तिचा हात प्रेमभराने दाबत पावेल म्हणाला.

दुसऱ्या दिवशी पावेलने विभागीय पक्ष समितीच्या चिटणीसांना पत्र लिहिले व आपल्याला येऊन भेटण्याची विनंती केली. त्याच संध्याकाळी चिखलाने माखलेली एक मोटार पावेलच्या घरासमोर येऊन थांबली. काही क्षणानंतर मध्यमवयीन लात्वियन वोल्मेर पावेलच्या बिछान्यापाशी येऊन प्रेमाने त्याच्याशी हस्तांदोलन करीत होते. त्यांची दाढी चांगली वर कानांपर्यंत पसरलेली होती.

"कसं काय चाललंय? हा काय चावटपणा लावलायस? अंथरुणातून ऊठ आणि ताबडतोब तुला खेड्यात कामाला पाठवतो," प्रसन्न हसत ते म्हणाले.

आपल्याला परिषदेला हजर रहावयाचे होते वगैरे सर्व गोष्टी विसरून चिटणीस वोल्मेर तब्बल दोन तासपर्यंत पावेलशी बोलत बसले. आपल्याला काम द्या असे पावेल त्यांना आवेगाने आवाहन करीत होता तेव्हा खोलीत येरझाऱ्या घालीत वोल्मेर त्याचे बोलणे ऐकत होते.

जेव्हा पावेलचे बोलून संपले तेव्हा ते म्हणाले, "अभ्यास मंडळांविषयी बोलणं बंद कर. तुला विश्रांती घेतली पाहिजे. आणि तुझ्या डोळ्यांबाबत काय करता येईल ते पाहिलं

पाहिजे. अजूनही काही उपाय शक्य होईल. मॉस्कोला जाऊन तज्ज्ञाकडून तपासून घेऊ या? जरा विचार कर या बाबतीत..."

पण पावेलने त्यांना मध्येच अडवले :

"कॉम्रेड वोल्मेर, मला भोवती माणसं हवीत. जिवंत, हाडामांसाची माणसं! मला कधी नव्हती एवढी त्यांची आत्ता गरज आहे. एकटयानं जगणं मला शक्य नाही. अगदी कमी अनुभवाची पोरं माझ्याकडं पाठवा: खेडयात त्यांचा डावीकडं जास्त कल झुकतोय, सामुदायिक शेतं त्यांना पुरेसा वाव देत नाहीत, त्यांना कम्युन स्थापन करण्याची इच्छा आहे. कम्सामोल कसे असतात तुम्हाला माहीत आहे. तुम्ही त्यांना आवरून धरलं नाही, तर ते रेषा ओलांडून पुढं घुसायचा नक्की प्रयत्न करणार. मी एकेकाळी तसाच होतो."

वोल्मेर एकदम चकित झाले.

"तुला कसं हे सारं समजलं? अगदी आजच त्यांनी ही बातमी आणली."

पावेल हसला.

"माझ्या बायकोनं मला सांगितलं. तुम्हाला आठवते ती? कालच तिला पक्षात प्रवेश मिळालाय."

"बशा विसळणारी कोर्चागिना? ती तुझी बायको होय? मला माहीत नव्हतं हे!" काही क्षण वोल्मेर स्तब्ध राहिले. मग कपाळावर थापटया मारता मारता त्यांना एक कल्पना अचानक सुचली. "कुणाला तुझ्याकडं पाठवावं ते माझ्या आत्ता ध्यानात आलं. लेव बेर्सेनेवला! त्याच्याहून चांगला कॉम्रेड तू अपेक्षिणार नाहीस. तो अगदी तुझ्या विचारांचाच माणूस आहे. तुम्ही दोघं मिळून छान काम कराल. दोन

उच्च दाबाच्या ट्रान्सफॉर्मेटरांसारखं! एकेकाळी मी इलेक्ट्रिशियन होतो ना! त्यामुळे असं बोलायची सवय! लेव तुझ्यासाठी एक रेडिओ बनवून देईल. तसल्या गोष्टी करण्यात तो तरबेज आहे. कानाला यंत्रं लावून मी कितीतरी वेळा पहाटे दोन दोनपर्यंत त्याच्या घरी रेडिओ ऐकत बसतो. वायकोला माझा संशय यायला लागलाय. घरी एवढ्या उशीरा का जातो याचा छडा लावायचाय म्हणते!"

कोर्चागिनने स्मित केले.

"बेर्सेनेव कोण?" त्याने विचारले.

वोल्मेर येरझाऱ्या घालायचे थांबले व खाली बसले.

"तो आमचा सॉलिसिटर आहे. खरं म्हणजे आता मी जितपत बॅले नर्तक राहिलोय तितपतच तो सॉलिसिटर राहिलाय. अगदी अलिकडेपर्यंत एका जबाबदारीच्या जागेवर होता. १९१२ पासून क्रांतिकारक चळवळीत आहे आणि क्रांतीपासून पक्षात आहे. यादवी युद्धात दुसऱ्या घोडदळ सेनेच्या क्रांतिकारक न्यायालयात काम केलंय. त्यावेळी कॉकेशसमधून ते श्वेतरक्षकांना विंचरून काढत होते. ऊवा काढाव्यात त्याप्रमाणं! तो त्सारीत्सीनमध्ये होता, तसाच दक्षिण आघाडीवरही होता. नंतर काही काळ अतिपूर्व प्रजासत्ताकाच्या सर्वोच्च लष्करी न्यायालयात त्यानं काम केलं. तिथं त्याला खडतर परिस्थितीला तोंड द्यावं लागलं. शेवटी क्षयानं त्याला पछाडलं. अतिपूर्व सोडून तो इथं कॉकेशसला आला. पहिल्यांदा गुबेर्निया कोर्टाचा अध्यक्ष आणि प्रादेशिक कोर्टाचा उपाध्यक्ष म्हणून त्यानं काम पाहिलं. आणि त्यानंतर फुफ्फुसाच्या रोगानं त्याला पार आडवं केलं. इथं येऊन जपून जगणं किंवा भुताचा पाठलाग सोडणं एवढंच शक्य होतं. अशा रीतीनं आम्हाला ह्या नामवंत

सॉलिसिटरचा लाभ झाला. हे कामही निवांत आहे, त्याला साजेसं आहे. इथल्या माणसांनी हळूहळू प्रथम त्याला एक गट घ्यायला लावला. नंतर विभागीय समितीवर त्याची निवड केली आणि पुढं त्याला स्वतःला समजायच्या आतच तो राजकीय विद्यालयाचा प्रमुख झाला. आता नियंत्रण आयोगावर त्याला नेमलंय. अवघड प्रश्न सोडविण्यासाठी सर्व महत्त्वाच्या आयोगांवर त्याला कायम सभासद म्हणून नेमलंय. एवढे सारे उद्योग सांभाळून तो शिकारीला जातो, रेडिओचा त्याला जबरदस्त नाद आहे आणि त्याला आता जरी फक्त एकच फुफ्फुस असलं तरी त्याच्याकडं पाहिल्यावर तसं वाटणार नाही. उत्साहानं नुसता मुसमुसलेला असतो. त्याला मरण येईल तेव्हा विभागीय समितीची कचेरी आणि कोर्ट यांच्या दरम्यान तो कुठंतरी असेल."

पावेल एकदम तोडून वोल्मेरना बोलला.

"कशाला एवढा बोजा त्यांच्यावर लादता?" तिखट स्वरात पावेलने विचारले. "पूर्वीपेक्षा इथं ते जास्त काम करताहेत."

वोल्मेरनी थट्टेने पावेलकडे कटाक्ष टाकला:

"पण जर मी तुझ्यावर अभ्यास मंडळ आणखी काही सोपवलं तर लेव नक्की म्हणेल: 'कशाला एवढा बोजा त्याच्यावर लादलात?' तो स्वतःच म्हणतो की पाच वर्षं इस्पितळात उताणं पडण्यापेक्षा एक वर्ष जोरानं काम करणं त्याला जास्त आवडेल. असं दिसतंय की समाजसत्तावादाची उभारणी केल्याशिवाय आपण माणसांची चांगली काळजी घेऊ शकणार नाही."

“खरं आहे. मीसुद्धा पाच वर्षं कुंथत जगण्यापेक्षा वर्षभराचं प्रवाही जीवन पत्करीन. पण काही वेळा आम्ही निष्कारण ताकद वाया घालवतो. आता मला समजतं की, त्यात शौर्य दाखवण्यापेक्षा अकार्यक्षमता आणि बेजबाबदारपणा जास्त भरलेला असतो. माझ्या स्वत:च्या प्रकृतीबद्दल एवढं निष्काळजी राहण्याचा मला काहीएक हक्क नव्हता याची आत्ता कुठं मला जाणीव झालीय. त्यात कुठलंही शौर्य नव्हतं हे आता मला कळलंय. तो चुकीचा पराक्रम केला नसता तर आणखी काही वर्षं मी टिकाव धरला असता. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर डावा बालरोग हा एक सर्वांत मोठा धोका आहे.”

“आत्ता हा असं बोलतोय,” वोल्मेर यांच्या मनात विचार आला, “पण जरा पायांवर उभा राहिला की, कामाशिवाय दुसऱ्या कशाचं त्याला भान राहणार नाही”. प्रत्यक्षात मात्र वोल्मेर काहीच बोलले नाही.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी लेव बेर्सेनेव पावेलकडे आले. ते परतले तेव्हा मध्यरात्र होत आली होती. खूप वर्षांपूर्वी हरवलेला आपला भाऊच जणू परत गवसला, अशी जाताना त्यांची भावना होती.

सकाळी कोर्चागिनच्या घराच्या छपरावर रेडिओची काठी बसविण्यात आली. तोवर घरामध्ये लेव रेडिओ सेटसकट पावेलपाशी बसून त्याला आपल्या गतजीवनातील तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टी सांगून रिझवीत होते. पावेल त्यांना पाहू शकत नव्हता. पण तायाने केलेल्या वर्णनानुसार त्याला माहीत झाले होते की, लेव उंच, सोनेरी केसांचे, निळ्या डोळ्यांचे, जोराने हातवारे करीत बोलणारे तरुण गृहस्थ होते. पावेल त्यांना

प्रथम भेटला तेव्हा मनातल्या मनात त्याने लेव यांची हुबेहूब तशीच प्रतिमा कल्पिली होती.

संध्याकाळच्या सुमारास खोलीत तीन वॉल्व झगमगू लागले. विजयी मुद्रेने लेवनी पावेलच्या हाती कर्णयंत्रे दिली. वातावरणात अनेक आवाजांचा गोंगाट मिसळला होता. बंदरातील ट्रान्समिटर अनेक पक्ष्यांप्रमाणे चिवचिवाट करीत होते आणि किनाऱ्यापासून जवळच कुठेतरी समुद्रावरचे एक जहाज अखंडपणे कड-कट्टचे संदेश पाठवीत होते. पण ह्या आवाजांच्या आणि गोंगाटाच्या प्रचंड कोलाहलातून रेडिओच्या सुईने एक धीरगंभीर आणि शांत स्वर नेमका स्वच्छ पकडला :

"मॉस्को बोलत आहे..."

त्या छोट्या रेडिओमुळे जगातील वेगवेगळ्या भागांमधील साठ रेडिओ स्टेशने पावेलच्या काबूत आली. ज्या आयुष्या-पासून तो वंचित झाला होता ते आयुष्य कर्णयंत्रांच्या पातळ वेष्टनत्वचेमधून सर्व बंधने तोडून त्याच्यापाशी धावले. त्या आयुष्याचे महाप्रचंड स्पंदन पुन्हा एकदा त्याला जाणवले.

पावेलच्या डोळ्यांमध्ये आनंदाचे तेज उजळलेले पाहून बेर्सेनेवना आपल्या श्रमांचे सार्थक झाल्याचे समाधान मिळाले.

ते मोठे घर स्तब्ध होते. ताया झोपेत अस्वस्थपणे काहीतरी बरळत होती. पावेलला आपल्या बायकोची भेट आजकाल दुर्मीळ बनली होती. खूप थकूनभागून आणि थंडीने कुडकुडत ती रात्रीची उशीरा घरी यायची. कामात तिचा जास्त जास्त वेळ जात होता आणि मोकळी संध्याकाळ तिला क्वचितच

लाभत असे. याबाबतीत बेर्सेनेव काय म्हणाले होते त्याची पावेलला आठवण झाली :

"बोल्शेविकाची बायको जर पक्षाची सभासद असली तर त्या दोघांची क्वचितच भेट घडते. पण याचे दोन फायदे आहेत : त्यांना एकमेकांचा कधीही कंटाळा येत नाही आणि भांडण करायला त्यांना वेळच सापडत नाही !"

आणि खरेच, पावेल आता कसा आक्षेप घेऊ शकणार होता ? असे घडणे स्वाभाविकच होते. एकेकाळी ताया संध्याकाळचा सारा वेळ पावेलबरोबर घालवीत असे. त्यांच्या नात्यात तेव्हा अधिक ऊब आणि हळुवारपणा होता. पण त्यावेळी ती केवळ पत्नी होती, त्याची सहचरी होती. आता ती त्याची शिष्या होती, त्याची पक्षातील साथीदारीण होती.

राजकीयदृष्टचा ताया जसजशी अधिक परिपक्व होत जाईल तसतशी त्याच्या वाट्याला ती कमी कमी येत जाईल, याची पावेलला जाणीव होती. त्याने अपरिहार्यापुढे मुकाट मान तुकविली.

एक अभ्यास मंडळ त्याला चालविण्यासाठी देण्यात आले होते. सायंकाळच्या वेळी पुन्हा एकदा आवाजांची गजबज घरात ऐकू येऊ लागली. तरुणांबरोबर घालविलेल्या त्या वेळामुळे पावेलला नवी शक्ती आणि जोम प्राप्त झाला.

बाकीचा वेळ पावेल रेडिओ ऐकण्यात घालवी. जेवणापुरता त्याला रेडिओपासून दूर करता करता पावेलच्या आईच्या नाकीनऊ येत.

आंधळेपणाने पावेलपासून जे हिरावून घेतले होते ते रेडिओने त्याला परत मिळवून दिले. ज्ञान ग्रहण करण्याची त्याला संधी लाभली. आणि ह्या प्रचंड ज्ञानपिपासेमुळे त्याला आपल्या

शरीरामधील असह्य कळा विसरण्यास, डोळ्यांमधली जळती वेदना सोसण्यास आणि त्याच्या निष्ठुर कमनशिबाने त्याच्यावर लादलेले सारे दैन्य साहण्यास मदत झाली.

पावेलच्या नंतरच्या कम्सामोलच्या पिढीने माग्नीतोस्त्रोय येथे गाजविलेल्या पराक्रमांची बातमी रेडिओने दिली तेव्हा पावेल कमालीचा आनंदून गेला.

भुकेल्या लांडग्यांच्या कळपाप्रमाणे हिंस्त्र अशा स्वरूपाची उरालमधील दुष्ट हिमवादळे आणि गोठवणारी थंडी त्याच्या नजरेसमोर उभी राहिली. घोंघावणारे वारे त्याला ऐकू आले आणि बर्फाच्या भिरभिरत्या चक्रांमध्ये कम्सामोलची दुसरी पिढी आर्क दिव्यांच्या उजेडात कारखान्यांच्या महाप्रचंड इमारतींच्या छपरांवर काम करीत असल्याचे, बर्फापासून पहिल्या बांधकामाचा नाश होऊ नये म्हणून झटत असल्याचे, त्याने कल्पनेने पाहिले. या कामाची व्याप्ती आणि त्यातील कष्ट पाहता, कीव्हच्या कम्सामोलांच्या पहिल्या पिढीने पंचमहाभूतांशी लढून पार पाडलेले जंगलामधील रेलरस्त्याच्या बांधणीचे काम अगदीच किरकोळ भासत होते. देश वाढला होता आणि त्याच्या बरोबरच देशाची माणसेही!

झीपरवर पुरामुळे पोलादी बांध तुटले होते आणि माणसे व यंत्रे वाहून गेली होती. पुन्हा एकदा कम्सामोलच्या सभासदांनी फुटलेला बांध बांधून काढायला धाव घेतली होती व दोन दिवस शर्थीची झुंज देऊन बेफाम पाण्याला परत काबूत आणले होते. ह्या महान लढयाच्या गाडीतून कम्सामोलची नवी पिढी कूच करीत होती. आणि त्या वीरांमध्ये पावेलने आपल्या जुन्या साथीदाराचे – ईग्नात पानक्रातोवचे – नांव मोठ्या अभिमानाने ऐकले.

प्रकरण नववे

मॉस्कोत पहिले काही दिवस ते एका मित्राच्या घरी राहिले. पावेलला खास क्लिनिकमध्ये दाखल करण्याची तजवीज हाच मित्र करीत होता.

जेव्हा तारुण्य होते आणि भक्कम शरीर होते तेव्हा शूर वागणे किती सोपे होते याची आत्ता कुठे पावेलला जाणीव झाली. आता आयुष्याचा लोखंडी विळखा बसला असताना नुसते टिकून राहणे, ही सुद्धा प्रतिष्ठेची बाब बनली होती.

पावेल कोर्चागिनला मॉस्कोत येऊन दीड वर्ष लोटले. अठरा महिने वर्णन करण्यास अशक्य अशा यातना!

नेत्रोपचार रुग्णालयात प्रा. अवेरबाख यांनी पावेलला स्पष्ट सांगून टाकले की, त्याची दृष्टी परत येण्याची मुळीच शक्यता नव्हती. भावी काळात कधीतरी सूज नाहीशी झाल्यानंतर, त्याच्या डोळयांच्या बाहुल्यांवर शस्त्रक्रिया करणे शक्य झाले असते. दरम्यान सूज थांबविण्यासाठी एक शस्त्रक्रिया करावी असा सल्ला प्राध्यापकमहाशयांनी दिला होता.

पावेलने मान्यता दिली. डॉक्टरांना जे जे आवश्यक वाटत होते ते ते सर्व त्यांनी करावे, असे त्याने सांगितले.

त्याच्या गळयातल्या पॅराथायरॉईडच्या गाठी काढून टाकण्या-साठी शस्त्रक्रियेच्या मेजावर पावेल तासनतास काटचा-सुऱ्यांनी जखडून पडलेला होता तेव्हा तीन वेळा मृत्यूच्या सापळयाची मगरमिठी त्याला जाणवली होती. पण जीवनाच्या दोरीला तो घट्ट धरून राहिला. अनेक तासांच्या यातनामय प्रतीक्षेनंतर ताया जेव्हा त्याला पाही तेव्हा त्याचा चेहरा पांढराफटक पडलेला

असे. पण तरीही त्याच्या मुद्रेवर नेहमीची सजीवता, शांतता व मृदुता तिला दिसे.

"माझ्या सोनुली, चिंता करू नको. मला ठार मारणं एवढं सोपं नाही. विद्वान डॉक्टरांचे अंदाज चुकविण्यासाठी का होईना, पण मी जिवंत राहीन आणि गोंधळ करीत राहीन. माझ्या प्रकृतीबद्दल त्यांची सर्व निदानं बरोबर आहेत, पण मी काम करायला संपूर्ण नालायक आहे असं ते लिहितात तेव्हा मात्र घोडचूक करतात. मी अजूनही त्यांची चूक त्यांच्या पदरात घालीन."

नवजीवनाच्या बांधणीकारांमध्ये पुन्हा दाखल होण्याचा पावेलने निर्धार केला होता. त्याला नेमके काय करायचे होते ते ठाऊक होते.

हिवाळा संपला होता. उघडच्या खिडक्यांमधून वसंताची आल्हादक हवा आत घुसत होती. आणखी एका शस्त्रक्रियेमधून पावेल पार पडला होता. कितीही अशक्तपणा असला तरी इतःपर इस्पितळात न राहण्याचा निर्णय त्याने घेतला होता. स्वतःच्या यातना सोसण्यापेक्षा, सभोवताली वेदना भोगणाऱ्या माणसांमध्ये महिनेच्या महिने राहणे, उपचारांच्या पलिकडे गेलेल्या रुग्णांच्या विव्हळण्याचे आवाज ऐकणे, हे त्याला अधिक कठीण जात होते.

म्हणून जेव्हा आणखी एका शस्त्रक्रियेचा प्रस्ताव त्याच्यापुढे मांडण्यात आला तेव्हा त्याने सरळ नकार दिला.

"नाही," तो ठामपणे म्हणाला. "झालं एवढं पुरे! विज्ञानासाठी मी भरपूर रक्त सांडलं. उरलेल्या माझ्या रक्ताचा मला दुसऱ्या कारणांसाठी वापर करायचाय."

त्याच दिवशी पावेलने मध्यवर्ती समितीला पत्र लिहून खुलासा केला की, वैद्यकीय उपचारांसाठी इतस्ततः भ्रमंती करण्यात आता काही अर्थ राहिला नव्हता, तेव्हा मॉस्कोत त्याची बायको काम करीत होती तेथेच राहण्याची त्याची इच्छा होती. मदतीसाठी पक्षापुढे त्याने प्रथमच हात पसरला होता. त्याची विनंती मान्य करण्यात आली आणि मॉस्को सोविएतने त्याला रहायला फ्लॅट दिला. पुन्हा कधीही न येण्याची आशा बाळगून पावेलने इस्पितळ सोडले.

क्रापोत्कीन्स्काया रस्त्याच्या बाजूच्या एका निवांत गल्लीच्या कोपऱ्यावरची त्याची खोली म्हणजे त्याच्या दृष्टीने सुखाची परमावधी होती. अनेकदा रात्री जाग येऊन पावेल उठायचा तेव्हा इस्पितळ हे त्याच्या दृष्टीने भूतकाळात जमा झाले होते यावर विश्वास ठेवणे त्याला कठीण जायचे.

ताया आता पक्षाची पूर्ण सभासद झाली होती. वैयक्तिक जीवनात तिची शोकांतिका असली तरी कारखान्यातील धडक कामगारांच्या ती मुळीच मागे नव्हती. ह्या शांत स्वभावाच्या, निगर्वी तरुणीला कारखान्याच्या ट्रेड युनियन कमिटीवर निवडून देऊन तिच्या सहकारी कामगारांनी तिच्याविषयीचा आपला आदर व्यक्त केला होता. आपली बायको अस्सल बोल्शेविक बनत चालल्याचा पावेलला खूप अभिमान वाटायचा व स्वतःच्या शारीरिक यातना सोसणे त्याला सुसह्य व्हायचे.

काही कामासाठी बाझानोवा मॉस्कोला आली होती तेव्हा ती पावेलला भेटली. खूप वेळपर्यंत ते बोलले. लढाऊ पक्ष-कार्यकर्त्यांमध्ये परत जाण्याच्या आपल्या योजना तिला सांगताना पावेल कमालीचा उत्तेजित झाला होता.

बाझानोवाने पावेलच्या कपाळावरील रूपेरी बटेकडे पाहिले व हळुवार आवाजात ती म्हणाली :

"तुम्ही खूप मोठ्या संकटातून गेलात ते मी पाहतेय. पण तरी तुमचा उत्साह अजिबात कमी झालेला नाही. आणि महत्त्वाची तीच बाब आहे. गेली पाच वर्षं ज्या कामाची तुम्ही तयारी चालवली आहे ते काम लौकरच सुरू करताय याचा मला खूप आनंद होतोय. पण कशा पद्धतीनं तुम्ही काम करणार ?"

पावेलने शांत स्मित केले.

"उद्या माझे मित्र माझ्यासाठी एक कार्डबोर्ड स्टेन्सिल घेऊन येणार आहेत. त्यामुळं ओळींचा घोटाळा न करता मला लिहिणं शक्य होईल. त्याच्याशिवाय मला लिहिता येणार नाही. खूप विचार केल्यानंतर मला ही कल्पना सुचली. कार्डबोर्डच्या कडक कडांमुळं माझी पेन्सिल वाकड्या ओळीत जाणार नाही. आपण काय लिहितोय ते न पाहता लिहिणं अर्थातच खूप अवघड आहे. पण ते अशक्य मात्र नाही. मी प्रयत्न करून पाहिलाय आणि मला लिहिता येतं. ते तंत्र अवगत करायला थोडा वेळ लागला. आता अधिक हळू हळू लिहायला, प्रत्येक अक्षर वळणदार काढायला मी शिकलोय आणि त्याची निष्पत्ती समाधानकारक आहे."

अशा रीतीने पावेलने काम सुरू केले.

पराक्रमी कतोवस्की डिव्हिजनविषयी एक कादंबरी लिहिण्याची योजना त्याने आखली. शीर्षक त्याला सहजच स्फुरले : 'वादळातून जन्मलेले.'

त्याच्या सर्व जीवनशक्ती ह्या पुस्तकाच्या लेखनात एकवटल्या. हळू हळू एकेक ओळीमधून, पाने तयार होऊ लागली.

…च्या भोवतालच्या सर्व गोष्टींना विसरून तो लिहिण्यात …ग्न झाला होता, प्रतिमांच्या जगात बुडाला होता. पहिल्यांदाच …ला निर्मितीच्या कळा जाणवल्या होत्या. ठसठशीत, …स्मरणीय असे मन:चक्षूंसमोर स्पष्ट दिसणारे प्रसंग कागदावर …त्र फिके आणि निर्जीव उतरतात तेव्हा कलावंताला किती दु:ख होते, याचा त्याने अनुभव घेतला.

त्याने लिहिलेले सर्व काही, अगदी शब्द न् शब्द, त्याला आठवावे लागे. थोड्याशा अडथळ्याने त्याचा विचाराचा धागा तुटे व कामात व्यत्यय येई. आपल्या मुलाच्या ह्या उद्योगाकडे आई धास्तावून पहात होती.

काही वेळा तर केवळ स्मरणशक्तीच्या जोरावर तो पानेच्या पाने आणि प्रकरणेसुद्धा घडाघडा म्हणत असे. अशा वेळी तो भ्रमिष्ट होत चाललाय अशी त्याच्या आईची कल्पना होई. तो काम करीत असताना त्याच्या जवळ जाण्याचे तिचे धाडस होत नसे. पण जमिनीवर पडलेले कागद गोळा करताना भीत भीत ती म्हणे:

"पावलूशा, थोडं दुसरं काही काम केलंस तर बरं होईल बाबा. सारा वेळ असं लिहीत बसणं चांगलं नव्हे..."

तिच्या धास्त्यांना तो मनापासून हसे आणि तिला पटवून देई की, तिने काळजी करायचे काही एक कारण नव्हते. "अजून तो वेडा झाला" नव्हता.

पुस्तकाची तीन प्रकरणे पुरी झाली होती. कतोवस्की डिव्हिजनमध्ये लढलेल्या आपल्या जुन्या मित्रांचे कादंबरीबाबतचे मत अजमावून पाहण्यासाठी पावेलने ते हस्तलिखित अदेस्साला पाठविले. लौकरच त्या मित्रांकडून प्रशंसापर पत्र

आले. पण उलटटपाली येणारे हस्तलिखित वाटेतच कुठेतरी गहाळ झाले. सहा महिन्यांच्या कामावर पाणी पडले होते. हा त्याला फार मोठा धक्का होता. आपल्याजवळची एकुलती एक प्रत पाठवल्याचा त्याला विलक्षण पश्चात्ताप झाला. ही हकिकत लेदेनेवना समजली तेव्हा त्यांनी पावेलची खडसून हजेरी घेतली.

"असा कसा तू निष्काळजी वागलास? असो. उतू गेलेल्या दुधाबद्दल पश्चात्ताप करून काय उपयोग? पुन्हा कामाला सुरुवात कर."

"पण माझं सहा महिन्यांचं काम वाया गेलं. दररोज आठ तासाचे काबाडकष्ट पाण्यात गेले. दुसऱ्यांच्या जिवावर जगणाऱ्यांचा नायनाट होवो!"

लेदेनेवनी आपल्या मित्राचे सांत्वन करण्याचा खूप प्रयत्न केला.

पुन्हा नव्याने सुरुवात करण्यावाचून दुसरा मार्ग नव्हता. लेदेनेवनी पावेलला कागद पुरविले आणि हस्तलिखिताच्या टंकलिखित प्रती काढण्यास मदत केली. सहा आठवड्यांनंतर पहिले प्रकरण पुन्हा लिहून झाले.

कोर्चागिन कुटुंब ज्या फ्लॅटमध्ये रहात होते त्याच्याच एका भागात अलेक्सेयेव नांवाचे कुटुंब रहात होते. सर्वांत मोठा मुलगा अलेक्सान्द्र हा कम्सामोलच्या एक विभागीय समितीचा चिटणीस होता. त्याची बहीण गाल्या ही अठरा वर्षांची चुणचुणीत मुलगी कारखाना प्रशिक्षण शाळेत शिकली होती. "चिटणीस" म्हणून गाल्या आपल्याबरोबर काम करील काय, अशी पावेलने आईमार्फत विचारणा केली. गाल्या आनंदाने तयार झाली. प्रसन्न हसऱ्या चेहऱ्याने ती पावेलकडे काम करण्यासाठी आली आणि पावेल कादंबरी लिहीत

होता हे तिला समजले तेव्हा कमालीची आनंदित झाली.

"कॉम्रेड कोर्चागिन, मी तुम्हाला आनंदानं मदत करीन," ती म्हणाली. "सामुदायिक घरांमध्ये स्वच्छता कशी राखावी याबद्दलची रुक्ष जाहीर निवेदनं वडलांसाठी लिहिण्यापेक्षा तुमचं काम कितीतरी छान आहे."

त्या दिवसापासून पावेलचे काम दुप्पट वेगाने होऊ लागले. एका महिन्यात खरोखरीच एवढे काम झाले की, पावेल स्वतःसुद्धा चकित झाला. गाल्याचा सक्रिय सहभाग आणि तिची सहानुभूती, यांची त्याला फार मदत झाली. तिची पेन्सिल वेगाने कागदावर कुरूकुरू चालायची आणि एखादा परिच्छेद तिला आवडला म्हणजे ती अनेकदा मोठ्याने वाचायची. अशा रीतीने पावेलच्या यशामध्ये ती सर्वार्थाने आनंद घेत होती. त्याच्या कामाबद्दल त्या घरात फक्त तिलाच विश्वास वाटत होता. बाकी कुणालाही त्यातून काही निष्पत्ती होईल असे वाटत नव्हते. आपल्यावर लादलेले सक्तीचे रिकामपण पावेल रेटत होता एवढीच साऱ्यांची भावना होती.

काही कामासाठी बाहेर गेलेले लेदेनेव जेव्हा मॉस्कोत परत आले तेव्हा त्यांनी पावेलने लिहिलेली काही प्रकरणे वाचली व अभिप्राय दिला:

"मित्रा, काम पुढं चालू ठेव. तू जिंकशील याबद्दल मला मुळीच शंका नाही. पावेल, तुझ्या वाट्याला फार मोठं सुख वाढून ठेवलंय. पक्षात सक्रिय काम करण्याचं तुझं स्वप्न लौकरच खरं ठरेल असा माझा ठाम विश्वास आहे. पोरा, आशा सोडू नको."

पावेलला एवढा जोम आलेला पाहून तो वयोवृद्ध माणूस अत्यंत समाधानाने परत गेला.

गाल्या नियमाने येत होती. अविस्मरणीय भूतकाळातील प्रसंग पानांवर पुनरुज्जीवित होत असताना तिची पेन्सिल विलक्षण वेगाने काम करीत होती. पावेल जेव्हा काही क्षण विचारात गढून जात असे आणि आठवणींच्या आवेगाने त्याच्या पापण्या थरथरत असत तेव्हा गाल्या त्याला एकटक पहात रहायची. त्याच्या डोळयांमध्ये विचारांचा ओघ धावत असलेला पहायची. एवढ्या नितळ-स्वच्छ डोळयांना, निष्कलंक बाहुल्यांना, काहीही दिसत नव्हते यावर कुणाचा विश्वास बसला नसता.

दिवसभराचे काम संपल्यानंतर जे काही लिहिलेले असे ते गाल्या वाचायची आणि कपाळाला आठ्या घालून पावेल एकतानतेने ऐकायचा.

"कॉम्रेड कोर्चागिन, तुमच्या कपाळाला आठ्या का? लेखन मनासारखं उतरलं नाही का?"

"गाल्या, माझं लेखन अगदीच वाईट झालंय." तो म्हणायचा.

त्याला न आवडलेली पाने तो स्वत: पुन्हा लिहून काढायचा. स्टेन्सिलची अरुंद पट्टी त्याला काही वेळा त्रासदायक वाटायची व धीर सुटून तो ती फेकून द्यायचा. आयुष्याने आपल्याला दृष्टीसुखापासून वंचित केले ह्या विचाराने मग तो संतापायचा, पेन्सिली मोडून टाकायचा आणि रक्त येईपर्यंत ओठ चावायचा.

काम संपत आले तसे बांध घातलेल्या भावना वारंवार अनावर होऊ लागल्या. त्याच्या सदैव दक्ष निर्धारावर मात करू लागल्या. दु:खाचे आणि स्वाभाविक मानवी भावनांचे त्याला उमाळे येऊ लागले. आजवर त्याने या भावनांना आपल्या मनात थारा दिला नव्हता. पण त्या भावनांपैकी एका जरी भावनेच्या तो आहारी गेला असता तर त्याचे

परिणाम फार वाईट घडले असते याची त्याला जाणीव होती.

ताया कारखान्यामधून संध्याकाळी खूप उशीरा घरी यायची आणि पावेलच्या आईशी चार शब्द बोलून बिछान्यावर अंग टाकायची.

सरतेशेवटी अखेरचे प्रकरण लिहून पुरे झाले. पुढचे काही दिवस गाल्या सारे पुस्तक मोठ्यांदा पावेलला वाचून दाखवत होती.

उद्या हस्तलिखित लेनिनग्रादला प्रादेशिक पक्ष समितीच्या सांस्कृतिक विभागाकडे पाठवण्यात यायचे होते. तिथे पुस्तक मंजूर झाले असते म्हणजे ते प्रकाशकांच्या हवाली करता आले असते आणि मग...

त्या विचारासरशी त्याचे काळीज धडधडले. सारे काही सुरळीत झाले असते तर एका नव्या जीवनाला आरंभ झाला असता. अनेक वर्षांच्या अविश्रांत, अथक श्रमांमधून निर्माण झालेले नवे जीवन!

पावेलचे भवितव्य त्या पुस्तकाच्या भवितव्यावर अवलंबून होते. जर हस्तलिखित परत आले असते तर त्याच्या दृष्टीने सारेच संपले होते. याउलट जर ते काही अंशी वाईट ठरले असते, अधिक परिश्रमांनी त्यातील दोष काढून टाकण्यासारखे असते, तर त्याने नवी चढाई सुरू केली असती.

त्याच्या आईने हस्तलिखिताचे पार्सल स्वतः टपाल कचेरीत नेले. आतुरतेने वाट पाहणे सुरू झाले. यापूर्वी कधीही पावेलने एवढ्या आतुरतेने पत्राची वाट पाहिली नव्हती. सकाळपासून संध्याकाळपर्यंत तो केवळ टपालाची वाट पहात जगत होता. पण लेनिनग्रादहून काहीही बातमी येत नव्हती.

प्रकाशकांचे अखंड मौन अनिष्टसूचक वाटू लागले. दर दिवसागणिक अभद्राची शक्यता वाढत चालली आणि पुस्तक जर सपशेल नाकारले गेले तर आपला निकाल लागेल अशी पावेलची स्वतःपुरती धारणा बनली. ती गोष्ट सहन करणे त्याला शक्य नव्हते. जगण्यासारखे त्यापुढे काही उरणार नव्हते.

अशा क्षणी समुद्रकिनाऱ्यालगतचे टेकडीवरचे उद्यान त्याला आठवायचे आणि एकच प्रश्न तो पुनःपुन्हा स्वतःला विचारीत रहायचा :

"पोलादी साखळया तोडून पक्षात परत जाण्याचे, स्वतःला उपयुक्त बनविण्याचे सारे यत्न तू केलेस का?"

आणि त्याला स्वतःचे उत्तर मिळायचे: "होय. माझ्या मतानं मी सारं काही केलंय!"

शेवटी वाट पाहण्याची वेदना जेव्हा असह्य झाली, पावेलची आईही त्याच यातना सोसत होती, अशा वेळी एक दिवस ती ओरडतच पावेलच्या खोलीत धावत आली :

"लेनिनग्रादहून पत्र आलंय!"

प्रादेशिक समितीकडून तार आली होती. त्रोटक भाषेत तारेचा मजकूर होता: "कादंबरी मनपसंत आहे. प्रकाशकांकडे सोपवलीय. तुमच्या यशाबद्दल अभिनंदन."

पावेलच्या काळजाचे ठोके वेगाने पडू लागले. त्याचे उरी बाळगलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरले! पोलादी बंधने तुटून पडली होती आणि आता नव्या शस्त्रानिशी सज्ज होऊन तो परत लढवय्यांच्या तुकडीत आणि जीवनात उतरला होता.

१९३०-१९३४

निकोलाय अस्त्रोवस्की १९०४ पासून १९३६ पर्यंत आपले अल्प पण शौर्यशाली जीवन असे जगले. यादवी युद्धात रणांगणावर वयाच्या २० व्या वर्षी त्यांना जबरदस्त जखमा झाल्या व अपंग बनून ते अंथरुणाला खिळले. पुढे हळूहळू त्यांना त्यातून अंधत्व येत गेले. पण त्या तशा अवस्थेत त्यांनी 'अग्निदिव्य' ही स्फूर्तिदायक कादंबरी लिहिली. ही कादंबरी तरुणांविषयी आहे, प्रेम आणि संघर्षाविषयी आहे, त्यांचे मित्र आणि साथी यांच्याविषयी आहे, आरंभीच्या सोविएत काळामधील कम्युनिस्ट युवक संघाच्या सदस्यांविषयी आहे.

कादंबरीमधील बहुतेक व्यक्तिरेखा प्रत्यक्ष जीवनामधील लोकांवरून रेखाटल्या आहेत. मुख्य नायकाचे – पावेल कोर्चागिनचे – व्यक्तिचित्रण बहुतांश आत्म-चरित्रात्मक आहे.

'खऱ्या माणसाची कहाणी'चे लेखक बरीस पोलेवोय म्हणतात: "पावेल कोर्चागिन पर्वतांना ओलांडून आणि महासागरांना पार करून जगाची सफर करीत आहे. सर्व देशांमधील वाचकांमध्ये त्याला चांगले मित्र लाभले आहेत."